वास्को डी गामा* ह्यानें ज्या मुलुखांचा शोध लावला, त्या ठिकाणीं पूर्वी फार प्राचीन काळापासून अति विस्तृत राष्ट्रें हयात होतीं. तीं राष्ट्रें नाहींशीं करून त्या ठिकाणीं नवीन अंमल सुरू करतां येईल, असें युरोपांतून गेलेल्या नवीन लोकांस वाटलें नाहीं. परंतु कोलंबसानें ज्या मुलुखांचा शोध लाविला, त्या ठिकाणीं अशा प्रकारचीं दोनच राज्यें होतीं; परंतु हीं राज्यें फारशीं मजबूत नव्हतीं, असें लौकरच दिसून आलें. कोलंबस ह्यानें यूरोपीयन व अमेरिकन लोकांचा जो नवीन संबंध जोडला, तो फार चमत्कारिक व पक्का असल्यामुळें त्याजपासून पुढें फार निकराचें युद्ध सुरू झालें, व जगाच्या इतिहासांत ज्या कांहीं हकीकती अंगावर शहारे येण्यासारख्या आहेत, त्यांतच ह्या युद्धाची गणना आहे. हें दोन बरोबरीच्या राष्ट्रांत सुरू नव्हतें. ज्याप्रमाणें मेंढराच्यानें लांडग्याशीं टक्कर देणें कधीं व्हावयाचें नाहीं, त्याप्रमाणेंच युरोपांतील राष्ट्रांशीं सामना करणें ह्या अमेरिकेंतील रानटी लोकांच्या हातून घडण्यासारखें नव्हतें. पेरु सारख्या देशांत लोकसंख्या जास्त होती व राज्यव्यवस्थाही सुरळीत चालली होती. तरीसुद्धां तेथील लोकांच्यानीं युरोपियन लोकांपुढें टिकाव धरवला नाहीं. सर्व प्रदेश जिंकला गेला. तेथील राजघराण्यांचा समूळ नाश झाला. सर्व लोक गुलाम होऊन युरोपियन लोकांच्या ताब्यांत आले. जिकडे जिकडे युरोपियन लोक गेले, तिकडच्या मूळच्या सर्व लोकांचा नेहमीं पराजयच होत चालला, व जय मिळालेल्या लोकांनीं हस्तगत झालेल्या मुलुखाची मर्जीप्रमाणें वांटणी केली. हिंदुस्थानांत परकीय लोक आले होते; तरी त्यांनीं आपलें शौर्य हिंदुस्थानांतील लोकांपुढें एकदम प्रगट केलें नाहीं. हळु हळु ते वरचढ होत गेले. परंतु अमेरिकेंत तसें झालें नाहीं. ज्याप्रमाणें पारधी लोक हरणावर एकाएकीं हल्ला

* टीप.—* पान ९६ पहा.

करून त्याचा पाठलाग करितात, त्याप्रमाणेंच यूरोपियन लोकांनीं अमेरिकेंतील मूळच्या रहिवाशांची शिकार करून, त्यांची अगदीं दाणादाण करून सोडली. अशीच स्थिति चहुंकडे झाली. अमेरिकेंत त्या वेळीं असलेल्या देशांचे दोन विभाग करतां येतील. मध्य अमेरिका आणि दक्षिण अमेरिका; त्यांतील बहुतेक प्रदेश स्पेन आणि पोर्तुगाल यांचे वांटणीस आले; व उत्तर अमेरिकेंतील प्रदेश इंग्लंडचे वांट्यास आले. मेक्सिको, पेरू व दक्षिण अमेरिकेंतील दुसरे कित्येक देश ह्यांत लोकसंख्या इतर प्रदेशांप्रमाणें थोडी नव्हती. तरी यूरोपियन लोकांशीं ताडून पाहतां ती अगदीं निर्बल होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांची गणना लाखांनीं होत असे. मनुष्यें प्रथम अगदीं रानटी असतात, शेतकी करून उपजीविका करण्याची त्यांच्या अंगीं शक्ति येणें ह्मणजे बरीच सुधारणा समजावयाची. तर इतक्या सुधारणेस ते लोक येऊन पोंचले होते. त्यांच्यांत शहरें वगैरे स्थापन झालीं होतीं. परंतु उत्तर अमेरिकेंतील युनायटेड् स्टेट्स् आणि कानडा ह्यांजमध्यें मोडणाऱ्या मुलुखांत जे लोक राहत असत, ते वरील लोकांच्या मानानें फारच रानटी होते. “ शिला पर्वत ” (रॉकी माऊन्टन) नांवाची उत्तर अमेरिकेंत दक्षिणोत्तर एक पर्वताची मोठी ओळ आहे. तिच्या पूर्वेकडील संस्थानांची मूळची लोकसंख्या अमेरिकेचा शोध लागल्यानंतर तीन लाखांपेक्षां कधींही जास्त नव्हती, ह्यापेक्षां कमीच होती, असा अजमास आहे. ह्मणून स्पेन देशचे लोक दक्षिण अमेरिकेंत तेथें मूळ असलेल्या लोकांतच जाऊन राहिले. परंतु उत्तर अमेरिकेंत तर इंग्रज लोकांनीं मूळचे लोकांस अगदींच नाहींसें करून टाकिलें. जसजसे ते पश्चिमेकडे वसाहती करीत गेले, तसतसे मूळचे लोकांस तें पश्चिमेकडे जास्त हट-

वीत चालले. अशा प्रकारें त्या मूळच्या लोकांशीं आपलें मिश्रण होण्याचा प्रसंग तेथील यूरोपियन लोकांना कधींच आला नाहीं.

अखेरीस सुदैवेंकरून वास्को डि गामा आणि कोलंबस ह्या उभयतांनीं शोध लावलेले मुख्य मुख्य प्रदेश इंग्रजांकडेसच आले. इकडे सर्व हिंदुस्थान देश त्यांचे ताब्यांत आला. पश्चिमेकडे अमेरिकेंतील त्यांच्या वसाहतींमुळें एक मोठेंच नवीन राज्य स्थापन झालें. ह्या नवीन वसाहत केलेल्या प्रांतांत मजबूत ह्मणण्यासारखीं मूळचीं राज्यें मुळींच नव्हतीं, व त्यांतूनही इंग्रजांनीं ज्या प्रांतांत वसाहती केल्या ते प्रांत तर बहुतेक अंशीं ओसाड होते. अलीकडे आस्ट्रेलिया नांवाचें जें मोठें महाद्वीप इंग्रजांचे ताब्यांत आलें आहे त्याचीही पूर्वी अशीच स्थिति होती. ही गोष्ट फार महत्वाची आहे, हें पुढें कळून येईल.

वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, " इंग्लडचें साम्राज्य " ह्या शद्बांचा अर्थ इंग्रज लोक जातीनें पुष्कळ ठिकाणीं पसरले, इतकाच नसून, त्यांचा अंमलही त्या ठिकाणीं पसरला, असा आहे. असें आहे तरी, ह्या विस्तृत राज्याचा विचार करितांना इंग्रज लोक जातीनें पुष्कळ पसरले, हीही गोष्ट फार महत्वाची आहे. जेव्हां एखाद्या राष्ट्रांतील लोक परमुलखांत जाऊन पसरले असतांही, त्या ठिकाणीं मूळ देशाचा अंमल सुरू होत नाहीं, तेव्हां नीतिमत्ता व बुद्धिमत्ता यांचे संबंधानें पसरलेल्या लोकांचें वजन जरी अतोनात वाढतें, तरी राष्ट्रीय सत्ता व शक्ति वाढली, असें होत नाहीं. त्यास उदाहरण ग्रीक लोकांचें वर देण्यांत आलेंच आहे. परंतु एखाद्या राष्ट्रांतील लोकांचा अंमल जेव्हां परक्या ठिकाणीं वाढतो, तेव्हां निराळाच प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो. हा अंमल मुद्दाम घडवून आणलेला असल्यामुळें त्यास बराच अपाय होण्याचा संभव

असतो. पुष्कळ राष्ट्रें विस्तृत झालीं ह्मणजे त्यांची बहुतकरून अशीच स्थिति होते. ह्मणजे त्यांजला जास्त संकटें उत्पन्न होतात. हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याची सुद्धां अशीच स्थिति आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांत इंग्रजांचा अंमल जरी मजबूद आहे तरी तद्देशीय लोकसंख्येच्या मानानें, इंग्रजांची लोकसंख्या, समुद्रांत थेंब, ह्या प्रमाणांत आहे. एका राष्ट्राचे लोक जेव्हां दुसऱ्या ठिकाणीं राहण्यास जातात, तेव्हां बहुधा असें घडतें कीं, त्या नवीन मुलुखांत जे दुसरें लोक राहणारे असतात, त्यांस जरी त्यांनीं जिंकिलें असलें, तरी त्यांचा समूळ नाश करणें अगर त्यांस समूळ त्या प्रदेशांतून काढून लावणें फार कठीण असतें. असें जेव्हां घडून येतें तेव्हां नवीन स्थापलेल्या अंमलास फार मोठे धोके प्राप्त होतात. वसाहत केलेल्या मुलुखांत मूळचे निरनिराळ्या जातीचे लोक राहत असतात, त्या सर्वांचें एकीकरण होणें शक्य नसतें. त्याजमुळें राज्याला निरंतर भीति असते. इंग्रजी राज्याचें हें सुदैवच समजलें पाहिजे कीं, हीं वरील संकटें त्याजवर फारशीं येण्यासारखीं नाहींत, अशा प्रकारचा त्याचा विस्तार आहे. कारण त्यांनीं कबजांत आणिलेले प्रांत पूर्वी बहुतेक ओसाड होते, ह्मणून त्यांस पाहिजे तिकडे वसाहत करण्यास मोकळीक सांपडली. जो कोणी नवीन प्रांतांत वसाहत करण्याची इच्छा धरी, त्यास पाहिजे तितकी जागा सांपडे; व मूळचे रहिवाशी लोक इतके निःसत्व असत कीं, इंग्रज लोक अगदीं शांततेनें जरी त्या ठिकाणीं येऊन राहूं लागले असते, तरी त्यांच्याशीं ह्यांस टिकाव धरतां आला नसता. मग इंग्रज लोक केवळ युद्धाची तयारी करून त्यांजबरोबर सामना करण्यासच आले असते, तर त्या बिचाऱ्यांचें काय झालें असतें, हें सहज समजत आहे.

हें आमचें वरील ह्मणणें एकंदरीनें खरें आहे. पुरातनचीं महाराष्ट्रें

अगदीं निःसत्व असत. कसें तरी करून भिन्न जातीचे लोकांस एकवट करून तीं स्थापन झालेलीं असत; तशी इंग्लिश साम्राज्याची स्थिति नसल्यामुळें त्यास पूर्वीच्या प्रमाणें भीति नाहीं. केव्हां केव्हां असे उद्गार निघतात कीं, इंग्लिश साम्राज्यांत एकी अशी बिलकूल नाहीं; साधारण प्रयत्नानें सुद्धां त्याचा भंग होईल. अशा लिहिण्याचा हेतु काय असावा, तो आपण पुढें पाहूं; तरी आमचें असें ह्मणणें आहे कीं, पुष्कळ महाराष्ट्रें अगर प्रजासत्ताक राज्यें, ह्यांच्या ठिकाणीं जी मजबुदी सामान्यतः नसते, ती मजबूदी ह्या इंग्लिश राज्यांत आहे. उदाहरणार्थ, आस्ट्रियाच्या राज्यास ही भीति आहे; कारण त्यांत जर्मन, स्लाव, माग्यार वगैरे भिन्न जातीचे लोक राहतात. स्वित्झर्लंडच्या प्रजासत्ताक राज्यांत तीन निरनिराळ्या भाषा चालू आहेत; परंतु इंग्लडचें राज्य जिकडे तिकडे एकजातीय आहे, असें ह्मणण्यास चिंता नाहीं.

तथापि ह्या ह्मणण्यास बरेच अपवाद आहेत. वर जे चार ब्रिटिश राज्याचे मुख्य भाग सांगितले, त्यांपैकीं एकासच ह्मणजे आस्ट्रेलियासच ही वरील गोष्ट वर सांगितल्याप्रमाणें अक्षरशः लागू पडेल. मनुष्यजातीसंबंधीं शास्त्ररीत्या जे शोध लागले आहेत, त्यांत आस्ट्रेलियन लोक इतके हलक्या प्रतींत गणले आहेत कीं, त्यांजकडून कोणासही बिलकुल उपद्रव होण्याचा संभव नाहीं. परंतु ह्याच भागांत न्यू झीलंड नांवाच्या बेटाची गणना आह्मीं केलेली आहे. ह्या बेटाच्या उत्तर भागांत मावरी ह्मणून लोक राहतात; ज्याप्रमाणें गेल्या शतकांत ग्रेट ब्रिटनच्या उत्तर भागांतील हायलंडर लोकांनीं इंग्रजांस बराच त्रास दिला, त्याचप्रमाणें हे मावरी लोक असून ते अगदीं तुच्छ मानण्यालायक आहेत, असें नाहीं. तथापि त्यांची एकंदर संख्या ४० हजारांहून जास्त नसून तीही दिवसेंदिवस जारीनें कमी होत चालली आहे. आतां दुसऱ्या भागाचा ह्मणजे मुख्यत्वें-

करून उत्तर अमेरिकेंतील कानडा नांवाखालीं मोडत असलेल्या वसाहतींचा विचार करूं लागलें ह्मणजे असें दिसतें कीं, ह्या वसाहतीपैकीं मुख्यमुख्यतरी आरंभीं इंग्रजांनीं वसविलेल्या नव्हत्या. जे फ्रेंच लोक प्रथम वसाहत करण्यास तिकडे गेले, त्यांनीं हे प्रांत जिंकून आपल्या ताब्यांत आणिलेले होते. एका राज्यांत भिन्न भिन्न जातीचे लोक राहत असल्यामुळें त्याजवर येणारीं संकटें जीं वर सांगण्यांत आलीं, तीं कानडामध्यें प्रथमारंभीं जबरदस्त होतीं. कानडापैकीं जो मुलूख प्रथम फ्रेंचांचे ताब्यांत होता, त्यास पुढें खालचा कानडा (लोअर कानडा) असें नांव मिळालें; व त्या ठिकाणीं इंग्रजांचें राज्य स्थापन झाल्यापासून त्यासच क्वेबेक प्रांत असें नांव देण्यांत आलें आहे. ह्या प्रांताची लोकसंख्या सुमारें १९ लक्ष आहे, व कानडांतील सर्व राज्याची लोकसंख्या ४९ लाखांपेक्षां जास्त नाहीं. हे ४९ लाख लोक प्राटेस्टंट धर्माचे इंग्रज असून वरील पंधरा लाख क्याथोलिक धर्माचे फ्रेंच आहेत. अशी भिन्न जातीची व भिन्न धर्माची लोकसंख्या कानडामध्यें असल्यामुळें नुकतींच ह्या प्रांतावर कांहीं संकटें आलीं होतीं. आस्ट्रिया आणि रशिया येथें ज्याप्रमाणें आपसांत कज्जे भांडणें नेहमीं सुरू असतात, त्याचप्रमाणें कानडामध्यें सुरू होती. हल्लींच्या व्हिक्टोरीया राणीच्या कारकीर्दीच्या आरंभीं कानडा प्रांतांत बंड* झालें, तें सर्वांस माहीत आहे. हें बंड स्वतंत्रता मिळविण्याचे उद्देशानें लोकांनीं केलें, असें प्रथमारंभीं दिसतें खरें; तरी ह्या बंडाचें मूळ कारण, हा जातिभेदाचा तंटा, हेंच होय. कारण

* कानडांतील बंडः—कानडा, हा उत्तर अमेरिकेंतील प्रांत मूळचा फ्रेंचांचा असून तो १७६३ सालच्या तहाच्या वेळीं फ्रेंचांनीं इंग्रजांच्या स्वाधीन केला. तेव्हांपासून तो त्यांच्याच ताब्यांत आहे. पण पुढें भांडणें सुरू झालीं. कारण जरी जुलूम वगैरे इंग्रजांनीं कांहीं केला नव्हता, तरी तो प्रांत इंग्रजांच्या उपयोगाकरितां होता, असें समजलें जाई; त्याप्रमाणें इंग्रज लोक तिकडे जाऊन राहूं लागले. थोडेच दिवसांनीं

पुढें ह्या बंडाची हकीकत लिहितांना लॉर्ड डरहाम यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें लिहून ठेविलें आहे. "मला वाटलें होतें कीं, ह्या बंडांत लोक सरकारावर उठतील; परंतु तसें न होतां एकाच राज्यांतील दोन जातीचे लोक आपसांत भांडूं लागले. बंड झालें तें सरकाराकडून कांहीं हक्क मिळ-

---

इंग्रजांचा भरणा फाराच झाला. तेव्हां त्यांचे व फ्रेंचांचे वाद होऊन वैमनस्यें, व तंटे सुरू झाले; तेव्हां त्यांचे निवारणार्थ छोटे पिट्ट मुत्सद्दी ह्यांनीं १७९१ त एक बिल पसार करून घेतलें; त्याप्रमाणें सर्व प्रदेशाचे उत्तर व दक्षिण कानडा असे दोन भाग करण्यांत आले व एकांत इंग्रज व दुसऱ्यांत फ्रेंच, असे राहण्याचेही भेद केले. हें करणें अगदीं चुकीचें आहे, असें फाक्स यानें सांगितलें. त्याचें ह्मणणें असें कीं, दोन्ही लोकांना एकमेकांशीं मिळून राहण्याची संवय लावून देणें, हें इष्ट आहे; परंतु त्याचें सांगणें कोणीं ऐकिलें नाहीं. पिट्टचा कायदा भांडणें बंद करण्यासाठीं केला होता खरा, पण त्यामुळें उलट तीं वाढलींच, कारण त्या कायद्याप्रमाणें ते लोक अगदींच भिन्न झाले. होतां होतां दोन्ही लोकांचीं सरकाराविरुद्ध गाऱ्हाणीं गेलीं. सन १८३१ त त्यांना अनुकूल अशी कांहीं देणगी देण्यांत आली, परंतु तिनें त्यांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं जास्तच मागण्या केल्या. नवीन गव्हर्नर नेमले. त्यांनीं, आपणास त्या मागण्या देऊं नये असा हुकूम आहे, ही गुप्त गोष्ट सर्वांस व्यक्त केली. पुढें १८३७ त रसेल साहेबानें कांहीं एक कायदा काढला, पण त्यांतसुद्धां कांहीं तडजोड निघाली नाहीं. तेव्हां त्या सालच्या नोव्हेंबर महिन्यांत बहुतेक बंड उद्भवलें. परंतु तें बंद पडलें. पुढें १८३८ च्या जानेवारींत रसेलनें दुसरी एक कल्पना काढली. ती अशी कीं, कानडाची राज्यव्यवस्था मोडून राज्यसूत्र एका मुख्य गव्हर्नर व हाय कमिशनर यांच्या हातांत यावें. ह्या जागेला लार्ड डऱ्हामची नेमणूक झाली. हा लोकपक्षाचा, हुशार, पण ह्मणेल तसें करणारा मनुष्य होता. त्यानें लोकांवर सक्तीनें अंमल चालविला. आणि थोडासा जो अधिकार त्याला दिलेला नव्हता, तोही त्यानें वापरला. तेव्हां त्याला परत येण्याविषयीं हुकूम गेला. सर जॉन कोलबोर्न ह्याजला त्याच्या जागीं नेमलें. डऱ्हाम परत येतो तोंच पुन्हा बंडाचीं चिन्हें उद्भवलीं. परंतु तीं कोलबोर्ननें मोडून टाकिलीं. पुढें कांहीं तरी व्यवस्था ताबडतोब करणें जरूर पडलें. त्याप्रमाणें डऱ्हामच्या रिपोर्टावरून एक कायद्याचा मसुदा तयार करण्यांत आला. त्यांतील मुख्य तत्वें ह्मणजे दोन जातींचीं वैमनस्यें मोडावीं, दोन्ही प्रांत एक करावे, राज्यरीतीचीं मूळतत्वें मोडूं नयेत, राज्यव्यवस्था गैरकायदेशीर असूं नये, व फ्रेंचांचें अज्ञान दूर करावें, अशीं होतीं. हें बिल पास झाल्यापासून तेथें शांतता आहे.

वून घेण्याकरितां नव्हे, तर आपसांतील तंट्यामुळें झालें." तथापि हल्लीं कानडांतील मूळचे लोक कमी कमी होत असून तेथील इंग्रज लोकांशीं मिळून जात आहेत. आणि प्रजेच्या मतानें त्यांच्या कल्याणाच्या पुष्कळ गोष्टी सरकारांनीं केल्यामुळें लोकांचीं मनें हल्लीं शांत होऊन त्यांच्यांत स्नेहभाव उत्पन्न होत आहे.

ब्रिटिश राज्याचा वेस्ट इंडियन ह्मणून तिसरा भाग आहे; त्या ठिकाणीं सुद्धां जातिभेदाचे तंटे बरेच आहेत. इंग्लंडच्या बाहेरील इंग्रज राज्याच्या इतिहासांत स्मरणीय असा एक विलक्षण प्रकार ह्याच भागांत आढळून येतो. तो सिद्धी (नीग्रो) लोकांचा गुलामांचा व्यापार होय. कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावला, त्याचाच जणुं हा परिणाम असावा. हा व्यापार बराच चालू असल्याचें प्रथम येथेंच दिसून आलें. जोंपर्यंत हा गुलामांचा व्यापार सुरू होता, तोंपर्यंत हे जातिभेदाचे तंटे सुरू नव्हते. कारण ज्या ठिकाणीं गुलामगिरीचा वास पूर्णपणें आहे, त्या ठिकाणीं लोकांच्या मनांत स्वजातित्वाचें वारेंही असण्याचा संभव नाहीं. तसेंच गुलामगिरीप्रत पावलेल्या लोकांनीं बंड करणें, व गुलाम नसून कितीही कमजोर असलेल्या लोकांनीं बंड करणें, ह्या दोहोंत फार अंतर आहे. परंतु गुलामांचा व्यापार जेव्हां बंद करण्यांत आला, तेव्हां गुलाम असलेले लोक मोकळे झाले. त्यांच्या निरनिराळ्या जातींप्रमाणें त्यांचा रंग पालटून त्यांचे आपसांतील भेद स्पष्ट होऊं लागले व असे लोक आतां स्वतंत्र होऊन इतर लोकांबरोबर आपले हक्कांविषयीं भांडूं लागले, ह्मणजे मात्र ह्या जातिभेदाचे तंटे फार पुढें येऊं लागतील. प्रस्तुतच्या वेस्ट इंडियन भागांत निदान हल्लीं तरी ह्या अडचणी फारशा आलेल्या नाहींत. कारण, नवीन वसविलेले प्रांत लहान लहान बेटें असून एकमेकांपासून पुष्कळ अंतरावर आहेत, ह्मणून परस्परांत स्नेहभाव फारसा नाहीं.

आतां चवथा भाग जो दक्षिण आफ्रिकेंतील मुलूख, त्यामध्यें हा जातिभेदाचा तंटा फारच मोठा आहे. येथें संकटोद्भव होण्याचा संभव दुप्पट आहे. कारण, हे प्रांत एकामागून दुसऱ्यानें असे दोन वेळ जिंकले गेले आहेत. प्रथम ह्या प्रांतांत डच लोकांनीं जाऊन तेथील लोकांस जिंकून त्यांच्यांत वसाहती केल्या व नंतर डच वसाहती इंग्रजांनीं जिंकून घेतल्या. एवढ्यावरून कानडाप्रमाणेंच आफ्रिकेंतील वसाहतींची स्थिति आहे, असें प्रथम दर्शनीं वाटेल; कारण कानडा प्रांतांत प्रथम फ्रेंच लोक जाऊन राहिले, व नंतर तो प्रांत इंग्रजांनीं जिंकून घेतला; परंतु कानडा व दक्षिण आफ्रिकेंतील प्रांत ह्यांत दोन भेद आहेत, ते असे. कानडा प्रांतांतील मूळचे लोक हळू हळू कमी होऊन गोरे लोकांत मिळून गेले, त्याप्रमाणें दक्षिण आफ्रिकेंतील मूळचे लोक नवीन वसाहत करणाऱ्या गोरे लोकांपेक्षां संख्येनें कमी कमी होत न जातां वाढतच जात आहेत, व त्यांच्यांत जें ऐक्य व सुधारणा करण्याची शक्ति दिसते, तशी अमेरिकेंतील मूळच्या लोकांत बिलकूल नव्हती. इ. स. १८७५ च्या खानेसुमारीवरून असें दिसतें कीं, केप कालनी येथील लोकांची एकंदर संख्या त्या वेळीं सुमारें साडेसात लाख होती. ह्यापैकीं सुमारें दोन हिस्से तेथील राहणाऱ्या लोकांचे व एक हिस्सा वसाहत करणाऱ्या युरोपियन लोकांचा होता. हे मूळचे लोक वसाहत करणाऱ्यांमध्येंच रहात असून त्यांच्याशिवाय आणखी पुष्कळ लोक नित्यशः मध्य आफ्रिकेच्या ओसाड प्रदेशांत इतके वाढत आहेत कीं, त्यांची गणतिच करितां येणार नाहीं. दुसरा भेद असा आहे कीं, कानडामध्यें वसाहत करणाऱ्या इंग्रज लोकांची संख्या इतकी सत्वर वाढली कीं, पूर्वीं वसाहत केलेले फ्रेंच त्यांच्यापुढें कांहींच नव्हते. ह्मणून थोड्याच वेळांत कानडा देशाची सर्व व्यवस्था इंग्रजी तऱ्हेची होऊन त्यांत फ्रेंचांचें नांवही राहिलें

नाहीं. सन १८३८ ह्या वर्षी फ्रेंचांनीं जें कानडा देशांत बंड केलें, तें केवळ मरतां मरतां हात पाय हालविणाऱ्या माणसासारिखें होतें. त्यांत खरोखर शौर्य बिलकूल नव्हतें. परंतु तशी स्थिति दक्षिण आफ्रिकेची नाहीं. मूळचे वसाहत करणारे डच लोक आहेत तसे असून इंग्रजांचा भरणा वाढावा तसा न वाढल्यामुळें त्यांची छाप डच लोकांवर अद्यापि बसली नाहीं, ह्मणून कानडापेक्षां त्या ठिकाणीं इंग्रजी अमलास जास्त अपाय आहे, ह्यांत संशय नाहीं.

इंग्रजांचें साम्राज्य जातित्वाचेसंबंधानें बहुतांशीं एकवट व अभिन्न आहे, असें ह्मणण्यास जे कांहीं अपवाद ह्मणून होते, त्यांचें येथपर्यंत कथन झालें; तरी ह्या क्षुल्लक अपवादांवरून वरील सामान्योक्तीस फारसा बाध येत नाहीं. ग्रेट ब्रिटनमध्येंसुद्धां वेल्स, स्काटूलंड, ऐर्लंड असे भेद असून मूळचे सेल्टस् नांवाचे लोक अद्यापि हयात आहेत, व त्यांच्या भाषाही इतक्या भिन्न आहेत कीं, प्रत्यक्ष इंग्रज लोकांसही त्या बिलकूल समजत नाहींत. असें असतांही जर सर्व ग्रेट ब्रिटनभर स्वजातित्व पूर्णपणें वसत आहे, असें आपण मानतों, तर एवढ्या विस्तृत इंग्लिश राज्यांतही थोडेसे फ्रेंच अथवा डच लोक अथवा थोडेसे काफर किंवा मावरी लोक असले ह्मणून सर्व राष्ट्राचें स्वजातित्व नष्ट झालें, असें ह्मणण्यास कांहीं कारण नाहीं.

अशा प्रकारचें एकीकरण ब्रिटिश अमलांत वसत आहे. ह्या गोष्टीचें महत्व आह्मांस ह्या अमलाच्या चिरस्थाइकतेचा विचार करतांना कळून येईल. ज्या गोष्टीच्या योगानें लोक एके ठिकाणीं बद्ध राहून एकसरकारानुरक्त होतात, अशा गोष्टी तीन आहेत. त्या ह्याः—समानजातित्व, समानधर्मत्व, व समानार्थित्व वसत असणें. ह्या सर्व गोष्टी कमीजास्त प्रमाणानें समकाळीं अगर भिन्नकाळीं एका ठिकाणीं

राहूं शकतील. आतां इंग्लंडचें एवढें विस्तृत राज्य फार दिवस न टिकतां लवकरच लयास जाईल, असें जेव्हां कोणी ह्मणतात, तेव्हां ह्या ह्मणण्याचें कारण ते असें दाखवितात कीं, ह्या सर्व राज्यांत वरील तीन गोष्टींपैकीं तिसरी गोष्ट ह्मणजे समानार्थित्व बिलकूल वसत नाहीं. ते असें ह्मणतात, "आस्ट्रिया व न्यू झीलंड कोणीकडे व इंग्लंड कोणीकडे. एक आहे मकर वृत्ताचे दक्षिणेस व दुसरें आहे उत्तर अक्षांश ९०° च्याही पलीकडे. तेव्हां ह्या उभयतांचें नफानुकसान कधींही समान असूं शकणार नाहीं. इतक्या अंतरावर असलेले निरनिराळे लोक एका अमलाखालीं राहणें अशक्य आहे, असें कोण ह्मणणार नाहीं ?" ह्या ह्मणण्यांत बरेंच तथ्य असलें पाहिजे; कारण ह्यास प्रत्यक्ष दाखलाही घडून आलेला आहे. गेल्या शतकांत अमेरिकेंतील इंग्लिश लोक इंग्लंडापासून स्वतंत्र झाले, ह्याचें कारण त्यांच्याशीं मिळून राहणें त्यांस फायदेशीर वाटलें नाहीं, हें होय. म्हणून ही गोष्ट जरी पुष्कळ महत्वाची आहे तरी भिन्न लोक एकवट करण्यास लागणाऱ्या ज्या दुसऱ्या दोन गोष्टी त्यांचा ब्रिटिश साम्राज्यांत अभाव नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्या सुरक्षितपणें त्यांत वसत आहेत. पुरातन काळीं भिन्न जातीच्या भिन्न धर्माच्या लोकांना जुलमानें एकवट करून स्थापन केलेलीं राज्येंसुद्धां कित्येक शतकेंपर्यंत बिनधोक चालत होतीं; मग हें ब्रिटिश साम्राज्य तर ह्या असल्या जुलमानें एकवट केलेल्या राष्ट्रांपैकीं खचीत नाहीं. ह्या राज्यांत घडून येत असलेलें एकीकरण फार दृढ आहे. जिकडे तिकडे एक जात आहे, एक धर्म आहे आणि जरी जातिधर्माचे ग्रंथि अभंग नाहींत, तरी ते फार मजबूद असून अतिशयच मोठी जेव्हां एखादी त्यांजवर ताण येऊन बसेल, तेव्हांच त्यांचा भंग होण्याचा संभव आहे.

"वसाहती" व त्या मिळून झालेलें "साम्राज्य" या दोन्ही

शब्दांचा अर्थ फार संदिग्ध असल्यामुळें इंग्रजांचें वसाहतींनीं झालेलें साम्राज्य कोणत्या स्थितींत आहे, ह्याचा इतका वेळ आह्मांस विचार करण्याची जरूर पडली. ग्रीक किंवा रोमन लोक ह्यांचे वेळेस ज्या वसाहती होत असत, तशा प्रकारच्या ह्या हल्लींच्या वसाहती नाहींत. त्या वेळेस जीं महाराष्ट्रें असत, तशा प्रकारचें हें इंग्लिश राज्य नाहीं. इंग्लिश साम्राज्य ह्याचा अर्थ सामान्य अर्थाप्रमाणें नसून त्यांत एक विशिष्ट अर्थ आहे. ह्मणून त्याच्या चिरस्थायिकतेचा विचार करितांना ह्या वरील गोष्टीचें महत्व आपण पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे.

पुरातन काळीं स्थिति कशी होती व हल्लीं कशी आहे, हें नीट समजावें ह्मणून अमेरिकेंत जीं कित्येक नवीन साम्राज्यें स्थापन झालीं, त्या सर्वांचा विचार करणें, आह्मांस भाग पडलें. ह्या नवीन उद्भवलेल्या साम्राज्यांतच इंग्लिश साम्राज्याचीही गणना आहे. आह्मीं मागें सांगितलेल्या अठराव्या शतकांतील इंग्लिश राज्यनीतीचा खरोखरी कल कोणीकडे व कसा होता, हें पूर्णपणें कोणी समजत नाहींत. सर्व असें मानीत आले आहेत कीं, अठराव्या शतकांत अमेरिका आणि एशिया इकडे इंग्लंडचा फारसा संबंध नव्हता. सर्व भानगडी फक्त युरोपांतच चालू होत्या. इंग्लंड देशाचें महत्व आपण कमी मानतों असें नाहीं, परंतु विस्तृत इंग्लिश साम्राज्याचें महत्व आपण खचीत कमी मानतों, ह्यांत संशय नाहीं. परंतु ही चुकीची कल्पना केवळ इंग्लिश राज्यासच लागू आहे असें नाहीं; तर अठराव्या शतकांत फ्रान्स, पोर्चुगाल, स्पेन आणि हालंड इत्यादि राष्ट्रांची अमेरिकेंत सत्ता होती, हेंही बहुतेक विसरून गेल्यासारखेंच दिसतें.

ह्मणून सतराव्या आणि अठराव्या शतकांत युरोपीयन राष्ट्रांचा जो कांहीं विशेष फेरबदल झाला, तो ह्या वरील गोष्टींत आहे. अमेरि

केंत वरील पांचही युरोपीयन राष्ट्रांचा अंमल ह्या वेळीं सुरू होता. सतराव्या शतकाचे पूर्वी अशी स्थिति होण्यास नुकताच प्रारंभ होत होता; आणि अठराव्या शतकानंतर ह्या स्थितीची समाप्तिही झाली. कोलंबसानें अमेरिका खंड शोधून काढल्यामुळें असंख्य व अमर्याद असे परिणाम घडून आले. तरी ते घडून येण्याचा क्रम अतिशयच मंद गतीनें चालला होता. ह्मणून अमेरिकेंत आपल्यास वांटा असावा, असें वरील राष्ट्रांपैकीं प्रत्येकास वाटूं लागलें. परंतु अशी गोष्ट केवळ मनांत येण्यासच सर्व सोळावें शतक निघून गेलें. बहुतेक सोळावे शतकाचे अखेरीपर्यंत हॉलंड देश मुळीं स्वतंत्र स्थितींतच नव्हता; मग अर्थात्च ह्या देशाच्या परमुलखांत वसाहती असणें बिलकूल संभवत नाहीं. तसेंच, इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांच्याही इतर ठिकाणीं वसाहती नव्हत्या. उत्तर अमेरिकेंत वसाहती करण्याचे फ्रेंच लोकांनीं पूर्वींच बेत चालविले होते; ह्यास प्रमाण कारोलिना हें नांवच होय. फ्रान्सचा राजा नववा चार्लस ह्याच्यावेळीं ही वसाहत केलेली असल्यामुळें, त्याचेच नांवावरून त्या वसाहतीचें नांव पडलें असून, तें आजपर्यंत चालत आहे. तरी फ्लॉरिडामध्यें जे स्पेन देशाचे लोक राहत होते, त्यांनीं फ्रेंचांचे बेत सिद्धीस जाऊं दिले नाहींत. ह्या ठिकाणाच्याच आसपास सर वाल्टर राले ह्यानें जी वसाहत स्थापिली होती, तीही लवकरच नाहींशी होऊन तिचा मागें मागमूसही राहिला नाहीं. ह्यावरून सोळाव्या शतकांत पोर्चुगल, स्पेन, वगैरे ज्या राष्ट्रांकडून अमेरिकेचा शोध लागला होता, त्यांचेच ताब्यांत बहुतकरून तें खंड राहिलें. स्पेनची दृष्टि अमेरिकेवर होती; व पोर्चुगालची दृष्टि एशियाकडे होती. अखेरीस इ. स. १५८० या वर्षी उभय राष्ट्रांचा तह ठरला. हा तह, ६० वर्षेपर्यंत चालला. डच लोकांनींही इ. स. १५९५ पासून १६०२ ह्मणजे सुमारें सात वर्षेपर्यंत अमेरिकेंत वसाहती

करण्याचे प्रयत्न केले. त्यांचे पाठीमागून सतरावे शतकाचे आरंभींच ह्मणजे पहिला जेम्स राजा इंग्लंडांत राज्य करीत असतां, तें कृत्य इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांनीं तडीस नेण्याचें मनावर घेतलें.

नवीन वसाहती करण्याकरितां ह्या पांच राष्ट्रांची जी ही झटापट सुरू जाहली, ती १९ वे शतकांत थांबली. ती थांबण्यास दोन कारणें झालीं. एक तर अमेरिकेंत वसाहत करणाऱ्या लोकांनीं मूळ राष्ट्रापासून स्वतंत्र होण्याविषयीं लढाया केल्या. आणि दुसरें, इंग्रज लोकांनीं पुष्कळ मुलूख जिंकून आपले ताब्यांत घेतले. शंभर वर्षांची लढाई ह्मणून पूर्वी सांगण्यांत आलीच आहे. तिच्या योगानें फ्रान्सच्या ताब्यांतील प्रांत इंग्लंडचे ताब्यांत आले होते. त्याचप्रमाणें हालंड देशाच्या ताब्यांतीलही बहुतेक प्रांत इंग्लंडचे ताब्यांत गेले. केप् आफ् गुड् होप* आणि डेमेरारा† हे त्यांचे प्रांत इंग्लंडचे ताब्यांत आले. तरी जावा नांवाचें एक मोठें बेट अजून हालंडचे ताब्यांत आहे. हें बेट लहान नाहीं. ह्याची लोकसंख्या सुमारें एक कोट, नव्वद लाख होती. स्पेन आणि पोर्तुगाल ह्यांचे ताब्यांतील ठिकाणें गेल्यास अजून फार काळ गेला नाहीं. तीं गेलीं त्यावेळचे लोक अद्यापि आपणांमध्यें जिवंत आहेत. एखाद्या गोष्टीचें महत्व दोन तऱ्हेनें गणलें जाईल. एक ती गोष्ट घडतांना झालेल्या चळवळीवरून, व दुसरी त्या गोष्टीपासून झालेल्या पुढील परिणामांवरून. वरील ठिकाणें सर्व राष्ट्रांच्या ताब्यांतून जात चाललीं, ह्या गोष्टीचें महत्व जर वरील दुसऱ्या तऱ्हेनें पाहूं गेलें, तर जगाच्या इतिहासांत तें अतोनातच आहे, असें ह्मणावें लागतें. कारण दक्षिण व मध्य अमेरिका ह्यांस जें स्वतंत्र स्वरूप पुढें प्राप्त झालें, त्याचा आरंभ ह्या वेळीं जाहला. ही गोष्ट ह्या शतकाच्या

---

* केप् आफ् गुड् होपः—आफ्रिकेचा दक्षिण बिंदु.

† डेमेराराः—दक्षिण अमेरिकेंतील एक प्रांत.

विसाव्या वर्षाचे सुमारास घडून आली. नेपोलियन ह्यानें स्पेन आणि पोर्तुगाल यांजवर स्वाऱ्या केल्यामुळें, त्या देशांत बंडें सुरू झालीं. हींच बंडें त्या देशांच्या ताब्यांतील प्रदेश जाण्यास कारण झालीं. ह्मणून नेपोलियन ह्याच्या कृत्यांचा एक मोठा परिणाम असा झाला कीं, स्पेन, आणि पोर्तुगाल यांचा पर मुलुखांत पाडाव होऊन दक्षिण अमेरिकेस स्वातंत्र्य प्राप्त झालें.

ह्या भयंकर घडामोडीचें खरें स्वरूप थोड्यांसच माहीत आहे. ह्या घडामोडीच्या योगानें पश्चिम युरोपांतील इंग्लंडशिवाय करून बाकीच्या राष्ट्रांचा व अमेरिकेचा अर्थाअर्थी संबंध तुटला. हें आमचें ह्मणणें ठोकळ मानाचें आहे; अगदीं तंतोतंतच उतरेल असें नाहीं. कारण अद्यापिही स्पेनच्या ताब्यांत क्यूबा, पोर्टोरिको वगैरे बेटें आहेत; आफ्रिका खंडांत पोर्तुगालचे कांहीं प्रांत आहेत; उत्तर आफ्रिकेंत फ्रान्सच्या नवीन वसाहती हल्लीं स्थापन होत आहेत. तथापि ह्या चार राष्ट्रांची हल्लींची जगामध्यें स्थिति पूर्वीपेक्षां अगदीं भिन्न होऊन गेली आहे. ज्याप्रमाणें कोलंबसानें समुद्रांतरीं सफर करण्याचे पूर्वी ह्या राष्ट्रांची मर्यादा युरोपास सोडून गेली नव्हती, तद्वतच ती फिरून झाल्यासारखीच आहे. हें जें महदंतर पडलें तें प्रचारांत हल्लीं सहज समजण्यासारखें आहे. नुकतीच स्पेन देशाला दुःस्थिति प्राप्त जाहली होती. तेथील लोकांनीं बुर्बों* घराण्यांतील राजांस हांकून दिलें, व प्रजासत्ताक राज्य स्थापन करून त्याचा अनुभव घेऊं लागले. त्या देशांत ही गोष्ट जरी फार महत्वाची होती, तरी ती इतकी सुलभ रीतीनें घडून आली कीं, इतर

* इ. स. १८६८ या वर्षी बुर्बों घराण्यांतली स्पेनची राणी इझाबेला हिच्या जुलुमी अंमलाला त्रासून लोकांनीं बंड करून तिला गादीवरून काढून टाकिलें. ह्याप्रमाण बुर्बों घराण्याचा शेवट झाला. पुढें तेथें प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें.

राष्ट्रांस ती फारशी समजलीही नाहीं. हीच गोष्ट जर सतराव्या अगर अठराव्या शतकांत घडून आली असती, तर तिचे परिणाम सर्व जगास माहीत झाले असते; दक्षिण ध्रुवापासून तों उत्तर ध्रुवापर्यंत जे जे ह्मणून देश आहेत, त्या सर्वांत ह्या गोष्टीपासून जिकडे तिकडे दंगे सुरू झाले असते. तसेंच अलीकडे नुकत्याच ज्या घडामोडी* फ्रान्समध्यें झाल्या, त्याच जर १८ व्या शतकांत घडल्या असत्या, तर सेंट लारेन्स, उत्तर अमेरिकेंतील मोठीं सरोवरें आणि मिसिसिप्पी ह्या सर्वांस धक्का बसला असता. तसेंच त्यांचे योगानें दक्षिण हिंदुस्थानांतील संस्थानांतील संस्थानिक राजे ह्यांची हल्लींच्याहून कांहीं निराळीच स्थिति आज असती; गंगथडीचीही कांहीं चमत्कारिक स्थिति आज दिसती; अर्थात् सर्व हिंदुस्थान देश आज आहे ह्याहून आपल्यास अगदीं भिन्न दिसला असता; परंतु ह्या सर्व घडामोडी फक्त फ्रान्सांतच चालू होत्या. इतर ठिकाणीं त्यांना बरें वाईट ह्मणणारे लोक होते, परंतु कोणाच्याही स्वार्थाशीं त्यांचा संबंध न झाल्यामुळें इतर ठिकाणीं त्यांचे परिणाम घडून आले नाहींत.

---

* ह्या ठिकाणीं इ. स. १८७० सालच्या फ्रान्स व जर्मनी यांजमधील प्रसिद्ध भयंकर युद्धाचा उल्लेख असावा असें दिसतें, व हाच उल्लेख आणखी कित्येक ठिकाणीं असल्यामुळें, त्याची थोडक्यांत हकीकत देतों.

१८७० चा फ्रेंचांचा मोड झाला तो फ्रांको–जर्मन युद्धांत झाला. हें युद्ध उत्पन्न होण्याचें बाह्य मूळ स्पेनच्या गादीच्या वारसासंबंधाचा जो तंटा चालला होता, तें होय. परंतु युद्धाचें खरोखरी कारण फ्रान्साचा त्या वेळचा प्रतिराजा नेपोलियन ह्याची केवळ स्वार्थपरता हें होय. त्याच्या अमलाला लोक कंटाळले होते. सैन्यसुद्धां त्याचे विरुद्ध फितलेलें होतें. लोकांस स्वातंत्र्यसंबंधाच्या सवलती देऊन त्यांना संतोषविण्याचा त्याचा प्रयत्न जेव्हां निष्फळ झाला, तेव्हां सैन्यास बाहेरील युद्धाची लालूच दाखवून त्यास तूर्त आपल्या पक्षाचे करून घ्यावें, व लढाईत जय मिळाले ह्मणजे सैन्य आपल्यावर बहाल होईल आणि मग, आपलें पद निर्धास्त होईल, अशी कल्पना रचून त्यानें स्पेनच्या गादीच्या वारसासंबंधानें प्रशियाशीं प्रथम भांडण उकरून काढलें. स्पेनचा पंतप्रधान जनरल प्रिम् ह्यानें एक उमेदवार निवडून काढला. प्रशियाच्या राजाची त्याला अनुकूलता होती. तो प्रशियाच्या राजाचा लांबचा संबं-

ह्यावरून आह्मांस असें दिसतें कीं, सतराव्या व विशेषेंकरून अठराव्या शतकांत अमेरिकेचा व युरोपांतील पांच पश्चिम राष्ट्रांचा कांहींएक विशिष्ट संबंध जडला होता; ह्मणून ज्या कांहीं लढाया आणि तह वगैरे ह्या प्रांतांत झाले, ते घडवून आणण्यास हाच संबंध कारणीभूत झाला असून, त्या काळांत युरोपियन राष्ट्रांचे जे परस्परव्यवहार चालू होते, त्यांचेंही कारण अंशतः हाच संबंध होय. ह्मणून त्या वेळच्या लढाया, तह व युरोपीय राष्ट्रांचे इतर व्यवहार पूर्णपणें समजण्यास ह्या संबंधाची चांगली माहिती असली पाहिजे. मागील भागांत सांगितलेंच आहे कीं, फक्त युरोपखंडच ध्यानांत घेऊन त्याच्याबाहेर दृष्टि न फेंकली, तर वरील काळांतील इंग्लंड आणि फ्रान्सच्या युद्धपर्वाचें पूर्ण स्वरूप आपणांस समजणार नाहीं. तें समजण्यास सर्व जग अवलोकनांत घेतलें पाहिजे; ह्मणजे असें कळेल कीं, विस्तृत इंग्लंड आणि विस्तृत फ्रान्स अशीं हीं

धी होता खरा, परंतु त्याचा फ्रान्साशीं निकट संबंध होता. असें असूनसुद्धां प्रशियाची त्याजला असलेली अनुकूलता केवळ स्वार्थपर आहे, त्यांत राजाचा स्वराज्यवृद्धीचा हेतु आहे, असा प्रशियावर आरोप घालून त्यानें त्याजबरोबर लढाई करण्याची तयारी चालविली आणि लढाईचा हेतु प्रकट केला. हें करण्यांत तो अगदीं फसला. त्याला अशी खात्री होती कीं. स्वतःचें सैन्य आपल्यास पूर्णपणें अनुकूल आहे, व प्रशियाच्या विरुद्ध जर्मनीचा बादशाहा आपल्यास पूर्ण कुमक करील. परंतु ह्या दोन्ही गोष्टी खोट्या होत्या. त्याचें सैन्य तयार नव्हतें, व जर्मनी त्याच्या प्रतिकूल होता. ह्याप्रमाणें चुकीच्या माहितीनें त्यानें आपलें सैन्य प्रशिया व जर्मनी ह्या देशामध्यें घातलें. येथें रणकंदनास प्रारंभ झाला. प्रारंभ झाल्यापासून नेपोलियनचा मोडच होत गेला. त्याचा परिणाम असा झाला कीं, त्याजला फ्रेंचांनीं पदभ्रष्ट केलें. तो पदभ्रष्ट झाला, लोकांनीं राज्यसूत्र आपले हातांत घेतलें, तथापि युद्धाग्नि जो एकदां भडकला होता, तो कांहीं केल्यानें विझेचना. ह्या वेळीं इंग्लंडचें राज्यसूत्र धि आनरेबल मि. ग्लाड्स्टन ह्यांचे हातीं होतें. प्रधानमंडळानें ह्या युद्धांत अगदीं उदासीनतेचें स्वरूप घेतलेलें होतें, तथापि युद्धाग्नि विझविण्यासाठीं त्यानें मध्यंतरीं बराच प्रयत्न केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. तसेंच फ्रेंच गृहस्थ मोशो थियर्स, ह्यांनींही तडजोड करून तंटा मोडण्याचा प्रयत्न केला, पण तोही निष्फल झाला, व एव

दोन भव्य जगद्राष्ट्रेंच एक वेळ पृथ्वीभर झगडत होतीं, व तीं केवळ युरोपीयच होतीं असें नाहीं. त्याचप्रमाणें वरील दोन शतकांच्या हालंड, पोर्तुगाल आणि स्पेन ह्यांच्या इतिहासांचा विचार करितांना तीं राष्ट्रें ह्मणजे केवळ युरोपीय अशींच न समजतां इतर महाद्वीपांतही त्यांचा विस्तार त्यावेळीं पुष्कळ झाला होता, ही गोष्ट विसरतां कामा नये. ह्मणून ह्या ठिकाणीं हेंही सांगणें जरूर आहे कीं, त्यावेळची ती स्थिति आतां

माजतच चाललें. शेवटीं होतां होतां शत्रूंनीं खुद्द पारिस शहरावरच चाल केली, व शहरास वेढा देऊन बसले. राजधानीरक्षणार्थ फ्रेंचांचा मेळा फारच जमला. मोठ्या अभिमानी व शूर सरदारांनीं स्वतः तलवारी हातीं धरिल्या, पण त्यांना प्रशियन मुत्सद्दी व अतिहुशार व प्रसिद्ध वीर व्हॉन मोल्ट्के ह्यांच्याशीं सामना धरावयाचा होता. ह्या वीरानें अशी कांहीं मोहीम रचली, अशी कांहीं दक्षता ठेवली व अशी कांहीं मर्दुमकी केली कीं, त्याच्या पुढें एकंदर फ्रेंच वीरांचा पाड काय लागणार ! सन १८७१ तारिख १२ जानेवारीपासून तो तहत ता. १९ पर्यंत सात दिवस फ्रेंचांचा सारखा पराजयच होत गेला. सातवे दिवशीं पारिसच्या लोकांनीं शेवटला प्रयत्न केला; पण बिचाऱ्यांना त्यांतही यश आलें नाहीं. त्यांचा धान्याचा, पाण्याचा, वैरणीचा, दारूगोळ्याचा, एकंदर सर्व जिन्नसांचा सांठा संपला. शहर बाहेरून वेढलेलें, तेव्हां सामुग्री मिळते कशी ! उघडच दुष्काळानें लोकांची दैना उडूं लागली. तेव्हां नाइलाजानें त्यांनीं युद्ध सोडलें व शत्रूस ते शरण आले. पुढें मार्चच्या तिसऱ्या तारखेस तहनामा झाला. त्यांतील शर्ती फारच कडक होत्या पण करतात काय! फ्रेंचांना त्या कबूल कराव्याच लागल्या. येणेंप्रमाणें लढाई तर संपली. पण फ्रान्समधील अंतस्थ स्थिति अतिशय भयंकर होती. ती सुधारेपर्यंत बरेच दिवस गेले व फ्रेंचांचे हाल फार झाले. ही लढाई केवळ नेपोलियनच्या अप्पलपोटेपणानें व मूर्खपणानें सुरू झाली व तिजमुळें फ्रेंच लोकांना अतिशय हाल भोगावे लागले. ह्याबद्दल सर्वच राष्ट्रांना फार वाईट वाटलें. हें युद्ध खरें, पण तें नुसतें सवा वर्षच चाललें, (१८७०–७१). परंतु त्याचें मोठें पर्यवसान झालें तें हें कीं, फ्रान्सची बादशाही पूर्णपणें नाहींशी झाली. इतक्या भयंकर गोष्टी फ्रान्स देशांत घडत असतांही इतर सर्व राष्ट्रें उदासीन असल्यामुळें यांचे परिणाम इतर युरोपीय व्यवहारांवर फारसे घडले नाहींत. तरी सर्वांचीं चित्तें फ्रान्सच्या स्थितीकडे फार तटस्थ लागून राहिलीं होतीं. अठराव्या शतकांत तर ह्याच युद्धाचे परिणाम सर्व जगतास भोंवले असते. परंतु एकुणिसाव्या शतकांत सर्वत्र शांतता झाली असल्यामुळें ह्या युद्धांत इतर राष्ट्रांस पडण्याचें कारण नव्हतें.

अमर्दी नाहींशी झाली आहे. स्पेनचा विस्तार व बहुतेक पोर्चुगाल आणि हालंड ह्यांचा विस्तार फ्रान्सच्याप्रमाणेंच नष्ट झाला आहे, व इंग्लंडचा मात्र कायम आहे. ह्मणजे इंग्लंडच्या राज्यास इंग्लिश साम्राज्य असें आज ह्मणतां येईल. ह्यावरून ह्या इंग्लिश साम्राज्याची ऐतिहासिक दृष्ट्या काय स्थिति आहे, ती उघड होईल. महासागरांतरीं अफाट भूमीचा नूतन शोध, राजकीय विषयासंबंधानें पाश्चिमात्य राष्ट्रांच्या कल्पनांचा समकालीन विकास, आणि तदुत्पन्न युरोपखंडाची विशिष्टावस्था, ह्या सर्व गोष्टींचा चमत्कारिक रीत्या मिलाफ होऊन जीं कित्येक राष्ट्रें अतीव विस्तारान्वित झालीं, त्या सर्वांपैकीं एतत्कालपर्यंत हयात राहिलेलें असें हें एकच इंग्लिश साम्राज्य पृथ्वीभर पसरलेलें आहे. ह्या सर्व राष्ट्रांची अशी स्थिति होण्याचें कारण कांहींना कांहीं संकटें त्यांस येत गेलीं हें होय. इंग्लिशांनीं अशा संकटांपासून आपला बचाव केला, ह्मणून ते निभावले; तरी ह्या संकटांचा थोडाबहुत परिणाम* इंग्लिश महाराष्ट्रावरही घडलेला आहे, व इतक्या अनुभवांतीं ह्यापुढें तरी कोणतेंही संकट आलें असतां तें पार पाडतां येईल, अशा प्रकारें हल्लींच्या राज्यपद्धतींतील दोष काढून टाकून ती सुधारतां येईल किंवा नाहीं, हाच आतां मुख्य प्रश्न इंग्लिश लोकांनीं विचारणीय आहे.

---

* युनायटेड् स्टेट्स् नांवाचा देश इंग्लंडचे ताब्यातून जाऊन स्वतंत्र झाला, ह्या गोष्टीचा उल्लेख येथें आहे.

प्रकरण चवथें.

प्राचीन काळच्या वसाहतींची स्थिति.

पूर्वी असें सांगण्यांत आलें आहे कीं, ग्रीक लोकांच्या वेळची वसाहती करण्याची पद्धत व हल्लींची पद्धत ह्यांचें साम्य पाहूं गेलें असतां पूर्वीच्या पद्धतीस नैसर्गिक असें ह्मणतां येईल. तथापि हल्लींची पद्धतही थोडीबहुत नैसर्गिक आहे. राज्य ह्या शब्दाची ग्रीक लोकांची कल्पना फारच आकुंचित होती. त्यांस असें वाटे कीं, एका राज्यांत लोकसंख्या जास्त वाढली असतां, कांहीं लोकांनीं इतर प्रांतांत जाऊन नवीन स्वतंत्र राज्य स्थापन करावें. ग्रीक लोक असें मानीत होते तरी, हल्लींच्या पद्धतीप्रमाणें एकाच राज्याचा विस्तार पाहिजे तितका होणें, ह्या कल्पनेंत नैसर्गिकत्व बिलकूल नाहीं, असें मानण्याची जरूरच आहे कीं काय ! एका झाडावरून पिकलेलें फळ खालीं पडून त्यापासून दुसरें झाड उत्पन्न होणें, हें स्वाभाविक आहे. परंतु त्याचप्रमाणें एखाद्या फळापासून झाड उगवून त्याला शेंकडों फांद्या व हजारों पानें येणें, हीहि गोष्ट स्वाभाविकच आहे. एशियामायनरच्या पश्चिम किनाऱ्यावर प्राचीन काळीं ग्रीक लोकांचें मायूलेट्स् नांवाचें एक फार प्रसिद्ध शहर होतें. तेथील लोकांनीं दुसरीकडे जाऊन नवीन शहरें वसविलीं, व त्या नवीन ठिकाणीं ते स्वतंत्रतेनें राहूं लागले, ही गोष्ट वरील झाडाच्या पहिल्या उपमेप्रमाणें स्वाभाविक आहे. तद्वतच इंग्लंडचें लहानसें राज्य सर्व पृथ्वीभर विस्तृत होऊन त्याचें एकच मोठें साम्राज्य बनणें हेंही वरील दुसऱ्या उपमेप्रमाणें नैसर्गिकच आहे.

असें आहे तरी इंग्लंडच्या नवीन पद्धतींत कांहीं अस्वाभाविक-

त्वही आहे. सुमारें शंभर वर्षांपूर्वी अमेरिकेंत जाऊन वसाहत केलेले इंग्रज लोक इंग्लंडपासून स्वतंत्र झाले व त्याचप्रमाणें पुढें कांहीं दिवसांनीं स्पेन आणि पोर्तुगाल ह्यांच्या वसाहतींतील लोकांनींही मूळ देशाच्याविरुद्ध बंड केलें, त्या सर्वांचें कारण त्या पद्धतींत कांहीं अस्वाभाविकत्व होतें, हें होय.

खरोखरी गोष्ट अशी आहे कीं, 'देशविस्तार' अगर 'देशवृद्धि' हा शब्द सकृद्दर्शनीं फार साधा व सुलभ दिसतो. तरी त्यांतील अर्थाची खरी कल्पना थोडक्यांसच आहे.

ह्या अर्थाच्या स्पष्टीकरणार्थ, इंग्लंडचे राज्याचा अमर्याद विस्तार झाला, ह्मणजे त्याजमुळें इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेंत फरक पडला किंवा नाहीं, ह्याचा आपण विचार करूं. वसाहतींपासून फायदा काय? असा प्रश्न केलेला पुष्कळ वेळां ऐकण्यांत येतो. वरप्रमाणें मूळच्या राज्यव्यवस्थेंत फरक पडल्याशिवाय जर एकच राष्ट्र पाहिजे तितका विस्तार पावलें, तर हा वरील प्रश्न करण्याचें कोणास प्रयोजन पडलें नसतें; कारण, अशा विस्तारानें कोणाचें नुकसान न होतां फायदाच झाला असता. अशा प्रकारचा विस्तार होणें हल्लींच्या काळांत शक्य आहे कीं नाहीं, हा प्रश्न निराळा. तथापि शक्य असेल तर तो इष्ट आहे, ह्यांत संशय नाहीं.

पृथ्वीच्या पाठीवर ओसाड असलेला मुलूख, जे लोक आपल्या ताब्यांत घेतात, त्यांस ती इतकी नवीन संपत्तिच मिळाली, असें आरंभीं समजून आपण पुढें चालूं. संपत्ति ह्या शब्दाचा ह्या ठिकाणीं अर्थ फार व्यापक समजला पाहिजे. लिओन व आरेगान ह्मणून स्पेन देशांत दोन परगणे आहेत. त्यांतूनच सोळाव्या शतकाच्या आरंभीं स्पेन देशचे लोक प्रथमतः अमेरिकेंत वसाहती करण्याकरितां गेले. ह्मणून त्या

लोकांस ' कोलंबस ह्यानें नवीन जग उत्पन्न करून दिलें ' असे शब्द त्याच्या थडग्यावर लिहिलेले होते, ते अक्षरशः खरे झाले. कांहीं लोकांना त्यानें खरोखरच अतोनात स्थावर मिळकत मिळवून दिली आहे. आतां ही एवढी मिळकत मिळाल्यानें पुष्कळ गरिब लोक श्रीमंत व्हावे खरे, परंतु ते श्रीमंत झाले नसतील तर, व गरिब लोक सुखी झाले नसतील तर, त्याचा दोष त्या संपत्तीकडे नाहीं. तिचा विभाग व विनियोग हे योग्य न झाल्यानें अथवा तिची व्यवस्था बरोबर न राहिल्यानें गरिब लोक श्रीमंत झाले नसतील. कोलंबसाच्या शोधानें युरोपीय राष्ट्रांस इतकी अतोनात संपत्ति प्राप्त झाली कीं, तिच्या योगानें युरोपांतील प्रत्येक गरिब मनुष्य सहज मोठा जमीनदार होऊन बसला असता.

परंतु ही सर्व संपत्ति लोकांच्या ताब्यांत येऊन त्यांस तिचा उपयोग करतां येण्यास एका गोष्टीची जरूर होती. सरकाराकडून मालमत्तेचें संरक्षण होईल तरच ती लोकांच्या उपयोगीं पडूं शकेल, ह्मणून अमेरिकेंतील जमिनी निर्भयपणें लोकांच्या उपयोगास येण्यापूर्वी तेथें कांहीं तरी सरकारी अंमल असण्याची जरूर होती. वसाहत करणारांचें सरकाराकडून संरक्षण न झालें, तर त्यांस त्या ठिकाणच्या मूळच्या रहिवाशांकडून अगर इतर परकीय वसाहत करणारांकडून त्रास पोंचल्याशिवाय राहणार नाहीं. बरें, युरोपप्रमाणेंच अमेरिकेंत राज्यें स्थापन होऊन जिकडे तिकडे चांगला बंदोबस्त झाला, अशी कल्पना करूं; ह्मणजे अर्थात्च युरोपांतल्याप्रमाणेंच अमेरिकेंत मालमत्तेचा उपभोग लोकांस निर्भयपणें घेतां येईल असें झालें असतां, युरोपांत ज्या गरीब लोकांस आपली उपजीविका करणें कठिण पडतें, आणि लोकसंख्या फार असल्यामुळें राहण्यास धड जागाही मिळत नाहीं, ते

फक्त अमेरिकेंत गेले ह्मणजे पुरें. त्यांस पाहिजे तितकी स्वस्त जमीन मिळेल, आणि ते सहज एकदम श्रीमंत होतील.

ह्यावरून पृथ्वीवरील ओसाड मुलखांत कांहींतरी सरकारी अंमल असणें किती इष्ट आहे, हें सहज ध्यानांत येईल. परंतु हें सरकार ह्मणजे इंग्रज सरकारच असलें पाहिजे, असें मानण्यास कांहीं कारण नाहीं. कारण, युरोपांतील इतर राष्ट्रांच्या वसाहतींत अगर अमेरिकेंतील मूळच्या स्वतंत्र राज्यांत इंग्रज लोकांस जाऊन राहतां येईल, तर मग इंग्रजांच्याच वसाहती अमेरिकेंत असण्यांत विशेष फायदा काय बरें आहे ?

हा प्रश्न थोडासा चमत्कारिक आहे, व इंग्लंडच्या लोकांची एक विशिष्ट समजूत कायम आहे, ती नसती तर हा प्रश्न त्या देशांत कोणीं विचारिलाही नसता. बहुतेक इंग्रज लोकांना असें वाटतें कीं, आपण आपल्याच देशबांधवांशीं मिळून राहवें. जे कायदे, जो धर्म, व ज्या संस्था त्यांचे वाडवडील पूर्वापार पाळीत आले, तींच सर्व आपण पुढें चालू ठेवावीं. ह्मणून परकीय भाषा बोलणाऱ्या लोकांमध्यें आपण एकदम जाऊन राहणें ह्मणजे आपण होऊन आपल्यास बुद्ध्या संकटांत घालून घेण्यासारखें आहे. अशी समजूत इंग्रजांची आहे यांत संशय नाहीं. कारण, आपल्यास नेहमीं आढळून येतच आहे कीं, अमेरिकेंत जाऊन राहण्यास त्यांस जरी पाहिजे तितकी मोकळीक आहे, तरी प्रतिवर्षी फारसे इंग्रज लोक तेथें जाऊन राहत नाहींत. परकीय तर खरींच, परंतु तेथें पुष्कळ नवीन राज्यें स्थापन झालीं असून, राज्यव्यवस्थाही चांगली चालू आहे. ब्रेझील, मेक्सिको, दक्षिण अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्यें, वगैरे ठिकाणीं पाहिजे तितकी विपुल जागा असतांही इंग्रज लोक तिकडे राहण्यास जात नाहींत. वसाहती अत्यंत उपयोगाच्या आहेत व अमेरिकेंतील एवढी अफाट मालमत्ता आपल्या आटोक्यांत आणण्यास वसा-

हती करण्याशिवाय दुसरें साधनच नाहीं, असें सर्व इंग्रज लोकांस वाटलें असतें. परंतु अमेरिकेंत इंग्रजांचींच स्वतंत्र संस्थानें स्थापन झालीं असल्यामुळें, इतर सर्व इंग्लिश प्रजेस ह्या संस्थानांचा स्वतःच्या वसाहतीं-सारखाच उपयोग करून घेतां येतो. कारण इंग्रज लोक तेथें जाऊन राहिले असतां, त्यांस कोणतीही अडचण पडण्यासारखी नाहीं. त्यांची भाषा तेथें चालू आहे, त्यांच्या रीतीभाती, व त्यांच्या संस्थाही तेथें कायम आहेत. हल्लीं ह्या स्वतंत्र संस्थानांचें ऐक्य वृद्धि पावत असल्यामुळें, तीं इतकीं भर-भराटीस आलीं आहेत व त्यांजबद्दल सर्व इंग्रज लोकांस इतका अभिमान वाटत आहे कीं, त्या आनंदाच्या भरांत आपल्यास कित्येक गोष्टींचें स्मरणही राहत नाहीं. हीं संस्थानें केवळ स्वतःच्या वसाहतींसारखींच त्यांस वाटण्याचें कारण, तीं मूळ इंग्रजांनींच स्थापिलेलीं आहेत, व ह्मणून त्यांचा इंग्लंडशीं एक विशिष्ट संबंध जडलेला आहे. परंतु हा संबंध सामान्य नियमास अनुसरून नाहीं, तर अपवादिक आहे. ह्मणून वसा-हतींच्या उपयुक्ततेबद्दल सामान्यतः विचार करितांना या स्वतंत्र संस्थानांकडे लक्ष दिलें तर घोंटाळा मात्र होईल, सबब ह्या गोष्टीकडे आपण दुर्लक्ष करूनच चाललें पाहिजे.

ह्मणून सामान्यतः विचार केला असतां वसाहती असणें ह्मणजे राष्ट्राची इतकी संपत्ति वाढविण्यासारखेंच आहे. ज्यांना जमीन नसते त्यांस ती मिळते; आणि जे गरीब असतात, त्यांस संपत्ति मिळून ते स-धन होतात. ही तर अगदीं साधी गोष्ट आहे. परंतु ती साधी आहे असें समजूनच आपण तिकडे दुर्लक्ष करितों. एका राज्यांत लोकसंख्या फार वाढल्यामुळें त्यांस तेथें राहण्यास धड जागाही मिळेनाशी झाल्याची उदाहरणें इतिहासांत पुष्कळ सांपडतील. पुष्कळ लोकांनीं स्वराज्यांत जागा न मिळाल्यामुळें स्वराज्याची सीमा उल्लंघून जाऊन पलीकडच्या

राष्ट्रांवर झुंडीच्या झुंडी मिळून हल्ला करावा, व कधीं कधीं पर राज्यांत त्यांस जमीनी आणि संपत्ति हीं विपुल मिळावीं, अशीं पुष्कळ उदाहरणें घडून आलीं आहेत. इंग्लंडचीही बहुतेक अशीच स्थिति आहे. हल्लीं युरोपीय इंग्रजी राज्यांत जागेची जितकी दाटी झाली आहे, तिच्या अर्ध्यानेंही पूर्वीं दुसऱ्या कोणत्याही राज्यांत गर्दी झाली नसेल. हल्लींची इंग्लंड देशांतली वस्ती ह्मणजे, निदान युरोपांत तरी अशी पूर्वीं कधीं कोणास माहीत नव्हती. आपल्या देशांत फारच गर्दी होत चालली आहे, असें ते नेहमीं ह्मणत आले आहेत. व हल्लींची लोकसंख्येची वाढही बहुतेक कायमसारखीच असल्यामुळें आणखी सुमारें ९० वर्षांनीं आपली काय भयंकर स्थिति होईल, याचा ते विचार करूं लागतात. ते असें ह्मणतात कीं, आपला मुलूख १,२०,००० चौरस मैल आहे; तो कांहीं वाढला नाहीं. हल्लींच त्यांत लोकसंख्या अगदीं दाट आहे. तिची वाढही इतकी जलद आहे कीं, सुमारें ७० वर्षांत लोकसंख्या दुप्पट होत आहे. ह्यावरून आपली कशी स्थिति होणार बरें? अशा गोष्टी ते मनांत आणतात, त्यावरून हें उघड दिसतें कीं, वसाहतींच्या योगानें जो नवीन मुलूख इंग्लंडचे ताब्यांत आला आहे, तो तर, हा विचार करितांना, ते मुळींच सोडून देतात. काय, इंग्लंड देश फक्त १,२०-००० चौरस मैल इतकाच आहे? छेः ही गोष्ट खरी नाहीं. व्हिक्टोरिया राणीसाहेबांच्या अमलाखालीं अगणित मुलूख आहे. हिंदुस्थानांत वसाहत करण्यास जागा नाहीं, ह्मणून तो देश वजा केला तरी राणी सरकारच्या अमलाखालीं जो मुलूख आहे, तो अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्याहीपेक्षां फार जास्त आहे. युनायटेड् स्टेटस्‌विषयीं लोक असें नेहमीं ह्मणतात कीं, तेथें वस्ती दाट नाहीं, व परकीय वसाहत करणाऱ्यांस पाहिजे तितकी जागा रिकामी आहे. परंतु याहीपेक्षां जास्त

मुलूख इंग्लंडचे ताब्यांत आहे. ह्मणजे ही सामान्य गोष्ट नाहीं. आतां मूळ इंग्लंड देशांत फारच दाट वस्ती आहे खरी, तरी दाटी झालेल्या लोकांस पर मुलूखांत राहण्यास जागा मिळावी ह्मणून गाथ अगर टर्कोमन लोकांप्रमाणें शेजारच्या राज्यांवर हल्ला करण्याचें इंग्रजांस प्रयोजन नाहीं. ह्या कामीं मोठमोठीं संकटें अगर अडचणी येण्यासारख्या नाहींत; कारण कानडा, दक्षिण आफ्रिका आणि आस्ट्रेलिया येथें इंग्रजी भाषा सुरू आहे, इंग्रजी धर्म चालू आहे, इंग्रजी कायदे अमलांत आहेत. अशा ठिकाणीं जाऊन वसाहत करण्याचाच काय तो अवकाश असतो. इंग्लंडचे परगणे डारसेट शायर आणि वुईल्ट शायर येथें जर लोक अगदीं भिकारी झाले असतील, तर आस्ट्रेलिया येथें बिनमालकीची अतोनात संपत्ति रिकामी आहे, तेथें त्यांनीं जावें. एका ठिकाणीं जर लोकांजवळ संपत्ति मुळींच नाहीं, तर दुसऱ्या ठिकाणीं संपत्तीचा उपभोग घेण्यास लोकही नाहींत. असें असूनही ह्या दोनही गोष्टींचा एकसमयावच्छेदेंकरून विचार न करितां आपल्या इतक्या लोकसंख्येचें आतां पुढें काय होईल, ह्याजबद्दल ते विनाकारण फिकिर करीत बसतात. बरें, वसाहतींची गोष्ट निघाली, ह्मणजे त्यांजपासून आपल्यास काय फायदा आहे? असेंही पुनः ह्मणण्यास ते तयारच.

असें होण्याचें कारण अंशतः त्या लोकांची विचारसरणीच होय; आणि अंशतः असेंही खरें आहे कीं, वसाहती ह्मणजे इंग्लिश राष्ट्राचा व इंग्रजी राज्याचाच एक भाग आहे, असें ते बिलकूल मानीत नाहींत. ह्या वसाहती इंग्लंडचे ताब्यांत आहेत, असें ते भीत भीत मानतात खरें, तरी त्या इंग्रजी राज्याचे बाहेर आहेत, असें ते समजत असल्यामुळें, जे लोक इंग्लंडांतून त्या ठिकाणीं राहण्यास गेले, ते जणूं काय इंग्लंडाला मुकलेच, असें त्यांस वाटतें. वसाहती करण्याकरितां फार लोक बाहेर जाऊं

लागले, तर तसें लोकांनीं न करण्याविषयीं त्यांस उपदेश चालू असतात. ह्यावरूनही त्यांची वरील समजूत व्यक्त होते. ते उपदेश असे असतात कीं, बाहेर राहण्यास जाणें ही गोष्ट वसाहत करणाऱ्यांच्या जरी फायद्याची आहे, तरी इंग्लंड देशास अपायकारक आहे; कारण, उत्तम, मजबूत व प्रसंगीं उपयोगी पडणारे असे लोक इंग्लंडांतून नाहींसे होतील. " नाहींसे होतील " असें ह्मणण्याचें कारण परक्या ठिकाणीं जाऊन राहिल्यावरही ते लोक इंग्रजी बाण्याचेच कायम राहतील, व पाहिजे तेव्हां इंग्लिश राष्ट्राच्या संरक्षणास उपयोगी पडतील, हें ते विसरून जातात. आतां युनायटेड् स्टेट्स्मध्यें वसाहतीविषयीं जे विचार चालू आहेत, त्यांजवरून असें दिसतें कीं, पश्चिमेकडे पुष्कळ मुलूख ओसाड असल्यामुळें तेथील लोक तिकडे वसाहती करीत चालले आहेत, व प्रसंगानुसार नवीन संस्थानेंही स्थापित आहेत. तरी ही गोष्ट ह्मणजे एकंदर राज्याच्या बळकटीस हानिकारक आहे, असें तेथें कोणासही वाटत नाहीं. एकंदर शक्तींतून तितकी शक्ति कमी झाली, असें ते लोक बिलकूल मानीत नसून उलट शक्ति वाढविण्याचेंच हें अत्युत्तम साधन आहे, असें ते मानतात. हेच विचार इंग्लंडांतील इंग्रज लोकांच्या विचारांशीं ताडून पाहिले असतां इंग्रजांचे विचार किती कोते दिसतात बरें !

ह्यावरून इंग्लंडचें राज्य अद्यापि वाढलें आहे, असें ह्मणतां येत नाहीं. अठराव्या शतकांत इंग्रजांचें राज्य विस्तार पावलें, असें जें वारंवार सांगण्यांत येत आहे, त्यांत थोडीशी अतिशयोक्ति आहे. राज्यविस्तार झाला, ह्मणजे इंग्लंडच्या विस्तृत राज्याचा पाया घातला गेला खरा, तरी तें विस्तृत राज्य ह्या पायापासून तयार व्हावयाचें आहे. अशा प्रकारचें राज्य विस्तृत करण्याचा उद्देश आरंभीं कोणाच्या मनांत नव्हता, व तो घडून आल्यावरही त्याचें खरें स्वरूप पुढें पुष्कळ वेळपर्यंत कोणास कळून

आलें नाहीं. वसाहती ह्मणजे मूळ राज्याचीच वृद्धि आहे, हें कोणास खरें वाटेना. त्या मूळ देशापासून विभक्त आहेत, असें लोकांस वाटे, ह्मणून पुन्हः असा प्रश्न विचारणें भाग पडत आहे कीं, त्या वेळीं लोकांच्या मनांत 'वसाहत' ह्याचा कोणता अर्थ बरोबर अवगत होता?

वर असें सांगण्यांत आलें आहे कीं, सोळाव्या शतकामध्यें युरोपांतून अमेरिकेंत वसाहती करितां स्वभावतः फारसे लोक जात नव्हते, युरोपांत त्या वेळीं वस्ती दाट झाली नव्हती, ह्मणून जास्त जागेची अवश्यकता त्यावेळीं वाटली नव्हती. ह्यामुळें वसाहतींचें जें खरें स्वरूप (ह्मणजे एकाच राज्याचा विस्तार) आपणांस आज वाटत आहे, तें त्या वेळच्या लोकांस माहीत असण्याचें कारण नव्हतें; उलट त्यावेळच्या मुत्सद्दी वगैरे लोकांस अशी पंचाईत पडत असे कीं, ह्या नवीन शोध लागलेल्या व लागत असलेल्या जमिनीचा काय उपयोग करतां येईल? सेबाशियन केबट* ह्यास अमेरिकेकडे जाण्याविषयीं सातव्या हेन्रीनें† उत्तेजन दिलें. परंतु जेव्हां तो मसाले वगैरे परत आणीनासा झाला, तेव्हां त्याजकडे राजाचें लक्ष सहजच कमी झालें. तेव्हां तो इंग्लंड देश सोडून स्पेन देशास जाऊन मिळाला. वसाहतींपासून फायदा होण्यासाठीं त्यांचें मूळ देशाकडून संरक्षण व्हावें लागे, असें मागें सांगण्यांत आलें आहे. तर तेंच धोरण लक्षांत ठेऊन वसाहती ह्मणजे केवळ संपत्ति असा

---

* सेबाशियन केबटः—हा गृहस्थ मूळचा जिनोआ येथील एका घराण्यातला असून इंग्लंड देशांत जन्मला होता. इ. स. १४९७ ह्या वर्षी इंग्लंडांतून गलबतें घेऊन तो अमेरिकेच्या शोधास निघाला. कोलंबसानें थोड्या वर्षांपूर्वी अमेरिकेच्या आसपासच्या बेटांचा शोध लाविला खरा, परंतु केबट ह्यानें न्यू फाउंडलंड् वगैरे उत्तरेकडील बेटांचा शोध लावला व खुद्द अमेरिकेच्या महाद्वीपावर प्रथमतः उतरलेला असा हाच गृहस्थ होय. त्या वेळीं दर्यावर्दीपणामध्यें इंग्लंडची फारशी सरशी नसल्यामुळें, केबट ह्याच्या कृत्यास इंग्लंडाकडून व्हावी तशी मदत झाली नाहीं.

† इंग्लंडचा राजा सातवा हेन्री–(१४८५–१५०९).

सर्व समज होऊन सर्व राष्ट्रांस संपत्तीची जरूर असल्यामुळें पर मुलुखांतून ती संपत्ति, व्यापार अगर दुसऱ्या कोणत्या तरी साधनानें, यूरोपांत आणणें, ह्या पलीकडे वसाहतींचा उपयोग लोकांस वाटत नसे. यूरोपीय राष्ट्रांची सुधारणा ह्या वसाहतींत सुरू करून त्या भरभराटीस आणणें ही गोष्ट कोणाच्याही मनांत येत नव्हती. अर्थात मूळ देशाचा फायदा करणें हाच सर्वांचा मुख्य उद्देश, वसाहतींचें कल्याण करणें हा नव्हे.

आरंभीं ज्या देशांतील राजकीय संस्था प्रगल्भ दशेस आलेल्या नसतां तेथील लोकांनीं दुसरीकडील अफाट व ओसाड अशा मुलुखांत जाऊन स्वतंत्रपणें राहणें, ह्या पद्धतीस आह्मीं नैसर्गिक असें नांव वर दिलें आहे. ही पद्धत व सोळाव्या शतकांतील वसाहत करण्याची पद्धत ह्या दोहोंत एक कांहीं चमत्कारिक फरक आहे. स्वतंत्र राजाच्या कडक अमलाखालीं लहानशा दाट वस्तीच्या देशांत पुष्कळ दिवस राहिल्यानें कंटाळून अवचित शोध लागलेल्या सुसंपन्न दूर प्रदेशांत यूरोपीय लोक जाऊन राहूं लागले; ही पद्धत प्राचीन पद्धतीहून फार भिन्न आहे. प्राचीन काळीं नवीन वसाहत करण्याच्या कामांत मूळ सरकारचें कांहीं एक अंग नसे. जे लोक परमुलुखांत जाऊन राहात, तेच वसाहती करण्याचें सर्व काम स्वतःच्या मुखत्यारीवर करीत, व त्या ठिकाणीं स्वतंत्र राज्यही स्थापन करीत. परंतु सोळाव्या शतकांत जे लोक वसाहती करण्यासाठीं अमेरिकेंत गेले, ते स्वतः पाहिजे ती गोष्ट करण्यास मुखत्यार नसून सर्व काम मूळ सरकारच्या हुकुमानें होत असे. बाहेर गेलेल्या लोकांवर देखरेख ठेवणें, प्रसंगीं त्यांस मदत करणें, वसाहत झाल्यावर ती आपल्या ताब्यांत घेणें, ह्या सर्व गोष्टी मूळ सरकाराकडून व्हावयाच्या. असें करण्यांत त्या सरकारचा हेतु वसाहतींपासून आपल्यास फायदा करून घ्यावयाचा हाच असे. पूर्वीच्या पद्धतींत नवीन मुलखांत लोक गेल्यानें त्यांचें

मूळ देशाशीं नातें तुटल्यासारखें होत असे; हल्लींच्या पद्धतींत तें नातें कायम राहतें. एखाद्या राष्ट्रानें नवीन जमीन आपल्या ताब्यांत आणिली ह्मणजे त्यांत केवळ स्वतःचा फायदा पाहिला असें होईल. परंतु बाहेर ठिकाणीं गेलेल्या मनुष्याशीं स्वतःचें नातें सुद्धां कायम राखण्याचा प्रयत्न राष्ट्रानें हल्लींच्या पद्धतींत केला असल्यामुळें त्याची दृष्टि केवळ स्वतःच्या फायद्याकडेस नाहीं, असें प्रथमतः कोणास वाटेल, तर तसें नाहीं. हें नातें कायम राखलें जाण्याचें कारण बाहेर गेलेल्या लोकांचें कल्याण करणें नव्हे, तर नातें कायम राहिल्यानें आपला सर्व प्रकारचा ताबा त्यांजवर बसावा, व त्यांजपासून सर्वस्वी आपला फायदा व्हावा, हें होय. यावरून नवीन वसाहतींच्या संबंधानें लोकांचे मनांत दोन समज एकांतएक मिसळून गेलेले होते, असें दिसतें. स्पेनच्या लोकांनीं जेव्हां प्रथम अमेरिकेंत वसाहत केली, तेव्हां ही नवीन वसाहत ह्मणजे, स्पेनचें राज्य यूरोपांत आहे, तसेंच आणखीं थोडें अमेरिकेंत जास्त वाढलें असा समज झाला. परंतु एकच राज्य इतक्या दूर अंतरावर असणें त्या वेळीं कोणास शक्य वाटत नव्हतें. ह्मणून हा अर्थ जरी स्वाभाविक होता, तरी खरा प्रकार तसा घडून येत नसल्यामुळें वसाहत ह्मणजे 'ताब्यांतील मुलुख' असा अर्थ होऊं लागला. (अर्थातच या समजांत मूळ देशांतील लोकांचे व वसाहत करणाऱ्यांचे हक्क सारखे नाहींत.) बरें, हा दुसरा अर्थ तरी अगदीं नवीनच उत्पन्न झाला होता असें नाहीं. एकाच राजाचे ताब्यांत दूर अंतरावर समुद्राचे पलीकडे मुलुख असणें, सोळाव्या शतकाचे पूर्वीपासून ह्मणजे, मध्ययुगापासून लोकांस अवगत होतें. भूमध्यसमुद्राचे पूर्वेकडील क्यांडिया बेट व्हेनीस येथील राजाचे ताब्यांत होतें. तसेंच आड्रिआटिक* समुद्रांतही आणखीं

---

* हा समुद्र इटली आणि बाल्कन द्वीपकल्प, यांजमध्यें आहे.

पुष्कळ ठिकाणें व्हेनिसचे ताब्यांत होतीं. इंडिझ्* नामक नवीन वसाहत केलेल्या बेटांत स्पेनच्या लोकांची राजकीय सभा स्थापन झाली, त्या वेळीं त्यांच्यासमोर हें व्हेनिसचें उदाहरण असावें असेंच वाटतें. वसाहत याचा व्हेनिस येथील लोकांनीं केलेला अर्थ केवळ स्वार्थ व व्यापार इतक्यापुरताच होता. व्हेनिसचें जें प्रजासत्ताक राज्य होतें त्याचाच एक भाग त्या वसाहती, असें व्हेनिशियन लोक बिलकूल मानीत नव्हते; इतकेंच नाहीं तर हे बाहेरील प्रदेश ह्मणजे राज्याचे एकंदर संपत्तीचा सजीव प्राणिघटित एक भागच, असें ते मानीत असत. यावरून वसाहतीसंबंधीं ह्या वरील दोन प्रकारच्या कल्पना अगदीं मुळांतच मिळत आहेत. हल्लींची वसाहत करण्याची पद्धत मूळ स्पेनच्या लोकांनीं सुरू केली व त्यांत उत्तरोत्तर कमीजास्त फेरफार करून तीच यूरोपांतील इतर राष्ट्रांनीं उचलली; तीही वरप्रमाणें दोन विरुद्ध समजांचा एकत्र संयोग होऊन उत्पन्न झाली आहे.

वसाहतीपासून फायदा काय ह्मणून जेव्हां आपण विचारतों, तेव्हां हा वरील दुसरा अर्थ थोडाबहुत स्पष्ट विचारणाराच्या मनांत असतोच. प्रश्न विचारणारा वसाहत शब्दाचा अर्थ एकाच राष्ट्राचा इतर ठिकाणीं विस्तार इतकाच समजत नाहीं, तर वसाहत ह्मणजे त्या राष्ट्राच्या ताब्यांतील (जशी इतर संपत्ति तसाच) प्रदेश, असा अर्थ त्याच्या मनांत असतो. हा अर्थ नसता तर वरील प्रश्न विचारण्याचें प्रयोजनच पडलें नसतें. कार्नवाल अगर केंट वगैरे इंग्लंड देशाचे परगणे आपण आपल्या

* अमेरिकेच्या पूर्वेस अटलांटिक महासागरांत कोलंबसानें इ. स. १४९२ या वर्षीं प्रथम शोध लाविलेलीं जीं बेटें आहेत, त्यांस वेस्ट इंडीझ् अशी संज्ञा आहे. यांत क्यूबा, हेटी, जमेका वगैरे कित्येक बेटांचा समावेश होतो. कोलंबस यास मदत स्पेन देशाकडून झाली असल्यामुळें, ह्यांपैकीं बहुतेक बेटें स्पेनच्याच ताब्यांत आहेत.

ताब्यांत ठेवावे किंवा नाहीं; असा प्रश्न कधीं कोणी विचारणारच नाहीं; तसेंच या दोन परगण्यांपासून होणारें उत्पन्न तेथें लागणाऱ्या खर्चापेक्षां जास्त आहे किंवा नाहीं, याचाही विचार कोणी करीत नाहीं. एका राष्ट्राच्या सजातीय भागांच्या एकीकरणाचीं बंधनें नफ्यातोट्यावर अवलंबून नसतात. जशीं एका कुटुंबाचीं माणसें एकत्र राहण्यास नात्याचीं बंधनें बलवत् असतात, तद्वतच एका राष्ट्राचे निरनिराळे भाग परस्पर सख्यत्वानें एका अंमलाखालीं राहण्यास लागणारीं बंधनें मजबूद असतात. वसाहतीचा अर्थ एकाच राष्ट्राचा दुसऱ्या ठिकाणीं विस्तार, इतकाच केवळ समजला गेला असता, तर वरील कौटुंबिक बंधनें वसाहतींसही लागू झालीं असतीं. इंग्लंडच्या सर्व विस्तृत राज्याचा अर्थ याचप्रमाणें समजला गेला असता, तर कानडा व आस्ट्रेलिया हे दोन प्रांत इंग्रज लोकांस केवळ केंट आणि कार्नवाल यांप्रमाणें वाटले असते. परंतु एकवार जर हा अर्थ लोकांच्या मनांतून गेला, ह्मणजे जे लोक दूरदेशीं वसाहत करण्यास गेले ते पूर्वीच्या लोकांस मुकले, असें एकदां सर्व समजूं लागले, ह्मणजे लागलेंच त्यांचें पूर्वलोकांशीं नातें निराळेंच बनलें ह्मणून समजावें. आतां हें नवीन उत्पन्न झालेलें नातें दोन प्रकारचें असूं शकेल. एक तर पूर्वीच्या ग्रीक लोकांच्या वेळचें ह्मणजे ज्याप्रमाणें मुलें मोठीं झालीं ह्मणजे लग्न वगैरे करून बापापासून वेगळीं होऊन दूर जाऊन राहतात, व दोघांचा कुटुंबसंबंध तुटून जातो त्याचप्रमाणें वसाहतीची स्थिति असूं शकेल. ह्मणजे वसाहती मूळ देशापासून स्वतंत्र होतील. अशी स्थिति ग्रीक लोकांचे वेळीं होती. दुसरें नातें ह्मणजे हल्लींचें. आपण असें पाहतों कीं, मुलें जरी दुसऱ्या ठिकाणीं जाऊं लागलीं, तरी मूळचा संबंध सर्वथैव तुटत नाहीं; तर त्या संबंधास थोडेंसें निराळें स्वरूप मात्र प्राप्त होतें. हा मूळचा संबंध न

तोडण्याविषयीं अलीकडच्या राज्यकर्त्यांनीं चांगली काळजी घेतली आहे. हा संबंध केवळ स्वार्थावर अवलंबून आहे. ह्मणूनच वसाहतींपासून फायदा काय, ह्मणून जेव्हां प्रश्न विचारला जातो, तेव्हां त्याचें उत्तर असें दिलें पाहिजे कीं, ज्याप्रमाणें कोणा एकाच्या ताब्यांत कांहीं मालमत्ता असते व तिजपासून त्यास उत्पन्न मिळत असतें, अगर कांहीं पैसा ताब्यांत असून त्याजपासून व्याजाचें वगैरे उत्पन्न त्यास होतें, त्याचप्रमाणें वसाहतींपासून मूळ राष्ट्रास कांहीं तरी फायदा होत आहे.

आतां अशा प्रकारच्या दोन देशांचें सख्यत्व या वरील स्वार्थावर अवलंबून राहण्यास एका गोष्टीची जरूर आहे. ती ही कीं, उभय राष्ट्रांचा स्वार्थ एकाच गोष्टींत असला पाहिजे. प्रत्येक व्यवहारांत उभयतांचा फायदा असला ह्मणजे दोन देश कांहीं नातें नसतांही एकमेकांशीं सख्यत्वानें असतात. यास प्रत्यंतरेंही पुष्कळ आहेत. ऐक्यत्वानें राहण्यांत उभयतांचें कल्याण असतें. आस्ट्रिया आणि हंगेरी ऐक्यत्वानें राहण्याचें कारण हेंच. स्विस् कान्फिडरेशन नांवाच्या स्वित्झर्लंडांतील प्रजासत्ताक राज्यांत फ्रेंच, जर्मन आणि इटालियन अशा भिन्न भिन्न राष्ट्रांचे मुलूख असतांही ते सर्व याच कारणामुळें एकत्र राहतात. इंग्रज लोकांच्या वसाहतीपासून इंग्लंडास फायदा आहे, ह्मणजे जर त्या वसाहती स्वतंत्र झाल्या, तर इंग्लंडाचें नुकसान होईल, इतकेंच केवळ इंग्रज लोकांस वाटून उपयोग नाहीं; तर वसाहतींतील लोकांसही असें वाटलें पाहिजे कीं, इंग्लंडपासून आपल्यास फायदा आहे, व इंग्लंडशीं आपला संबंध तुटेल तर आपलें नुकसान होईल. असें जर उभय पक्षीं वाटत असेल, तर मात्र इंग्लंड आणि इंग्लंडच्या वसाहती यांचा संबंध वर दाखविलेल्या उदाहरणाप्रमाणें राहील. अलीकडे वाफेच्या वाहनाची व विजेच्या तारायंत्राची युक्ति निघाल्यामुळें दोन देशांमधील

अंतर कितीही मोठें असलें, तरी त्याची कांहींच गणना नाहींशी झाली आहे. ह्मणून मूळ देश व त्यांच्या वसाहती एकमेकांपासून कितीही दूर असल्या तरी वर निर्दिष्ट केलेल्या उभय पक्षीं स्वार्थाचा समज उभयतांमध्यें कायम असणें बिलकूल अशक्य नाहीं. परंतु अमेरिकेचा शोध लागल्यानंतर कित्येक वर्षेंपर्यंत असा उभय पक्षीं स्वार्थाचा समज कायम राहणें कठीण होतें. या बाबतींत अट्लांटीक महासागर हा इतका मोठा प्रचंड अडथळा होता कीं, अमेरिकेंतील व यूरोपांतील लोकांनीं परस्परांच्या उपयोगीं पडणें दुरापास्त होतें, ह्मणून पूर्वीची वसाहत करण्याची जी पद्धत सामान्यतः चालू होती तिचा उभय राष्ट्रांच्या स्वार्थाशीं फारसा संबंध नव्हता.

वसाहतीचा मूळ देशाशीं राजकीय संबंध असूं शकणार नाहीं, अशी स्थिति अलीकडील आरंभींच्या वसाहतींची होती, असें सांगण्यांत येतें. परंतु हें ह्मणणें सर्वथैव खरें आहे, असें आपण मानतां नये. उदाहरणार्थ, लोकांत असा समज आहे कीं, अमेरिकेंतील वसाहती इंग्लंडपासून विभक्त होण्याचें कारण इंग्लंडच होय. केवळ स्वार्थावरच लक्ष देऊन अमेरिकेंतील लोकांचा व्यापार इंग्लंडनें बंद केला व ह्या नुकसानीबद्दल त्यांस दुसरा कोणताही फायदा त्यांनीं होऊं दिला नाहीं. परंतु ही गोष्ट खरी नाहीं. इंग्लंड आणि अमेरिका यांजमध्यें पूर्वापार दळणवळण सुरू असून उभयतां एकमेकांच्या उपयोगी पडत असत. व्यापारसंबंधीं जरी कांहीं हक्क इंग्लंडानें आपल्या ताब्यांत ठेविले होते, तरी त्याच्या मोबदल्यांत इंग्लंडकडून वसाहतीचें संरक्षण केलें जात होतें. गेल्या शतकांत जेव्हां अमेरिकेशीं तंटे सुरू झाले तेव्हां भांडणाची सुरवात प्रथमतः इंग्लंडकडून झाली नसून अमेरिकेंतील लोकांकडूनच झाली. परराष्ट्राशीं दोन मोठ्या लढाया इंग्रजांस कराव्या लागल्याचें कारण केवळ

वसाहतीच होय, व शेवटीं सर्व संबंध तोडून टाकण्यास प्रथम प्रवृत्ति इंग्लंडकडून झाली नसून वसाहतीनींच तो तोडण्यास इंग्लंडास भाग पाडलें. इंग्लंडकडून वसाहतींवर कर बसविले गेले, ते त्यांच्या संबंधानें इंग्लंडास झालेला खर्च भरून काढण्याकरितांच बसविले होते. इंग्रज लोकांनींच अमेरिकेंतील फ्रेंच सत्तेचा मोड करून आपल्या वसाहतींस स्वतंत्र होण्याची संधि आपल्या हातानें आणून दिली व त्याजबद्दल त्यांस पुढें पस्तावा झाला हेंही साहजिकच आहे.

ही जी वसाहत करण्याची पद्धत आरंभीं सुरू होती, तींतही वसाहतींचा मूळ देशाशीं संबंध कांहीं अंशीं जिंकलेल्या मुलुखासारखा होता. यासंबंधानें सामान्यतः जी भाषा वापरण्यांत येते, तिजवरून वरील समज व्यक्त होतो. बोलतांना आपण 'इंग्लंडचे ताब्यांतील मुलूख,' 'स्पेनचे ताब्यांतील मुलूख' असें बोलतों. आतां एक लोक दुसऱ्याचे ताब्यांतील आहेत, असें आपण ह्मणतों, तेव्हां त्याचा बरोबर अर्थ काय आहे, ह्याचा विचार केला पाहिजे. वरील बोलण्यांत गुलामगिरीचा थोडासा अर्थ गर्भित असलेला दिसतो. ह्मणजे ताब्यांतील लोक, याचा अर्थ जर, दोन्हीं एकाच राजाच्या अमलाखालीं असलेले लोक, इतकाच केला, तर तो अगदीं गैर होईल. ह्मणून वसाहत ह्मणजे "मूळ देशाच्या फायद्याकरितां स्थापन केलेली दौलत" असा समज वरील शब्द बोलणारांच्या मनांत मूळारंभीं गर्भित असलाच पाहिजे, यांत संशय नाहीं.

स्पेन देश व त्यांच्या वसाहती यांचा जो संबंध होता तो इतर राष्ट्रांस केवळ कित्त्यासारखा झाला असावा. हा कित्ता खालीं लिहिल्याप्रमाणें होता. वसाहतींतील मूळचे रहिवाशी लोक अगदीं गुलामाप्रमाणें होऊन बसले होते. मेक्सिको देशांत पूर्वी जे लहान लहान राजे होते,

तेच पुढें स्पेन कडून तेथील कामदार नेमण्यांत आल्यामुळें त्यांजकडून कांहीं ठिकाणीं तेथील लोकांवर हवातसा जुलूम होऊन त्यांस पाहिजे तीं कामें करणें भाग पडे. इतर ठिकाणीं श्रमाचें ओझें दुःसह होऊन मूळची लोकसंख्या कमी कमी होऊन शेवटीं नाहींशी झाल्यामुळें त्यांचे ठिकाणीं दुसरे सिद्दी लोक येऊन राहत. स्पेनकडून अंमल होणें तो केवळ जबरीचा होत असे. वसाहतींकडून अव्याहत उत्पन्न स्पेन देशास चालू असे. राज्यव्यवस्था अगदीं फसवणुकीची होती. एका-वर दुसरा अंमलदार, अशी केवळ यांत्रिक व्यवस्था सतत चालू होती. या व्यवस्थेनें वसाहत करणारे लोकांवर अंमल कांहीं अंशीं पाद्री लोकां-चाच असून कांहीं अंशीं तेथील मूळच्याच लोकांचा होता; व प्रसंगीं उपयोगी पडावे ह्मणून या लोकांस बाह्यतः तरी चांगली वागणूक मिळत असे. अशा प्रकारचा स्पेननें घातलेला हा कित्ता होता. इंग्लंडच्या ज्या नवीन वसाहती अमेरिकेंत झाल्या, त्यांस हा कित्ता बिलकुल लागू होण्यासारखा नव्हता. कारण, वसाहतींकडून इंग्लंडास वसुल येत नसे. त्या ठिकाणीं मूळचे रहिवाशी लोक नव्हते व सोन्यारुप्याच्या खाणीही नव्हत्या. तथापि ज्या कित्त्यापासून फायदा होतो असें एकवार दिसून आलें, तो कित्ता विसरून जाणें इतर राष्ट्रांस शक्य नव्हतें. इ. स. १६६३ या वर्षी इंग्लंडच्या दुसऱ्या चार्लस राजानें वरील कित्त्याचें अनु-करण करण्याचा आग्रह धरिला होता. असें होतां होतां वसाहत ह्मणजे ताब्यांतील मुलूख, असें ठाम मत एकवार सर्वांचें होऊन चुकलें.

एक लोक, दुसऱ्याची मालमत्ता आहे, त्यांच्या श्रमाचें फळ दुस-ऱ्यांस मिळालें पाहिजे, व तें मिळण्याचें कारण दुसऱ्यांकडून त्या लोकांना कांहीं फायदा होत आहे, हें नव्हे, तर त्यांस जिंकण्याचा किंवा दुसरा एखादा हक्क त्यांजवर दुसऱ्यांस प्राप्त झाला आहे, हें होय. अशा प्रका-

रचा समज असणें, हें मुळांतच रानटीपणाचें द्योतक आहे. ज्या ठिकाणीं एक लोक जिंकले गेल्यामुळेंच त्यांजवर स्पष्टपणें दुसऱ्याचा ताबा सुरू झाला आहे, त्या ठिकाणींसुद्धां तो ताबा फार दिवस कायम ठेवणें, हें अगदीं गैर असून, केवळ रानटी लोकांसच शोभण्याजोगें आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थान देश जरी इंग्रज लोकांनीं स्वपराक्रमानें जिंकिला असला, तरी केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्याकरितां तो त्यांनीं आपल्या ताब्यांत ठेवणें अशक्य आहे; व ते तो तसा ठेवीतही नाहींत. हिंदुस्थानापासून इंग्लंडास खंडणी मिळत नाहीं. बरें, इंग्लिश मांडवलाचा फायदेशीर रीतीनें हिंदुस्थानांत खप होत आहे, असेंही नाहीं. केवळ स्वार्थाकरितां जर एखाद्या बाबतींत इंग्रज लोकांकडून हिंदुस्थानचें नुकसान झालें, तर त्याजबद्दल राज्यकर्त्यांस मोठी शरम वाटते. जिंकिलेल्या देशास जर ही वरील पद्धत लावतां येत नाहीं, तर ती वसाहतीस लागू करणें, हें त्याहीपेक्षां वाईट होय. कारण, असें करणें ह्मणजे जे आपले देशबंधु आहेत, ज्यांच्याशीं आपला हाडामासाचा निकट संबंध आहे, त्यांसच जिंकिलेल्या शत्रूंप्रमाणें वागविणें असें होईल. जिंकिलेल्या शत्रूंसही अशी वागणूक हल्लींच्या सुधारलेल्या राष्ट्रांकडून मिळत नाहीं. प्राचीन काळच्या लोकांनीं वसाहती करतेवेळीं हें वरील तत्व त्या पद्धतींत समजून उमजून शिरूं दिलें नसावें असें वाटतें. परंतु सोळाव्या शतकापासून जिंकिलेल्या देशास तरी हें तत्व लावण्यास कोणास शंका वाटेनाशी झाली. स्पेनच्या वसाहती कांहीं अंशीं जिंकिलेल्या मुलुखासारख्याच असल्यामुळें, हें वरील रानटीपणाचें तत्व न समजतां व उद्देश नसतां स्पेन देशानें घातलेल्या पद्धतींत सहज शिरून गेलें. आरंभीं तें गुप्त असून कोणाचे दृष्टोत्पत्तीस फारसें आलें नाहीं; तरी पुढें त्यामुळें वसाहत करण्याची सर्व पद्धत अगदीं बिघडून गेली. इतर युरोपियन राष्ट्रें, हॉलंड, फ्रान्स, इंग्लंड वगैरे,

स्पेनच्यामागून सुमारें एक शतकानें वसाहती करूं लागलीं. तेव्हां अर्थात्च स्पेननें घालून दिलेला कित्ता या इतर राष्ट्रांनीं चालू ठेविला.

फ्रान्स वगैरे वरील कांहीं राष्ट्रांच्या संबंधानें त्या वरील पद्धतीचा परिणाम असा झाला कीं, मूळ राष्ट्राकडून वसाहतींवर फार कडक व जुलमाचा अंमल होऊं लागला. कानडामध्यें जे फ्रेंच लोक वसाहत करून राहिले होते, त्यांस शेंकडों कडक नियम पाळावे लागत असत; व जर ते फ्रान्स देश सोडून अमेरिकेंत वसाहत करण्यास गेले नसते तर त्यांस हे कडक नियम पाळावे लागले नसते. इंग्लंडच्या संबंधानें अशी एखादी विशेष गोष्ट घडून आलेली नाहीं. व्यापाराच्या कित्येक बाबींमध्यें मात्र वसाहत करणाऱ्यांस कांहीं अडथळे सोसावे लागत. परंतु याच्यापलीकडे दुसरें कांहीं एक नव्हतें. वसाहतीकरितां अमेरिकेंत गेलेल्या इंग्रज लोकांनीं आपलें मूळचें राष्ट्रीयत्व कायम ठेविलें होतें. ह्मणून इंग्लंडांतील लोकांस जे हक्क होते, तेच आपल्यास असण्याविषयीं ते नेहमीं भांडत असत. मेरिव्हेल साहेबानें असें लिहिलें आहे कीं, हल्लींची क्राउन कॉलनी* ह्मणून जो वसाहतींचा एक प्रकार आहे तो प्रथमारंभीं मुळींच प्रचारांत नव्हता. क्राऊन कॉलनीमध्यें राज्यकारभार पाहणारा

* इंग्लंडच्या ताब्यांतील प्रदेशांचा इंग्लंडच्या राजनीतीशीं जो संबंध आहे त्यास अनुसरून अशा सर्व प्रदेशांचे सरकारी रीतीनें तीन वर्ग केले जातात. पहिला क्राउन कालनीज्, ह्मणजे ज्यांत वसाहतींकरितां कायदे वगैरे करण्याचा सर्व अधिकार इंग्लंडचे हातांत असून तेथूनच अंमलदार नेमले जाऊन ते वसाहतींवर अंमल बजावितात. ज्या वसाहतींत लोकनियुक्त सभा राज्य चालविण्यासाठीं स्थापन झाल्या असून कायदेकानु वगैरे सर्व याच सभेकडून केले जात असतात व शेवटचें अनुमोदन देण्याचा नांवाचा हक्क व अंमलदार वगैरे नेमण्याचा सर्व अधिकार मूळ देशाचा असतो त्या सर्व वसाहती दुसऱ्या वर्गांत येतात. तिसऱ्या वर्गांतल्या वसाहतींस वरच्यापेक्षां इतकाच फरक असतो कीं, एक गव्हर्नर मात्र मूळ देशाकडून नेमला जात असून बाकी सर्व अधिकारी नेमणें वगैरेचें काम वसाहतींतल्या लोकनियुक्त सभांकडेसच सोंपलेलें असतें.

लोकनियुक्त मंडळी नसून सर्व कारभार मूळ सरकारानें नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या हातांत असतो. आरंभीं वसाहती करण्यास सुरवात झाली, त्यावेळीं लोकनियुक्त राज्य करणारी मंडळी मुद्दाम विधियुक्त स्थापन करण्याचा परिपाठ नव्हता; परंतु लोकनियुक्ततेचें तत्व इंग्रज लोकांच्या अंगीं पूर्णपणें बिंबून गेलें असल्यामुळें, ज्या ज्या ठिकाणीं ते जात, त्या त्या ठिकाणीं राज्यकारभार पाहण्याकरितां अशा प्रकारच्या मंडळ्या आपोआप स्थापन होत असत. उदाहरणार्थ, हचिन्सन ह्यानें वसाहतींचा आरंभींचा इतिहास लिहून ठेविला आहे. तो इ. स. १६१९ या वर्षाच्या हकीकतींत असें लिहितो कीं, " ह्या वर्षीं व्हर्जीनिया प्रांतांत गांवगन्ना लोकनियुक्त प्रतिनिधींची एक सभा नवीन स्थापन झाली. " त्यावेळीं वसाहतीच्या कारभारांत मूळ सरकाराकडून हात घातला जाणें फारसें शक्य नव्हतें, ह्मणून त्या सरकारावर जुलमीपणाचा दोषारोप होण्याजोगा नव्हता. तात्पर्य, वसाहतींतील लोकांस इतकी मोकळीक त्या वेळीं होती कीं, कांहीं वसाहती व विशेषेंकरून इंग्लंडच्या वसाहती तर आरंभापासूनच बहुतेक कामांत स्वतंत्र राज्याप्रमाणें पूर्ण मोकळीक भोगीत होत्या, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इ. स. १६६९ चे सुमारास मासाच्युसेट्स् प्रांतांत वसाहत करणारे लोक इंग्लंडशीं आपला वस्तुतः संबंध बिलकूल नाहीं असें मानीत असत. १६६९ हें वर्ष ह्मणजे त्या वेळीं वसाहतींस प्रारंभ झाल्यापासून फक्त चाळीस वर्षें झालीं होतीं, व त्यानंतर अमेरिकेंतील वसाहती इंग्लंडपासून स्वतंत्र होण्यास शंभराहून अधिक वर्षें लागलीं. त्या मासाच्युसेट्स् प्रांतांत जो मुख्य सुभेदार होता त्यानें ह्याप्रमाणेंलिहून ठेविलें आहे. " येथील लोक असें ह्मणतात कीं, जोंपर्यंत सनदेंत ठरल्याप्रमाणें एकंदर सोन्या रुप्याचा $\frac{1}{5}$ हिस्सा

आह्मी इंग्लंडास देत आहों, तोंपर्यंत इंग्लंडच्या राजाचा आमच्यावर सभ्यपणाच्या वर्तनाशिवाय दुसरा कोणताही हक्क नाहीं. "*

यावरून इंग्रजांची आरंभीची वसाहत करण्याची पद्धत मुळींच सदोष नव्हती. ज्या गोष्टी अमेरिकेंतील वसाहत करणाऱ्यांस दुःसह झाल्यामुळें ते स्वतंत्र झाले, त्या गोष्टी खऱ्या होत्या, तरी त्या इतक्या क्षुल्लक होत्या कीं, त्यांपासून जसे विलक्षण परिणाम घडून आले तसे त्याचेपूर्वी अगर त्याचेनंतर कधींही घडून आले नाहींत. वसाहतींच्या कारभारांत इंग्लंडची नजर उत्तरोत्तर जास्त खोल जाऊं लागली, ह्मणून अमेरिकेंतील वसाहतींस त्रास झाला असें नाहीं; तर जें थोडें बहुत मूळ राष्ट्राचें अंग वसाहतींच्या कारभारांत होतें, तेंच अगदीं दुष्टपणाचें असल्यामुळें दुःसह झालें होतें. इंग्लडची मागणी अगदीं थोडी होती खरी, तरी ती अयोग्य होती. व्यापाराशिवाय दुसऱ्या हरएक बाबतींत वसाहतींस पाहिजे ती मोकळीक इंग्लंडकडून होती. परंतु व्यापाराचे संबंधांत इंग्लंडच्या व्यापाऱ्यांचा मात्र फायदा व्हावा ह्मणून वसाहतीवर जबर ओझें इंग्लंडकडून लादण्यांत आलें. ह्या लहानशा गोष्टीमुळें इंग्लंडाचें

---

*वसाहतीसंबंधीं कागद पत्रांचें वार्षिक टांचण (क्यालेंडर आफ् स्टेट् पेपर्स् कलोनियल्) डिसेंबर सन १६६५, ह्यांत तो आणखी असें लिहितोः--ते ह्मणतात कीं, लटापटीमध्यें आह्मी कशी तरी सात वर्षें सहज लोटूं आणि सात वर्षें संपतांच कांहींतरी फरक झालाच पाहिजे. इतकेंच नाहीं, तर कित्येक असेंही म्हणतात कीं, हल्लीं डच लोकांशीं चालू असलेल्या लढाईचा काय परिणाम होईल, हें कोण सांगूं शकेल ! या लोकांचा राज्यकारभार पाहणारी मंडळी आहे, तिच्या अनुमतानें यांनीं क्रामवेल यास हत्याराचा वगैरे पुरवठा केला. क्रामवेलच्या हातांत इंग्लंडची राज्यसत्ता असल्यामुळें 'अशा कित्येक कृत्यांनीं तुम्ही इंग्लंडपासून स्वतंत्र आहां ' असा जाहीरनामा त्याजपासून युक्तीनें मिळविण्याची त्यांनीं पुष्कळ खटपट केली. वुइन्सोल नामक एका गृहस्थाचे मार्फत त्यांनीं क्रामवेलजवळ हें सर्व बोलणें लाविलें होतें. हल्लीं ते आपल्यास स्वतंत्र मानितात व उघडपणें तसें ह्मणतातही. पं. कै.

वसाहतींशीं नातें विपरीत दिसूं लागलें. वसाहती ह्मणजे ताब्यांतील मालमत्ता आहे. जे इंग्रज लोक इंग्लंडांत आहेत त्यांच्या फायद्यासाठीं त्या मालमत्तेचा पाहिजे तसा उपयोग करितां येईल, असा इंग्लिश लोक हक्क सांगूं लागले. हा हक्क किती बरें अयोग्य आहे? गुलामावर धन्याचा जो हक्क असतो, तशाच प्रकारचा जरी हा हक्क बहुतेक अंशीं नसेल, तरी निदान कुळावर जो जमनीच्या मालकाचा हक्क असतो तितका तरी हा खचीत आहे. कित्येक जमीनदार लोक आपल्या जमीनी कुळास पूर्णपणें सोडून देतात, व ते आपला सारा वसुल होण्यापलीकडे कुळांशीं कांहींच संबंध ठेवित नाहींत. ह्यांत कुळाला मालकाकडून दुसरें कांहीं मिळालें नाहीं, तरी जमीनीचा पूर्ण उपयोग मिळतो; परंतु वसाहतींचें नातें याहूनही चमत्कारिक आहे. मासाच्यूसेट्स् येथील वसाहत करणारा असें ह्मणेल कीं, 'आमच्या उद्योगावर असा सतत हक्क इंग्लंडचे लोकांनीं सांगण्यास, त्यांनीं आह्मांवर असे काय उपकार केले आहेत? ज्या जमीनी पहिल्या जेम्स राजाच्या मालकीच्या नसून त्यानें कधीं पाहिल्याही नव्हत्या, त्यांजबद्दलच्या सनदा त्या राजानें आह्मांस देऊन त्यांचा उपयोग करण्याची पूर्ण परवानगीही दिली. त्या राजानें आह्मांस त्या सनदाकरून दिल्या नसत्या, तरी ह्या जमिनी बिनहरकत आह्मांस वापरतां आल्या असत्या.'

यावरून ही जुनी पद्धत दोन विरुद्ध समजुतींचें एके ठिकाणीं कांहीं एक अयुक्त संमेलन होऊन उत्पन्न झाली होती, हें उघड होतें. वसाहत करणारे लोक आपलेच जातभाई आहेत, त्यांस आपले सारखेंच वागविले पाहिजे, असा इंग्लंडचा समज कायम असूनही, त्यांजवर जो अंमल होत होता, तो इतर जिंकलेल्या तद्देशीय इंडियन लोकांवर होत असे, तशा प्रकारचा होता. बरें याप्रमाणें जिंकलेल्या लोकांसारखा त्यांजवर अंमल होत असतांही, त्यांस इतकी स्वतंत्रता दिलेली होती कीं, त्यांस सहज बंड करतां आलें.

वसाहतीविषयीं हा चमत्कारिक व मिश्रित समज कसा प्रचारांत येत गेला, हें आह्मीं इतका वेळ सांगितलें. एकदां हा समज इंग्रजांचे मनांत शिरला असतां, तो कां कायम राहिला व त्याच्या ठिकाणीं दुसरा चांगला समज कां उत्पन्न झाला नाहीं, हें समजणें फारसें कठीण नाहीं. त्या वेळच्या जगत्स्थितीप्रमाणें इंग्रजांनीं जर आपण होऊन ही वसाहत करण्याची पद्धत सुधारण्याचें मनांत आणिलें असतें, तर तसें करण्यास त्यांना मुख्य व साधा मार्ग ह्मटला ह्मणजे वसाहतींला पूर्णपणें स्वतंत्र होऊं देणें, हाच होता. वसाहती जेव्हां मूळ देशापासून पुष्कळ अंतरावर असतात व त्यामुळें उभयतांचें हितानहित अगदीं निराळें असतें, तेव्हां मुलगे व मुली यांनीं मोठीं झाल्यावर आईबापांस सोडून जाणें, व वसाहतींनीं मूळ देशापासून स्वतंत्र होणें, या दोहोंत पुष्कळ साम्य आहे. अशी स्थिति असल्यावर दोन्ही देश एक ह्मणून राहणें, व मूळ देशाचा वसाहतींवर अधिकार कायम असणें; या गोष्टीस जागा राहिली नसती, व मग ग्रीक लोकांचीच पद्धत फार युक्त झाली असती. कारण त्या पद्धतींत वसाहतीस पाहिजे ती स्वतंत्रता मिळून, पुन्हः उभयतांचें सतत सख्य कायम राही. सराव्या शतकामध्यें इंग्लंडच्या वसाहती साधारणतः फार दूर असल्यामुळें त्यांचें इंग्लंडशीं सख्य राहणेंच शक्य नव्हतें. ही गोष्ट इतकी खरी आहे कीं, इंग्लंडच्या वसाहती आरंभींच स्वतंत्र न होतां इंग्लंडचे ताब्यांत इतके दिवस कशा राहिल्या, हेंच समजण्यास कठीण आहे. परंतु असें होण्याचें ह्मणजे वसाहती अगोदरच स्वतंत्र न होण्याचें कारण, आमच्या मतें असें आहे कीं, उत्तर अमेरिकेंत सतराव्या शतकाचे शेवटीं फ्रेंच लोकांची सत्ता हळूहळू वाढतच चालली होती. वसाहतीसंबंधें इंग्लंड आणि फ्रान्स यांची एकदां स्पष्टपणें लढाई जुंपल्यानंतर,

बसाहतींचें इंग्लंडशीं सख्यत्व पूर्वीपेक्षांही थोडेंसें जास्त दृढ झालें; आणि आह्मांस असेंही वाटतें कीं, इ. स. १७५९ या वर्षी कानडा प्रांत जर फ्रेंचांकडून इंग्रजांनीं जिंकून घेतला नसता, व फ्रेंचांशीं चालू असलेलें युद्ध समाप्त न होतां, जास्तच वाढत गेलें असतें, तर अमेरिकेंतील वसाहतींनीं स्वतंत्रतेचा जाहिरनामाही* लावला नसता व त्यांचा इंग्लंडाशीं संबंध न तुटतां उलट जास्त दृढ झाला असता. परंतु खरोखर प्रकार निराळाच घडून आला. मूळारंभीं उभयतांच्या सख्यत्वाची जरूर मुळींच दिसून आली नाहीं. पुढें कांहीं वेळपर्यंत ही जरूर फारच दिसून आली, व पुनः एकाएकीं सर्व वजन एकदम नाहींसें होऊन सर्व ग्रंथी तुटले. याचा परिणाम असा झाला कीं, वसाहतींनीं स्वतंत्रता मिळविण्याची कल्पना जोरावत जाऊन वसाहतींच्या संबंधांत सुधारणा करण्याचें एकीकडेसच राहून गेलें.

अशी स्थिति असतां पूर्वी चालू असलेली पद्धतच कायम ठेवणें जरूर होतें; कारण त्यांत जर थोडासा फरक करण्याचा कोणीं प्रयत्न केला असता, तर असलेली पद्धतही एकदम नाहींशी झाली असती. व्यापार संबंधीचे हक्क जरी अन्यायाचे होते, तरी ते पूर्वीपासून चालत आले असल्यामुळें केवळ हट्ट धरून ते तसेच चालू ठेवणें त्या वेळच्या मुत्सद्यांस बरें वाटलें. कारण दोघांसही हितावह असा एखादा फरक चालू पद्धतींत करणें, कोणास शक्य वाटलें नाहीं.

कदाचित् अशा प्रकारचा थोडासा फरक करूनही उभयतांस सोइस्कर अशी वसाहती राखण्याची पद्धत स्पष्टपणें कोणाच्या ध्यानांत येणारी नव्हती. वर आह्मीं सांगितलेंच आहे कीं, वसाहती ह्मणजे फाजील वाढलेल्या लोकसंख्येला सुखानें राहण्याचें आयतें तयार अस-

---

* टीप.—‡ पान ५७ पहा.

लेलें स्थळ, जेणेंकरून अतिशय महत्वाचें जें आपलें स्वजातित्व तें सोडल्याशिवाय स्वदेशांतील गर्दीमुळें वैतागलेल्या लोकांस दुसऱ्या ओसाड ठिकाणीं स्वस्थपणें जाऊन राहतां येतें. परंतु शंभर वर्षांपूर्वी ही कल्पना इंग्रज लोकांच्या मनांत कशी बरें यावी? इंग्लंडांत त्या वेळीं फाजील लोकसंख्या झाली नव्हती. अमेरिकेंतील लढाई सुरू झाली, त्या वेळीं सर्व ग्रेट ब्रिटनमध्यें मिळून एक कोट वीस लक्षांपेक्षां जास्त लोक नव्हते. आणि जरी त्या वेळींसुद्धां इंग्लंडपेक्षां अमेरिकेंत राहणें जास्त फायदेशीर व सुखाचें झालें असतें, तरी स्वदेशप्रीति, पूर्वापार चालत आलेला परिपाठ, पर मुलखांत जाऊन राहण्याची नाखुषी आणि भीति, हीं सर्व तेथें गेल्यापासून होणाऱ्या फायद्यांच्या मानानें फारच अतोनात होतीं. अमेरिकेमध्यें वसाहत करण्यास जे लोक हल्लीं नित्यशः असंख्य जात असल्याचें आपण पाहतों, ते त्या जमिनीचा शोध लागल्यापासून असेच जाऊं लागले आहेत, अथवा निदान इंग्लंडच्या वसाहती स्थाईक झाल्यापासून तरी आजपर्यंत ते तसेच सारखे जात आहेत, असें आपण बिलकूल समजतां नये. इ. स. १८१९ त तह* झाला, त्यानंतर वसाहतींत लोक जाऊन राहण्यास सुरवात झाली. आरंभीची वसाहत करण्याची पद्धत चालू असतां देशस्थिति कांहीं अंशीं निराळी होती. इंग्रजांनीं स्थापलेल्या नवीन वसाहतींची जी आपणास माहिती आहे, तिजवरून ही स्थिति चांगली व्यक्त होईल. इ. स. १६२० या वर्षी या वसाहती स्थापन झाल्यापासून इ. स १६४० या वर्षी लॉंग पार्लमेंटची† सभा झाली तोंपर्यंत, ह्मणजे सुमारें वीस वर्षे इंग्लंडांतून

---

* टीप.—* पान ७५ पहा

† धि लॉंग पार्लमेंट:—पार्लमेंट ह्मणजे काय हें वाचकांना माहीत असेलच तो शब्द इतका बहुश्रुत झालेला आहे. निरनिराळ्या वेळीं ह्या पार्लमेंटाला निर-

पुष्कळ लोक अमेरिकेंत जाऊन राहत होते. परंतु यास एक विशेष कारण होतें. इंग्लंडांत त्या वेळीं धर्मसंबंधानें बराच जुलूम चालू होता. ह्मणून प्युरिटन, ब्राऊन, इंडिपेंडेंट वगैरे पंथाचे लोकांस जो जुलूम इंग्लंडांत राहिल्यानें सोसावा लागे, तो अमेरिकेंत गेल्यानें चुकत नसे. लाँग

निराळीं नांवें पडलेलीं आहेत. उदाहरणार्थ, "म्याड," "गुड्," "आडल्ड्," "शार्ट," इत्यादि. त्याजप्रमाणें हें "लाँग" नांव होय. पहिला चार्लस इंग्लंडच्या गादीवर इ. स. १६५५ त बसला व १६४९ पर्यंत त्यानें राज्य केलें. तो जुलमी होता. तो पार्लमेंटची पर्वा करीत नसे. पैशासाठीं पार्लमेंट जमवी. परंतु पार्लमेंटच्या परवानगीशिवायही तो लोकांपासून पैसे काढित असे. तो जेव्हां जुलूम करूं लागला, तेव्हां पार्लमेंटानें ठराव केला कीं, राजानें जुलूम बंद करून लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकिल्याशिवाय त्याला पैसे द्यावयाचे नाहींत. मग पार्लमेंटची सभा भरवावी व ती लागलीच बरखास्त करावी असें त्यानें मांडलें. त्यानें तिसरें पार्लमेंट १६२८ त भरविलें. तें आपला हट्ट धरून बसलें, तसें ह्यानें तें बरखास्त केलें. मग १६२९ पासून तों १६४० पर्यंत त्यानें पार्लमेंटची सभाच भरविली नाहीं. ह्या मुदतींत त्याचा मुख्य अमात्य सर टामस वेंट्वर्थ, अर्ल् आफ् स्ट्राफर्ड, हा होता. ह्या मुदतींत त्यानें फारच जुलूम केला. पुढें १६४० त त्यानें पार्लमेंट सभा भरविली. पुन्हां पार्लमेंटाचा पाडा पूर्वींचा होता तो होताच. तेंही पार्लमेंट त्यानें तीन आठवड्यानेंच बरखास्त केलें. ह्या पार्लमेन्टाला " शार्ट " अशी संज्ञा आहे. पुढें त्यानें शेवटली पार्लमेन्टची सभा बलाविली. ह्या पार्लमेन्टालाच " लाँग " ह्मणजे दीर्घ अशी संज्ञा आहे. राजाच्या अमदानींतलें ह्यानंतरचें पार्लमेंट १६६० त भरलें. तेव्हां लांग पार्लमेंट वीस वर्षे बसलें असें साधारणपणें लोक मानतात. परंतु हें पार्लमेंट १६५२-५३ त क्रामवेल यानें बरखास्त केलें. नंतर त्यानें आपल्याला राज्याचा " प्रोटेक्टर " नेमून घेऊन आपल्याच नांवानें १६५८ पर्यंत राज्य केलें. असो, त्या पार्लमेंटानें प्रथम असा ठराव केला कीं, " ह्या पार्लमेंटाच्या संमतीशिवाय आपणाला कोणी बरखास्त करणार नाहीं." पुढ त्यांनीं स्ट्राफर्ड व लॉड ह्यांचेवर खटला सुरू केला. स्ट्राफर्ड याला फांशीं दिलें, व लॉड याला चार वर्षे कैदेंत टेवून पुढें त्यालाही फांशीं दिलें. चार्लसनें जीं कांहीं नवीन कोर्टें स्थापिलीं होतीं तीं मोडून टाकिलीं. सन १६४१ मध्यें " ग्रांड रेमान्स्ट्रन्स " ह्मणून एक पत्रक पिम यानें पार्लमेंटाकडून काढविलें. तेव्हांपासून राजा व प्रजा ह्यांच्यांत तंटा सुरू झाला. त्याचा अंत १६४९ त जेव्हां राजाला फांशीं दिलें तेव्हां झाला. ह्या पार्लमेंटाचे पुढारी पांच होते. त्यांचीं नांवें येणें प्रमाणें होतः— पिम, हाम्डन, हेजलरिग, हालिस, आणि स्ट्रोड. लढाई सुरू झाली ती नऊ वर्षे चा-

पार्लमेंटची सभा झाल्याबरोबर वसाहतींत लोक 'जाऊन राहिनासे झाले. आणि पुढें सुमारें १०० वर्षेपर्यंत अमेरिकेंत जाऊन वसाहत करणाऱ्यांची संख्या इतकी कमी झाली कीं, या संख्येपेक्षां वसाहती सोडून जाणाऱ्यांचीच संख्या अतोनात मोठी होती.*

अशा प्रकारची त्या वेळची स्थिति असल्यामुळें जरी तेव्हां वसाहती होत्या, तरी त्यांस विस्तृत ब्रिटिश राज्य, असें ह्मणतां आलें नसतें. या विस्तृत साम्राज्याचा पाया मात्र या सतराव्या व अठराव्या शतकांत घातला गेला. अमेरिकेंतील ओसाड प्रदेशांत वस्ती होणें व इतर प्रतिस्पर्धी राष्ट्रांचा त्या ठिकाणीं अंमल नाहींसा होणें, ह्या गोष्टी वरील कृत्यांस साधनीभूत होत, त्या मात्र अस्तित्वांत होत्या.

ल्ली. राजाच्या पक्षाला 'काव्हेलियर' व प्रजेच्या पक्षाला 'रौंड हेड' अशी संज्ञा होती. पार्लमेंटाच्या तर्फेनें अर्ल आफ एसेक्स, अर्ल आफ मांचेस्टर, सर थामस् फेअरफाक्स, व आलिव्हर क्रामवेल हे होते. ह्या सव काळभर क्रामवेल हाच राजा होता. ह्या पार्लमेंटानें ट्राएन्नियल कायदा ह्मणून एक फार महत्वाचा कायदा पार्लमेंटाच्या बैठकीबद्दलचा केला. तो पुढें १७१६ त बदलून सेप्टेनियल कायदा पास झाला. त्याप्रमाणें पार्लमेंटाच्या बैठकीची मुदत तीन वर्षांची सात वर्षें करण्यांत आली. ह्या पार्लमेंटामध्ये प्रेस्बिटेरियन व प्यूरिटन नामक काल्व्हिननें स्थापलेल्या पंथाचे फार कडक धर्ममतांचे लोक होते व ह्यांचीं राजकीय मतें राजत्वाला फारच विरुद्ध अशीं होतीं. ह्या एकंदर वीस वर्षांना, व विशेषेंकरून १६५२ पासून तों १६५८ पर्यंतच्या काळाला 'प्यूरिटन अंमल' अशी संज्ञा आहे, कारण ह्या वेळीं प्यूरिटन धर्मी क्राम्वेलकडेच सर्व अधिकार होता.

* हिल्ड्रेथ यांच्या इतिहासांत खालील हकीगत लिहिलेली आहे.—"इ. स. १६४० नंतर अमेरिकेंत इंग्लिश राज्याची वृद्धि झाली खरी तरी केलेली वसाहत सोडून देऊन दुसरीकडे जाणारे लोकच जास्त होते, इतके कीं, सुमारें २०० वर्षांत सर्व उत्तर अमेरिकेभर व बहुतेक सर्व पृथ्वीभर इंग्रज लोक पसरून गेले. १६४० चे पूर्वीं जे लोक वसाहतीकरितां अमेरिकेंत आले त्यांची संख्या सुमारें २५ हजार होती, व हल्लींची युनायटेड स्टेट्सची जी लोकसंख्या आहे, तिचा निदान एक चतुर्थांश तरी या मूळच्या २५००० लोकांपासून उत्पन्न झालेला आहे." (ग्रं. क.)

परंतु या साधनीभूत द्रव्यांस एकवट करणारी कल्पना त्या वेळीं कोणास माहित नसल्यामुळें, तीं द्रव्यें विस्कळींत राहिलीं. एक गोष्ट मात्र, हीं द्रव्यें एके ठिकाणीं करण्यास, घडून आली होती. वसाहतींचा व इंग्लंडचा निकट संबंध असून इंग्लंडांतील कित्येक गोष्टी वसाहत करणाऱ्यांबरोबर दूर देशीं जात होत्या. तसेंच लढाई केल्याशिवाय इंग्लंडापासून आपल्यास विभक्त होतां येणार नाहीं, ह्या गोष्टीही वसाहतींना त्या वेळीं पूर्णपणें अवगत होत्या.

अठराव्या शतकांतील इंग्लिश वसाहतींच्या स्थितीची जी ही हकीकत आह्मीं दिली, तीच इतर राष्ट्रांच्या वसाहतींसही लागू आहे. विस्तृत स्पेन, विस्तृत पोर्तुगाल, विस्तृत फ्रान्स, आणि विस्तृत हालंड, हीं सर्व साम्राज्यें विस्तृत इंग्लंडप्रमाणेंच पृथगवयवैक्य-विरहित कृत्रिम व निर्जीव इमारतीसारखीं होतीं.

हीं सर्व साम्राज्यें अशीं होतीं ह्मणूनच फार दिवस टिकलीं नाहींत. इंग्लंडचें साम्राज्यही वरच्याप्रमाणेंच थोडे दिवस टिकेल, असें आरंभीं वाटलें होतें. इतकेंच नव्हे तर इतर राज्यांपेक्षांहीं हें लवकर लयास जाईल असा संभव होता. इ. स. १७७६ या वर्षीं अमेरिकन वसाहतींकडून जो स्वतंत्रतेचा जाहिरनामा* प्रसिद्ध झाला, त्याच्या योगानें इंग्लिश साम्राज्यास फार मोठा धक्का बसला, इतकेंच नाहीं, तर वसाहतींकडून मूळ राज्यास जे अपाय घडले त्यांपैकीं हा पहिला होय.

राज्यकर्त्यांच्या अंगीं कितीही शहाणपण असतें तरी, हा अपाय घडूं न देणें त्यांच्या शक्तींत नव्हतें. पहिली वसाहती करण्याची पद्धत दोषयुक्त होती, हें जरी त्यांस दिसून आलें, तरी ती सोडून देऊन दुसरी पद्धत राज्यकर्त्यांनीं सुरू केली नाहीं. ज्या कारणांच्या योगानें

* टीप.--‡ पान ५८ पहा.

प्रथमतः इंग्लंडादि राष्ट्रांचा विस्तार होऊं लागला, त्याच कारणांनीं व त्याच पद्धतीवर अमेरिकेमध्यें नवीन स्वतंत्र राष्ट्रें उत्पन्न होऊं लागलीं. आपणास आलेल्या अनुभवापासून इंग्रज लोक जास्त शहाणे न होतां उलट जास्त निराश मात्र झाले. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें वसाहती आपल्या ताब्यांत ठेवणें दुर्घट आहे, असें जरी त्यांस आढळून आलें, तरी ती पद्धत बदलली पाहिजे, हें त्यांस समजलें नाहीं. उलट ह्या वसाहती केव्हां तरी आपल्या ताब्यांतून जाणारच, एवढें मात्र ते पूर्णपणें समजत असत.

पुढें या शतकाच्या चाळिसाव्या वर्षी व्यापारावर असलेले सर्व प्रतिबंध काढून टाकण्याचें 'फ्री ट्रेड' नांवाचें सर्वसंमत तत्व अमलांत आलें. व्यापारांवर असलेली प्रत्येक हरकत ज्याप्रमाणें काढून टाकण्यांत आली, त्याचप्रमाणें प्रथमची वसाहती करण्याची पद्धतही लोकांस अमान्य होऊन ती बंद पाडण्यांत आली. तरी असें होतांना लोकांचा असा समज झाला कीं, वसाहतींपासून कांहीं एक उपयोग नसून त्या जितक्या लवकर स्वतंत्र होतील, तितक्या चांगल्या; आणि जर जगाची सर्व साधारण स्थिति सतराव्या व अठराव्या शतकाप्रमाणेंच एकुणिसाव्या शतकांतही कायम राहिली असती, तर हा वरील ग्रह खरा होण्याचाही उघड संभव होता. त्यावेळीं इंग्रजांस असें वाटे कीं, व्यापाराच्या फायद्याशिवाय वसाहतींचा आपल्यास दुसरा कोणताही उपयोग नाहीं. जेव्हां हा व्यापाराचा मक्ता नाहींसा झाला, तेव्हां अर्थातच मग दुसरा कांहीं फायदा राहिला नाहीं.

पुढें कांहीं दिवसपर्यंत शांतता होती. अखिल साम्राज्य एकवट करून ठेवण्याचीं बंधनें जरी फार शिथिल झालीं होतीं, तरी तीं शांतता असल्यामुळें टिकलीं. सर्व गोष्टी यावेळीं अनुकूल असल्यामुळें कोणतेंही

संकट आलें असतां, त्याचें निवारण करण्यास सर्वस्वाभाविक बंधन मजबूद होतें. इंग्लिश लोक जरी सर्व जगभर पसरले होते, तरी त्या सर्वांस असें वाटे कीं, आपण एका हाडामासाचे व एका धर्माचे आहों. आपणां सर्वांचा इतिहास एकच असून भाषा व ग्रंथ वगैरे एकच आहेत. जोंपर्यंत वसाहती अगर मूळ देश यांपैकीं कोणांसही फारसा मोठा तोटा सोसावा लागत नव्हता, तोंपर्यंत हें वर निर्दिष्ट बंधन सर्व राष्ट्र एकीभूत ठेवण्यास समर्थ होतें. अशा प्रकारची शांतता असली म्हणजे, एकंदर राष्ट्राविषयीं व वसाहतीविषयीं लोकांचे ग्रह कांहीं निराळेच होतात. कारण हल्लींचे काळांत राजकीय बाबतींत दोन देशांमधील अंतर वाफ व वीज यांचे योगानें अगदीं नाहींसारखें झालें आहे.

गेल्या शतकांत मूळ देश व वसाहती यांमधील व परस्पर वसाहतींमधील अंतर फार मोठें असल्यामुळें इंग्लंडचें विस्तृत राज्य हें वरील खऱ्या अर्थी त्यावेळीं असू शकलें नसतें. परंतु हा अंतराचा अडथळा आतां बिलकुल राहिला नाहीं. शास्त्रांतरीं नवीन शोध लागल्यामुळें राजकीय व्यवहारांना एक विलक्षण स्वरूप प्राप्त झालें आहे. हे शोध म्हणजे वाफ आणि वीज. ह्या दोन अजब शक्ती नवीनच कळून आल्यामुळें, इंग्लंडच्या वसाहतींचें स्वरूप कसें बदलत आहे, तें विचारपूर्वक पाहिलें पाहिजे. इंग्रज लोकांच्या मनांत पूर्वी आपलें राज्य जिकडे तिकडे विस्तृत होईल, अशी कांहीं एक भव्य कल्पना होती. ती कल्पना खरोखरी घडून येणें, या दोन शक्तींच्या योगानें शक्य होतें. शक्य असूनही हल्लीं असें होणें बहुतेक जरूरीचें आहे, असें वाटतें. एवढें अफाट राज्य एकचक्री राखतां येईल, इतकेंच प्रथमतः शक्य वाटलें. प्राचीन काळीं अशा प्रकारचें विस्तृत राज्य एकवट व सुरक्षित राहण्यास तें राज्यव्यवस्थेच्या संबंधानें कमी प्रतीचें असले पा-

हिजे होतें. ह्मणजे त्याजवर होत असलेला अंमल केवळ जुलमी असला पाहिजे होता. स्पेनचें विस्तृत राज्य इंग्लंडच्या विस्तृत राज्यापेक्षां जास्त टिकलें, याचें कारण स्पेनमध्यें अंमल जुलमी होता. परंतु इंग्रज लोकांस पार्लमेंट सभेसंबंधीं स्वतंत्रतेची गोडी लागली असून तीच गोडी राज्य फाटण्यास कारण झाली. अशा प्रकारची स्वतंत्रता त्यावेळीं लोकांस विशेष मिळणें शक्य नव्हतें; जुलमी राज्य मात्र शक्य होतें. त्याचवेळीं जर पार्लमेंटसंबंधी स्वतंत्रता सर्व लोकांस देणें शक्य वाटलें असतें, तर सर्व तंटा लवकरच मिटला असता. परंतु हें शक्य वाटलें नाहीं. तें कां शक्य वाटलें नाहीं, हें बर्क नामक विख्यात ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत सुरेख रीतीनें लिहून ठेविलें आहे. अमेरिकेसारख्या अंतरावरून लोकांचे प्रतिनिधी पार्लमेंट सभेंत बसण्यास येणें, हें किती अयुक्त आहे, हें त्यानें दाखविलें आहे. ही कल्पनाच अत्यंत अनुचित आहे. असें आहे तरी हल्लीं ही कल्पना अनुचित वाटेनाशी झाली आहे. तरी बारीकसारिक गोष्टींमध्यें हल्लींही कित्येक अडथळे या व्यवस्थेस येणार नाहींत, असें नाहीं. ज्या वसाहती इंग्रज लोकांपासून स्वतंत्र झाल्या, त्यांनीं स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य कसें स्थापन करावें, हें स्वतःच्या उदाहरणावरून लोकांस दाखवून दिलें आहे. दूर देशांतील अफाट प्रदेश पुष्कळ ठिकाणीं अगदीं विरळ वस्तीचे व तेही नवीन वसाहत केलेले असे असून त्यांत वसाहती करणारे नवे लोक पूर्वीच्या लोकांशीं सख्यत्वानें वागतात आणि सर्वांस ही पार्लमेंटसंबंधी स्वतंत्रता पूर्णपणें मिळते, हें सर्व त्यांनीं लोकांस प्रयोगरूपानें करून दाखविलें. प्रथम जेव्हां इंग्लंडांतून वसाहती करण्यास सुरूवात झाली, तेव्हां जो प्रश्न फार कठीणसा वाटला होता, तो या वसाहतींनीं अगदीं सोपे रीतीनें उघड सोडवून दाखविला आहे. यूनायटेड् स्टेट्समध्यें पश्चिमेकडील

ओसाड प्रदेशांत हमेश नवीन वसाहती होत आहेत. अट्लांटिक महासागराचे किनाऱ्यावरील लहानशा वसाहत केलेल्या पट्टींतून लोक पश्चिमेकडे जात जात पासिफिक् महासागरापर्यंत सर्व प्रदेशांत वसाहती करीत आहेत. हें ढळढळीत उदाहरण त्यांनीं स्वतः करून दाखविलें आहे. बरें इतकें असूनही ह्या पश्चिमेकडील वसाहतींवर सर्व देशाच्या हिताकरितां कर वगैरे बसविणें शक्य आहे किंवा नाहीं व प्रत्येक असामी स्वतंत्रता मागण्यास उतावीळ होईल कीं काय, अशा प्रकारचे प्रश्न युनायटेड् स्टेट्स्मध्यें कोणासही अवघड वाटत नाहींत. सर्व लोक फार सुखानें नांदत आहेत. हेच प्रश्न पूर्वी इंग्लंडांत इंग्रज लोकांस फार गहन वाटले होते.

आतां वरील दोन शक्तींच्या योगानें जी गोष्ट शक्य ह्मणून वाटली, ती गत शतकापेक्षां ह्या शतकांत फारच जरूरीची झाली आहे. ज्या शक्तीच्या योगानें पूर्वी राजकीय एकीकरण शक्य झालें, त्याच शक्तीच्या योगानें पूर्वी सुरक्षित नसलेलीं राष्ट्रें हल्लीं कमी प्रतीचीं होण्याचा संभव आहे, ह्मणजे त्यांचें पुष्कळ महत्व कमी होणार आहे. युनायटेड् स्टेट्स् आणि रशिया हीं राष्ट्रें जर आणखी ५० वर्षेपर्यंत, आहेत अशीं अव्याहत चाललीं, तर ५० वर्षांनंतर फ्रान्स, जर्मनी वगैरे प्राचीन राष्ट्रांचा ऱ्हास होत जाऊन तीं अगदीं हलक्या प्रतीचीं होतील. जर इंग्रज लोक आपलें राज्य पिट्ट साहेबाचे वेळीं होतें तेवढें फक्त युरोपांतच आहे, असें समजून स्वस्थ राहतील, तर इंग्लिश राज्याचीही वरप्रमाणेंच स्थिति होईल. हल्लींची इंग्लिश साम्राज्याची स्थिति अशी आहे कीं, सर्व पृथ्वीभर लहान मोठ्या वसाहती, बेटें वगैरे ठिकठिकाणीं पसरलेलीं आहेत. त्या सर्वांत निरनिराळ्या जातींचे लोक राहतात. सहजरीत्या सर्व मिळून राणी सरकारचा अंमल कबूल करतात. ह्मणून हें एकीकर-

णाचें मजबूद बंधन आहे, असें बिलकुल नाहीं. ही स्थिति अशीच राहील, तर वर निर्दिष्ट नवीन तऱ्हेचीं मजबूद पायाचीं जीं साम्राज्यें आहेत, त्यांच्यापुढें ह्या इंग्लिश साम्राज्याचा निभाव लागणें कठीण दिसतें. इंग्लिश साम्राज्य ह्मणून जें आपण ह्मणतों, तें कृत्रिम इमारतीसारखें नसून, हिंदुस्थान देश वजा केला असतां, बाकीच्यास साम्राज्य हें नांवही शोभणार नाहीं; तर हें एकच राष्ट्र आहे, असें ह्मटलें असतां चालेल.* हें एक अफाट इंग्लिश राष्ट्र आहे, ह्मणजे तें इतकें पसरलेलें आहे कीं, वाफ आणि वीज यांचा शोध लागण्यापूर्वीं, निरनिराळ्या भागांमधील अंतर फार मोठें असल्यामुळें, त्याच्यापुढें धर्माची आणि जातीचीं बंधनें कांहींच टिकलीं नसतीं. ह्मणून हा अंतररूपी अडथळा वाफ आणि वीज यांच्या योगानें नाहींसा होतांच युनायूटेड् स्टेट्स्, रशिया वगैरे सारखीं साम्राज्यें अतोनात अंतरावरही सुरक्षितपणें नांदूं लागलीं आहेत. तसेंच इंग्लिश साम्राज्यही खरोखरी मजबूद आहे, असें हळूहळू आपणांस वाटूं लागलें आहे. मजबूद अशा ज्या कांहीं राजकीय संस्था असतील, त्यांतच आतां या इंग्लिश साम्राज्याची गणना होत आहे आणि जरी युनायूटेड् स्टेटस्पेक्षां या साम्राज्याची मजबुदी जास्त नसली, तरी राशियापेक्षां ती खचित जास्त आहे. कारण, राशियांत तर भिन्न भिन्न जातींचे व धर्माचे लोक राहत आहेत. स्लाव, जर्मन्, टर्कोमन्, आर्मीनियन्, ग्रीक्, खिश्चन्, काथोलिक्, प्राटेस्टंट्, मुसलमन् आणि बौद्ध, असे नानातऱ्हेचे लोक राशियांत वास करीत आहेत.

---

* या ठिकाणीं राष्ट्र आणि साम्राज्य याचा विरोध दाखविण्यांत येत आहे. राष्ट्रांत एकजातीय लोकांचा मात्र समावेश होतो. साम्राज्यांत जरी एकचक्री राज्य असतें तरी, त्यांत राहणारे लोक एकजातीय असलेच पाहिजेत, असें नाहीं.

प्रकरण पांचवें.

अमेरिकेचा* युरोपावर परिणाम.

अठराव्या शतकामध्यें इंग्लिश साम्राज्याचा सर्व व्यवसाय फ्रान्सच्या साम्राज्याचा पाडाव करून स्वतःची सत्ता स्थापन करण्याकडे चालला होता. एवढी गोष्ट ध्यानांत घेतली ह्मणजे त्यावेळच्या इंग्लंडच्या इतिहासांतील सर्व गोष्टींचा मेळ सुरेख बसतो. त्यावेळचीं सर्व युद्धें आणि भांडणें हीं सर्व एकाच प्रकारचीं व एकाच उद्देशाकरितां होतीं, हें सर्व मागील एका प्रकरणीं उघड करून दाखविण्यांत आलें आहे. तसेंच सतराव्या आणि अठराव्या शतकांत केवळ इंग्लंड आणि फ्रान्स यांच्याच नाहीं, तर स्पेन, पोर्तुगल, हालंड, या सर्वांच्या वसाहती अमेरिकेंत होत्या, हेंही सांगण्यांत आलेंच आहे. एवढी गोष्ट नेहमीं ध्यानांत धरली पाहिजे कीं, त्यावेळीं हीं राष्ट्रें फक्त युरोपांतच समावेश झालेलीं नव्हतीं, तर त्यांचा पुष्कळ विस्तार युरोपाच्या बाहेरही होता. तीं जगद्राष्ट्रेंच होतीं असें ह्मटलें तरी चालेल. त्या सर्वांमध्यें एक मोठा तंटा सतत चालू होता. तो तंटा केवळ युरोपखंड लक्षांत घेऊन चाललें तर नीट समजावयाचा नाहीं, तर हा तंटा अमेरिकेंतील जमिनीच्या मालकीविषयीं होता.

ही गोष्ट एकदां उघडपणें लक्षांत घेतली ह्मणजे या सर्व राष्ट्रांच्या त्यावेळच्या इतिहासास एक प्रकारचें स्वरूपैक्य प्राप्त होतें. त्यांच्या-

---

* ग्रंथकारानें " नवीन सांपडलेलीं सर्व द्वीपें " अशा शब्दांचा उपयोग केला आहे. सर्वांत अमेरिका हेंच मोठें असल्यामुळें शब्ददुर्मीळतेस्तव त्या सर्वांस अमेरिका असेंच ह्या पुस्तकांत ह्मणण्यांत आलें आहे.

मधील सर्व युद्धें आणि तह या सर्वांचा उलगडा एकाच गोष्टीनें होतो. आतां प्रस्तुत भागांत आह्मांस असें दाखविणें आहे कीं, वरील राष्ट्रांचा अमेरिकेशीं संबंध घडून आल्यामुळें त्यांच्या आपसांत चालू असलेल्या राजकीय व्यवहारांत अंतर पडत चाललें, इतकेंच नाहीं, तर प्रत्येक राष्ट्राच्या स्वतःच्या अंतर्व्यवस्थेंतही फरक पडत चालला. याच अनुरोधानें, मध्य युगानंतर इंग्लंडच्या अलीकडील स्थितीचें थोडक्यांत स्वरूप काय ह्मणून कोणीं विचारिलें असतां त्यास असें सांगतां येईल कीं, इंग्लंड देशाचा हळुहळु विस्तार होत असून तें एक जगत्साम्राज्य बनत आहे.

सुमारें तीस (३०) वर्षांच्या अंतरानें दोन गोष्टी युरोपांत घडून आल्यां. एक अमेरिकेचा शोध आणि दुसरी ख्रिस्ती धर्मसुधारणा.* आणखी दुसऱ्या दोन गोष्टी याच सुमारास घडल्या त्या ह्याः—तुर्क

---

* धर्मसुधारणा—हा शब्द फार व्यापक आहे. ह्यांत पुष्कळ गोष्टींचा समावेश होतो. तमोयुगानंतरच्या कालाला हा शब्द ठोकळ मानानें लागेल. अकराव्या शतकानंतर ह्या सुधारणेस आरंभ झाला. व्यापार वाढूं लागला. शेतकी व कला सुधारत चालल्या. विद्योज्जीवन होऊं लागलें. एकंदरीनें समाज सुधारत चालला. ह्या सर्व सुधारणेंत धर्मसंस्थापनेची सुरवात झाली. ही तमोयुगाच्या शेवटल्या कांहीं शतकांत थोडथोडी होऊं लागली होती. बाराव्या शतकापर्यंत साधारणपणें स्थापित धर्माविरुद्ध प्रतिपादन ह्मणण्यासारखें नव्हतें. पण बारावें शतक लागल्याबरोबर नानाविध धर्मविरुद्ध मतें जिकडे तिकडे पसरत चाललीं. त्यांचा कळस, पंधराव्या शतकाच्या शेवटापासून तों बहुतेक सर्व सोळाव्या शतकभर झाला. सातव्या हेनरीपासून तों एलिझाबेथ राणीची कारकीर्द सुरू होईपर्यंत ही धर्मसुधारणा अतिशय जारीनें चालू होती. ह्या काळांत छळ व जुलूम फार झाला. राजा मुख्य स्थापित धर्मानुयायी व तद्विरुद्धमतप्रतिपादक ह्यांपैकीं अनुक्रमें एका किंवा दुसऱ्या वर्गाचा असेल त्याप्रमाणें एकमेकांवर छळ व जुलूम फार होत असे. ह्या धर्मसुधारणेचें मूळ बीज ह्मटलें ह्मणजे पोपच्या व भिक्षुक वगैरे धर्मोपदेशक वर्गाच्या अमलाचा, तसेंच धर्मसंबंधीं जो त्यांनीं लोकांवर जुलूम चालविला होता, त्याचा लोकांना कंटाळा आला होता व त्या दोघांचाही अंमल झुगारून द्यावा, स्थापित

लोकांनीं पूर्वेकडील रोमन राष्ट्र जिंकल्यामुळें यूरोपांतील लोकांचा पूर्वमहाद्वीपाशीं व्यवहार बंद पडला, आणि दुसरी यूरोपांतील मोठमोठ्या राष्ट्रांनीं आपलीं विस्कळित राज्यें एकछत्राखालीं जमवून आपली शक्ति प्रबल केली. या दोन गोष्टींशीं पहिल्या दोन गोष्टींचा संयोग झाल्यानें मध्य युगाची* समाप्ति होऊन अर्वाचिन कालास सुरुवात झाली. वर ज्या प्रथम दोन गोष्टी घडल्या ह्मणून सांगण्यांत आलें, त्यांपैकीं दुसरीचा

धर्म जो त्यांनीं भ्रष्ट केला होता, त्याची पुनः संस्थापना करावी अशी सर्वत्र उत्कट इच्छा झाली हें होय. हें मुळ ठीक झालें. प्रयत्नांचा हेतु चांगला होता. परंतु त्या प्रयत्नांत माथेफिरूपणाही फार होता. जेवढे धर्मसुधारक झाले तेवढे अति दृढ मताचे, फार निश्चयी फारच माथेफिरू, कधीं सवलत न करणारे, असे होते. त्या काळांत मोठे सुधारक ह्मणजे वुइक्लिफ, ल्युदर, क्रान्मर, लाटिमर, काल्विन, रिडले, नामक होते. ह्या वेळीं व ह्यानंतर ख्रिस्तीधर्मांत ढंग पुष्कळ झाले त्या धर्मांचे मुख्य पंथ ह्मटले ह्मणजे क्याथोलिक, प्राटेस्टंट, आंग्लिकन, प्रेस्बिटेरियन, क्वेकर, मेथॉडिस्ट, प्युरिटन्, इंडिपेंडेंट वगैरे आणखी पुष्कळ आहेत.

* मध्य युग (धि मिडल् एजिस):—जगाच्या व विशेषेंकरून युरोपाच्या ऐतिहासिक कालाचे तीन भाग केलेले आहेत—एक प्राचीन काळ, दुसरा मध्य काळ, तिसरा अर्वाचीन काळ. ह्या मध्यकाळच्या मर्यादा ठरविण्याचें फार कठिण आहे, परंतु ठोकळ मानानें पाहतां पांचव्या शतकापासून तों पंधराव्या शतकापर्यंत हा काल ठरवितां येईल. परंतु इतिहासाची सरणी अविच्छिन्न ठेवावयाची ह्मणजे ह्या मर्यादेंत थोडासा फरक करावा लागेल. तो असा:—पांचव्या शतकाच्या समाप्तीपूर्वीं थोडीं वर्षें सर्व पश्चिम युरोपभर पसरलेलें बादशाही राज्य उत्तरेकडील व्हांडाल्स वगैरे लोकांनीं स्वाऱ्या करून विध्वंस करून टाकलें, त्यावेळीं प्राचीन इतिहासाची समाप्ति झाली, असें ह्मणावें लागेल; आणि नवीन कालास ह्मणजे मध्य कालास प्रारंभ झाला तो, रोमशीं बहुत काल संबंध असलेली सेलियन फ्रांक्स् नांवाच्या लोकांची एक जर्मनींतील जात होती, तिचा राजा क्लाव्हिस ई. स. ४८६ च्या सुमारास जेव्हां गाल (फ्रान्सचें पूर्वींचें नांव) मध्यें स्वारी करून आला आणि तेथील सेग्रियस नांवाच्या राजाचा सोइसान्स येथें पराभव करून आपली स्थापना केली, तेव्हां झाला, असें समजावें लागेल. अर्वाचीन कालाचा प्रारंभ बरोबर ठरवितां येतो. फ्रान्साचा राजा आठवा चार्लस हा गादीवर सन १४८३ त बसला. तो १४९८ त मरण पावला. त्यानें १४९५ च्या सुमारास इटालीमधील नेपल्सवर स्वारी करून

ह्मणजे धर्मसुधारणेचा परिणाम फारच त्वरेनें सर्वांसमक्ष घडून आला; व तो इतिहासांत फार चित्तवेधक होता. सुमारें ९० वर्षेपर्यंत हाब्स्बर्ग* घराणें व धर्मसुधारणा यांची निकराची झटापट चालू होती. प्रथमतः ही झटापट जर्मनींत चालू होती. नंतर फ्रान्स देश तींत सामील झाला. पुढें हे तंटे हालंड देशांत चालू होऊन त्यांत कधीं कधीं फ्रेंच लोकांचें अंग असून कधीं कधीं इंग्रजांचेंही अंग असे. इकडे अशा गोष्टी युरोपांत चालू असतां त्याच वेळीं अमेरिकेंतील वसाहतींचें काम हळूहळू सुरूच होतें. जोंपर्यंत युरोपांतील विषयांकडे लोकांचें लक्ष असतें, तोंपर्यंत अमेरिकेचें महत्व आरंभीं फारसें कळून येत नाहीं. कॉर्टेझ्† आणि पिझारो‡ यांनीं जे पराक्रम केले, त्यांचा युरोपांतील घडामोडींशीं फारसा संबंध असल्याचें कोणास कळून

तें राज्य जिंकिलें. नेपल्सचें राज्य नष्ट झालें, त्याचबरोबर प्राच्य बादशाहीचा अंत झाला. तेव्हांपासून ह्या अर्वाचीन कालास प्रारंभ झाला. युरोपस्थ मुख्य राजांत परस्पर स्नेहभाव किंवा वैरभाव ठेवून कृत्यें करण्यास प्रारंभ ह्या स्वारींत सुरू झाला. असे संबंध आजपर्यंत आपले देखत चालू आहेत. युरोपस्थ इतिहासाचा माग काढूं लागलें तर ह्याचें मूळ ह्या स्वारीच्या वेळीं सांपडतें. ह्या स्वारीच्या पूर्वींचा काल अगदीं निराळा भासूं लागतो. आणि ह्या स्वारीपासून तों तहत आजपर्यंतचा काळ एकसूत्री भासतो. ह्या स्वारीपासून इटाली व फ्रान्स यांच्या इतिहासाची समाप्ति होते, आणि मध्यकालाचा इतर देशांचा जो इतिहास आहे त्याच्या समाप्तीच्या वृत्तांताशीं समकालीन वृत्तांत ह्या स्वारीचा होय. ह्मणजे मध्यकालाच्या ऐतिहासिक मर्यादा इ. स १४८६ व इ. स. १४९५ ह्मणजे पाश्चिमात्य रोमन बादशाहीची समाप्ति व प्राच्य रोमन बादशाहीची समाप्ति ह्या होत असें झालें.

* हाब्सबर्ग या नांवाचा एक मोडकळीस आलेला किल्ला स्वित्झर्लंड देशांत आर नदीचे कांठीं आहे. तेथें राहत असलेल्या एका घराण्यापासून जर्मनी, स्पेन, आणि आस्ट्रिया येथील राजघराण्यांची उत्पत्ति आहे, ह्मणून हाब्सबर्ग घराणें यांत वरील तीनही देशांतील राजघराण्यांचा समावेश होतो.

† टीप.—*पान ८८ पहा.

‡ टीप.—* पान ८९ पहा.

२०

येत नाही. सोळाव्या शतकाचे अंतीं फ्रान्सीस ड्रेक* आणि त्याचे साथीदार हे मध्य अमेरिकेंतील स्पेन लोकांच्या वसाहतींवर हल्ला करूं लागल्यामुळें इंग्लंडावर एकवार मोठी स्वारी करण्याचें स्पानिश लोकांच्या मनांत आलें. ह्या वेळपर्यंत, ह्मणजे स्पानिश आरमेडाचा† इंग्लंडावर हल्ला झाला तोंपर्यंत, अमेरिकेंतील व्यवहारांचा परिणाम युरोपावर स्पष्टपणें घडून येत असल्याचें दिसून येत नाहीं.

---

* सर फ्रान्सिस् ड्रेक.-(१५३९-१५९५) हा एका धर्मवेड्या प्राटेस्टंट पंथी गृहस्थाचा मुलगा होता. तो खुष्कीवर व समुद्रावर मोठा शूर व धीट सरदार होता. त्यानें सर जॉन हाकिन्सबरोबर समुद्रावर बऱ्याच सफरी करून ऐर्लंडमध्यें एसेक्सबरोबरही फार शूरत्वाचीं कामें केलीं. त्यांबद्दल एसेक्सानें एलिझाबेथ राणीकडून त्याचा गौरव करविला. त्यानें अमेरिकेंतील स्पेनच्या वगैरे वसाहतींना फारच त्रास दिला. १५८८ तील स्पानिश आरमाराच्या पराभवांत ह्यानें आडमिरल लार्ड हावर्ड ह्यास मदत केली होती. १५८९ त तो पार्लमेंटाचा सभासद झाला.

† स्पानिश आर्मेडा (१५८८). मेरी, स्काटूलंडाची राणी, मरण्यापूर्वी तिनें एक मृत्युपत्र केलें. त्यांत तिनें इंग्लंडच्या गादीचा आपला हक्क स्पेनचा राजा दुसरा फिलिप याच्या मुलाला देऊन ठेवला होता. स्पेनच्या राजाला एलिझाबेथ राणीचाही फार राग आला होता, कारण कीं तिनें त्याच्याशीं लग्न लावण्याचें नाकबूल केलें होतें; इंग्लंडांत तिनें प्राटेस्टंट धर्म स्थापिला होता, व स्पेन हें काथोलिक राष्ट्र होतें; आणि तिनें नेदर्लंडांतील प्राटेस्टंट लोकांना स्पेनच्या विरुद्ध कुमक केली होती. एलिझाबेथ राणीच्या अशा कृत्यासाठीं तिला शिक्षा करावी अशी फिलिपाला फार इच्छा झाली. तेव्हां त्यानें एक मोठें आरमार तयार केलें, व त्याला "अजिंक्य आरमार" असें नांव दिलें. ह्या आरमारानिशीं इंग्लंडवर स्वारी करण्याचा त्यानें निश्चय केला. हें आरमार अवाढव्य होतें, ह्मणजे तसें लढाऊ आरमार त्या काळपर्यंत कोठल्याही देशांत तयार झालेलें नव्हतें. त्या आरमारांत १३२ तारवें होतीं. त्यांवर वीस हजार शिपाई होते व आठ हजार खलाशी होते. इंग्लंडाला जाण्याच्या वाटेवर नेदर्लंडाच्या एका बंदरावर त्यावेळचा विख्यात योद्धा ड्यूक आफ पार्मा ह्याच्या हाताखालीं ४०,००० मनुष्यांची कुमक आरमारावर येणार होती.

ह्या स्वारीला तोंड देण्याला इंग्लंडांतील सर्व प्रकारचे लोक उठले. ह्या वेळपावेतों क्याथोलिक व प्रोटेस्टंट ह्या भिन्न धर्मी लोकांची अतिशय मोडामोडी चाललो

परंतु या काळापासून पुढें युरोपांतील सर्व घडामोडींचीं दोन मुख्य कारणें दिसून येतात तीं हीं:—धर्मसुधारणा आणि अमेरिका. ह्यांपैकीं पहिल्या कारणाचा ह्मणजे धर्मसुधारणेचा जोर उत्तरोत्तर कमी कमी होत गेला, व अमेरिकेचें वजन त्याच प्रमाणानें जास्त वाढत गेलें. सतराव्या शतकाची विशेष गोष्ट ह्मटली ह्मणजे ही आहे कीं, हीं वरील

होती. परतु परकीय राजाची स्वारी येणार असें कळतांच त्यांचें द्विधापण एकदम गेलें, व सर्वांची जूट जमली. प्रत्येकानें जात, भेद वगैरे कांहीं न पाहतां लढाईची तयारी केली. त्यामुळें राणीची शक्ति वाढली, तिनें रात्रंदिवस मेहनत करून देशाच्या रक्षणासाठीं तयारी केली. लंडनच्या दक्षिणेस वीस मैलांवर थेम्स नदीच्या डाव्या बाजूच्या किनाऱ्यावर टिलबरी नामक एक बंदर आहे, त्या ठिकाणीं अर्ल आफ् लीस्टर हा फौजेनिशीं दाखल झाला. एलिझाबेथनें त्या फौजेची पहाणी केली, व अभिमानानें पुढील वाक्य ह्मटलें:—"मी जरी जातीची बाई आहे व त्यासंबंधानें माती शरीरशक्ति जरी निर्बल आहे, तथापि माझें हृदय राजपुरुषाचें आहे, व तेंसुद्धा बारीक सारीक राजपुरुषाचें नव्हे, तर इंग्लंडच्या राजपुरुषाचें आहे." असो. इंग्लिशांचें आरमार लहानसें होतें. त्यांत फक्त ८० तारवें होतीं. आणि त्यांतील ५० तर हल्लीं आपण जीं लहान लहान वाफेचीं तारवें पहातों त्यांच्या आकाराचीं असतील नसतील. त्यांतील अतिशय ४ मोठीं तारवें स्पानिश आरमारांतील अतिशय लहान तारवांच्या जोडीला आलीं असतीं, परंतु इंग्रजी तारवें चांगलीं बांधलेलीं, हलकीं व ह्मणून जलदी हलवितां येण्यासारखीं होतीं. त्यांवरील खलाशी फार शूर, निश्चयी व अभिमानी असे होते. त्यांत लॉर्ड हॉवर्ड, रोमन क्याथलिक, हा प्रमुख होता व त्याचे हाताखालीं ड्रेक, फ्रॉबिशर, व हॉकिन्स असे फारच धीट खलाशी होते.

हें स्पानिश आरमार जेव्हां प्लिमथ बंदरांतून दिसूं लागलें, तेव्हां लॉर्ड हॉवर्डनें आपलें छोटेखानी आरमार समुद्रांत घातलें. स्पानिश तारवें अवजड असल्या कारणानें त्यांना लवकर हालतां येत नाहीं हें हॉवर्डच्या ध्यानांत आल्याबरोबर त्यानें आपलीं लहान लहान तारवें त्या मोठमोठ्या तारवांच्या मध्यें घालून त्यांचें नुकसान करण्याचा घाट घातला. स्पानिश तारवें इतकीं उंच होतीं कीं, त्यांच्या तोफांचे गोळे शत्रूच्या डोक्यांवरून निघून जात, त्यामुळें शत्रूला त्यापासून कांहीं अपाय होत नसे. आणखी स्पानिश तारवांच्या बाजू इतक्या कांहीं रुंद होत्या कीं, इंग्रज लोकांच्या तोफांना नेम चांगला सांपडे. अशा प्रकारचें तें स्पानिश आरमार क्याले येथें येऊन धडकलें. पण तेथपर्यंत येईपर्यंतच त्यांना कितीतरी लढावें लागलें, व त्यांच्या कित्येक तारवांचा फडशा उडाला. त्यानें क्यालेपासून कांहीं अंतरावर नांगर टाकिला व

दोनही कारणें एकसारखीं चालू होतीं. यास उदाहरण, क्रामवेलच्या वर्तनावरून दिसून येतें. तें असें कीं, स्पेनबरोबर युद्ध* करण्याचे त्याचे दोन उद्देश होते. पहिला उद्देश क्याथोलिक धर्माचा पाडाव करणें हा होता, असा दिसतो. परंतु त्याच्याच अंतर्गत खरोखरचा उद्देश अमेरिकेंतील मुलुख स्पेनच्या ताब्यांतून आपल्या ताब्यांत आणणें हा होता. बरें, या लढाईचा परिणाम ही तसाच झाला. जमेका बेट इग्रजांस मिळालें. हीं वरील दोन कारणें सारखीं चालू होतीं, याचें

ड्यूक आफ्पार्माची वाट पाहत राहिले. मध्यरात्रीला इंग्लिशांनीं आठ तारवांना आग लाविली. तीं भरतीबरोबर स्पानिश तारवांकडे गेलीं. तीं जळतीं तारवें पाहून स्पानिश आरमारांत अगदीं गोंधळ उडून गेला. हा घाट चांगला सिद्धीस गेला, कारण तीं जळतीं तारवें पाहतांच स्पानिअर्ड लोकांनीं भीतीनें आपले नांगर वर उचलले, आणि समुद्रांत तारवें घालूं लागले. परंतु इंग्लिशांनीं आपलें आरमार अगदीं जवळ आणून भिडाविलें होतें, तेव्हां स्पानिश लोकांना दुसरें कांहीं न करतां लढाईच सुरू करावी लागली. ही लढाई फार आणीबाणीची झाली, त्यांत स्पानिशांची तीन मोठालीं तारवें इंग्लिशांनीं बुडवून टाकिलीं, आणि दुसरीं तीन किनाऱ्यावर हापटलीं. ४,००० स्पानिअर्ड प्राणास मुकले. स्पानिअर्ड लोकांना आतां इंग्लिश आखातांतून जाण्यास मार्ग राहिला नाहीं. तेव्हां त्यांनीं उत्तरसमुद्राकडे वाट धरली, व आर्कनी बेटांना वळसा घालून स्वदेशीं जाऊं लागले. जातांना एका मोठ्या वादळानें त्यांना गाठलें. त्यांत त्यांचीं अतिशय तारवें बुडालीं. एवढ्या प्रचंड स्पानिश आरमारापैकीं शेवटीं राहतां राहतां ५० मोडकीं तोडकीं तारवें शिल्लक राहिलीं. तीं व त्यांवरील आजारी, थकलेलीं, मरायला टेंकलेलीं माणसें कशीतरी ही दुःखाची वार्ता कळविण्यास स्वदेशीं परत गेलीं. येणेंप्रमाणें दुसऱ्या फिलिपाच्या अभिमानानें इंग्लंडवर केलेल्या स्वारीचा शेवट झाला. ह्या जयाच्या स्मरणार्थ एलिझाबेथ राणीनें एक लेख लिहून ठेविलेला आहे, तो असा:—"ईशकृपेनें वादळ सुरू झालें व त्या आरमाराची दाणादाण उडाली."

* क्रामवेलचें स्पेनबरोबर युद्ध:—१६५६ सालीं क्रामवेलचा मानस बाह्य देशामध्यें आपला देश श्रेष्ठ करण्याचा होता. युरोपांतील प्राटेस्टंट राज्यांत श्रेष्ठता मिळवावयाचा त्याचा विचार होता. आणि जेव्हां सेव्हायचा ड्यूक तरवारीच्या जोरावर आल्पाईन खिंडींतल्या प्राटेस्टंटांना धर्म बदलण्यास लावूं लागला, तेव्हां त्या प्राटेस्टंटांचा क्रामवेलानें त्याच हेतूनें पक्ष उचलिला. आणि फ्रेंच प्रधान माझारिन ह्याच्याशीं

आणखीही प्रत्यंतर आहे. इ. स. १६७२ या वर्षी हालंड देशावर हल्ला करण्याकरितां इंग्लंड व फ्रान्स एकत्र झाले.* या वेळीं इंग्लंड व हालंड या दोन प्राटेस्टंट धर्मी राष्ट्रांचा कलह चालला. शाफ्टस्बरी ह्मणून क्रामवेलचीच राज्यपद्धत संमत असलेला मुत्सदी त्यावेळीं होता, त्याचीच संमति विशेषें करून या लढाईस होती, कारण या उभय राष्ट्रांची नवीन मुलूख मिळण्याविषयीं खटपट चालू होती. परंतु सतरावें शतक समाप्त होतांच धर्मसुधारणेचें वजन राजकीय प्रकरणांत अगदीं कमी झाल्यासारखें दिसून येतें; व अठराव्या शतकांत विशेष महत्व कायतें अमेरिकेचेंच दिसूं लागलें. याच कारणामुळें व्यापार वाढून तत्संबंधींचें चमत्कारिक स्वरूप या शत-

---

तह करण्याचें नाकारलें. एलिझाबेथच्या मुत्सद्याच्या राजनीतीप्रमाणें ह्याचे मत स्पेन हें राज्य युरोपांतील कॅथोलिक राष्ट्रांत प्रमुख होतें. तेव्हां माझारीनशीं जूट करण्याचा निश्चय त्यानें केला, तो फ्रान्साला मदत करण्यासाठीं नव्हे, तर स्पानिश कोर्टाच्या विरुद्ध जाण्यासाठीं केला. त्याच्या उद्देशाप्रमाणें त्यानें तजवीजही केली होती. ब्लेक हा आरमार घेऊन फिरत होता. तसेंच गुप्तपणें एक मोठें आरमार वेस्ट इंडीज घेण्यासाठीं पाठवलेलें होतें. पण त्याला जय कांहीं झाला नाहीं, उलट पूर्ण पाडाव झाला. असें दिसूं नये म्हणून त्या आरमारानें जातां जातां जमेकाचें बेट घेतलें. असा निष्फळ जरी त्याचा हा गुप्त प्रयत्न झाला, तरी त्यानें उद्योग सोडिला नाहीं. जमेका बेट त्यानें वसविलें, पुढें नोव्हेंबरमध्यें फ्रान्सबरोबर तह केला, स्पेनशीं प्रसिद्धपणें लढाई करण्याचें ठरविलें, व त्यासाठीं लढाऊ गलबतें माँटेग्यु व ब्लेक ह्यांच्या हाताखालीं दिलीं.

* इ. स. १६७० या वर्षी इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस व फ्रान्सचा राजा चौदावा लुई यांजमध्यें तह झाला, त्याला 'डोव्हरचा तह' असें नांव आहे. यांत असें ठरलें कीं, उभयतांनीं मिळून हालंडबरोबर लढाई सुरू करावी. हॉलंड देश प्राटेस्टंट-धर्मी होता, व इंग्लंड देशही जरी प्राटेस्टंट धर्मीच होता, तरी राजा चार्लस हा मनांत नेहमीं क्याथोलिक असे. वरील तह गुप्तपणें झाला होता. हालंडमध्यें क्यथोलिक धर्म सुरू करावा असें ह्या दोघांनीं ठरविलें. तसेंच हॉलंडचे ताब्यांत अमेरिकेकडे वगैरे पुष्कळ मुलूख होता, तो आपल्याकडे घेण्याचा लुईचा इरादा होता, व त्याशिवाय न्यू झीलंड व दक्षिण अमेरिकेंतील कित्येक प्रदेश इंग्लंडला मिळवून देण्याचें लुईनें वचन दिलें. ही लढाई कांहीं वेळ चालली. इ. स. १६७२ या वर्षी निकराचें युद्ध हालंडांत झालें. त्यांत हालंडचा मोड झाला. पुढें ही लढाई संपली.

कास प्राप्त झालें आहे. धर्मसंबंधींचे तंटे कितीही मोठे होते, तरी ते सर्व मार्गे पडून त्यांच्या ठिकाणीं वसाहतींसंबंधी मोठा प्रश्न सर्वांपुढें आला, व याच प्रश्नांत पुष्कळांचें ऐहिक हितानहित गुंतून गेलें.

याप्रमाणें अमेरिकेचें वजन युरोपावर पडूं लागलें. परंतु याचा अर्थ काय ? वस्ती नसलेला अफाट प्रदेश अमेरिका, ह्याचा परिणाम युरोपीय राष्ट्रांवर दोन रीतीनें होऊं शकेल. प्रथमतः राजकीय व्यवहारांवर ह्मणजे युरोपीय राष्ट्रांच्या राज्यपद्धतीवर परिणाम घडूं शकेल, कारण बिनमालकीचा एवढा मोठा प्रदेश मोठ्या तंट्यास कारण होईल. इतका वेळ जो आह्मीं विचार केला, तो याच बाबतीचा, ह्मणजे बिनमालकीचा एवढा मोठा प्रदेश सर्वांसमोर आल्यामुळें कसकशा लढाया सुरू झाल्या, ह्याजबद्दल केला. अठराव्या शतकांतल्या बहुतेक लढाया व विशेषेंकरून इंग्लंड आणि फ्रान्स यांजमधील त्या वेळच्या मोठमोठ्या लढाया, या सर्वांचें मूळ कारण हा प्रदेशच होय. परंतु याशिवाय अमेरिकेसंबंधीं दुसरा एक परिणाम घडून येणार आहे. हा परिणाम युरोपीय लोकांवर घडणारा आहे. त्यांच्या धंद्यांत व व्यावहारिक चालींत फरक पडेल. तसेंच त्यांच्या औद्योगिक व अर्थशास्त्रसंबंधीं वागणुकींतही फेरफार होत जाईल. ह्मणून इंग्लंडचा विस्तार ह्मणून जेव्हां आपण ह्मणतों, तेव्हां त्यांत इंग्लंडच्या अंतर्व्यवस्थेंत बदल होणें असाही अर्थ आहे.

इंग्लंड देश हल्लीं मोठा दर्यावर्दी आहे. त्याच्या वसाहती पुष्कळ आहेत. इंग्रज लोक मोठे उद्योगी आहेत. सर्व लोक जिकडे तिकडे असें मानतात कीं, इंग्लंड देश पूर्वापार असाच चालत आला आहे व इंग्रज लोकांचा स्वभाव असा आहे कीं, वरच्याहून दुसरी तऱ्हा त्यांस लागणें अशक्य आहे. ह्या समजुतींत प्रमाद आहे, व रूकर्ट* नांवाच्या

* रूकर्ट-एक जर्मन कवि (१७८८-१८६६).

गृहस्थानें एक कविता केली आहे, त्यांत त्यानें अशा प्रकारच्या प्रमादाचें सुरेख वर्णन केलें आहे. एक देवता दर पांचशें वर्षांनीं पृथ्वीवर एकाच ठिकाणीं येत असे. त्या ठिकाणीं केव्हां तिला अरण्य दिसे, केव्हां शहर दिसे, केव्हां समुद्र दिसे. प्रत्येक वेळेस जें तिला दिसे त्याच्या उत्पत्तीविषयीं ती तेथील लोकांस प्रश्न करी व तिला एकच उत्तर मिळे कीं, अशाच प्रकार सतत चालू आहे. ह्मणजे जें जें त्या लोकांच्या समोर असे, तेंच नेहमींचें आहे, असें त्यांस वाटे. तर अशा प्रकारचा मनाचा ग्रह असणें, ह्मणजे इतिहासाकडे केवळ दुर्लक्ष करणें होय. जें आपण पुष्कळ दिवस पहात आहों, तेंच सतत सृष्टिक्रमांत पूर्वापार चालू आहे, हा चुकीचा समज इंग्रज लोकांच्या बुद्धिवैचित्र्याचें वर्णन करण्यामध्यें दृढ झालेला दिसतो. इंग्रज लोक हल्लीं आहेत त्याहून निराळे होऊं शकले असते, इतकेंच नाहीं, तर ते पूर्वींसुद्धां अगदीं निराळेच होते, असें मानणें लोकांस इतकें अवघड वाटतें कीं, शोध करून खरें काय तें ठरविण्यापूर्वींच आपण पूर्वापार एकसारखेंच असण्याचें कारण काय ? याचा ते शोध करूं लागतात. इंग्रज लोकांचे पूर्वज चांचे लोक असून ते समुद्रावर भटकत असत, हें बहुश्रुत आहे. त्याचप्रमाणें हल्लींचे इंग्रज लोकही मोठे प्रवास करणारे व श्रम करणारे असून नवीन ठिकाणीं जाऊन राहण्यास मोठे तत्पर आहेत. त्यांस असें वाटतें कीं, आपल्याचकरितां ईश्वरानें समुद्र उत्पन्न केला आहे, व त्या धोपट मार्गावरून पाहिजे तिकडे फिरून आपण निरनिराळीं राष्ट्रें काबीज करून त्यांत आपली वसाहत करण्यास कांहीं हरकत नाहीं. असें जरी सर्व इंग्रज लोकांस वाटतें, तरी एलिझाबेथ राणीच्या वेळेपासूनच इंग्रज लोक व्यापारांत व दर्यावर्दीपणांत पुढें सरसावूं लागले.

इंग्रज लोकांचा देश समुद्रवलयवेष्टित आहे. त्याच्या पश्चिमेस

व उत्तरेस अफाट अट्लांटिक महासागर पसरला आहे. यावरून कोणास असें सहज वाटणार आहे कीं, सृष्टस्थितीला अनुसरूनच इंग्रज लोक मूळपासून दर्यावर्दी असले पाहिजेत. प्रथम इंग्लिश द्वीपांत हे लोक गलबतांतूनच आले. शेवटीं समुद्रावर फिरणाऱ्या लोकांनींच त्यांस जिंकिलें, तथापि इंग्लंडची स्थिति नार्वे देशासारखी नाहीं. नार्वे देशांत शेतकीला उपयुक्त जमीन फारच थोडी आहे. ह्मणून उपजीविकेकरितां लोकांस समुद्राशिवाय दुसरें साधन नाहीं. प्लांटाजनेट* घराण्यांतले राजे इंग्लंडावर राज्य करीत असतां दर्यावर्दीपणांत इंग्रज लोक प्रवीण नव्हते. त्यावेळीं त्यांस दर्यावर्दी हें विशेषण शोभलें असतें किंवा नाहीं याची शंकाच आहे. कधींकधीं लढाईच्या प्रसंगीं इंग्रज लोकांचें बरेंच मोठें आरमार समुद्रपीठावर लढावयास आलेलें दृष्टीस पडे, परंतु लढाई संपून तह होतांच आरमारही गुप्त होई. इंग्लिश खाडींत यांचे लोकांनीं बरीच पुंडाई माजविल्याचें आपण वाचतों. यावरून स्पेन देशाच्या किनाऱ्याजवळील समुद्रावरसुद्धां इंग्रज लोकांस आपला अंमल पूर्णपणें बजावतां येत नव्हता असें उघड होतें. मध्ययुगांतरीं जशी कोणत्याही राष्ट्राची कायमची फौज नव्हती, तद्वतच इटलींतील कित्येक नगरसंस्थानेंखेरीज करून, इतर कोणत्याही राष्ट्राचें कायमचें आरमार नव्हतें, असें कित्येक ठिकाणीं लिहिलेलें आहे, तें यथार्थ आहे. त्या वेळीं आरमार वरचेवर मोडलें जात असे. जेव्हां एखादा लढाईचा प्रसंग येई, तेव्हां व्यापारी लोकांच्या खासगी गलबतांसच तेवढ्या वेळेपुरते सरकारी परवाने देऊन लढाईस बोलावून घेण्याची चाल असे. व्यापारी लोक आपलीं गलबतें लढाईला पाठविण्याचें खुषीनें कबूल करीत ह्याचें कारण हें कीं, लढाईला गेल्यानें शत्रूंचीं गलबतें लुटण्याची त्यांस

* हे घराणें ११५४—१४८५ पर्यंत राज्य करीत होतें.

संधि येई, इतकेंच नाहीं, तर पुढें चांचेपणाचा धंदा चालविण्याची चांगली सोय त्यांस मिळे. प्लँटाजनेट* राजांच्या वेळेस जरी इंग्रज लोकांचा लढाईकडे अलीकडच्यापेक्षां जास्त कल होता, तरी त्या वेळेस लढाई समुद्रावर न करितां जमीनीवरच करण्याचा त्यांचा विशेष परिपाठ असे. त्या वेळच्या इंग्लिश सैन्यानें जे पराक्रम केले आहेत, त्यांच्यापुढें इंग्लिश आरमारांचे पराक्रम अगदीं झांकून जात असत. क्रेसी, पायटियर्स† वगैरे ठिकाणच्या जमीनीवरील लढायांची आपणां सर्वांस चांगली आठवण आहे. परंतु स्ल्यूस् वगैरे ठिकाणच्या‡ समुद्रांतील लढाया कोणाच्याही स्मरणांत नाहींत.

• वास्तविक पाहूं गेलें असतां, हें उघड आहे कीं, दर्यावर्दीपणांत इंग्रज लोकांचा पुढारीपणा त्यांस वाटतो त्यापेक्षां फार अलीकडचा आहे. सतराव्या शतकांत इंग्रज लोकांच्या आपआपसांत कित्येक लढाया झाल्या तेव्हांपासून व राबर्ट ब्लेक याच्या वेळेपासून इंग्लंडचें नांव दर्यावर्दीपणांत पुढें येऊं लागलें. क्रूसेड्स् ह्मणून जीं प्राचीन काळीं धर्मयुद्धें झालीं, त्या युद्धांनंतर भूमध्य समुद्रांत इंग्रजांचें आरमार जिब्राल्टरच्या सामुद्रधुनींतून स्पेनच्या पूर्व किनाऱ्यापर्यंत ब्लेक§ साहेबानें नेलें, त्या

* टीप—* पान १६० पहा.

† टीप—* पान ३५ पहा.

‡ इ. स. १३३८. शंभर वर्षांच्या युद्धांतील फ्रेंचांबरोबरची समुद्रावरील लढाई, इंग्लंडचा तिसरा एडवर्ड विजयी झाला.

§ राबर्ट ब्लेक (१५९८–१६५७) हा इंग्लंडचा मोठा शूर, धीट असा जलाशी व आरमारावरचा हुशार योद्धा होता. त्यानें पार्लमेंटच्या पक्षानें पहिल्या चार्लस राजाच्या कारकीर्दीतील राजा व प्रजा ह्यांच्यामधील युद्धांत पुष्कळ लढाया मारल्या व प्रिंस रूपर्ट याला बऱ्याच सामन्यांत जेर केलें, त्याबद्दल पार्लमेंटनें त्यास पुष्कळ बक्षीस व शाबासकी दिली.

वेळेस तो प्रिन्स रूपर्ट* याचा पाठलाग करीत होता. फ्रान्सिस ड्रेक,† रिचर्ड ग्रेनव्हील,‡ आणि जान हाकिन्स§ वगैरे ब्लेकच्या पूर्वीचेही दर्यावर्दी योद्धे आहेत; तरी एलिझाबेथ राणीचें आरमार बाल्यावस्थेंतच होतें, व त्या वेळचे योद्धेही चांचे किंवा समुद्रचोर यापेक्षां जास्त नव्हते. ट्यूडर घराण्यांतील राजांच्या पूर्वी इंग्लिश आरमार केवळ गर्भांतच होतें, असें म्हटलें तरी चालेल. पांचव्या हेन्रीची लहानशी कारकीर्द खेरीजकरून पंधराव्या शतकांतील इंग्लिश आरमाराच्या इतिहासांत कांहींच तथ्य

---

* प्रिन्स रूपर्ट–(१६१९–१६८२) ह्याचा बाप पांचवा फ्रेडरिक व आई इंग्लंडचा राजा पहिला जेम्स ह्याची मुलगी एलिझाबेथ होती. हा पहिल्या चार्लसच्या राज्यांतील राजा व प्रजा ह्यांमधील युद्धांत होता. हा राजाच्या पक्षाचा होता. तो शूर व धाडशी होता, पण फारच अविचारी होता. त्याच्या अविचारामुळें पहिल्या चार्लसचें १६४४ त मार्स्टनमूरच्या लढाईंत समूळ नुकसान झालें. त्याला राबर्ट ब्लेक ह्यानें फार जेरीस आणलें. तो दुसऱ्या चार्लसच्या राज्यांतील डच लोकांबरोबरच्या युद्धांत होता. त्यानें आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस तत्त्वज्ञानाच्या विषयांत, रसायन शास्त्रांचे प्रयोग करण्यांत, तसेंच शिल्पकामांत घालवले.

† टीप* पान १५४ पहा.

‡ सर रिचर्ड ग्रेनव्हील (१५४०–१५९१) हा शूर इंग्लिश सरदार होता. त्यानें हंगेरीमधील बादशाही सैन्यांत तुर्कांच्या विरुद्ध लढाई केली, व परत आल्यावर ऐयर्लंड जिंकण्यांत त्यानें मदत केली. १५८५ त त्यानें अमेरिकेवर स्वारी करण्याचें काम घेतलें. १५९१ त त्याला एक स्पानिश आरमार लुटण्याचें काम सांगितलेलें होतें. पश्चिमेच्या बेटांवर गेल्यावर एक जबरदस्त स्पानिश आरमार त्याजवर पाठवलें. तें पोंचल्यावर अडमिरल हावर्ड हा समुद्रांत आपलें आरमार घेऊन गेला. परंतु ग्रेनव्हील हा आजाऱ्यांना वर घेण्यासाठीं पाठीमागें राहिला, इतक्यांत त्याच्याभोंवतीं स्पानिश आरमारानें गराडा घातला. त्यानें आपल्या तारवाचा बचाव करण्याकरितां पराकाष्ठेची शर्थ केली. परंतु त्याला जखम झाल्यानें तो मरण पावला.

§ हाकिन्स, सर जॉन:— (१५२०–१५९५) हा फार शूर खलाशी व आरमारी योद्धा एलिझाबेथच्या कारकीर्दींत होता. त्यानें आफ्रिका, गिनी, वेस्ट इंडीज वगैरे ठिकाणीं सफरी केल्या. त्याचीं समुद्रांतील शूर कृत्यें हाक्ल्यूटच्या सफरींच्या वृत्तांत सांगितलेलीं आहेत. त्यानें स्पानिश आरमारांची दाणादाण उडविण्यांत फार

नाहीं. त्यापूर्वीही कांहीं आरमार असलें तर निरुपयुक्तता हें त्याचें साधारण स्वरूप असून त्याजकडून पराक्रम घडले असें अगदीं विरळाच. याप्रमाणें आरमाराचा इतिहास शोधीत पाठीमागें जातां असें कळतें कीं, कायम आरमाराची कल्पना प्रथम पहिल्या एडवर्ड राजास सुचली.

दर्यावर्दीपणांतच काय, परंतु समुद्रांतरीं नवीन जमिनीचा शोध लावणें वगैरे इतर सर्व प्रकारच्या सामुद्रिक व्यवहारांत इंग्लंड देशाची चळवळ अगदीं अलीकडचीच आहे. पंधराव्या आणि सोळाव्या शतकांत जी अपरिमित नवीन जमीन दृष्टोत्पत्तीस कित्येकांनीं आणिली, त्यांत इंग्लंडचें अंग नव्हतें, असें नाहीं. तरी पण त्यांत पुढारीपणा आपला आहे, असें त्यांनीं ह्मणणें केवळ धाडस होईल. या कामांत इंग्रजांची तरतरी आरंभीं थोडी जास्त होती. इंग्लंडांतील ब्रिस्टल शहराहून एक गलबत निघालें तेंच अमेरिकेच्या महाद्वीपास प्रथम लागलें. ह्मणजे कोलंबसाच्याही पूर्वी सुमारें एक वर्ष इंग्लिश खलाशांनींच खुद्द अमेरिकेवर प्रथम पाऊल ठेविलें. तेव्हां त्यामुळें या कामांत स्पेन देशाशीं इंग्लंडची स्पर्धा चालू होईल असा सुमार दिसत होता. येथें कदाचित् कोणी असें ह्मणतील कीं, वरील ब्रिस्टल येथून निघालेल्या गलबताचा कप्तान केबट हा जातीनें इंग्रज नव्हता, मग इंग्रजांस प्रथम अमेरिका सांपडली असें कसें ह्मणतां येईल? यास इतकेंच उत्तर आहे कीं, कोलंबसही स्पेन देशाचा राहणारा नव्हता. तथापि स्पेनदेशांतून त्यास मदत मिळाली असल्यामुळें, त्याचे पराक्रम जसे स्पेनचे असे ह्मटले जातात, तद्वतच केबट यास मदत इंग्लंडां-

---

श्रम केले. त्याबद्दल त्याला नाईट किताब मिळाला. तो सर फ्रांसिस ड्रेक ह्याचा आप्त होता व त्याचेबरोबर १५९७ त स्पेनच्या वेस्ट इंडीझ् वसाहतींवर स्वारी घेऊन गेला होता. पण ती संपविण्यापूर्वी तो मरण पावला. त्यानें खलाशासाठीं एक दवाखाना चाथम मुक्कामीं बांधला होता.

तून मिळाली असल्यामुळें, त्याच्या कृत्याचें भूषण इंग्लंडासच आहे.* याप्रमाणें जरी इंग्रजांची सुरुवात बरीच तारीफ करण्याजोगी दिसत होती तरी ते लवकरच मागें पडले. इंग्लंडचा राजा सातवा हेन्‌री हा पैशाचा मोठा चिकट होता. •अशा कामांत त्यानें पैसे खर्च केले नाहींत, हें शाहणपण नव्हे. आठवा हेन्‌री राजा तर धर्मसुधारणेच्या चक्रांत सांपडला होता, ह्मणून दुसऱ्या विषयांकडे लक्ष देण्यास त्यास सवड झाली नाहीं. नवीन जमिनीचा शोध लावणारे जे आरंभींचे गृहस्थ प्रसिद्ध आहेत, त्यांत इंग्रेजांचें नांव नाहीं. कोलंबस मरण पावल्यानंतर पन्नास वर्षेपर्यंत फ्रॉबिशर,† फ्रान्सिस ड्रेक‡ यांचा समुद्रास पायही लागला नव्हता. समुद्रावर लढाया मारणें, नवीन जमिनीचा शोध लावणें व त्या ठिकाणीं वसाहत करणें या गोष्टींमध्यें पुढारी ह्मणून जीं राष्ट्रें नावाजलेलीं आहेत, त्यांजमध्यें इंग्लंडची गणना स्पानिश आरमेडाच्या पूर्वी ह्मणजे इसवी सन १५८८ चे पूर्वीं होत नसे. स्पेनचें नांव तरी पुढें येण्यास स्पेन लोकांचीं कृत्यें कारण नसून नशीबच कारण आहे. कारण केवळ त्यांच्या नशीबानेंच कोलंबस त्यांजकडे आला. खरोखरी या कामांत पुढारीपणा पोर्तुगीज लोकांचा होता. कोलंबस त्यांच्याआड आला

---

* जान केबट नांवाचा एक इटालियन जातीचा गहस्थ व्हेनीस येथील राहणारा होता. ब्रिस्टल शहरांत येऊन राहिल्यावर त्यास सेबाशियन नांवाचा एक मुलगा झाला. हाच मुलगा पुढें ब्रिस्टल येथून इंग्रजांचें एक गलबत घेऊन प्रथम अमेरिकेंत गेला. यावरून अमेरिकेचा शोध प्रथम इंग्रजांनीं लावला असें ह्मणतां येईल. तरी पण पुराव्यावरून ही गोष्ट सिद्ध होत नाहीं. हेलवाल्ड याच्या ग्रंथांतील सेबाशियन केबट याजवरील विवेचन पहा. ग्रं. क.

† मार्टिन फ्रॉबिशर एक प्रसिद्ध इंग्लिश खलाशी. ह्यानें इ. स. १५९२ पासून नवीन प्रदेश शोधण्याचे कामांत बरींच महत्कृत्यें केलीं. हा स्पानिश आरमाराचे वेळेस इंग्लिशांकडे लढत होता.

‡ टीप—* पान १५४ पहा.

नसता, तर त्यांनींच पुढील सर्व लौकिक मिळविला असता. बरें ज्या गोष्टी घडून आल्या त्याच घेऊन चाललें, तरी कोलंबसाचेविरुद्ध पोर्चुगीझ लोकांस असें ह्मणतां येईल कीं, हिंदुस्थान सांपडण्याच्या उद्देशानें जर कोलंबस निघाला होता, तर त्याचा रस्ता चुकून त्यास हिंदुस्थान सांपडलेंही नाहीं. परंतु पोर्चुगीझ लोकच रस्ता न चुकतां हिंदुस्थानांत प्रथमतः आले.* याप्रमाणें पहिल्या वर्गांत जीं राष्ट्रें आहेत, त्यांत इंग्लंडची गणना नसून त्याच्या खालच्या पायरीमध्यें इंग्लंड व तसेच फ्रान्स हे देश येतात. येथेंसुद्धां इंग्लंडचें नांव फ्रान्सच्यापूर्वीं घालतां येईल कीं काय याचा संशय आहे. ह्या संशयाचा निकाल लावणें इतिहासांच्या दुर्बोधतेमुळें अवघड आहे. ज्या त्या देशाच्या इतिहासकारांनीं आपआपल्य लोकांचीं कृत्यें अतिशयोक्तीनें वर्णन केलीं आहेत. पुढें जेव्हां दर्यावर्दीपणांत इंग्रेजांचेंच वर्चस्व सर्वत्र कबूल झालें, तेव्हां तें हिरावून घेण्यास कोणी एखाद्या राष्ट्रानें प्रयत्न केला असतां, त्यांस त्वेष यावा. परंतु आपलें वर्चस्व आहे, अशी खात्री असल्याशिवाय त्वेष तरी कसा येईल स्पेन देशानें हें वर्चस्व उत्तम रीतीनें सुमारें १०० वर्षेपर्यंत उपभोगिल्यानंतर त्यांच्याशीं स्पर्धा करण्याचें इंग्रेज लोक धाडस करूं लागले व ते मिळत नसतांही त्याजकरितां झटून उद्योग करण्यांतच त्यांस समाधा

* आणखीही कोणी या संबंधांत कोलंबसच्या तर्फे असें ह्मणतील, कीं रस्ता न चुकतां हिंदुस्थान सांपडण्यापेक्षां रस्ता चुकून अमेरिका सांपडणेंच जास्त प्रशंसनीय आहे. असें ह्मणण्यासही पोर्चुगीझ लोकांस असें उत्तर देतां येईल कीं, आपण दोनही कृत्यें केलीं. हिंदुस्थानास दुसरी सफर करण्याकरितां ह्मणून जेव्हां गलबतें हाकारून पोर्चुगीझ लोक लिस्बन शहराहून निघाले, तेव्हां त्यांस ब्राझील देश लागला. त्या वेळीं अमेरिका सांपडून फक्त आठच वर्षें झालीं होतीं, व कोलंबस जर त्या वेळीं मुळीं जन्मास आलेला नसता, तर अमेरिकेंतील ब्राझील देश त्यांनीं प्रथम शोधून काढल्यामुळें अमेरिका प्रथम पोर्चुगीझ् लोकांसच सांपडली, असें ह्मणतां आलें असतें.

(पं. कृ.)

वाटत असे. सतराव्या शतकाचे शेवटीं अमेरिकेचा बराच भाग स्पेनच्या अंमलाखालीं आला. हिंदी महासागरांतून पोर्चुगीझ अंमलदार हिंदुस्थानांतील पोर्चुगीझ मुलुखाचा कारभार करण्यास येऊं लागले. स्पेन देशांतील पाद्री लोक जपान वगैरे दूर देशीं जाऊं लागले. जे प्रदेश पूर्वीच्या कवींस केवळ काल्पनिक असे वाटत, त्याच प्रदेशांत एक पोर्चुगाल देशांतला प्रसिद्ध कवि* सोळा वर्षेपर्यंत जाऊन राहिला. त्या ठिकाणीं त्यानें एक मोठें वीररसप्रधान काव्य लिहिलें. इतक्या सर्व गोष्टी घडून आल्या तरी दर्यावर्दीपणांत इंग्रेज लोक अगदीं नवशिके असून त्यावेळीं त्यांच्या वसाहतीही मुळींच नव्हत्या.

इतका वेळ दर्यावर्दीपणाविषयीं इंग्रज लोकांचा इतिहास सांगण्यांत आला. आतां त्यांचें कलाकौशल्य आणि व्यापार यांविषयीं विचार करूं. या विषयांसंबंधींही आपणांस असें आढळून येईल कीं, त्यांत जो एवढा मोठा जय इंग्रजांस प्राप्त झाला, तो कांहीं अंतस्थ कुशलतेचा स्वभावसिद्ध परिणाम ह्मणून झाला नाहीं. पृथ्वीवर असे कांहीं देश आहेत कीं, त्यांमध्यें कित्येक जिन्नस अतोनात उत्पन्न होतात. अशा देशांशीं इंग्लंडचा एक विशिष्ट संबंध घडून आला असल्यामुळें वरील गोष्टींत इंग्रज लोक इतके प्रवीण झाले आहेत. त्या देशांत लोकसंख्या विरळ असून जमीन सुपीक व विपुल असल्यामुळें उत्पन्न चांगलें होतें, परंतु जे जिन्नस त्या देशांत उत्पन्न होतात, त्यांपासून उपयोगाच्या वस्तु, कारागिरीनें तयार करण्यास तेथील लोकांस सवड नाहीं. कारण, त्यांचा सर्व वेळ उत्पन्न करण्यांत जात असल्यामुळें कारागिरीचें काम करण्यास कोणी लोकच मिळत नाहींत. परंतु कारागिराचें काम करण्यास सवड आहे,

* ह्या भागाचे अखेरीस कमोन्स नांवाच्या कवीचा उल्लेख आहे, तोच हा असावा.

अशी लोकसंख्या इंग्लंडांत पुष्कळ आहे; व कारागिरीच्या उपयोगाचें उत्तम साधन दगडी कोळसा, हाही तेथें विपुल सांपडतो, ह्मणून अमेरिकेचा कापूस व आस्ट्रेलिया येथील लोंकर हे पदार्थ, उपयोगाचे जिन्नस तयार होण्याकरितां इंग्लंडांत येतात. हा व्यापारसुद्धां अगदीं अलीकडचाच आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात यांत्रिक कला जसजशी वाढत गेली, तसतसें कोळशांचेंही महत्व वाढलें. अमेरिकेचा शोध लागेपर्यंत आरंभीं जिन्नसच उत्पन्न होत नव्हते. बरें, पण अमेरिकेचा शोध लागल्यावरही सुमारें २९० वर्षेपर्यंत आगगाडी चालू नसल्यामुळें तेथें होत असलेल्या उत्पन्नाचा उपयोग करतां येत नसे. तेव्हां यावरून हें उघड होतें कीं, कारागिरीमध्यें इंग्रज लोकांचा पुढारीपणा फारच अलीकडचा आहे. करागिरीसंबंधानें प्लांटाजनेट राजांच्या वेळीं इंग्लंडची स्थिति हल्लींच्यापेक्षां फारच भिन्न होती. त्यावेळीं कारागिरीचीं कामें होत नव्हतीं, असें नाहीं, परंतु त्या वेळीं इंग्लिश राष्ट्राचा हल्लींच्याप्रमाणें उद्योग सपाट्यानें चालत नव्हता. कोणतीही गोष्ट प्रत्यक्ष करून दाखविण्यामध्यें ते त्या वेळीं फारसे कुशल नव्हते. पंधराव्या शतकामध्यें एका ग्रंथकारानें त्यांजविषयीं असें लिहून ठेविलें आहे कीं, "इंग्रज लोक फार श्रम पडले तरी थकत नसल्यामुळें त्यांचें बहुतेक जीवित्व धार्मिक व शुद्ध आहे.* " त्यावेळीं इंग्रज लोकांची उपजीविका मुख्यत्वें करून फ्लांडर्सबरोबर† चालत असलेल्या व्यापारावर होत असे. इंग्लं-

---

* ही गोष्ट फार्टेस्क साहेबानें लिहिली असून तिचा उतारा कानिंग्हाम यानें आपल्या " इंग्रज लोकांचा उद्योग व व्यापार यांची वृद्धि " या ग्रंथांत घेतला आहे. " इंग्रज लोक सुस्त आणि पारमार्थिक असून पंधराव्या शतकामध्यें त्यांची स्थिति विलक्षण गोंधळ होती. त्यांच्या अंतःकरणांत कौटुंबिक ममतेचा लेशही नसे. " गार्डिनरकृत पास्टन लेटर्स, पुस्तक ८, प्रस्ता. पत्र ६३ पहा. ग्रं. क.

† फ्लांडर्स हा फ्रान्स देशाचा एक प्रांत बेलजियम देशाला लागलेला आहे.

डांत लोंकर उत्पन्न होत असून ती फ्लांडर्समध्यें जाऊन तेथें तिचीं वस्त्रें बनतात. हल्लीं आस्ट्रेलिया आणि वेस्ट रायडिंग* यांचा जो संबंध आहे, तोच संबंध पूर्वी इंग्लंड आणि फ्लांडर्स यांचा होता. हल्लीं ज्या-प्रमाणें सिडने† शहर आहे, त्याप्रमाणें त्या वेळीं लंडन होतें. घेंट‡ आणि ब्रूजीस‡ हीं त्यावेळीं, हल्लींच्या लीड्स§ आणि ब्राड्फर्ड§ या शह-रांप्रमाणें होतीं.

ही इंग्लंडची स्थिति एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीपर्यंत अशीच राहिली. परंतु जेव्हां दर्यावर्दीपणांत इंग्लंडचें पाऊल पुढें पडत चाललें, तेव्हांच कारागिरीच्या संबंधानें हे इंग्रज लोक पुढें सरसाऊं लागले. हालंड आणि स्पेन यांच्यामध्यें जी धर्मसंबंधीं मोठी लढाई झाली, तिच्या-योगानें फ्लांडर्स् येथील कारागिरीचा व्यापार अगदीं बुडाला. तेथील कारागीर लोक इंग्लंडांत येऊन राहिले, आणि तेथें नार्विच् प्रांतांत जो मोठा उद्योग पूर्वीपासून चालू होता, त्यास या नवीन कारागिरांनीं बरीच ऊर्जित दशा आणिली. याप्रमाणें इंग्लिश कारागिरीच्या इतिहासांत 'नार्विच् येथील कारागिरीचा काल' ह्मणून प्रथमारंभीं प्रसिद्ध आहे. सर्व सतराव्या शतकांत कारागिरी नार्विच् येथेंच चालू होती. या वेळची विशेष गोष्ट अशी आहे कीं, इंग्लंडांत जेवढी लोंकर उत्पन्न होत असे, तेवढ्याचीच ते वस्त्रें स्वतःपुरतीं तयार करीत असत. ज्याप्रमाणें आरंभीं

---

* इंग्लंडांतील यार्क नांवाच्या परगण्याचे तीन भाग केले आहेत. त्या प्रत्ये-कास रायडिंग ह्मणतात. त्यांतील पश्चिमेकडील भागास वेस्ट रायडिंग ह्मणतात.

† सिडने—आस्ट्रेलिया बेटाचे चार भाग आहेत. त्यांपैकीं न्यू साउथ वेल्स याचें मुख्य शहर सिडने आहे. येथील बंदर फार चांगलें असून व्यापार फार झपा-ट्याचा चालतो.

‡ घेंट आणि ब्रूजीस हीं दोन शहरें बेलजियम देशांत आहेत. पूर्वीं या ठिकाणीं मोठा व्यापार चालत असे.

§ लीड्स् आणि ब्राड्फर्ड हीं दोन शहरें इंग्लंडांत आहेत.

इंग्लंड देशांत जिन्नस उत्पन्न मात्र होत असे व तो तयार होण्याकरितां दुसरीकडे जात असे, व ज्याप्रमाणें हल्लीं जिन्नस बिलकुल उत्पन्न होत नसून कारागिरीचा मात्र व्यापार चालतो, त्याप्रमाणें सतराव्या शतकांत नव्हतें. त्यावेळीं दोनही गोष्टी तेथेंच होत असत. जेवढें उत्पन्न होईल, तेवढ्याचेच जिन्नस तेथें तयार होत असत.

इतकें कारागिरीसंबंधानें झालें. परंतु हल्लींची इंग्लंडची भरभराटी फक्त कारागिरींतच आहे असें नाहीं. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं माल नेण्याआणण्याचा इंग्लंडचा व्यापार सर्व जगाशीं सुरू आहे, ह्मणूनच देवघेव फार असून इंग्लंड देश सर्व प्रकारच्या व्यापारांचें मध्यस्थान झालें आहे. हा माल नेण्याआणण्याचा व्यापार इंग्लंडाकडेसच येण्याचें कारण, त्या देशाचा दर्यावर्दीपणांत पुढारीपणा हें होय. ह्मणून जर दर्यावर्दीपणांत इंग्लंड देश मध्य कालामध्यें पुढारी नव्हता, तर या व्यापारांतही तो पुढारी नव्हता, हें उघड आहे. त्या कालीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं माल वगैरे मुळींच जात येत नसे. कारण हा माल जाण्यायेण्याचा मुख्य रस्ता समुद्रावरून होता. अमेरिकेचा शोध लागेपर्यंत हा रस्ता कोणास माहीत नव्हता. त्यावेळीं इटली व जर्मनी वगैरे मध्य युरोपांतील देशांतलीं मोठमोठीं शहरें, व्यापाराचीं मुख्य स्थानें असत. पंधराव्या शतकांतील मोठे उद्योगी व्यापारी ह्मटले ह्मणजे फ्लारेन्स येथील मेडिसाय*, आग्सबर्ग येथील फगर्स†, जिनोआ येथील सेंट जार्ज‡ नांवाच्या ब्यांकेचे उत्पादक वगैरे होते.

---

* मेडिसाय नांवाचें एक घराणें इटलींतील फ्लारेन्स शहरीं फार प्राचीन कालापासून नांवाजलेलें होतें.

† जर्मनींतील बव्हेरिया प्रांतांत आग्सबर्ग ह्मणून एक मोठें शहर आहे. त्या ठिकाणीं फगर नांवाचें एक घराणें पूर्वी फार प्रसिद्धीस आलेलें होतें. त्याचा मूळ पुरुष जान फगर ह्मणून कोष्टी होता. उद्योग व व्यापार यांचे योगानें त्यानें अतोनात द्रव्य संपादन केलें.

‡ सेंट जार्ज नांवाची पेढी जिनोआ शहरीं इ. स. १४०७ या वर्षी स्थापण्यांत आली असून सर्व युरोपांत फार प्रसिद्ध व जुनी अशी हीच पेढी होती.

मध्य युगांत व्यापाराचे संबंधानें इंग्लंडचें पाऊल फार पुढें नव्हतें, इतकेंच नाहीं, तर उलट फार मागेंच होतें. त्या वेळच्या व्यापारानें भरभराटीस आलेल्या देशांतून इंग्लंडची फार नाचक्की होत असावी. ज्याप्रमाणें जर्मनीची व फ्रान्साचीसुद्धां व्यापाराची पद्धत व हुंडीच्या देवघेवीची व्यवस्था हीं इंग्लिश लोकांस अगदीं अडाणी अशीं वाटतात, त्याचप्रमाणें मध्य युगांत इटालियन लोकांस इंग्लंडच्या संबंधानें वाटत असे. मोठमोठ्या शहरांत इटालियन लोकांचें त्या वेळचें तें उच्च प्रतीचें राहणें, दूरदूरच्या प्रदेशांशीं व्यापाराचे संबंधाचें त्यांचें दळणवळण, प्रत्येक गोष्ट तरतरीनें करण्याची त्या वेळची त्यांची शैली, या सर्व गोष्टी मनांत आणून इंग्लंड आणि फ्रान्स यांची ते लोक रानटी देशांत गणना करीत असत. हे देश केवळ शेतकींत गुंतले असून, त्या वेळच्या सुधारलेल्या कल्पनांचें त्यांस वारेंही लागलें नव्हतें.

पुढें एक मोठी घडामोड झाली. इटली आणि जर्मनी अगदीं मागें पडत चालले. व्यापाराचें मध्यस्थान दुसरीकडेस जात चाललें. तरी इटली व जर्मनी यांच्यामागून भरभराटी झाली, ती इंग्लंडची नव्हे, तर हालंड देशाची. सतराव्या शतकांत बहुतेक काळपर्यंत जगाचा सर्व माल नेण्याआणण्याचा व्यापार डच लोकांच्या हातांत होता. हालंडचें राजधानी शहर आम्स्टेर्डाम हें सर्व घडामोडीचें मुख्य स्थान होतें. ऑलिव्हर क्रामवेलच्या वेळेस व दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दीच्या आरंभीं इंग्लंडचा सर्व तंटा हालंडबरोबर चालला होता. पुढें सतराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं हालंडही मागें पडत चाललें. त्या वेळपर्यंत इंग्लंडची व्यापाराचे कामांत मुळींच प्रसिद्धि नव्हती.

याप्रमाणें वर सांगितलेल्या सर्व गोष्टी एकदम ध्यानांत घेतल्या ह्मणजे असें दिसून येतें कीं, इंग्लंड देश जो आज दर्यावर्दीपणांत, व्यापा-

रांत आणि उद्योगांत अगदीं अग्रगण्य दिसत आहे, तो अलीकडेच असा झालेला आहे. अठराव्या शतकाचे पूर्वी अग्रगण्यता इंग्लंडांत मुळींच दृष्टोत्पत्तीस येत नव्हती. सतराव्या शतकांतही अग्रगण्यता इंग्रजांस प्राप्त होण्याचा सुमार मात्र दिसत होता. हें महत्व इंग्लंडास प्राप्त होण्यास सुरवात केव्हां झाली, असा प्रश्न विचारला असतां, त्याचें उत्तर अगदीं उघड आहे. ही सुरवात एलिझाबेथ राणीच्या वेळेपासून झाली.

ह्या वेळेपासून अमेरिकेचें वजन युरोपावर पडूं लागलें. यावरून एक विशेष गोष्ट अशी उघड दिसते कीं, हल्लींची इंग्लंडची उच्च स्थिति व इंग्रजांचें एक विशिष्ट महत्व यांस मूळ कारण अमेरिकाच होय. नार्वे येथील दर्यावर्दी लोक इंग्रजांचे पूर्वज होते, ह्मणून हल्लींचे इंग्रज लोक दर्यावर्दी झाले, असें नाहीं. तसेंच प्रथमचे आंग्लो—साक्सन लोकांची उद्योगाकडे विशेष प्रवृत्ति होती, ह्मणून हल्लींचें कलाकौशल्य आणि व्यापार वाढला असें नाहीं; तर याचें कारण कांहीं निराळेंच आहे. हें कारण घडून येण्यापूर्वीं पुष्कळ काळपर्यंत इंग्रज लोक शेतकींत गुंतले असून धनगरी करण्याचे होते. त्यांस पूर्वीं लढाईची अभिरुचि होती, परंतु समुद्रावर पराक्रम करण्याची ते पर्वा करीत नसत.

कार्ल रिटर* नांवाचा एक भूगोलतत्त्ववेत्ता झाला. त्यानें एखाद्या देशाच्या भूगोलिक सृष्टस्थितीवरून तथोलि सुधारणेचे तीन पर्याय बांधले आहेत. पहिला सरित्तटीन, ह्मणजे नदीसंबंधीचा; दुसरा औपद्वीपिक ह्मणजे लहान लहान समुद्रसंबंधीचा; आणि तिसरा महाब्धिक ह्मणजे महासागरसंबंधीचा. याच पर्यायक्रमानें देशाची सुधारणा बदलत जाते,

---

* हा एक अर्वाचीन काळचा विख्यात भूगोलवेत्ता बर्लिन येथें होऊन गेला. तो इ. स. १७७९ या वर्षी जन्मला असून १८५९ या वर्षी मृत्यु पावला. भूगोलशास्त्राची सुधारणा प्रथमतः यानेंच केली.

असें वरील गृहस्थाचें ह्मणणें आहे. अमेरिकेचा शोध लागल्यानें जे फेरफार घडून आले, त्यांचे योगानें सुधारणेसंबंधीचें हें मत प्रचारांत आलें असावें; कारण, अमेरिकेचा शोध लागल्यानंतरच युरोपीय सुधारणा वरील दुसरा पर्याय सोडून तिसऱ्या पर्यायांत गेली. त्या वेळपर्यंत सर्व व्यापार फक्त भूमध्य समुद्रांत चालत असे. महासागर हा रहदारीचा रस्ता नसून, उलट देशाची मर्यादा ह्मणून मानला जात असे. युरोपाच्या उत्तरेस जे लहान लहान समुद्र आहेत त्यांच्यांतून थोडेंबहुत दळणवळण पूर्वी चालू होतें; व इटली, जर्मनी, डेन्मार्क वगैरे देशांतील कित्येक हान्स* या नांवानें प्रसिद्ध असलेल्या शहरांचा व्यापार ह्याच मार्गानें सुरू होता. तरी पण व्यापाराचें व हरएक प्रकारच्या सुधारणेचें त्या वेळचें मूळ घर भूमध्य समुद्र होता. ह्मणजे मध्य काळांतील लोकांचे व्यवहार प्राचीन काळच्या व्यवहारांशीं इतकी साम्यता पावतात कीं, इटली देशास स्वभावतःच समुद्राचा फायदा पुष्कळ असल्यामुळें दोनही काळांत आल्प्स पर्वताच्या पश्चिमेकडील देशांपेक्षां इटालीचेंच वर्चस्व सर्वांत जास्त असे. जरी मध्ययुगांत इंग्लंड आणि फ्रान्स यांची वर्चस्वपणा मिळविण्याकडे बरीच प्रवृत्ति होत होती, तरी इटालियन लोकांस हे देश बरेच रानटी वाटत असून बुद्धिमत्तेनेंही आपल्यापेक्षां त्यांस ते कमी प्रतीचे मानीत असत. याचें कारण असें कीं, जरी इंग्लंड आणि फ्रान्स यांस समुद्राचा फायदा घेतां येण्यासारखा होता, तरी समुद्राचा उपयोग त्यांनीं न केल्यामुळें

---

* मध्य काळामध्यें हान्स समाज ह्मणून एक व्यापार करणारी मंडळी होती. हल्लीं हान्स शहरें ह्मणून जीं प्रसिद्ध आहेत, तीं ब्रेमेन, हांबर्ग, ल्यूबेग, हीं होत. हान्स हा शब्द पूर्वी समाज या अर्थी योजला जात असे. यापूर्वी या समाजांत पुष्कळ देशांतील व्यापाऱ्यांचा समावेश होत असे. डेन्मार्क, जर्मनी, इटली, वगैरे देशांतील व्यापारी वरील नांवानें प्रसिद्ध असत, व त्यांचाच व्यापार सपाट्याचा होता. हल्लीं वर लिहिलेल्या तीनच शहरांस हें नांव लावण्यांत येतें.

त्यांची स्थिति समुद्रकिनारा नसलेल्या भूमध्यगत देशासारखीच राहिला. इटालियन लोकांस भूमध्य समुद्राचा मोठा फायदा मिळत होता. फ्लारेन्स* शहरचें सर्व महत्व लोंकरीच्या कपड्यावर होतें. व्हेनीस,* पीसा*आणि जिनोवा यांच्या ताब्यांत पुष्कळ प्रांत होते. त्यांशीं व परमुलुखाशींही त्यांचा व्यापार उत्तम चालत असल्यामुळें तीं शहरें नेहमीं फार भरभराटींत असत. त्या वेळीं इंग्लंड आणि फ्रान्स या देशांमध्यें जहागीरदारी† बलवत्तर वाढून ते सुस्त बनले होते. अथेन्स आणि

---

* हीं सर्व शहरें इटली देशांत आहेत.

† फ्यूडल सिस्टिम:—आपले इकडील जहागीरदारीप्रमाणें युरोपांतील कित्येक देशांत एक लष्करी व्यवस्था सुरू होती, तिला फ्यूडालिझम ह्मणत सर्व देशांतील जमिनीची मालकी देशाच्या राजाकडे असावयाची. त्यानें त्या जमीनीचे विभाग करून ते देशांतील बलाढ्य लोकांना वांटून द्यावयाचे. ह्या जमीनीबद्दल सारा वगैरे त्यांना कांहीं द्यावा लागत नसे. फक्त त्यांनीं राजाला इतकें वचन द्यावयाचें असे कीं, "आह्मी लढाईच्या प्रसंगीं राजाला रणामध्यें आमच्या आश्रितांनिशीं मदत करूं." अशा वचनावर ठेवलेल्या जमिनींना 'फीफ' ही संज्ञा होती.

जे बलाढ्य जमीनदार असत त्यांना आपल्या जमिनी एकट्यांना संभाळवतना, तेव्हां ते त्यांचे तुकडे पाडून ते दुसऱ्यांस देत. ह्या पोटजमीनदारांना मोठ्या जमीनदारांबरोबर वरच्यासारख्याच शर्ती कराव्या लागत. ह्यांचेहून आणखी छोटे जमीनदारांनाही त्याच शर्ती पाळाव्या लागत. ह्मणजे ह्या पद्धतीस एखाद्या वृक्षाची उपमा शोभेल. त्याला जसा एक जाड बुंधा, पुढें फार मोठ्या फांद्या, पुढें त्याहून बारिक बारिक फांद्या आणि शेवटीं पानें असतात, त्याप्रमाणें ही पद्धत होती. ही पद्धत रोम बादशाही नाहींशी झाल्यापासून थोडथोडी पडत गेली. ती जर्मनी, फ्रान्स वगैरे देशांत सुरू झाली. ती इंग्लंडांत नार्मन विजयाच्या पूर्वीसुद्धां कांहीं भिन्न स्वरूपानें वसत होती. नार्मन विजयानंतर मात्र फ्रान्साच्या पद्धतीप्रमाणें सुरू झाली. ही पद्धत सुमारें तेराव्या शतकाच्या प्रारंभाला मोडूं लागली, ती चौदाव्या शतकांत अगदीं मोडली. "फ्यूडल सिस्टिम" प्रमाणें लढाई करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यच होतें ती कर्तव्यता पुढें नाहींशी झाली. पण कर्तव्यताबुद्धि जरी नाहींशी झाली, तरी लढाऊ जोम कायम राहिला, आणि लढणें ही क्रीडा झाली. केवळ हौसाखातर बलाढ्य लोक आपले पदरीं लष्करी लोक ठेवूं लागले. त्या लोकांचा एकमेकाशीं जीवास जीव देऊन लढण्याचा पण असे. ह्या लढाऊ टोळयांचा पुढें फार आग्

कारिंथ*, येथील सुधारलेल्या राष्ट्रांशीं जशी थेसली आणि मासिडोनिया यांची पूर्वी तुलना होत नसे, तशीच इटालींतील भरभराटीस आलेल्या नगरराष्ट्रांशीं फ्रान्स आणि इंग्लंड यांचीही तुलना होण्यासारखी नव्हती.

कोलंबस आणि पोर्चुगीझ लोक हे ही सर्व स्थिति तत्काळ बदलून टाकण्यास कारण झाले. व्यापाराचा चलनमार्ग भूमध्य समुद्र होता. तो बदलून त्याचे ठिकाणीं त्यांनीं अटलांटिक महासागर खुला केला. त्याच वेळीं इटली देश मागें पडला, व आणखी संकटें त्या देशावर आल्यामुळें त्या वेळच्या घडामोडींचा कार्यकारणभाव पुष्कळ अस्पष्ट भासतो. राजकीय संबंधानेंही इटली देश सहजरीत्या त्याच वेळीं खालीं आला. आल्पस् पर्वतावरून परकीय लोकांनीं इटलीवर स्वाऱ्या केल्या. फ्रान्स आणि स्पेन यांच्यांत लढाई जुंपून तिचें समरांगणही इटली देशच झाला. त्यामुळें तो देश हतवीर्य होऊन त्याचे विभाग झाले. सर्व लोक गुलाम होऊन परकीयांचे ताब्यांत गेले. हें जें इटलीचें महत्व एकवार नष्ट झालें, तें पुन्हां त्यास कधींही प्राप्त झालें नाहीं. अशा प्रकारचें संकट येण्याचें उघड कारण परकीयांच्या स्वाऱ्या होत. यांजमुळें इतर लहानमहान फेरफार त्यावेळीं काय होत होते, इकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. इतर कारणें तेंच कार्य घडविण्याविषयीं त्याच वेळीं सुरू होतीं, ह्मणून, जरी त्यावेळीं इटली देशावर बाहेरून कोणीं स्वाऱ्या केल्या नसत्या, तरी तो देश त्याच वेळीं

होऊं लागला, ह्मणून त्या आजिबाद नाहींशा करण्याविषयीं कामन्स सभेनें अर्ज केला होता. पुढें ह्याच टोळ्यांमुळें आपसांत बखेडे होऊं लागले. होतां होतां "वार्स् आफ् थि रोझीज" ह्मणून जें आपसांत युद्ध झालें, त्यांत बलाढ्य लोकांचा समूळ विध्वंस झाला. ह्या वरील काळाला "शिव्हल्री एज" ह्मणजे 'सरदारी बाण्याचा काळ' असें नांव आहे.

* ग्रीस देशांतील शहरें.

खालीं आल्याशिवाय राहिला नसता. ज्या गुप्त झऱ्यांतून इटली देशास शक्ति आणि सिद्धि यांचा सतत पुरवठा होत असे, तो अमेरिकेचा शोध लागल्यामुळें आटून गेला. हल्लीं इंग्लंडांतील केंट परगण्यामध्यें कांहीं बंदरें अशीं आहेत, कीं ज्या ठिकाणीं पूर्वीं उत्तम समुद्रकिनारा होता, त्या ठिकाणीं हल्लीं समुद्र पुष्कळ मागें हटला आहे. त्या बंदरांप्रमाणेंच इटलीची स्थिति झाली, असें ह्मटलें असतां चिंता नाहीं. जरी कोणी परकीय शत्रु आल्पस् पर्वत ओलांडून आले नसते, तरी ज्या नगरांत पूर्वीं चळवळ व धामधूम होती, त्या ठिकाणीं शांतता आणि उदासपणा जिकडे तिकडे पसरलाच असता. याचें कारण भूमध्य समुद्र मागें हटला असें नाहीं, तर अगदीं होमरच्या वेळेपासून जी योग्यता त्या समुद्रास प्राप्त झाली होती, ती आतां नाहींशी झाली. भूमध्य समुद्र ह्मणजे सर्व इतिहासांत मुख्य समुद्र इतकेंच नाहीं, तर याशिवाय दुसरा समुद्र इतिहासांत नाहींच. भूमध्य समुद्र ह्मणजे सर्व माणसांच्या दळणवळणाचा व सुधारणेचा मार्ग, तो आतां बंद झाला. आट्लांटिक महासागरांतून व्यापार चालू होतांच तुर्क लोक समुद्रावर फार प्रबल झाले, व त्यांनीं भूमध्य समुद्रांतील सर्व व्यापार अगदीं धुवून टाकिला. रांके आपल्या इतिहासांत असें ह्मणतो कीं, नवीन प्रदेशांचा शोध लागल्यामुळें बार्सिलोना*येथील व्यापारास फारसा धक्का बसला नाहीं. तो इ. स. १५२९ या वर्षापासून झपाट्यानें बुडत जाण्याचें कारण बार्बारोझा या नांवाच्या दोन शूर तुर्क सरदारांनीं समुद्रावर मोठमोठे जय मिळविल्यामुळें तुर्क लोक फार प्रबल झाले, व फ्रेंचांचा सालिमनबरोबर तह होऊन बार्बरी† संस्थानाची स्थापना झाली. या गोष्टींमुळें, भूमध्य

* इटलींतील एक शहर.

† बार्बरी स्टेट्स् ह्मणून उत्तरआफ्रिकेंत कांहीं संस्थानें आहेत, त्यांत आल्जीरिया, मोरोक्को, ट्रिपोली आणि ट्यूनिस इत्यादिकांचा समावेश होतो.

समुद्रांतील मूळच्या व्यापारास मोठा धक्का बसला. ह्या गोष्टी इतक्या उघड घडून आल्या कीं, युरोपाच्या सुधारणेचा वर सांगितलेला दुसरा पर्याय येथेंच संपून तिसऱ्या महाब्धिक पर्यायास स्पष्टपणें सुरुवात झाली, जणुंकाय ईश्वरी संकेतच असें घडवून आणण्याचा होता, असें येथें निःसंशय वाटणारें आहे.

या सर्व गोष्टींचा एक मोठा परिणाम असा झाला कीं, सर्व घडामोडींचें आणि बुद्धिमत्तेचें मुख्य स्थान जें पूर्वी युरोपाच्या मध्यभागीं होतें, तें आतां त्याच्या पश्चिमेकडे जाऊं लागलें. सर्व सुधारणा जर्मनी आणि इटली या देशांतून पश्चिमेकडे जात आहे. ती कोणत्या ठिकाणीं स्थाईक होईल, याचा नेम नाहीं. तरी ती जास्त पश्चिमेकडेसच स्थाईक होण्याचा संभव आहे. सोळाव्या शतकांत ज्या कित्येक गोष्टी घडल्या, त्यांजहून ही गोष्ट किती भिन्न आहे, ती पहा. त्या शतकाच्या आरंभीं जगांतील सर्व कुशलता इटली अगर जर्मनी यांत वास करीत असे. अर्वाचीन कलाकौशल्याचा अति भरभराटीचा काल इटलींत गेला आहे. या कलेंत इटलीशीं स्पर्धा करणारे कोणी असतील तर ते जर्मन कारागीर होत. कारण, मिकेल आंजेलो ह्मणून जो इटलीमध्यें अत्युत्तम कारागीर होऊन गेला, त्याससुद्धां जर्मन कारागिरांचें कसब केवळ टाकाऊ वाटलेलें नाहीं. इतकें होत असतां धर्मसुधारणा ही प्रथमतः जर्मनींतच होऊं लागली. अशा प्रकारें जर्मनी, इटली वगैरे देशांतून विद्या व कला यांस ऊर्जित दशा येऊन धर्म वगैरेंची सुधारणा चालली असतां फ्रेंच आणि इंग्रज हे लोक त्या गोष्टी आपल्यास संमत आहेत, इतकें मानण्यांतच आपल्यास कृतकृत्य समजत. यावरून ते या कामांत पुढारी तर नव्हतेच; उलटे उदासीन मात्र होते. परंतु सोळाव्या शतकाच्या उत्तर भागांत सुधारणा हळू हळू पश्चिमेकडे जांत आहे, असा भास होऊं लागतो. इटली आणि

जर्मनी यांची प्रथम सुधारणेच्या बाबतींत बरीच स्पर्धा होऊन नंतर ते दोनही देश मागें हटले व हळुहळु असें दिसूं लागलें कीं, मोठमोठ्या गोष्टी दुसऱ्याच देशांत घडून येत आहेत. असें होतां होतां सर्व बुद्धिमत्ता आणि महत्व हीं मध्यभागांतून निघून जाऊन पश्चिमेकडील दर्यावर्दी देशांत मात्र दिसून येऊं लागलीं.

हे पश्चिमेकडील देश ह्मणजे जे अमेरिकेच्या मालकिबद्दल भांडत होते, तेच होत. भूमध्य समुद्राचे संबंधानें प्राचीन काळीं ग्रीस आणि इटली यांची जी स्थिति होती तीच स्थिति अट्लांटिक महासागराचे संबंधानें स्पेन, पोर्चुगाल, फ्रान्स, हालंड आणि इंग्लंड यांची यावेळीं झाली. वरील प्राचीन राष्ट्रांप्रमाणें याही राष्ट्रांची सर्व गोष्टींत कुशलता दृष्टोत्पत्तीस येते. नवीन देश जिंकून वसाहत करण्याचे व व्यापार वाढविण्याचे मोठमोठे बेत जे पूर्वी अगदीं गांवढळ व एकाच तऱ्हेचे असे दिसत असत, ते आतां कांहीं निराळेच रीतीनें बदलत आहेत, असें दिसूं लागलें. या गोष्टीचा इंग्लिश राष्ट्रावर काय परिणाम झाला, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. हालंड देशावरही अशाच प्रकारचा विलक्षण परिणाम फार त्वरित घडून आला. हालंड देशाचा अगदीं बढतीचा काळ ह्मणजे सतराव्या शतकाचें पूर्वार्ध. त्या देशाची अशी भरभराटी होण्याचें कारण काय तें आतां आपण पाहूं.

पूर्वी हालंड देशाच्या प्रजासत्ताक राज्यांत मोडत असलेले व हल्लींही तेथील राज्यांत मोडणारे सात परगणे आहेत. सखल प्रदेश, लो कंट्रीझ्, ह्मणून ज्या देशांस संज्ञा आहे, त्यांत या सात परगण्यांचा समावेश होऊनही आणखी बेल्जियमच्या राज्यांत मोडणारे सर्व प्रांत त्यांत येत असत. या सखल प्रदेशांतील सर्व लोकांनीं स्पेनचा राजा दुसरा फिलिप याचे विरुद्ध बंड केलें. या बंडाचे वेळीं हल्लीं बेल्जियममें

राज्याखालीं मोडत असलेले प्रांत, बरेच चांगल्या स्थितींत होते. त्या प्रांतांत कारागिरीचे धंदे सपाट्यानें चालले होते. ज्याप्रमाणें हल्लीं लांकाशायर* किंवा वेस्ट रायडिंग† यांची व्यापाराचे कामांत भरभराटी आहे, त्याचप्रमाणें मध्ययुगांत ह्या प्रांतांची होती. हल्लीं हालंडच्या अंमलाखालीं मोडणारे जे प्रांत आहेत, ते त्या वेळीं फारसे पुढें आलेले नव्हते. ते समुद्रकांठीं असून तेथील बहुतेक लोक मासे धरून विकण्याचा धंदा करीत असत. वर जें स्पेनच्याविरुद्ध बंड झालें ह्मणून सांगण्यांत आलें, त्याचा परिणाम असा झाला कीं, बेल्जियममधले प्रांत स्पेनच्या ताब्यांत राहिले व त्यांस पुढें "स्पेनच्या ताब्यांतले सखल प्रदेश" असें नांव पडलें. परंतु हालंडखालीं मोडणारे प्रांतांचा पुष्कळ दिवसपर्यंत स्पॅनिश लोकांबरोबर निकराचा झगडा चालला होता, तरी कांहींच निकाल लागेना. शेवटीं स्पॅनिश लोकांना त्यांस आपल्या ताब्यांतून सोडून देणें भाग पडलें, तेव्हां ते स्वतंत्र झाले. परंतु ही लढाई चालू असतां बेल्जियमच्या प्रदेशांतील लोकांचे धंदे, उद्योग बुडाले. त्याच वेळीं फ्लांडर्समधील फ्लेमिश नांवाचे कारागीर लोक स्वदेश सोडून निघाले ते फिरत फिरत इंग्लंडांत येऊन स्थाईक झाले; व त्या ठिकाणीं त्यांनीं लोंकरीचीं वस्त्रें तयार करण्याचे कारखाने काढले. परंतु हालंडचे अंमलाखालीं जे प्रदेश होते, ते आरंभीं गरीब स्थितींत असतांही लढाईमध्यें बरेच सांवरले, आणि लढाई संपण्याचेपूर्वीच त्या ठिकाणीं सर्व जगामध्यें मोठा असा घडामोडीचा व्यापार चालू लागला. असें होण्याचें कारण काय बरें असावें? उघड आहे कीं, ते समुद्रकांठचे प्रदेश होत. आणि समुद्रांतून अमेरिकेकडे जाण्याचा मोठा रस्ता त्यांच्या अगदीं दाराशीं होता.

* इंग्लंड देशांत उत्तरेकडे एक परगणा आहे. त्यांत कोळशाच्या मोठमोठ्या खाणी असल्यामुळें व्यापार सपाट्याचा चालतो. येथें सर्व प्रकारचें कापसाचें कापड तयार होत असतें.

† वेस्ट रायडिंग, यार्कशायर परगण्याचा एक भाग. यांतही कोळशाच्या खाणी आहेत. येथें लोंकरीचें कापड तयार होतें.

इंग्रज लोकांच्या अगोदरपासून ते समुद्रावरलि व्यवहारांत प्रवीण झाले असल्यामुळें त्यांच्यापूर्वीच ते लौकिकास आले. स्पेनबरोबर जी त्यांची लढाई झाली, तिजमुळें त्यांचें नुकसान न होतां उलटा फायदा झाला. कारण स्पेन देशाचे पुष्कळ प्रांत अमेरिकेंत होते. त्यांत वस्ती अगदीं थोडी होती. परकीय हल्ला आला असतां त्यांत बिलकूल मजबुती केलेली नव्हती. तेव्हां सहज त्या प्रदेशांवर हल्ला करण्यास हालंडच्या लोकांस संधी मिळाली. हालंड देश अगदीं नापीक, तेथलि लोकवस्ती फार थोडी व मुळपासून अगदीं कंगाल. अशी स्थिति असतां स्पॅनिश लोकांबरोबर ते टक्कर देऊं शकले. इतकेंच नाहीं, तर उलटा त्यांजवर त्यांनीं आपला पगडा बसविला. इतकें करूनही लढाई चालू असतांच त्यांनीं अमेरिकेकडे जाऊन तेथें मोठमोठ्या वसाहती वसविल्या, व पूर्वमहाद्वीपांतही पुष्कळ वसाहती स्थापन केल्या. या सर्व गोष्टी पाहून सर्व जगतांतलि राष्ट्रांस विलक्षण आश्चर्य वाटलें असेल. शिवाय, सर्व प्रकारची सुधारणा समुद्रमार्गानें पूर्वेकडील प्रदेशांतून पश्चिमेकडे जात चालली होती, ती या वेळीं हालंड देशाइतकी दुसरी कोठें दिसत नव्हती. याप्रमाणें व्यापारामध्यें जसे हे हालंडचे लोक या वेळीं प्रवीण झाले, तसेच विद्वत्तेनेंही त्या वेळीं ते फार वरिष्ठ होते. लिप्सियस,* स्कालिगर† डेकार्ट्स्* वगैरे तत्ववेत्ते पुढें येण्यास हेच लोक कारण झाले, व ग्रोटिअस*, पाएट हेन†, व्हॉन् ट्रांप‡ वगैरे विख्यात पुरुष हालंडांतच प्रसिद्धीस आले.

---

* लिप्सियस (१५४७–१६०६); डेकार्ट्स्—(१५९६–१६५०); ग्रोटियस (१५८३–१६४५) हे तीन हालंड देशांत फार मोठे तत्ववेत्ते होते.

† जोसेफ जस्टस स्कालिगर (१५८३–१६५०); पाएट हेन (१५८०–१६५५) हे फार विद्वान गृहस्थ होते. ह्यांचाही उदय हालंडांतच झाला.

‡ व्हान् ट्रांप (१५९७–१६५३) हा डच लोकांचा फार प्रसिद्ध नावाडी होता. वरील महान पुरुषांच्या कालावरून हालंड देशाची या वेळीं कशी भरभराटी होती, हें सहज कळून येईल.

अमेरिकेचें वजन युरोपांतील देशावर पडल्याचें हें एक फारच विलक्षण व चोख उदाहरण आहे. त्याच गोष्टीमुळें इंग्लंड देशावर जितके जबरदस्त परिणाम घडून आले, तितके हालंडमध्यें घडले नाहींत, याचें कारण हालंड देशाच्या राजनीतीचा पाया फार आकुंचित होता व तो मोठा होण्यास हालंडमध्यें जागाच नव्हती. हे परिणाम हालंडमध्यें थोडेच दिवस टिकले, तरी फार त्वरित घडून आले असल्यामुळें, त्यांचें कारण नवीन भूमीचा शोध लागणें हें अगदीं स्पष्टपणें सर्वांस दिसण्याजोगें आहे.

अशा प्रकारचें अमेरिकेचें वजन युरोपावर पडत चाललें. हें वजन त्या वेळच्या लढाया आणि तह यांमध्यें दिसून येतें इतकेंच केवळ नाहीं, तर युरोपांतील पाश्चिमात्य राष्ट्रांची संपत्ति वाढली व त्यांचें मूळ स्वरूप अगदीं बदलून गेलें, या गोष्टींनींही तें चांगलें व्यक्त होत आहे. पुष्कळ वेळां असें घडतें कीं, एखादें मोठें साहसाचें कृत्य जेव्हां कांहीं राष्ट्रें करूं लागतात, तेव्हांच त्यांची सुधारणा वाढत जाते, व ती कायमची होण्यास त्या राष्ट्रांना पुष्कळ पिढ्यांपर्यंत श्रम करावे लागतात. युरोप आणि एशिया यांजमध्यें प्राचीन काळीं मोठी लढाई जुंपून तिचा परिणाम ग्रीस देशाची ऊर्जित कळा हा होय. त्याच प्रकारचीं क्रूसेड्स्* नांवाचीं

---

* धर्मयुद्धं.–ख्रिस्तांची पवित्र भूमि जेरुसलेम तुर्की लोकांच्या हातांत होती. ते महमदाचे अनुयायी होते, व ते ख्रिस्ताचा द्वेष करीत. ख्रिस्ती लोक आपला प्रभु तेथें जन्मला व मेला असें मानीत, म्हणून त्या भूमीच्या दर्शनार्थ जात असत. ज्या पवित्र थडग्याखालीं ख्रिस्ताला पुरला आहे असा समज होता, तें त्यांना फार प्रिय होतें. तेव्हां त्या थडग्याच्या दर्शनास ते जात. परंतु तुर्क लोक त्या यात्रेकरूंचा फार छळ करीत. पीटर धि हर्मिट ह्या नांवाचा एक यात्रेकरू युरोपांत परत आला व आपले हाल कसे झाले ते सांगूं लागला. त्याच्या वृत्तांतानें प्रत्येकाच्या मनांत जेरुसलेम तुर्क लोकांच्या हातांतून सोडविण्याची ईर्ष्या उत्पन्न झाली. पोपनें त्या ईर्ष्येस भर दिली. जे युद्धास गेले त्यांनीं आपल्या डाव्या बाहूवर तांबडा क्रूस धारण केला,

मध्ययुगांत झालेलीं धर्मयुद्धें होत. अमेरिका खंडाच्या मालकीविषयीं ह्या अलीकडच्या दोन तीन शतकांतले युरोपीय राष्ट्रांचे तंटेही याच वर्गांतले आहेत. जी उन्नतावस्था या राष्ट्रांस पूर्वीं माहीत नव्हती, ती त्यांस प्राप्त होण्याचीं उत्तम साधनें त्यांस मिळण्याचें हेंच मुख्य कारण होतें, व याच तंट्यामध्यें इंग्लंडास जयप्राप्ति झाल्यामुळें तो देश आजकाल इतका वैभवोच्चतेस जाऊन पोंचला आहे.

पंच महाराष्ट्रांची एकमेकांवर वरचढपणा मिळण्याविषयीं जी झटापट फार दिवसपर्यंत चालली होती, तिची समाप्ति होऊन शेवटीं इंग्लंडास जय मिळण्याचीं कोणतीं मोठीं कारणें झालीं, हें सांगून हा भाग संपवावयाचा आहे. या पांच राष्ट्रांपैकीं स्पेन आणि पोर्तुगाल हीं दोनही इतरांपेक्षां स्वोद्योगांत एक शतक पुढें होतीं, आणि हालंडसुद्धां इंग्लंडच्या पुढेंच होतें. नंतर सुमारें शंभर वर्षेंपर्यंत फ्रान्स आणि इंग्लंड यांचें वैमनस्य चालू होतें. दोघांकडे लढाईची तयारी बहुतेक सारखीच होती. तरी शेवटीं या पांच राष्ट्रांपैकीं शक्तिमान व सर्वांत वरचढ असें इंग्लिश महाराष्ट्र ठरलें. हल्लीं इंग्लंडच्याच ताब्यांत वसाहती फार आहेत.

प्रथम एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हालंड आणि पोर्तुगाल हे दोनही देश फार लहान असल्यामुळें मोठ्या कृत्यास जरूर लाग-

---

ह्मणून त्या युद्धाला "होली वार" अथवा "क्रूसेड" ह्मणजे धर्मयुद्ध अशी संज्ञा आहे. ह्या युद्धास सुरवात इंग्लंडचा राजा वुइल्यम ह्याच्या राज्यांत झाली. पहिलें युद्ध १०९६ त झालें. जेरुसलेमला जाऊन पोंहचेपर्यंत सैन्याचे फार हाल झाले. तेथें पोंचल्यावर पांच आठवडे वेढा घालून बसल्यावर जेरुसलेम हस्तगत झालें. तें ख्रिस्ती लोकांच्या हातीं ११८७ पर्यंत राहिलें. पुढें दुसऱ्या हेन्रीच्या राज्यांत दुसरें धर्मयुद्ध झालें. त्यांत हेन्रीचें अंग बरेंच होतें. तिसरें धर्मयुद्ध पहिल्या रिचर्डच्या कारकीर्दींत झालें. पुढें तिसऱ्या हेन्रीच्या वेळेपर्यंत धर्मयुद्धाची ईर्षा कायम होती. ह्या धर्मयुद्धांचें परिणाम पुष्कळ वाईट झाले. त्यांत राजे लोकांना त्या युद्धांच्या मिषानें कर पुष्कळ बसाविण्यास सोय झाली.

णारी सामुग्री त्यांजपाशीं नव्हती. हालंडचा मोड होण्याचीं कारणें उघड असून तीं वर कित्येक वेळां दाखविण्यांतही आलीं आहेत. स्पेनबरोबर सुमारें ८० वर्षेपर्यंत जी हालंडची लढाई चालली होती, तिजपासून हालंडला किती फायदा झाला, हें नुकतेंच सांगण्यांत आलें. परंतु ही संपतांच हालंडची व इंग्लंडची समुद्रावर लढाई जुंपली, व लागलीच फ्रान्सबरोबरही हालंडची लढाई चालू झाली. ही दुसरी लढाई सुमारें ९० वर्षेपर्यंत सुरू होती. समुद्रांतरीं इंग्लंडसारख्या सत्ताधीश राष्ट्राशीं टक्कर मारण्याचें धाडस हालंडच्या शक्तीबाहेरचें होतें, म्हणूनच हालंड देश खालीं आला. अठराव्या शतकाच्या आरंभीं हालंडच्या शक्तीचा ऱ्हास होत आहे, हें व्यक्त होऊं लागलें. युट्रेक्ट* येथील तहाचे वेळीं तर हालंडर्स लोकांनीं आपलीं हत्यारें खालींच ठेविलीं. जरी त्यावेळीं हालंडचाच जय झाला, तरी त्याची शक्ति जी एकवार मोडली, ती पुन्हां त्यास प्राप्त झाली नाहीं.

पोर्तुगीझ लोकांवर दुसरेंच अरिष्ट आलें. आरंभापासून आपल्याजवळ सामुग्री फार थोडी आहे, हें त्यांस माहीत होतें. तरी सामर्थ्यानुरूप फक्त आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर वसाहती करण्यानें त्यांची तृप्ति न होतां, त्यांनीं शक्तीच्याबाहेरील प्रचंड कृत्यास हात घातला, हें त्यांचें दुर्भाग्य होय. इ० सन १९८० या वर्षी पोर्तुगीझ लोकांस एवढा मोठा अपजय प्राप्त झाला कीं पूर्वी कोणाही युरोपीय राष्ट्रास असा प्राप्त झाला नसेल. पोर्तुगालच्या वसाहती सर्व जगभर पसरल्या असून मोठमोठीं व्यापाराचीं ठाणींही पुष्कळ होतीं, तरी त्यांची व्यवस्था बरोबर न राहिल्यामुळें, तो देश स्पेनच्या अमलाखालीं आला. साठ वर्षेपर्यंत पोर्तुगीझ लोक स्पेनच्या ताब्यांत होते. त्यावेळीं पोर्तुगीझ लोकांच्या वसाहतीही स्पेनच्या ताब्यांत आल्या. त्यांजवर डच लोकांस सहज

* टीप.--* पान ६७ पहा.

हल्ला करितां येऊन, पोर्चुगीझ लोकांचें मोठें नुकसान झालें. याप्रमाणें पोर्चुगालचें नुकसान होत असतां स्पेन लोकांस मोठा आनंद वाटत असे. याजबद्दल पोर्तुगीझ ग्रंथकार स्पानिश लोकांस मोठें दूषण देतात, कारण स्पेनच्या चुकांबद्दल पोर्चुगीझ लोकांना प्रायश्चित्त भोगावें लागलें. इ० स० १६४० या वर्षी पोर्चुगालमध्यें सर्व लोकांनीं स्पेनच्या अंमलास त्रासून बंड केलें, आणि ब्रागांझा वंशांतील पुरुषास राज्यपद देऊन नवीन राज्य-स्थापना केली. हें बंड होण्याचें मुख्य कारण वसाहतींसंबंधीं पोर्चुगालचें अतोनात नुकसान झालें, हें होय. तरी एकवार झालेलें नुकसान पुनः कधीं भरून आलें नाहीं. त्यांनीं केलेलें बंडही त्यांस अपायकारकच झालें. बंड करण्यासाठीं त्यांना इंग्लंडची मदत घ्यावी लागली. त्याज-बद्दल मुंबई बेट त्यांनीं इंग्रजांस दिलें. हें एक त्यांचें नुकसानच झालें बरें, नवीन राज्य स्थापन झालें, तें पूर्वींसारखें बळकट कधींही झालें नाहीं. प्रिन्स हेन्री,* बार्थलोमो डि ओझ,† वासकोडिगामा,‡ माजेल

* प्रिन्स हेन्री (१३९४—१४६०) पोर्चुगालच्या राजघराण्यांतील एक पुरुष होता. तो गादीचा मालक नव्हता. तरी त्यानें स्वदेशाकरितां अतोनात श्रम व उद्योग केले आहेत. नाव्हिगेटर ह्मणजे नावाडी हें त्यास एक टोपण नांव असे. नौका-नयन कलेस प्रथम चलन ह्यानेंच दिलें, व पोर्चुगाल देशांत वेधशाळा प्रथमतः त्यानें स्थापिली. या वेधशाळेंत घेतलेल्या वेधांचा इतर राष्ट्रांस पढे फारच उपयोग झाला.

† बार्थलोमो डि ओझ हा एक पोर्चुगाल देशांत फार शूर खलाशी होता. इ. स. १४८७ या वर्षी तो आफ्रिकेच्या दक्षिण बिंदूस प्रदक्षिणा घालून परत स्वदेशीं आला. त्या भुशिराजवळ त्यास एक मोठें तुफान लागलें, ह्मणून ‘ तुफानाचें भुशीर ’ (केप आफ् स्टार्म्स) असें त्यानें त्यास नांव दिलें. परंतु त्या वेळच्या पोर्चुगाल-च्या राजाचा सर्व हेतु हिंदुस्थान देश शोधून काढण्याचा असल्यामुळें आफ्रिकेचा दक्षिण बिंदु सांपडल्यानें हा त्याचा हेतु दृढ होऊन सफल होण्याची आशा दिसूं लागली. ह्मणून त्यानें त्या भुशिरास ‘ चांगल्या आशेचें भुशीर ’, ‘केप आफ गुड होप ’ असें नांव दिलें.

‡ टीप.—* पान १६ पहा.

हेन्स,* आणि कामोन्स,† इत्यादि ज्या मंडळीची युरोपाच्या इतिहासांत विलक्षण कीर्ति आहे, ती पूर्वीच्या राज्यांत होऊन गेली. ह्या नवीन राज्यांत तशी मंडळी उदयास आली नाहीं.

या ठिकाणीं हें सांगितलें पाहिजे कीं, या गोष्टी घडून येण्यांतही अमेरिकेचें वजन युरोपावर पडलें आहे. हालंड देशाची ऊर्जितावस्था व व्यापारवृद्धि यांचें कारण जसें अमेरिका ह्मणून वर सांगण्यांत आलें आहे, त्याचप्रमाणें पुढें कित्येक वर्षांनीं झालेल्या पोर्तुगाल येथील राज्यक्रांतीचेंही थोडेंबहुत कारण या नवीन वसाहतीच होत.

हालंड आणि पोर्तुगाल यांजविषयीं विवेचन झालें. आतां स्पेन आणि फ्रान्स यांचा पराजय होण्याचें कारण एकच आहे, असें कधींही ह्मणतां येणार नाहीं. तथापि ज्या कारणाचे योगानें दोनही देश खालीं येण्यास बरीच मदत झाली, असें एक मुख्य कारण सांगतां येईल.

स्पेनच्या वसाहती त्याचे ताब्यांतून गेल्यास फार दिवस झाले नाहींत. इंग्लंडच्या वसाहती अमेरिकेंत स्थापन होण्यापूर्वीं शंभर वर्षें स्पेनच्या वसाहती अमेरिकेंत स्थापन झाल्या. परंतु इंग्लंडच्या वसाहती स्वतंत्र झाल्या. नंतर ९० वर्षेंपर्यंत स्पेनच्या वसाहती त्याचे ताब्यांत होत्या, ह्मणून इंग्लंडची आणि स्पेनची तुलना केली असतां इतकाच फरक दिसतो कीं, इंग्रज लोकांसारखें स्पॅनिश लोकांनीं नवीन वसा-

* माजेल हेन्सः—हा पोर्तुगाल देशांतला एक प्रसिद्ध खलाशी असावा.

† कामोन्स (१५२४—१५७९) हा पोर्तुगाल देशांत एक विद्वान कवि होऊन गेला. स्वदेशांत लोकांकडून त्यास फार त्रास झाल्यामुळें तो इ. स. १५५३ या वर्षीं हिंदुस्थानांत येऊन गोवें येथें सुमारें १७ वर्षेंपर्यंत राहिला. गोवें येथें जे गव्हर्नर पोर्तुगाल देशाहून येत, त्यांच्याशीं याचें बरेंच सख्य असे. प्रथमतः त्याचे मनांत स्वदेशीं परत जाण्याचें नव्हतें, परंतु पुढें जन्मभूमि पाहण्याची उत्कट इच्छा होऊन तो इ. स. १५७० या वर्षीं परत पोर्तुगाल देशांत गेला.

हती जास्त वाढविण्याचें काम चालू ठेविलें नाहीं, व असें होण्याचें कारण इतकेंच कीं, सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत स्पेनच्या शक्तीचा विलक्षण रीतीनें ऱ्हास झाला. लोकसंख्या कमी होत जाऊन देशाचा वसूलसुद्धां कमी झाल्यामुळें वसाहत करण्याचीचशी काय, परंतु दुसरीही एक प्रकारची स्पेनची शक्ति मोडून गेली.

फ्रान्स देशाचा ऱ्हास अशा प्रकारचा नाहीं. एकसारख्या मोठमोठ्या लढायांत अपयश येत गेल्यामुळें, अर्थातच फ्रान्सच्या वसाहती त्याच्या ताब्यांतून गेल्या. आणि लढाईच सर्व नाशास कारण, असें एकवार समजलें, ह्मणजे मग पुढें आणखी त्या विषयांत जास्त चौकशी करीत जाण्याचें कारण नाहीं, असें कोणास वाटेल, तर असें नाहीं. मुळाशीं कांहींतरी एक मुख्य कारण असलेंच पाहिजे. स्पेन आणि फ्रान्स या दोघांचीही एक चुकी झाली. तिच्या योगानें दोघांचेंही नुकसान झालें. एकाच वेळीं पुष्कळ गोष्टी करण्याचे त्यांनीं हातीं घेतलें, ही दोघांची चूक होय.

आतां फ्रान्स व स्पेन यांची त्या वेळची स्थिति व इंग्लंडाची स्थिति यांजमध्यें मूळपासून एक भेद असा आहे कीं, युरोपांतील लढायांत पहिल्या दोन राष्ट्रांचें थोडेंबहुत अंग सतत असे; परंतु इंग्रज लोक नेहमीं सर्वांपासून अलिप्त राहत असत. इंग्लंड देश एक बेट आहे, ह्मणून अमेरिका अगर युरोप या दोहोंपासूनही तें अगदीं वेगळें असून विशेषतः अमेरिकेकडेच त्याचा कल जास्त आहे. निदान युरोप आणि अमेरिका यांपैकीं पाहिजे त्यांत मोडतां येण्यासारखी इंग्लंडची स्थिति आहे. स्पेनचीसुद्धां अशीच स्थिति झाली असती. परंतु इटली देशांत जे जय स्पेनच्या लोकांस मिळाले तेच त्यांस विपरीत झाले. दुसरें, स्पेनच्या व जर्मनीच्या राजांचा लग्नसंबंध जडला, हेंसुद्धां स्पेनचें दुर्दैवच होय.

तिकडे सोळाव्या शतकांत ते अमेरिकेंत वसाहती करण्यांत गुंतले असतां, इकडे युरोपांत त्यांची फारच धांदल उडून गेलेली होती. जरूर लागण्यापुरता पैसा वसूल होत नसल्यानुळें त्या देशाचा ऱ्हास होईल असें अगोदरच व्यक्त होऊं लागलें होतें. पांचवा चार्लस राजा जेव्हां गादीचा वारसा सोडून गेला, तेव्हां स्पेनच्या तिजोरीचें बहुतेक दिवाळें निघालें होतें. जरी त्या वेळेस हालंडकडून त्यांस पुष्कळ वसुल येत असे, तरी त्यांत फारसा अर्थ नव्हता. परंतु पुढें लवकरच हालंड देश स्पेनच्या ताब्यांतून गेला, ह्मणजे सखल प्रदेशांचा गरिब स्थितींत असलेला भाग (हालंड) स्वतंत्र झाला व सधन असलेला (बेल्जिअम) धुळीस मिळाला. फ्रान्सबरोबर पुष्कळ दिवस स्पॅनिश लोकांनीं लढाई चालू ठेविली. ऐशीं वर्षेपर्यंत हालंडबरोबर लढून पुढें २९ वर्षेपर्यंत पोर्तुगीज लोकांबरोबर लढाई कायम ठेविली. इतके व्यवसाय जेव्हां एकाच्या माथ्यावर येऊन पडले, तेव्हां त्यांजपुढें त्या देशाचा चूर झाल्याशिवाय कसा राहील ? सर्व देशाचें दिवाळें निघून सर्व प्रकारच्या व्यवस्थेस जीर्णावस्था सहज प्राप्त झाली. अशीं हीं अतोनात संकटें येऊन त्यांतच स्पॅनिश लोकांत औद्योगिकतेचा अभाव, केवळ धर्मसंबंधांत एकसारख्या लढाया करण्यानें आलेली जीर्णावस्था, यांची भर पडली. मग याचा परिणाम असा झाला कीं, जो अमेरिकेचा भाग त्यांचे वांट्यास आला होता, त्याची व्यवस्था नीट ठेवून त्याजपासून स्वतःचें हित करून घेण्याचें त्यांचें सामर्थ्य राहिलें नाहीं.

बरें, फ्रान्सचा उद्देश सिद्धीस गेला नाहीं, याचें कारण फ्रेंच लोक नेहमीं दोन गोष्टी एकाच वेळीं करण्यांत गुंतलेले असत, ह्मणजे युरोपांत सतत लढाई चालू ठेवणें, आणि वसाहती करणें. इ. स. १६८८ पासून तों १८१९ पर्यंत जीं सात मोठीं युद्धें झालीं ह्मणून वर सांगितलें आहे,

त्यांचा एकमेकांचे संबंधानें विचार केला असतां, त्यांपैकीं बहुतेकांचें दोन प्रकारचें स्वरूप दिसून येतें. इंग्लंड आणि फ्रान्स यांच्या संबंधानें एक स्वरूप आणि फ्रान्स व जर्मनी यांचे संबंधानें दुसरें स्वरूप. याप्रमाणें फ्रेंचांनीं दोन दगडांवर पाय ठेविला, त्यामुळें त्यांचें सहज नुकसान झालें. इंग्लंडची व्यवस्था बहुतकरून अशी नव्हती. एका वेळेस एकच गोष्ट करण्यास इंग्रज लोक प्रयत्न करतात. ते एकच लढाई चालू ठेवितात. परंतु फ्रान्सच्या तर एकाच वेळीं दोन हेतूंकरितां दोन लढाया चालू असत. चाथाम एकदां असें ह्मणाला होता कीं, "जर्मनींत राहूनच मी अमेरिका जिंकीन." यावरून फ्रान्साची काय चुकी होत आहे, ती त्यास उघड कळली. फ्रान्सचें सैन्य दोहोंकडे विभागलें गेलें. चाथामचे ह्मणण्याचा अर्थ असा कीं, जर्मनींत जाऊन तेथील राजा फ्रेडरिक याला मदत केली, ह्मणजे फ्रान्सचें सगळें बळ जर्मनीशींच लढाई करण्यांत खर्च होईल, मग फ्रान्सचीं जीं ठाणीं अमेरिकेंत आहेत, त्यांचें संरक्षण न झाल्यामुळें तीं आपोआपच इंग्रजांच्या ताब्यांत येतील. नेपोलियनचीसुद्धां त्याच प्रकारची चुकी झाली. अमेरिकेकडे त्याचें लक्ष असून युरोपाकडेही होतें. इंग्लंडचा पराभव करण्याचा त्याचा इरादा एक; हिंदुस्थानांतील व अमेरिकेंतील ज्या वसाहती त्यांचे ताब्यांतून गेल्या होत्या, त्या परत घेण्याचा त्याचा इरादा दुसरा. परंतु शेवटीं त्यानें केलें काय? जर्मनी देश जिंकला व रशियावर स्वारी केली. त्यामुळें त्याला इतकेंच समाधान वाटलें कीं, जर्मनी देश आपल्या स्वाधीन झाल्याच्या योगानें इंग्रजांचा व्यापार बंद करतां येईल आणि रशियांतून कदाचित् हिंदुस्थानांत येण्याचा मार्ग सांपडेल.

इंग्लंडचे असे कधीं दोन दगडांवर पाय नाहींत. पंधराव्या शतकामध्यें फ्रान्साशिवाय करून इतर युरोपीय राष्ट्रांच्या व्यवहारांशीं इंग्लं-

डचा फारसा संबंध नाहीं, व दुसरे कोणाबरोबर त्यांची एखादी लढाई फार दिवस चालू नाहीं. नेपोलियनप्रमाणें सर्व युरोपभर सार्वभौम बादशाही मिळविण्याची इंग्लंडाची इच्छा नाहीं, ह्मणून वेस्टफालियासारख्या तहाच्या अटीही त्यांस कबूल कराव्या लागल्या नाहींत. नेपोलियननें सर्व युरोपभर अशी व्यवस्था चालू ठेविली कीं, युरोपाशीं इंग्लंडचा सर्व प्रकारचा व्यवहार त्यानें बंद केला होता, तरी पण इंग्लंडनेंही असें दाखविलें कीं, आपल्यास इतर युरोपाची गरज नाहीं. ह्मणून इंग्लंडला कोणतीही गोष्ट करण्यास पाहिजे तेव्हां मोकळीक असे. व्यापाराचे योगानें त्यांचें चित्त अमेरिकेकडे वेधून गेलें. बरेच दिवस गेल्यावर शेवटीं यांतच इंग्लंडचा मोठा फायदा झाला. स्पेन आणि फ्रान्स यांप्रमाणें युरोपमध्यें आपलें वर्चस्व राखण्याकडे इंग्लंडनें प्रयत्न केले नाहींत. तसेंच हालंड, पोर्तुगाल व स्पेन यांजप्रमाणें स्वदेशांतही कोणी प्रबल शत्रु इंग्लंडास नव्हते. ह्मणून वसाहती करण्याचा जो उद्योग इंग्लंडचा फार धिमेपणानें चालू होता, तो बंद पाडण्यास अगर सोडून देण्यास कांहींएक अडथळा त्यास आलेला नाहीं. या सर्व गोष्टींचा एक परिणाम झाला. जीं पांच राष्ट्रें अमेरिकेंतील जमिनीच्या मालकीकरितां पुष्कळ दिवस झगडत होतीं, त्यांत एकासच सरते शेवटीं यश आलें. तें एक राष्ट्र कोणतें? वसाहती करण्यास आरंभापासून जें झटत होतें, तें नव्हे. ज्याचें धैर्य अगर शोधक शक्ति अगर काम करण्याची शक्ति इतरांपेक्षां जास्ती होती, तें नव्हे. तर ज्यास युरोपांतील व्यवहारांपासून, आरंभापासून अगदीं अलिप्त राहतां आलें, तें इंग्लिश राष्ट्र होय.

प्रकरण सहावें.

व्यापार आणि युद्ध.

पश्चिम युरोपांतील समुद्रकांठच्या पांच राष्ट्रांचा नवीन सांपडले-ल्या भूमीच्या ताब्याकरितां कलह, हेंच बहुतेक सतराव्या आणि अठराव्या शतकांतील युरोपाच्या इतिहासाचें मुख्य स्वरूप होय. जोंपर्यंत प्रत्येक राष्ट्राचा इतिहास पृथक् रीतीनें पाहिला जातो, तोंपर्यंत ह्या वरील सामान्य स्वरूपाकडे आपलें लक्ष सहसा जात नाहीं.

प्राचीन काळच्या ग्रीस देशाच्या इतिहासाचा आपण ज्याप्रमाणें अभ्यास करतों, त्याप्रमाणेंच युरोपाच्या इतिहासाचा अभ्यास केल्यास पुष्कळ फायदा होईल. ग्रीसच्या इतिहासांत तीन चार राज्यें नेहमीं डोळ्यांपुढें असतात. अथेन्स, स्पार्टा, थीब्स, अर्गास तसेंच मासीडोनिया आणि पर्शिया. या सर्वांची एकमेकांशीं विचारपूर्वक तुलना करून सर्वसाधारण घडामोडी कोण कोणत्या होत होत्या, हें कळण्याकरितां असें समजलें पाहिजे कीं, ग्रीस देश ह्मणून एकच स्वतंत्र राष्ट्र नव्हतें, पुष्कळ संस्थानांचें एकत्र मिश्रण होतें, ह्मणून हल्लींच्या प्रघाताप्रमाणें इतिहास लिहिण्याचा असता, तर सर्व ग्रीसचाच इतिहास एका ठिकाणीं न लिहितां, अथेन्स, स्पार्टा वगैरे निरनिराळ्या संस्थानांचा निराळा इतिहास त्यांनीं लिहिला पाहिजे होता. ज्यांनीं ग्रीसच्या इतिहासाचा अभ्यास केला आहे, त्यांस आमचें असें सांगणें आहे कीं, ग्रीस देशाच्याच इतिहासाची पद्धत त्यांनीं युरोपच्या इतिहासास लागू करावी. ग्रीस देश ह्मणजे निरनिराळीं पुष्कळ संस्थानें एका समुद्रासभोंवती वसलेलीं होतीं. त्या समुद्रांत लहान लहान बेटें पुष्कळ असून समुद्राच्या

पलीकडे दुसरे अफाट देश होते. या देशांत भिन्न भिन्न जातींचे लोक रहात असून त्यांजविषयीं ग्रीक लोकांस फारशी माहिती नव्हती. आतां ग्रीसचा इतिहास वाचतांना या राष्ट्रांतील प्रत्येकाचा पृथक विचार करण्याची आह्मांस संवय नसून एकदम सर्वांचा विचार करण्याचा पाठ आहे. हीं जीं ग्रीस देशांत कित्येक नगरसंस्थानें होतीं, त्या सर्वांचे एकमेकांशीं निरनिराळ्या तऱ्हेचे व्यवहार घडून जे सर्वसाधारण परिणाम घडून आले, ते आह्मांस माहीत आहेत. आतां जीं पांच युरोपीय राष्ट्रें मागें सांगण्यांत आलीं, ह्मणजे स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स, हालंड आणि इंग्लंड, हीं सर्व अटलांटिक महासागराच्या ईशान्य किनाऱ्यावर असून, त्या महासागरांत जी कांहीं गुप्त वस्तु होती, तींत त्या सर्वांचा सारखा स्वार्थ होता. ग्रीस देशाच्या मानानें हीं राष्ट्रें फारच मोठीं वाटतील. हा महासागरही अगदीं अमर्याद दिसेल व त्याच्या वसाहती सर्व जगभर पसरलेल्या दिसतील, ह्मणून सर्वांना एकदम एका ठिकाणीं मनांत जागा देणें कठिण वाटेल; तरी प्रयत्न करून पहा. एकाच नकाशांत सर्व राष्ट्रें काढा व हा नकाशा लहान आकाराचा असूं द्या. परंतु असें करतांना एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, इतिहासदृष्ट्या या सर्वांचा विचार करतांना एका पाठीमागून एक गोष्ट घेऊनच चालतां नये. एकंदर घडलेल्या गोष्टींतून आपल्या कामासाठीं ज्या निवडून घेणें त्या, एकच तत्व ध्यानांत ठेवून, नीट निवडून काढाव्या. काळाच्या क्रमानें त्यांचा क्रम लावूं नये. तसेंच एखाद्या गृहस्थाच्या चारित्राचा आधार घेऊन या गोष्टींचा क्रम लावूं नये. तर कार्यकारणभावान्वयें ज्यांचा जसा संबंध कमजास्त येईल, तशा क्रमानें या गोष्टींचा विचार करावा. प्राचीन ग्रीक लोकांच्या ज्या झटापटी चालू असत, त्यांचा बहुतकरून एकमेकांशीं संबंध नव्हता. परंतु अमेरिकेविषयीं या पांच युरोपीय राष्ट्रांचे कलह

ग्रीक लोकांच्यासारखे नव्हते. त्या सर्वांचा एकमेकांशीं संबंध निकट होता. अगोदरच युरोपीय राष्ट्रांचे घोटाळ्यांचे कलह सुरू होते. त्यांत कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावतांच त्यांस निराळें स्वरूप प्राप्त झालें. विशेषेंकरून वसाहतींचे कलह व धर्मसुधारणेचे कलह हे एकमेकांत गुंतून गेल्यासारखे झाले. अशा प्रकारें बनलेल्या जाळ्याची एकंदरींत शेवटीं फारच गुंतागुंत झाली. ती सोडविण्यास प्रथम असें केलें पाहिजे कीं, कोणतें तरी एक कारण घ्यावें. त्यापासून उत्पन्न होणारे असे जे परिणाम असतील ते इतरांपासून निराळे करून एका ठिकाणीं आणावे. असें करतां येण्यासाठीं काळाचा क्रम बिलकूल ध्यानांत घेतां कामा नये. एकसारखी कालक्रमानुरूप हकीगत सांगत जाण्याची इतिहासाची पद्धत फार वाईट आहे. आह्मीं सांगितलेल्या पद्धतीनें चाललें असतां, असें दिसेल कीं, सोळाव्या, सतराव्या व अठराव्या शतकांत मागील भागांत सांगितलेलीं दोन मुख्य कारणें सर्व युरोपभर प्रबल आहेतशीं दिसतात. प्रत्येक कारणाचे असंख्य परिणाम घडलेले आहेत. एक धर्मसुधारणा आणि दुसरें अमेरिकेचें वजन. या दोन कारणांचा आपण पृथक्पणें विचार करूं. प्रत्येकाचे काय काय परिणाम घडले तें पाहूं. आणि इतकें झाल्यानंतर मग ह्या दोन कारणांचे एकमेकांवर काय परिणाम घडले, तें पाहूं. प्रथम आपण अमेरिकेचे योगानें युरोपांतील पांच राष्ट्रांवर जे परिणाम घडले, त्यांचा विचार करूं. ह्या कारणाचा मुख्य परिणाम असा झाला कीं, युरोपांतील, पांच राष्ट्रांचें ज्ञान हळूहळू वाढत जाऊन त्यांच्या बुद्धीचा विकास झाला व त्यांस नवीन व्यापार सुरू करण्याचें उत्तेजन आलें. परंतु यापेक्षां जास्त परिणाम या कारणापासून कां घडावे, हें स्पष्ट समजत नाहीं. वर सांगितलेले परिणाम याच कारणापासून घडले, हें मागील भागीं सांगण्यांत आलें आहे. तेथें असें सांगण्यांत आलें आहे कीं, सो-

व्या शतकामध्यें सुधारणेचें मुख्य स्थान पूर्वेकडून भूमध्य समुद्रांतून हळुहळु पश्चिमेकडे आट्लांटिक महासागराकडे जात चाललें. ह्मणून सोळाव्या शतकाचे आरंभीं इटली आणि जर्मनी हीं मुख्य चळवळींचीं स्थानें दिसतात. राफेल,* मिकेल आंजेलो† वगैरे चितारी त्या वेळीं झाले. आरिओस्टो,‡ माकिआव्हेली,‡ वगैरे मुत्सद्दी झाले. डूरर,§ हट्टन्स,¶ आणि लूथर$ वगैरे धर्मसुधारक त्यावेळीं मध्ययुरोपांत झाले. तरी सोळाव्या शतकाचे अंतीं व सतरावें शतक सुरू होतांच ह्या सर्व गोष्टींचें स्थल वायव्येकडे गेलें. सर्व्हांटिस? आणि काल्ड्रान‖ वगैरे विद्वान पुरुष स्पेन देशांत झाले. शेक्सपियर,× स्पेन्सर,+ आणि

---

* राफेल (१४८३–१५२०). हा इटलीमध्यें एक फार प्रसिद्ध चितारी होऊन गेला. याचें चातुर्य अद्यापि सर्व लोक वाखाणतात.

† मिकेल आंजेलो (१४७५–१५६४). इटलींतील फ्लारेन्स प्रांतांतला शेवटचा उत्तम चितारी, हाही सर्वत्र प्रसिद्ध आहे.

‡ आरिओस्टो व माकिआव्हेली (१४६९–१५२७). हे दोन मुत्सदी व राज्यशास्त्रकार एकाच वेळीं इटलींत होऊन गेले.

§ डूरर (१४७१–१५२८). हा जर्मनीमध्यें प्रसिद्ध चितारी होता. वरील राफेल व हा एकाच वेळीं प्रसिद्धीस आले.

¶ हट्टन्स (१४८८–१५२३). जर्मनीमध्यें धर्मसुधारणेच्या कामांत एक महाशूर पुढारी होता.

$ लूथर (१४८३–१५४६). हा एक अतिविख्यात धर्म सुधारणारा होता. हा फार धैर्यवान व विलक्षण पुरुष होऊन गेला. ख्रिस्ती धर्म अगदीं निकृष्टावस्थेप्रत आला होता. त्यांतील व्यंगें काढून तो सुधारल्याचें बहुतेक श्रेय यासच आहे.

? सर्व्हांटीस (१५४७–१६१६). हा स्पेन देशांत एक नाटककार व कादंबरीकार होता. डान क्विक्सोट नांवाचा याचा सर्वमान्य ग्रंथ फार प्रसिद्ध आहे.

‖ काल्ड्रान (१६००–१६८१). हा स्पेन देशांत अतिविख्यात नाटककार होता.

× शेक्सपियर (१५६४–१६१६). हा इंग्लंडांत एक मोठा नाटककार होता. याचे ग्रंथ अद्यापि आबालवृद्धांस अतिशय प्रिय आहेत.

\+ स्पेन्सर (१५५२–१५९९). इंग्लंडांतील एक जुना कवि. हा एलिझाबेथ राणीच्या वेळेस होता.

बेकन* वगैरे इंग्लंडांत झाले. स्कालिगर† आणि लिपसिअस† व पुढें ग्रोटिअस† वगैरे हालंडमध्यें झाले. मांटेन‡ आणि कॅझाबॉन§ हे फ्रान्समध्यें झाले. फ्रान्सचा चवथा हेन्री,¶ इंग्लंडची राणी एलिझाबेथ$ व राजा प्रिन्स आफ् ऑरेंज|| वगैरे त्या वेळचे सत्ताधीश राजे पश्चिम युरोपांतच उदयास आले. पुढें हळुहळु तर सर्वच गोष्टी पश्चिमेकडेस दिसूं लागतात. इटली आणि भूमध्य समुद्र ह्या जणुंकाय जुन्या गोष्टी असें वाटूं लागतें. अमेरिका खंडाचा शोध लागल्यामुळें हे वरील परिणाम घडणें अशक्य नाहीं. कारण, ज्याप्रमाणें जगाच्या प्राचीन सुधारणेचें कारण भूमध्य समुद्र, असें आपण ह्मणतों, त्याचप्रमाणें ह्या समुद्राचे ठिकाणीं अटलांटिक

---

* बेकन (१५६१-१६२६). इंग्लंडांत एक महान् तत्त्ववेत्ता झाला. अलीकडच्या शतकांतील सर्व शास्त्रांच्या ऊर्जितावस्थेचा मूळ प्रेरक बेकन होय.

† टीप.—* पान १७९ पहा.

‡ मांटेन (१५३३-१५९२). फ्रान्स देशांत एक निबंधकार होता.

§ कॅझाबॉन (१५५९-१६१४). हा एक महाविद्वान धर्मग्रंथकार फ्रान्समध्यें होता. धर्मसुधारणेच्या कामांत हा पुढारी होता.

¶ चवथा हेन्री (१५५३-१६१०). हा फ्रान्स देशचा राजा होता. हा विद्वान व मेहनती असून दमदार होता. इ. स. १५८९ या वर्षी तो फ्रान्सचा राजा झाला. फ्रान्स देशाची पूर्वीं अगदीं अव्यवस्था झाली होती, ती यानें बंद केली. यानें देशाचा वसूल वाढविला, व तो सुरळीतपणें येऊं लागला. शेतकी, कारागिरी, व व्यापार यांस त्यानें ऊर्जित कळा आणिली. तसेंच फ्रान्स देशाची कीर्ति सर्व देशांत त्यानें जागृत ठेविली. यामुळें फ्रान्सच्या इतिहासांत याचें नांव गाजत आहे. इ. स. १६१० या वर्षी हेन्री याचा कोणी एका दुष्ट मनुष्यानें खुन केल्यावर त्याच्या पाठीमागून तेरावा लुई फ्रान्सचा राजा झाला.

$ एलिझाबेथ ही इंग्लंडची राणी होती. हिनें इ. स. १५५८ पासून १६०३ पर्यंत इंग्लंडचें राज्य केलें. इंग्लंडच्या वसाहतींची प्रथम सुरवात हिच्याच कारकीर्दींत झाली. ही आपलें राज्य फार उत्तम रीतीनें चालवीत असे.

|| प्रिन्स आफ् ऑरेंज (१६५०-१७०२) हा हालंडमधील एका प्रांताचा राजा असून इंग्लंडच्या राजघराण्याशीं याचा संबंध असल्यामुळें इ. स. १६८८ या वर्षी इंग्लंडांत राज्यक्रांति झाल्यावर यासच तिसरा वुइल्यम असें नांव देऊन लोकांनीं इंग्लंडचा राजा केलें. हाहि फार शहाणा व शूर राजा होता.

महासागर येतांच, ह्मणजे अटूलांटिक महासागराचे दुसरे बाजूस जमीन मिळतांच, त्याजपासून प्राचीन काळापेक्षांही मोठमोठे परिणाम घडून येणें अशक्य नाहीं. परंतु ह्यापेक्षां दुसरे जास्त परिणाम याच कारणापासून कां घडावे, हें समजणें सोपें नाहीं. हें समजण्याकरितां अमेरिका आणि युरोप यांच्यामध्यें एक विशिष्ट संबंध कोणत्या प्रकारचा जडलेला होता, तो समजला पाहिजे. अर्वाचीन वसाहतींची पद्धत कोणत्या प्रकारची आहे, याचा आह्मीं वर विस्तारानें विचार केला असल्यामुळें वरील विशिष्ट संबंध कोणत्या प्रकारचा होता, हें समजण्यास कठिण जाणार नाहीं.

अमेरिकेच्या योगानें जो परिणाम युरोपावर घडून आला, त्याहून भिन्न असा दुसरा कोणता परिणाम घडून येणें शक्य होतें, हें प्रथम पाहूं. युरोपामध्यें जशीं हल्लीं निरनिराळीं शक्तिमान राष्ट्रें अंमल करीत आहेत, तशींच जर राष्ट्रें अमेरिकेंत अंमल करीत असतीं, तर अमेरिका खंड सांपडल्यापासून काय बरें परिणाम झाला असता? तसें झालें असतें तर इंग्रज लोकांचा जपान अगर चीन देशाशीं जसा संबंध आहे, तसाच संबंध अमेरिकेशीं राहिला असता. चीन देशामध्यें इंग्रजांनीं शिरकाव केला तेव्हां चिनी लोकांनीं जसें शहाणपणाचें वर्तन केलें, तसेंच अमेरिकेंतील लोकांनीं केलें असतें, व याचा परिणाम एक तर असा झाला असता कीं, युरोप आणि अमेरिका यांजमध्यें मुळींच दळणवळण राहिलें नसतें; अथवा दुसरें कदाचित् हें दळणवळण ठेवण्यास युरोपीयन लोकांनीं अमेरिकेंतील लोकांस भाग पाडण्याचे प्रयत्न केले असते. मग त्या प्रयत्नांस यश आलें असतें किंवा नाहीं, हा निराळा प्रश्न. कदाचित् जपानच्या लोकांप्रमाणें अमेरिकेंतील लोक मोकळ्या मनाचे आणि उदार बुद्धीचे असते, तर अमेरिका आणि युरोप यांजमध्यें दळणवळण सहज सुरू झालें असतें; व उभयतांसही त्याजपासून फायदा होण्याचा संभव

असता. वरील गोष्टींपैकीं कांहीं झालें असतें तरी राज्यप्रकरणासंबंधीचे महत्वाचे परिणाम मुळींच घडून आले नसते. कारण, समुद्रांतून व्यवहार होण्याचीं साधनें त्या वेळीं फार नव्हतीं, ह्मणून युरोपची राज्यकारभाराची पद्धत होती तिचें व अमेरिकेंतील पद्धतीचें संमिश्रण झालें नसतें, व युरोपांतील व अमेरिकेंतील राष्ट्रांचे स्नेहसंबंधही घडून आले नसते. दोनही खंडांतील राष्ट्रांत एकमेकांची माहिती राहती व आजकाळीं जो संबंध इंग्लंडचा चीन आणि जपान यांच्याशीं आहे, तशा प्रकारचाच केवळ या दोन खंडांतील राष्ट्रांचा संबंध न राहतां सतराव्या शतकामध्यें जो संबंध चीन, जपान अथवा हिंदुस्थान व इराण या देशांशीं इंग्लंडचा होता, तशा प्रकारचा वरील दोन खंडांचा संबंध असता.

असो, मेक्सिको आणि पेरू शिवायकरून वर कल्पना केलेल्या प्रकारचीं राष्ट्रें अमेरिकेंत नव्हतीं. मेक्सिको आणि पेरू हींसुद्धां स्पेन देशांतील वसाहत करणाऱ्यांनीं तेव्हांच गिळून टाकिलीं. ह्मणून युरोपांतील राष्ट्रांस आपल्यांत शिरकाव न होऊं देण्याची शक्ति अमेरिकेंतील लोकांच्या अंगीं नव्हती. तेव्हां युरोप खंडांतून पुष्कळ लोक अमेरिकेंत जाऊन वसाहती करून राहूं लागले.

हीच एक गोष्ट फार महत्वाची आहे. तिजपासून असें समजतें कीं, अट्लांटिक महासागर केवळ पूर्वीच्या भूमध्य समुद्रासारखाच झाला असें नाहीं, तर कांहीं अंशीं जास्त झाला. भूमध्य समुद्राच्या योगानें परकीय लोकांशीं ग्रीक लोकांचे व्यापार, दळणवळण, विचारविनिमय वगैरे सुरू होते खरे, तरी अट्लांटिक महासागराचे योगानें लोकांना देशांतर करण्यास जशी अतोनात सवड सांपडली, तशी भूमध्य समुद्राचे योगानें ग्रीक लोकांस सांपडली नाहीं. प्राचीन काळीं लोकांकडून देशांतर घडत नव्हतें असें नाहीं; तरी पण हल्लींच्या देशांतराची व त्या वेळच्या

देशांतराची मुळींच बरोबरी नाहीं, इतकें हल्लींचें देशांतर जबरदस्त जास्त आहे. भूमध्य समुद्राचे पलीकडे प्राचीन काळीं मोठमोठीं राष्ट्रें होतीं, ह्मणून देशांतर करण्यास बरीच अडचण होती. तशांत देशांतराची गोष्ट बरीच खासगी तऱ्हेची असून राजकीय संबंधाची ह्मणतां येणार नाहीं. ह्या गोष्टीमुळें राजकीय कारभारांत फेरफार होत नाहीं, असें नाहीं. कित्येक वेळां तो होतोही. उदाहरणार्थ, प्यूरिटन* धर्माचे लोक अमेरिकेंत न्यू इंग्लंड नांवाची वसाहत करून जाऊन राहिले, ह्मणून इंग्लंडच्या राज्यकारभारांत बराच घोटाळा झाला. हें जरी खरें आहे, तरी हा परिणाम त्या कारणाचा प्रत्यक्ष आहे असें नसून, केवळ अप्रत्यक्षच आहे. ह्मणून देशांतर करणें ही गोष्ट फारशी राजकीय संबंधाची नाहीं.

दुसराही एक प्रकार घडून आला असता. युरोपांतील राज्यकर्त्यांनीं अमेरिकेंत काय चाललें आहे इकडे बिलकूल लक्ष दिलें नसतें, तर जे लोक वसाहत करून अमेरिकेंत राहिले, त्यांनींच स्वतंत्र राज्यें स्थापिलीं असतीं. मग अमेरिकेचें वजन युरोपावर फारच थोडें पडलें असतें. अमेरिका खंड अतिविस्तृत होतें; लोकसंख्या फारच विरळ होती; ह्मणून तेथें जाऊन वसाहत करणाऱ्यांचे हातून घडलेल्या कृत्यांचे मोठमोठे राष्ट्रीय परिणाम घडले नसते, व युरोपांतील राष्ट्रेंही निर्वेध राहिलीं असतीं. ज्याप्रमाणें दक्षिण अमेरिकेंतलि कित्येक राष्ट्रांचें कांहींच वजन युरोपावर पडलें नाहीं, त्याचप्रमाणें सर्व अमेरिकेचेंही युरोपावर फारसें वजन पडलें नसतें. राज्यक्रांतीचे तंटे अमेरिकेंत कितीही माजले

* ख्रिस्ती धर्मांतील नवीन सुधारलेलेल्या प्राटेस्टंट शाखेचा एक पंथ आहे. या पंथाचे लोकांस इंग्लंडांत नाना तऱ्हेचीं संकटें भोगावीं लागल्यामुळें शेवटीं त्रासून त्यांनीं स्वदेशत्याग केला, व ते अमेरिकेंत जाऊन राहिले, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. आलिव्हर क्रामवेल ह्याच पंथाचा होता.

असते, तरी तिकडे कोणीं लक्ष दिलें नसतें, व त्यांचे परिणामही एवढ्या अफाट व विरळ लोकसंख्येच्या प्रदेशांत कोठेंच गडप होऊन गेले असते.

इतका वेळ कित्येक कल्पना गृहित घेऊन त्यांचे काय परिणाम घडून आले असते, याचा विचार करण्यांत आला. आतां खरोखरी जो प्रकार घडून आला, तो समजण्यास बरेंच सुलभ पडेल. अमेरिकेचें वजन कितीही मोठें जरी युरोपावर घडून आलें, तरी वर सांगितल्याप्रमाणें दुसऱ्या कांहीं गोष्टी घडत्या, तर तें वजन राजकीय प्रकरणावर तसेंच घडलें पाहिजे होतें, असें नाहीं. परंतु युरोपांतून जे लोक वसाहती-करितां अमेरिकेंत गेले, त्यांनीं काबीज केलेल्या प्रदेशांवर युरोपयि राष्ट्रांनीं आपला हक्क कायम ठेविला, ह्मणून राजकीय प्रकरणावर जबरदस्त नवीन जोर येऊन पडलाच. युरोपयि राष्ट्रांचा अमेरिकेशीं निकट संबंध होऊन मोठमोठ्या गोष्टी घडून आल्या. आरंभीं सांगितलेल्या पांच शक्तिमान राष्ट्रांची मूळची अंतःस्थिति आणि त्यांचे स्वार्थ हे अगदीं बदलून गेल्यानें युरोपचे राजकीय व्यवहारही भिन्न झाले. या गोष्टीस आह्मीं इतकें मोठें महत्व देण्याचें कारण इतकेंच कीं, तिकडे पुष्कळांचें दुर्लक्ष झालेलें दिसतें, व हीच गोष्ट प्रधान धरून ह्या पुस्तकांतील विषयाचें विवेचन केलेलें आहे. विलक्षण राजकीय फेरफारांचें तत्व, हें स्वरूप धारण करून, अमेरिका खंड सतराव्या आणि अठराव्या शतकांत युरोपाच्या बाहेर असून युरोपांतच समावेश झालेलें होतें. ज्यांत इतिहासाला विषय न सांपडे असें एकदेशीय अमेरिका खंड या वेळीं नव्हतें. इतिहासकारांनीं एकसारखें काळजीपूर्वक लक्ष देत असलें पाहिजे. अशाच प्रकारचें अमेरिकेचें महत्व या वेळीं होतें. धर्मसुधारणेचें महत्व व अमेरिकेचें महत्व हीं कांहीं काळपर्यंत सारखीं चालत असून धर्मसुधारणेचें महत्व उत्तरोत्तर अगदीं नाहींसें होत गेलें, व अठराव्या शतकामध्यें तर युरो-

पीय राज्यप्रकरणांत धर्मसुधारणेचें वजन बहुतेक नसल्यासारखें असून सर्व वजन अमेरिका खंडाचेंच आहे, असें दृष्टोत्पत्तीस येतें.

इतिहासकारांनीं वरील शतकांचा इतिहास लिहितांना दोन तीन गोष्टी विशेष लक्षांत ठेविल्या आहेत. पहिली, धर्मसुधारणा आणि तिचे परिणाम; दुसरी, प्रत्येक देशांतील राजकीय प्रकरणांत फेरफार; व हे फेरफार ह्मणजे इंग्लंड देशास प्राप्त झालेली स्वतंत्रता आणि फ्रान्स देशांत जुलुमाचें राज्य झाल्यामुळें घडून आलेली राज्यक्रांति; तिसरी, युरोप खंडांत वेळोवेळीं जीं राजघराणीं पराक्रमी व सत्ताधीश होत गेलीं, त्यांजविषयीं कच्ची हकीगत इतिहासकारांनीं लिहिली आहे; जसें, आस्ट्रियांतील राजघराणें*, बुर्बों† नांवाचें राजघराणें, आणि नेपोलियन. या वरील दोन चार गोष्टींची जणुं काय एक चौकटच करून तिजमध्यें इतर सर्व लहान लहान गोष्टी इतिहासकारांनीं गोंवून दिल्या आहेत. परंतु ही चौकट अगदीं अपुरी आहे; व अगदीं एकदेशीय ह्मणजे युरोपीय आहे. इतर मोठमोठ्या पुष्कळ गोष्टी घडून आल्या. त्यांस या चौकटींत जागा मिळालेली नाहीं; व ज्या गोष्टींस जागा मिळालेली नाहीं अशी एक गोष्ट इतर सर्वांपेक्षां कदाचित् जास्त महत्वाची आहे. निदान ज्या इतर गोष्टींविषयीं त्यांनीं हकीकत लिहिली आहे, त्यांपेक्षां जास्त कालपर्यंत ती घडून येत होती. प्रत्येक गोष्टीचा युरोपच्या संबंधानें पृथक् विचार करूं लागलें ह्मणजे ती सर्वथैव खरी दिसते. धर्माची सुधारणा झाली, या नात्यानें

---

* आस्ट्रियाचें घराणें.—ह्या घराण्याचें नांव हाप्स्बर्ग घराणें. इ. स. १२७६ या वर्षीं हाप्स्बर्ग येथील रुडोल्फानें आस्त्रिया देश जिंकला. तेव्हांपासून इ. स. १८०६ पर्यंत ह्या हाप्स्बर्ग घराण्याकडेसच आस्त्रियाचें राज्य होतें. ह्या घराण्यांत पराक्रमी पुरुष निपजले असून त्यांजपासून युरोपच्या राजकीय व्यवहारांत बराच घोटाळा झाला होता.

† टीप.—* पान ५७ पहा.

विचार केला असतां, युरोप हें एक मोठें पाद्री देऊळ आणि साम्राज्यच आहे, असें दिसतें, व या साम्राज्याच्या पोटांत निरनिराळीं लहान लहान पुष्कळ राज्यें आहेत, व त्या महादेवळांत प्रत्येक राज्याचीं निरनिराळीं लहान लहान देवळें आहेत. मुत्सद्दी या नात्यानें विचार केला असतां, युरोप ह्मणजे एक राष्ट्रसमुदाय आहे व त्यांतील राहणाऱ्या लोकांस दिवसेंदिवस जास्त अधिकार व स्वतंत्रता मिळत आहे, असें दिसतें. राष्ट्रांचे परस्परांशीं व्यवहार जाणण्याच्या उद्देशानें पाहिलें असतां, युरोप एक राष्ट्रसमुदाय आहे; हीं राष्ट्रें एकमेकांशीं आपआपलीं समतोलता मोठ्या कष्टानें राखीत आहेत; कदाचित् एखाद्याचा जोर थोडा कमीजास्त होतांच ही समतोलता एकदम नाहींशी होईल असें वाटतें. परंतु इतका सर्व प्रकारचा विचार केला तरी तो अपूर्ण असून एकंदर विचाराचा फक्त अर्धा विचार यांत झालेला आहे. ह्मणून आणखीही युरोपाच्या संबंधानें असा विचार झाला पाहिजे कीं, ' युरोप हा एक राष्ट्रसमुदाय असून त्यापैकीं पश्चिमेकडील पांच राष्ट्रें अमेरिकेकडे एकसारखें आकर्षण पावत असून, त्याच योगानें त्यांनीं अमेरिकेमध्यें आपआपलीं राज्यें नवीन स्थापन केलीं आहेत. '

अठराव्या शतकाच्या संबंधानें आह्मीं वर सांगितलेला विचार पूर्वीं केला आहे. ह्मणजे फ्रान्स आणि इंग्लंड यांजमध्यें या शतकांत एकसारखें वैमनस्य चालू असण्याचें कारण अमेरिका, हें सांगण्यांत आलें आहे. इंग्लंड आणि फ्रान्स यांच्या ज्या लढाया या काळांत झाल्या, त्यांचें केवळ युरोपच्याच संबंधानें एकदेशीय विवरण इतिहासकारांनीं कित्येक प्रसंगीं केलें आहे. युरोपच्या राष्ट्रांची बलसमतोलता,* जिला बॅलन्स आफ् पावर असें नांव आहे, तिचें वर्णन करितांना इतिहासकारांनीं वरील

---

* बलसमतोलता—ह्मणजे ज्याला इंग्रजींत ' बॅलन्स आफ् पावर ' ह्मणतात ती होय. ही सर्व राज्यांची सत्ता सारखी ठेवण्याची कल्पना मूळ इटली देशांत नि-

लढायांचा विचार केला आहे. अशा प्रकारच्या एकदेशीय वर्णनाचें एक विशेष उदाहरण इतिहासकारांनीं लिहून ठेविलेला नेपोलियनचा वृत्तांत होय. ते नेपोलियनविषयीं असें लिहितात कीं, सर्व युरोपखंड जिंकून टाकण्याची त्याची बलवत्तर इच्छा असून, अशा महत्कृत्यांत यश-ही मिळविण्याची त्याची शक्ति जबर होती. नेपोलियनविषयीं असें जें लिहिण्यांत आलें आहे, त्यांत इतकाच विशेष ध्यानांत ठेवण्याचा आहे कीं, वरील सर्व गोष्टी त्यानें जरी केल्या, तरी त्याच करण्याचा त्याचा उद्देश नसून, खरोखरांचा उद्देश अगदीं निराळा होता. मोठमोठे मुलूख जिंकण्याची त्याची इच्छा असून त्यानें ते जिंकलेही. परंतु जे मुलूख जिंकण्याची त्याची खरोखर इच्छा होती ते त्यानें जिंकले नाहींत. यु-

---

घाली. ती पुढें युरोपमध्यें पसरत चालली व आजपर्यंत ती सुरू आहे. त्यांतलें मूळ तत्व हें कीं, सर्व राष्ट्रांनीं आपल्यांपैकीं कोणत्याही राष्ट्राला देशमर्यादेच्या बाबतींत जबरदस्त होऊं न देण्याचा प्रयत्न करावा. इंग्लंडाचा राजा तिसरा वुईल्यम ह्यानें फ्रान्साशीं जी १६९७ पर्यंत लढाई केली, तसेंच स्पॅनिश गादीच्या संबंधाची जी लढाई राणी आनच्या कारकीर्दींत झाली ती व आणखी पुष्कळ लढाया ह्याच तत्वास अवलंबून झालेल्या आहेत. मध्यकाळ १४९५ च्या सुमारास संपला, आणि दहा पांच राष्ट्रांनीं एकमेकांस साह्य होऊन किंवा एकमेकांच्या विरुद्ध जुटी करून मदत करणें किंवा लढाया करणें हें सुरू झालें. इंग्लंडचा राजा आठवा हेन्री ह्यानें १५११ त 'पवित्र जूट' म्हणून एक जूट बनविली. त्यावेळीं त्यानें राष्ट्रांची बलसमतोलता करण्याची इच्छा दाखविली. जेव्हां ही इच्छा त्यानें दर्शविली, तेव्हां राजाच्या कौन्सिलांत बराच वाद झाला. कांहींचें मत पडलें कीं जमिनीवर अशा जूटी करून लढाया लढण्यांत इंग्लंडास फायदा होईल. परंतु दुसऱ्यांचें मत पडलें कीं, इंग्रजांनीं समुद्रावरच बलाढ्य होण्याचा प्रयत्न करावा, जमिनीवर करूं नये. ह्या वादानें तेव्हां दोन दुफळ्या झाल्या. आणि ह्यापुढें आजपर्यंत परराज्यव्यवहारसंबंधानें जेव्हां मतभेद व तट होत आले, ते ह्याच प्रश्नावरून होत आले. ही बलसमतोलता राखण्यासाठीं सोळा, सतरा व अठरा ह्या तीन शतकांपैकीं पहिलीं शेंसवाशें वर्षें स्पेन देश बलाढ्य होता. त्यास खालीं आणतांना स्पेनबरोबर तितका काळ सर्व युरोपानें लढाया केल्या. तसेंच स्पेन रसातळास गेल्यावर फ्रान्स देश जबरदस्त झाला, त्यास खालीं आणतांना पुढें शेंदिडशें वर्षें सर्व युरोप फ्रान्साशीं भांडत होतें.

रोपविषयीं तर नेपोलियन बिलकुल पर्वा करीत नव्हता. तो असें स्पष्ट ह्मणत असे कीं, ‘ ह्या पुरातन युरोपाचा मला कंटाळा आला आहे. ’ त्याचे सर्व विचार अमेरिकेकडे लागले होते. पूर्वी फ्रेंच राज्य अमेरिकेंत स्थापन झालें होतें. त्याचा मोड करून त्या ठिकाणीं इंग्रजांनीं स्वतःचें राज्य स्थापन केलें. ह्मणून आपल्या हातांतून इंग्रजांकडे गेलेले मुलूख पुन्हां परत घ्यावे हा नेपोलियनचा मुख्य हेतु. ही आपली इच्छा नेपोलियननें कधीं गुप्त ठेविली नाहीं, व त्यानें ती कधीं सोडूनही दिली नाहीं. युरोपमध्यें जे त्यानें पराक्रम गाजविले ते केवळ सहज रीत्या घडून आले. कदाचित् इंग्लंडवर मोठी स्वारी करण्याचा तो पाया होता. जर्मनी जिकल्यावर प्रथम त्यास काय वाटलें तें पहा. ‘ इंग्लंडवर स्वारी करण्यास आतां आपल्यास नवीन साधन मिळालें आहे. आतां युरोपांतील सर्व देशांत एकच अंमल लागू करण्याची सवड येईल, ’ असें त्यास वाटलें. स्पेन आणि पोर्तुगाल आपले ताब्यांत घेण्याचें कारण काय? ते समुद्रकांठचे देश असून त्यांचीं आरमारें व वसाहती होत्या. इंग्लंडावर हल्ला करण्यांत यांचा उपयोग करण्यांत आला असता. सरतेशेवटीं रशियावर स्वारी करण्याचें तरी नेपोलियन यास प्रयोजन काय? असें विचारिलें असतां, आह्मांस असें ह्मणणें भाग आहे, कीं जर कांहीं रशियावर स्वारी करण्याचा नेपोलियनचा हेतु असेल, तर तो केवळ इंग्लंडचे विरुद्ध आपल्यास मदत मिळावी, हाच होय. परंतु बहुतेक इतिहासकारांस हा विचार संमत नाहीं. कारण, आरंभापासून अमेरिकेच्या आकर्षणाचें वजन युरोपावर किती होतें याजकडे कोणाचें पुरतें लक्ष गेलेलेंच नाहीं. वसाहतींचें महत्व त्यांस कळलेलें नाहीं. कारण, त्या दूर देशीं असून त्यांत लोकसंख्या फारच थोडी होती. जणुं काय वसाहती ह्मणजे युरोपीय राष्ट्रांचीं चलनजीवनविरहित गौणांगेंच होतीं.

राजकीय विचारांच्या प्रधान विषयांत वसाहतींची गणना नसे, हें खरें आहे. व्हर्जीनिया आणि लुसिआनिया यांजविषयीं लंडन अथवा पारीस येथील थोडेच लोकांचे मनांत विचार घोळत असत. ज्या त्या राष्ट्राचीं युरोपांतच घरगुती कामें पुष्कळ होतीं. नुकतेंच एखादें घडून आलेलें कारस्थान किंवा पार्लमेंटांतील मतभेद यांजविषयीं सर्व राज्यभर चर्चा चालू असे. भांड्याचे वर काय असतें, तेवढें मात्र डोळ्यांस प्रथम दिसतें, बुडाशीं काय आहे, हें लवकर दिसत नाहीं. परंतु मंत्रिमंडळांत वरचे-वर होणारे फेरफार, एकाचा मोड व दुसऱ्याचा उदय, सर्व युरोपभर दंगे, लढाया व राज्यक्रान्त्या ह्या सर्वांचें अंतस्थ कारण एकच आहे. अमेरिकेंतील मुलुखाच्या स्वामित्वाकरितां निरनिराळ्या राष्ट्रांत सतत चालू असलेलें वैमनस्य, हेंच या सर्वांचें अंतस्थ कारण होय. अशी जर गोष्ट आहे, तर ती जशी अठराव्या शतकास लागू आहे तशी सतराव्या शतकासही लागू असली पाहिजे. परंतु सोळा, सतरा, व अठरा या तीन शतकांत अमेरिकेचा युरोपाशीं संबंध होता; त्या वेळच्या इतिहासांत या तीनही शतकांपैकीं प्रत्येकाचा कांहींना कांहीं तरी विशेष आहे. सोळाव्या शतकास स्पेन–पोर्तुगाल काल असें ह्मणतां येईल. स्पेन आणि पोर्तुगाल याच दोन राष्ट्रांनीं अमेरिका शोधून काढिली असून, सोळाव्या शतकाच्या शेवटीं स्पेन आणि पोर्तुगाल हीं राज्यें दुसऱ्या फिलिपचे कारकीर्दीत संयुक्त होऊन एक झालीं. सतराव्या शतकांत दुसरीं तीन राष्ट्रें प्रमुख होतीं. फ्रान्स, हालंड, आणि इंग्लंड, यांत हालंडची गणना प्रथम करावयाची. प्रथम हालंडची व स्पेनची लढाई चालू होऊन, पोर्तुगीझ लोकांच्या ज्या वसाहती स्पेनच्या ताब्यांत गेल्या होत्या, त्या सर्व हालंडचे ताब्यांत आल्या. कांहीं काळपर्यंत ब्रेझिल देशही डच लोकांनीं जिंकला होता; नंतर लवकरच फ्रान्स व इंग्लंड यांनीं उत्तर अमेरिकेंत आपआपल्या वसाहती केल्या. युरोप-

च्या राजकीय व्यवहारांत जे फेरफार होऊं लागले ते याच काळापासून होते. पांच राष्ट्रांना वसाहतींसंबंधें जी नवीन स्थिति प्राप्त झाली होती तिचाच परिणाम हे राजकीय फेरफार होत, असें दाखविण्यांत आलेंच आहे. तसेंच सतराव्या शतकांत वसाहतींचें महत्व या पांच राष्ट्रांपैकीं प्रत्येकास कमी जास्त दिलें जातें. पोर्तुगालचा व पुढें हालंडचाही पाडाव झाला. स्पेन देश कांहीं दिवस अगदीं अचल स्थितीमध्यें होता, तरी त्याच्या वसाहती कमी झाल्या असें नाहीं. पण नवीन वसाहती मात्र मुळींच झाल्या नाहींत. चीन देश जसा सर्व जगाशीं कोणत्याही व्यवहारापासून अगदीं अलिप्त आहे, तसाच स्पेन देश त्या वेळीं होता. इंग्लंड आणि फ्रान्स या दोघांचीही पुढें सरशी होत गेली. व्यापाराचे संबंधानें युरोपीय देशांची तुलना करून कोल्बर्ट* यानें फ्रान्सचें नांव पहिलें घातलें आहे. मिसिसिप्पी† नदीचे आवर फ्रेंचांनींच शोधून काढिलें, परंतु इंग्लिश वसाहतींना एक मोठा फायदा होता. त्यांची लोकसंख्या सर्वांपेक्षां मोठी होती. येणेंकरून फ्रान्स आणि इंग्लंड यांचें मोठें युद्ध जुंपलें.

या पुस्तकाच्या आरंभींच वरील युद्धाचें वर्णन करण्यांत आलें असून, त्या ठिकाणीं असें दाखविण्यांत आलें आहे कीं, इंग्लड देशाचा विस्तार होत होता, तो शांतपणें कोणास न कळण्यासारखा होत नव्हता; तसेंच तो अगदीं अलीकडचा आहे, असेंही नाहीं. सर्व अठराव्या शतकांत या वरील कारणामुळेंच सर्व युरोपभर गडबड माजली असून पूर्वी

---

* कोल्बर्ट (१६१९–१६८३) हा फ्रान्स देशांत एक मुत्सद्दी होता.

† उत्तर अमेरिकेंत एक मोठी नदी आहे. हिच्या कांठचा प्रदेश फार सुपीक आहे. ही नदी संयुक्त संस्थानांतून दक्षिणेकडे वहात जाऊन मेक्सिकोच्या अखातास मिळते.

कधीं झाल्या नाहींत, अशा मोठ्या पुष्कळ लढाया झाल्या. यापेक्षां ज्यास्त सांगणें पुस्तकाच्या आरंभीं शक्य नव्हतें. परंतु अमेरिकेचें वजन साधारणपणें सर्व युरोपावर व विशेषेंकरून इंग्लंडावर कसें पडत गेलें, व या दोन खंडांचें आकर्षण कोणत्या प्रकारें व किती होतें, याचा आपण इतका वेळ स्वस्थपणें विचार केला असल्यामुळें, इंग्लंडचा विस्तार प्रथमारंभीं केव्हां व कसा होऊं लागला, हें आतां सहज कळणारें आहे.

वर असें सांगण्यांत आलें आहे कीं, एलिझाबेथ राणीच्या वेळेपासून इंग्लंडच्या प्रस्तुत स्वरूपास प्रथम सुरुवात झाली. ह्मणजे इंग्लंड देश व्यापाराच्या सपाट्यांत येऊं लागला तेव्हांपासूनच दर्यावर्दीपणांतही इंग्लंडचें लक्ष लागून अमेरिकेकडे त्याचें चित्त वेधलें. इंग्लंडच्या विस्ताराचें अगदीं आरंभींचें चिन्ह त्याच वेळेस बाहेर दिसूं लागलें. स्पॅनिश आरमेडाच्या वेळेपासून इंग्लंडचें मूळ स्वरूप बदलत जाऊन, त्यास सर्व जगाचे संबंधानें नवीनच स्वरूप प्राप्त होऊं लागलें. ह्मणून या वेळेपासूनच इंग्लंडच्या अर्वाचीन इतिहासास सुरुवात झाली. त्या वेळच्या पूर्वीच्या इतिहासांतील कोणतीही गोष्ट घेऊन, तिच्याशीं स्पॅनिश आरमेडाच्या स्वारीची तुलना केली असतां, एक विलक्षण नवीन तऱ्हा या आरमेडा नामक आरमारांत दिसून येते. ही नवीन तऱ्हा ह्मणजे काय याचा विचार केला असतां, असें दिसेल कीं, ती सामुद्रिक आहे. इंग्लंड मूळपासून बेट होतें खरें; इंग्रजांच्या इतर राष्ट्रांशीं पूर्वी पुष्कळ लढाया समुद्रावर झाल्या हेंही खरें. परंतु त्या वेळीं समुद्र ह्मणजे खाडी, सामुद्रधुनी किंवा फार झालें तर लहान समुद्र याच्या पलीकडे मजल गेली नव्हती; परंतु यापुढच्या सर्व लढायांची सुरुवात, स्थिति, व पर्यवसान, समुद्रावर

---

* टीप.—* पान १७ पहा.

च झालीं. इंग्रजांच्या सर्व लढाया मिळून एक नाटक अशी कल्पना केली असतां, आरमेडाच्या पुढच्या लढाया ह्मणजे शेवटचा अंक व या शेवटच्या अंकाचें स्थळ पूर्वीसारखें इंग्लंडजवळचे लहानलहान समुद्र नसून अट्लांटिक महासागर, पासिफिक महासागर व मेक्सिकोचें अखात वगैरे आहेत. कोलंबस* आणि वास्कोडिगामा† यांनीं अमेरिकेचा शोध लाविला. ज्या राष्ट्रांनीं प्रथम तेथें प्रवेश केला, त्यांच्याच वांट्यास तेथील स्वामित्व आलें. त्यांसही पुढें शत्रु उत्पन्न झाले. आपण मिळविलेला मुलूख आतां आपल्या ताब्यांतून जातो अशी त्यांस भीति पडली. या भीतीचें निवारण कोणीं केलें? मध्यकालचे योद्धे हॉट्स्पर्स् त्यावेळीं पुढें आले नाहींत. ज्या तिरंदाज लोकांनीं क्रेसीची लढाई जिंकिली, ते तिरंदाजही या वेळीं पुढें आले नाहींत. तर मध्यकालीन इंग्रजांस माहीत नाहींत, असे नवीनच चांचेपणाचा धंदा करणारे योद्धे पुढें आले. ते ड्रेक,‡ हाकिन्स,§ वगैरे होत. यांच्या पूर्वजांस जो समुद्र अनवगत असून निरर्थक व ओसाड असा वाटत असे, त्याच समुद्रावर भटकत फिरण्यांत यांनीं आपलीं सर्व जीवितें खर्चिलीं होतीं. "इंग्लंड समुद्रवीचींवर कूच करीत आहे," अशा अर्थाचें एक गाणें इंग्रज लोकांत सर्व प्रसिद्ध असून,

---

* टीप.—† पान ९६ पहा.

† टीप.—* पान ९६ पहा.

‡ ड्रेक, सर फ्रान्सिस्, (१५४५–१५९५). हा फार प्रसिद्ध इंग्लंडांतील खलाशी होता. स्पॅनिश लोकांवर अमेरिकेमध्यें प्रथमतः यानेंच हल्ला केला. इ. स. १५८८ या वर्षीं स्पानिश आरमेडाचा पराभव करण्यांत यानें मोठें शौर्य दाखविलें.

§ हाकिन्स, सर जान, (१५३२–१५९५). हाही एक उत्तम खलाशी होता. यानें अमेरिकेंत एकंदर तीन चार स्वाऱ्या केल्या, त्यांपैकीं शेवटल्या दोहोंत त्यास यश आलें नाहीं. याचेबरोबर ड्रेक दोन स्वाऱ्यांत होता. स्पानिश आर्मेडाचे वेळेस हा इंग्रजांचा व्हाइस आड्मिरल् होता.

ही गोष्ट चिरकाल अशीच चालत आली आहे, असा सर्वत्र समज आहे. परंतु ही गोष्ट खरी होण्यास याच वेळेपासून प्रथमतः सुरुवात झाली.

तरी ही फक्त सुरुवातच होय. अजून विस्तार झाला नव्हता. इंग्लंडचें राष्ट्र विस्तृत होण्याच्या साधनास चलनशक्ति मात्र प्राप्त झाली. ज्या ठिकाणीं हजारों इंग्रज लोकांस राहतां येईल, अशा मुलुखाचा रस्ता मात्र सांपडला गेला. ड्रेक आणि हाकिन्स यांचें शौर्य केवळ अपक्व होतें, व पाहिजे तिकडे समुद्रावर हौशीनें भटकत फिरण्याचा त्यांनीं पाठ घातला, असें कीं ह्या योगानें पाहिजे असलेली भूमि सांपडावी. परंतु हंफ्रे गिल्बर्ट* व वाल्टर राले† वगैरेंनीं आपली तीव्र बुद्धि खर्च करून वसाहती स्थापन करून त्यांत जाऊन राहण्याची सोय करून दिली. नंतर पुढील राजाच्या कारकीर्दीत वसाहतींचा पाया घातला गेला, तथापि

---

* गिल्बर्ट, सर हंफ्र, (१५३९–१५८३). इंग्लंडांत एक विख्यात खलाशी होता. हालंडबरोबर चालू असलेल्या त्या वेळच्या लढाईंत हा इंग्लिशांकडचा मुख्य कर्नल होता. त्यानें हिंदुस्थानास येण्याचे मार्गाविषयीं एक पुस्तक लिहिलें होतें. त्यानें अमेरिकेंत कित्येक सफरी केल्या, परंतु चांगलेंसें यश आलें नाहीं. हा राले याचा आईकडून नातलग होता. ह्याच्या वेळीं एलिझाबेथ राणी राज्य करीत होती.

† सर वाल्टर राले (१५५२–१६१८). हा प्रख्यात दर्यावर्दी आणि दरबारी पुरुष होता. तो मोठा शूर असे. एलिझाबेथ राणीची याजवर फार मेहरबानी होती. म्हणून तिनें त्याला जमिनीच्या पुष्कळ सनदा करून दिल्या असून, इतर व्यापारांचे-ही कित्येक मक्ते दिले होते. परंतु एलिझाबेथच्या नंतरचा राजा पहिला जेम्स यास असले पुरुष न आवडून त्यानें त्याची सर्व जिनगी जप्त करून त्यास कैदेंत टाकिलें. तुरुंगांत असतांना यानें आपला वेळ फुकट दवडिला नाहीं. त्यानें पुष्कळ ग्रंथ लिहिले, व रसायन शास्त्राचे पुष्कळ प्रयोग केले. पुढें इ. स. १६१६ या वर्षीं अमेरिकेंत गियाना प्रांतांतील सोन्याच्या खाणी शोधून काढण्याचें कबूल केल्यावरून त्यास तुरुंगांतून सुटून तिकडेस जाण्यास परवानगी मिळाली. अमेरिकेंत स्पेनबरोबर लढाई करण्याची त्याची उत्कट इच्छा होती. परंतु तिला जेम्स राजानें अनुमोदन दिलें नाहीं. पुढें राले हा गलबतें घेऊन गेला. परंतु त्याचे खलाशी वगैरे त्यास मदत करण्यास तयार नसल्यानें सोन्याच्या खाणी न सांपडतां, त्यास परत यावें लागलें; तेव्हां पुनः राजानें त्यास कैदेंत टाकिलें, कारण अमेरिकेमध्यें त्यानें स्पेनच्या ताब्या-

गिल्बर्ट किंवा राले यांपैकीं कोणासही तेथें जाऊन राहण्यास परवानगी मिळाली नाहीं. इ. स. १६०६ या वर्षी पहिल्या जेम्स राजानें व्हर्जीनियाची* सनद करून दिली. तसेंच इ. स. १६२० त न्यू इंग्लंडची सनद झाली. तेव्हां इंग्लंडचे लोकांस नवीन उत्तेजन मिळून त्यांचे हेतु आणि साधनें लोकांत इतकीं प्रगट झालीं कीं, युरोपच्या सर्व राष्ट्रांचें लक्ष तिकडे गेलें. पहिल्या चार्लस राजाचे वेळीं त्याची आणि लोकांची लढाई झाली. तेव्हां व तदनंतर प्रोटेक्टर या नात्यानें आलिव्हर क्रामवेल याचे हातांत इंग्लंडचीं सर्व राज्यसूत्रें असतां, हे अशा प्रकारचे इंग्रजांचे उद्देश अगदीं स्पष्टपणें दिसत होते, व त्या वेळचीं सर्व कृत्येंही अपक्व दशेंत होतीं. परंतु वाढतां वाढतां, शेवटीं त्या देशाचें मजबूत, पक्क असें खरें स्वरूप तिसऱ्या वुइल्यम राजाच्या कारकीर्दीत दिसूं लागलें, व पुढें सर्व अठराव्या शतकभर तें स्वरूप तसेंच कायम राहिलें. ह्याप्रमाणें इंग्लंडचा विस्तार होत गेला.

इंग्लंडच्या या स्थितीची एक विशिष्ट गोष्ट आह्मांस अशी दिसते

तील एका खेड्यावर हल्ला करून तें जाळलें होतं. त्याजबद्दल चौकशी करण्याकरितां राजानें एक कमिशन नेमलें, व पूर्वीचा व हा अपराध मिळून त्यास देहांत शिक्षा देण्याचा ठराव झाला. इ. स. १६१८ च्या अक्टोबर महिन्याचा २९ व्या तारखेस तो फांशीं गेला.

* इंग्लंडामध्यें पहिला जेम्स राजा राज्य करीत असतां अमेरिकेंत वसाहत करण्याच्या उद्देशानें एक मंडळी निघाली. पूर्वी एलिझाबेथ राणीच्या वेळीं अमेरिकेंतील ज्या भागास व्हर्जीनिया असें नांव देण्यांत आलें होतें, त्याच ठिकाणीं ह्या मंडळीस वसाहत करण्याची असल्यामुळें तिला व्हर्जीनिया कंपनी असें नांव आहे. ह्या मंडळीस इ. स. १६०६ या वर्षी जेम्स राजानें अमेरिकेंत वसाहत करण्याची सनद करून दिली. त्या सनदेंत पुष्कळ कलमें असून त्यांत सरकारचा फायदा राहून मंडळीच्या श्रमाबद्दल त्यांजला काय द्यावयाचें वगैरे सर्व ठरलें होतें. वसाहती करण्याचें कामांत शुद्ध पायावर इंग्लंडचे प्रयत्न ह्या मंडळीपासूनच चालू झाले, व या वेळेपासून वसाहती करण्याचें इंग्लंडचें काम बरेंच सपाट्यानें चाललें.

कीं, व्यापार आणि युद्ध हीं दोनही एकसारखीं एकाच वेळीं चालू होतीं. सर्व लोकांचा असा समज आहे कीं, व्यापार आणि शांतता यांचाच कार्य-कारणभावाचा संबंध आहे, ह्मणून इंग्लंडच्या ज्या लढाया या वेळीं झाल्या त्यांचें कारण वेगळेंच देण्यांत येतें. इंग्लंड वगैरे देशांत पूर्वापार मोठमोठे सरदार लोक जमिनीचे मालक असत. त्यांजपाशीं जीं कुळें असत त्यांस घेऊन प्रसंग पडल्यास राजास मदत करणें ह्या सरदारांचें काम असे; परंतु कित्येक वेळां हे सरदार अनिवार्य होऊन राजासही जुमानीत नसत, व ते कलहप्रिय असल्यामुळें अर्थात् पुष्कळ लढाया होत असत. अशा प्रकारच्या या वेळच्या लढाया होत्या, असें कित्येक वेळा दाखविण्यांत येतें. व्यापारी लोक शांतताप्रिय असतात, कारण व्यापाऱ्यांस दुसरा उपद्व्याप सहन होत नाहीं. या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्यावर वरील ह्मणणें सत्य दिसतें. परंतु यांतील चुकी काढण्यास तर्कशास्त्राचीच मदत पाहिजे. तर्कशास्त्रांत सिद्धांत काढण्याच्या दोन रीती आहेत. एक अशी आहे कीं, व्यक्तिमात्रावर प्रत्यक्ष प्रयोग करून जो परिणाम दिसेल तो तद्व्यक्तिवर्गावर सामान्यतः लागू करावयाचा. दुसरी अशी आहे कीं, सर्व वर्गास लागू होईल अशी एक सामान्य प्रतिज्ञा गृहीत घेऊन तिजपासून व्यक्तिमात्राची माहिती करून घ्यावयाची. परंतु सामान्य वाक्यांत त्या व्यक्तिमात्र वस्तूंचा समावेश आरंभींच झाला असल्यामुळें या दुसऱ्या रीतिपासून नवीन माहिती कांहींच न समजतां, जी समजते तीही प्रत्यक्ष बरोबर आहे किंवा नाहीं याचा संशय असतो. निदान असे विषय वादग्रस्त असतात. त्यांस ही दुसरी रीति लागू करणें चुकीचें होईल. तर ही जी दुसरी रीति सांगितली, तिचें हें वरील एक उत्तम उदाहरण आहे. कारण, त्यांत ढळढळीत चुकी आहे. लढाई व्यापारास अनिष्ट आहे, हें वाक्यच चुकीचें आहे. इंग्रजांनीं हिंदुस्थान देश

कसा जिंकिला ? हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याच्याच प्रयत्नांनीं नव्हे काय ? ह्मणून आमचें असें ह्मणणें आहे कीं, सतराव्या व अठराव्या शतकाच्या इंग्लंडच्या इतिहासांत असें एक प्रधान तत्व दिसतें कीं, व्यापार आणि लढाई यांचा एकमेकांशीं निकट संबंध आहे. वरील दोन शतकांमध्यें लढाईचें स्वाभाविक कारण व्यापार, आणि व्यापारवृद्धीचें कारण लढाई होय. पूर्वीं असें सांगण्यांत आलें आहे कीं, अठराव्या शतकांतील लढाया, मध्यकाळच्या लढायांपेक्षां अतोनात मोठ्या व जास्त जोखिमाच्या होत्या. त्यांपेक्षां थोड्या कमी तरीपण बहुतेक त्यांच्याच एवढ्या सतराव्या शतकाच्याही लढाया होत्या. याच दोन शतकांमध्यें इंग्लंडचा व्यापार हळू हळू फार मोठा वाढला. जसजसा व्यापार जास्त जास्त वाढूं लागला तसतशा लढायाही जास्त मोठमोठ्या होत गेल्या. व्यापार आणि लढाई हीं सारखीं वाढतच जाण्याचें कारण दूर नाहीं. हें कारण ह्मणजे त्या वेळची वसाहत करण्याची पद्धत होय.

व्यापाराचे योगानें शांतता वाढेल खरी, परंतु जेव्हां एखाद्या विशिष्ट प्रदेशाशीं व्यापार करण्याची एखाद्या राष्ट्राकडून बंदी होते, तेव्हां अर्थातच व्यापार लढाईस कारण होतो. अलीकडे चीन देशांत ज्या गोष्टी घडून आल्या, त्यांजवरून हें आमचें ह्मणणें अगदीं उघड दिसतें. अमेरिकेंत जर उदार बुद्धीच्या लोकांनीं भरलेलीं निरनिराळीं राष्ट्रें असतीं, व परकीय लोकांशीं मोकळेपणानें व्यापाराचें दळणवळण त्यांनीं ठेविलें असतें, तर, किंवा युरोपीय वसाहत करणारांनीं इतक्याच मोकळेपणाचें वर्तन इतर सर्व राष्ट्रांशीं ठेविलें असतें तर, लढाई न होतां व्यापारच वाढला असता. परंतु पूर्वींची वसाहतींची पद्धत कशी होती, ती आतां आपल्यास माहीत झाली आहे. अमेरिकेंत नवीन लोकांनीं जाऊन वसाहती केल्या. वसाहत केलेल्या जमीनीचा उपभोग वसाहत करणारांकडूनच

होत होता. अशा प्रकारचे मौल्यवान मुलुख आपल्या ताब्यांत आणण्याविषयीं लोक झटूं लागले. त्यांपासून द्रव्यप्राप्ति करून घेण्याची सर्वांस उत्कट इच्छा उत्पन्न झाली. यामुळें व्यापारास आजपर्यंत कधीं मिळालें नाहीं असें चलन मिळालें. हें चलन थोडे दिवसच न मिळतां कित्येक शतकेंपर्यंत सारखें चालू होतें. हें एक इतिहासांत विलक्षण कारण घडून आलें. त्याच्या योगानें प्राचीन काळची जी लोकांची राहटी होती, ती नाहींशी होऊन नवीन औद्योगिक स्थिति लोकांस प्राप्त झाली. परंतु व्यापारोत्तेजनापासून अविभक्त अशा परस्पर राष्ट्रीय वैमनस्यासही उत्तेजनच मिळालें. प्रत्येक राष्ट्राचें लक्ष व्यापारवृद्धीकडे लागलें, परंतु हा व्यापार केवळ तेथील लोकांच्या जरूरी भागण्यापुरताच चालू ठेवण्याचा होता असें नसून, अमेरिकेंतील कांहीं सधन मुलुख ताब्यांत आणून तो वाढविण्याचा सर्वांचा इरादा होता. आतां व्यापार आणि लढाई यांजमध्यें स्वाभाविक कार्यकारणभाव कितीही असला, तरी या वरील उदाहरणांत तरी व्यापारच लढाइचें कारण आहे. व्यापार आणि लढाई एकच ह्मटलें तरी चालेल. लढाईत जय मिळविणें ह्मणजे स्थावर मालमत्ता मिळविणें असें लोकांस वाटलें. ही मालमत्ता मिळविणें हाच पूर्वीच्या वसाहती करण्याच्या पद्धतीप्रमाणें सर्व राष्ट्रांचा मूळ हेतु होता. पश्चिमेकडील पांच राष्ट्रांची नवीन मुलुख मिळविण्याविषयीं अगदीं निकराची झटापट सुरू झाली, ह्मणजे त्या सर्वांचा असा संबंध जोडला गेला कीं, जास्त द्रव्य मिळविणें ह्मणजे भांडाभांड करणें हेंच त्यांस युक्त वाटलें; ह्मणजे व्यापार आणि लढाई हीं एकत्र गोंवलीं गेलीं; ह्मणजे व्यापाराच्या योगानें लढाया सुरू झाल्या, व लढायांच्या योगानें व्यापार वाढला. हें जें या काळाचें विशिष्ट स्वरूप तें आरंभींच स्पष्ट दिसत होतें. इंग्लंड आणि स्पेन यांची पुष्कळ दिवस धरसोडीची लढाई चालू होती. स्पानिश आरमेडा हा त्याच लढाईतील

एक मोठा भाग होय. त्या वेळचे इंग्रजांचे समुद्रावरील योद्धे चांचे लोकांसारखे होते, हें वर सांगण्यांत आलें आहे, आणि इंग्लंडच्या संबंधानें ही वरील लढाई ह्मणजे एक उपयुक्त धंदाच होता. ती द्रव्य मिळविण्याचें साधन असून त्यांत झालेला वेळाचा खर्च उपयुक्त कामांत झाला, असें मानलें जात असे. स्पेन देशाशीं लढाई हाच इंग्लंडच्या परदेशांशीं व्यापाराचा आरंभ होय. प्रथम व्यापाराकरितां ह्मणून जें भांडवल खर्चिलें होतें, तें लढाईकरितां असें समजण्यांत येत असे. ज्याप्रमाणें हल्लीं रेलवेमध्यें वगैरे लोक भांडवल घालितात, त्याचप्रमाणें त्या वेळचे उद्योगी व्यापारी, जॉन आक्सनहाम किंवा फ्रान्सिस ड्रेक हे प्लिमाउथ येथें जीं आरमारें तयार करीत होते, त्यांत पैसे देऊन आपले हिस्से ठेवीत असत. हीं आरमारें तयार करण्याचा हेतु असा होता कीं, स्पानिश लोकांचीं जीं गलबतें सोनें वगैरे मौल्यवान द्रव्यानें भरलेलीं सांपडतील, तीं लुटावीं व मेक्सिकोच्या अखातांतून स्पानिश लोकांच्या वसाहतींवर हल्ला करावा. तथापि हे दोन देश ह्मणजे अगदीं उघड रीतीनें लढाईच करीत होते असें नाहीं. याप्रमाणें अमेरिकेंतील जमीनी बळकावण्याची पद्धत पडून गेली असल्यामुळें, व्यापार आणि लढाई अगदीं ओळखतां येईनाशीं झालीं. हालंड देश पुढें भरभराटीस आला, हेंही याच तत्वाचें एक फार चांगलें उदाहरण आहे. लोक असें ह्मणतात कीं, निदान लहानशा राष्ट्रानें तरी मोठी लढाई करण्यास सरसावणें ह्मणजे स्वतःचें नुकसान करून घेणें होय. तरी स्पेनबरोबर सुमारें ८० वर्षें लढूनच हालंड देशास उन्नति प्राप्त झाली. याची वरच्याशीं संगति कशी? याचें कारण लढाई नसून शांतता असती, तर अमेरिकेंतील ज्या प्रदेशांवर हालंडास हल्ला करितां आला नसता, त्या प्रदेशांवर लढाईच्या योगानें त्यांस स्वाऱ्या

करितां आल्या. लढाईंत जय मिळवून हालंडच्या लोकांनीं विस्तृत साम्राज्य स्थापन केलें, आणि या योगानेंच ते लोक सधन झाले.

अशाच प्रकारचे विचार आलिव्हर क्रामवेलच्या* हातांत इंग्लंडचा राज्यकारभार असतांना इंग्लिश राज्यपद्धतीचे नियामक होते. ज्या दृष्टीनें आतां आपण इंग्लंडचा इतिहास पाहत आहों, त्या दृष्टीनें पाहिलें

---

* आलिव्हर क्राम्वेल (१५९९–१६५८)–हा इंग्लंडांत एक महान पुरुष होऊन गेला. हा पार्लमेंट सभेचा सभासद होता. इंग्लंडांत त्या वेळीं पहिला चार्लस राजा राज्य करीत होता. परंतु तो जुलमी असल्यामुळें लोकांस अगदीं आवडेनासा झाला. पुढें राजाची व लोकांची लढाई जुंपली. त्या लढाईंत स्वदेशाच्या स्वतंत्रते-करितां आलिव्हर क्राम्वेल मोठ्या निकरानें लढला. पुढें कित्येक लढाया होऊन शेवटीं इ. स. १६४९ या वर्षीं राजा व राणी यांस प्रसिद्धपणें लोकांनीं फांशीं दिलें. परंतु त्यानंतरही राजपक्षीय लोकांचें व इतर लोकांचें युद्ध बंद झालें नाहीं. चार्लसचा दुसरा मुलगा चार्लस या नांवाचा फ्रान्स देशांत होता. तो स्काटलंडांतून इंग्लंडांत आला. परंतु कित्येक लढायांत त्याचा पराभव होऊन त्यास फ्रान्सांत परत जावें लागलें. पुढें इंग्लंडच्या गादीवर कोण बसवावा याविषयीं वादविवाद होऊन राजसत्ता आलिव्हर क्राम्वेल याच्या हातांत द्यावी असें ठरलें. त्याप्रमाणें इ. स. १६५४ या वर्षीं लॉर्ड प्रोटेक्टर आफ् कामन्वेल्थ ह्मणजे ' इंग्लंडच्या प्रजासत्ताक राज्याचा संरक्षणकर्ता ' अशी पदवी क्राम्वेल यास पार्लमेंटानें देऊन, सर्व राज्यकारभार त्याच्या हातांत दिला. त्यानें थोड्या वेळांत जिकडे तिकडे स्वस्थता करून राज्यपद्धति सुधारली, व ४ वर्षेपर्यंत उत्तम रीतीनें राज्यकारभार चालविला. पुढें त्यास शत्रु फार उत्पन्न झाले. आपल्याकडे व आपल्या वंशाकडे राज्य कायम रहावें अशी त्याची इच्छा असून ती सफल होण्याचीं चिन्हें दिसेनात. ह्मणून त्यास मोठा हृद्रोग लागला. दिवसेंदिवस चैन पडेनासें होऊन कोणत्याही गोष्टींत त्यास करमणूक वाटेना. शेवटीं तो इ. स. १६५८ या वर्षीं मृत्यु पावला. त्याचे मागून त्याचा मुलगा रिचर्ड यास त्याची पदवी मिळाली; तरी लोकांचीं मनें पुनरपि पूर्वीचा राजवंश स्थापन करण्याकडे असल्यामुळें त्यांनीं पहिल्या चार्लस राजाचा मुलगा जो फ्रान्सांत होता, त्यास बोलावून आणून दुसरा चार्लस ह्या नांवानें त्यास गादीवर बसविलें. अशा प्रकारचा क्राम्वेलचा वृत्तांत आहे. क्रामवेल फार शहाणा व शूर पुरुष होता. त्याचा सर्व युरोपीय राष्ट्रांस मोठा दरारा वाटत असे. तो राज्यकारभार पाहत असतां, राजा नव्हता ह्मणून इंग्लंडच्या स्वामित्वास राज्य असें नांव नव्हतें. तरी तो केवळ प्रोटेक्टर ह्मणजे रक्षणकर्ता असल्यामुळें प्रोटेक्टोरेट असें त्या राज्यास त्या वेळीं

तर इ. स. १६८८ पूर्वी सतराव्या शतकांतील मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे पहिल्या चार्लस राजाची व लोकांची लढाई नव्हे, तो राजा फांशीं गेला हीही नव्हे, तर युरोपांतील लढाईंत क्रामवेलनें हात घातला, ही होय. हीच गोष्ट विस्तृत साम्राज्याचा मूळ पाया होय. ह्या गोष्टीचा परिणाम इतका जलदी झाला, कीं स्पेन देशाचा मोड होईल, असें तेव्हांच दिसूं लागलें. सुमारें १०० वर्षांपूर्वी जो स्पेन देश सर्व जगतास पुरून उरला होता, तो आतां निरुपाय होऊन फ्रान्सचा बलाढ्य राजा चवदावा लुई याच्या करड्या नजरेखालीं आला. इ. स. १६४० या वर्षी पोर्चुगाल देशांत जी राज्यक्रांति झाली, तीच स्पेन देशाच्या उतरते कळेचा आरंभ. तेव्हांपासून स्पेन देशाचा ऱ्हास होऊं लागला. परंतु पुढें वीस वर्षेपर्यंत स्पानिश लोक हातपाय हालवीत होते. मध्यें पुन्हां त्यांस थोडीशी तेजी येऊं लागली, याचें कारण असें कीं, फ्रान्स देशांत त्याच वेळीं अंतस्थ कलह माजले. असें होतांच क्रामवेल त्या तंट्यांत शिरला. तेव्हां तर स्पेनचा उपाय अगदीं हरला. परकीय राष्ट्रांच्या तंट्यांत इंग्लंडनें हात घातला, इतकी महत्वाची दुसरी गोष्ट कित्येक शतकेंपर्यंत इंग्लंडच्या इतिहासांत घडली नाहीं.

ही गोष्ट जशी एका साम्राज्याच्या नाशास कारण आहे, त्याचप्रमाणें ती दुसऱ्या साम्राज्याच्या उदयास कारण आहे. इंग्लंडच्या डोळ्यासमोर हालंडचें उदाहरण होतें. आणि व्यापाराची सर्व पद्धत इंग्रज लोकांनीं हालंडचे लोकांपासून उचलली होती. इंग्लंडच्या पहिल्या वसाहती जरी आरंभींच्या स्टुअर्ट राजांच्या कारकीर्दींत झाल्या, तरी

नांव असे. रीजन्सी, एजन्सी वगैरे नांवें याच प्रकारचीं आहेत. ह्मणजे त्यांत रीजंट अगर एजंट ह्मणून कोणी एखादा पुरुष सर्व राज्यकारभार पहात असतो. इंग्लंडांत इ. स. १६५४ पासून सन १६५८ पर्यंत प्रोटेक्टोरेट होतें.

या वरील नवीन कल्पना त्या राजांच्या मनांत शिरल्या नव्हत्या. त्यांनीं एलिझाबेथ राणीची पद्धत सोडून देऊन आपलें लक्ष अमेरिकेकडे न लावतां केवळ युरोपाकडे लावलें असल्याचें दिसतें. परंतु कामन् वेल्थ-च्या वेळेपासून ही मधील पद्धत फिरून बंद पडली, व पूर्वीची एलिझाबेथ राणीची पुन्हां सुरू झाली. ही नवीन पद्धत नीट विचारपूर्वक सुरू झाली होती, असें जरी नाहीं, तरी तींत लोकांचें धैर्य आणि निश्चय हीं चांगलीं व्यक्त होतात, व यात्र पद्धत्तीस अनुसरल्यानें पुढें इंग्रजांस जयप्राप्ति झाली.

एलिझाबेथ राणीची जी शेवटची पद्धत होती तिजप्रमाणेंच या वेळची पद्धत होती. ह्मणजे तिचा हेतु महासागरसंबंधीचा असून त्याचें सफलत्व पश्चिमेकडे दृष्टोत्पत्तीस येई. अमेरिकेचें वजन प्रथमतः युरोपावर पडूं लागलें तें याच वेळीं. अमेरिकेंतील वसाहत न्यू इंग्लंडसंबंधीं वरील तत्व ध्यानांत बाळगणारी कित्येक मंडळी पार्लमेंटात होती. या मंडळीविषयीं डाक्टर पाल्फ्रे यांनीं आपल्या ग्रंथांत सुरेख विवेचन केलें आहे. ही मंडळी आरंभीं प्यूरिटन धर्मी लोकांपासून उत्पन्न झालेली होती. हे प्यूरिटन्स "इंडिपेंडंट" शाखेचे होते. खुद्द क्राम्वेलही याच शाखेपैकीं होता. ह्मणून इंग्लंडच्या राज्यक्रांतींत याच लोकांचें अंग विशेष होतें. मासाच्युसेटस् नांवाच्या वसाहतींत राहिलेले असे कित्येक मुत्सद्दी त्या वेळेस होते; उदाहरणार्थ,—सर हेन्री व्हेन,* जार्ज

* सर हेन्री व्हेन (१६१२—१६६२) हा पार्लमेंटचा सभासद असून त्या वेळच्या प्रसिद्ध मुत्सद्यांपैकीं एक होता. पहिल्या चार्लस राजास फांशीं देण्यांत त्यांचें अंग नव्हतें. पुढें कित्येक कामांत तो पुढारी असे. फौज आणि आरमार यांजबद्दल एक कमिशन नेमण्यांत आलें, त्याचा हा अध्यक्ष होता. या वेळीं वसाहतींच्या संबंधांत यानें बरीच खटपट केली. दुसऱ्या चार्लस राजानें त्यास कैदेंत टाकिलें होतें. यानें पुष्कळ उत्तम ग्रंथ लिहिले आहेत.

डौनिंग,* आणि ह्यू पीटर्स. हा शेवटला क्राम्वेलचा उपाध्या होता. इंग्लिश लोकांचें मोठें आरमार राबर्ट ब्लेक याच्या हाताखालीं प्रथमतः समुद्रावर झळकूं लागलें. यापुढें इंग्लंडचें आरमारच त्याच्या सर्व मोठेपणास कारण झालेलें आहे. त्या वेळचें सैन्य पूर्वीपेक्षां जास्त व्यवस्थित होतें व इतकें मजबूत होतें कीं, मूळ राजास (पहिला चार्लस) पदच्युत करून आपल्या सेनापतीसच (क्राम्वेल) गादीवर बसविण्यास तें समर्थ झालें; तरीपण पुढें तें लवकरच मोडकळीस आलें, कारण लोकांची त्या फौजेवर पुष्कळ इतराजी झाली होती. परंतु आरमार मात्र यापुढें सर्व लोकांस आवडूं लागलें. येथून लोकांचा असा दृढ ग्रह झाला कीं, इंग्लंड देश बिलकुल फौजबंद नाहीं. इंग्लंडला सैन्य ठेवण्याची मुळींच जरूर नाहीं. जरूर असेल तर अगदीं थोडें सैन्य ठेवण्यापुरतीच आहे. परंतु इंग्लंडचें आरमार मात्र सर्व जगामध्यें बलिष्ठ राहील, असें सर्व लोकांस वाटूं लागलें.

आमच्या या विचारसरणीप्रमाणें पाहतां, क्राम्वेलच्या वेळची वसाहतींची पद्धत पुढील दुसऱ्या चार्लस राजाच्या पद्धतीपेक्षां जास्त न्याय्य अथवा जास्त यशस्वी होती, ह्मणून ती महत्वाची होती असें नाहीं. तर ती दुसऱ्या चार्लस राजाला किच्याप्रमाणें उपयोगी पडली. या पद्धतींत न्यायीपणा नव्हता; व धर्मसंबंधीं कांहीं प्रकार तींत होता असें कोणास वाटेल, परंतु क्राम्वेलची कारकीर्द कांहीं दिवस जास्त चालती तर तीस ह्या पद्धतींतील धर्मसंबंधीं प्रकारापासून खचित अपाय घडला असता. कारण, सत्ताधारी पुरुषांनीं एकाच गोष्टीविषयीं डोक्यांत वेड घेऊन तेव-

---

* जार्ज डौनिंग, बार्ट:—हा एक अलीकडील मोठा मनुष्य होता. ह्यानें सन १८०० मध्यें एक कायद्याच्या प्रोफेसराची जागा केंब्रिज युनिव्हर्सिटींत स्थापित केली. तिला डौनिंग प्रोफेसरची जागा असें नांव आहे.

ढीच तडीस नेण्याकरितां हाताखालच्या राष्ट्रास गुंतविणें ह्यापेक्षां जास्त भयंकर काय असूं शकेल? लोकांस स्वतंत्रता देण्याकरितां देशांत राज्य-क्रांति होणें नेपोलियन यास इष्ट वाटलें. कारण, स्वतंत्रतेच्या नांवावर स्वतःच्या मनांतील हौस त्यास पूर्ण करून घेतां आली. तद्वतच क्राम्वेल-ची स्थिति होय. प्राटेस्टंट धर्मसंस्थापनेच्या नांवावर त्यास पुष्कळ गोष्टी करतां येत होत्या. परंतु केवळ धर्माकरितांच जर त्यानें इतका उपद्व्याप स्वराष्ट्रास दिला असता, तर त्यांत त्याची हानि झाली असती. परंतु नेपो-लियनच्या द्विस्वरूपी पद्धतीला जसें प्रखर यश प्राप्त झालें, तसेंच क्राम्वेल याजलाही झालें. कांहीं वेळपर्यंत इंग्लंडचा लष्करी बाणा फार वाढला होता, व एकवार सैन्यास रजा दिल्यावर स्वतःस राखण्यास अतीव अव-घड अशी जबाबदारी त्या राष्ट्रानें आपल्या शिरावर घेतली होती. क्रा-म्वेलच्या कारकीर्दीचें खरें स्वरूप लोकांत प्रगट होण्यापूर्वी तिची समाप्ति झाली, ही फार चांगली गोष्ट झाली. लढाई करणें हें तर त्या कारकी-र्दीचें ब्रीद होतें. इंग्लंडांत राजकारण लोकांचे नेहमीं दोन पक्ष असतात. एक लिबरल व दुसरा कांझर्व्हेटिव्ह. लिबरल पक्षाचे लोक नेहमीं लो-कांच्या पक्षाचे असतात, व कांझर्व्हेटिव्ह, राजाचे पक्षाचे असतात. हा लिबरल पक्ष कलहप्रिय नाहीं. क्राम्वेल याचा पक्ष प्युरिटन धर्माचा होता. तरी तो लिबरल होता, असें मानणें चुकीचें होय. मारव्हेल* ह्मणून एक इंग्लंडांत कवि होता. त्यानें क्राम्वेलची स्तुति केली आहे ती पहा. त्यानें असें भविष्य केलें होतें कीं, ज्याप्रमाणें फ्रान्स देश सीझर यानें जिंकला, अगर इटली देश हानिबाल यानें जिंकला, त्याचप्रमाणें क्राम्वेलही ते देश जिंकील. बरें, असें लिहिण्यांत त्या ग्रंथकारास तिलप्राय धाडस वाटलें नाहीं. कदाचित् या कामांत क्राम्वेल कचर खा-

* मारव्हेल—इ. स. १६२१–१६७८ पर्यंत.

ईल, ह्मणून त्यास त्यानें असा उपदेश केला आहे कीं, तुझें पाऊल अविश्रांत पुढें चालू दे. आणि असें ध्यानांत ठेव कीं, ज्या कृत्यांनीं मोठेंपण मिळविलें असेल, तींच कृत्यें तें राखण्यास समर्थ असलीं पाहिजेत." क्राम्वेलची परराज्यांशीं वर्तणुक पाहिली असतां, हें वरील तत्व त्याच्या लक्षांत नव्हतें, असें नाहीं. पुढें धर्मसंबंधीं युरोपांत लढाई होईल, असा त्यास सुमार दिसत होता. आपल्या वज्रदेही* शिपायांस बरोबर घेऊन ज्याप्रमाणें त्यास इंग्लंडांत राजपक्षीय लोकांशीं लढावें लागलें, त्याचप्रमाणें सर्व इंग्लंडासही युरोपांतील धर्मयुद्धांत लढावें लागलें, असें त्यास वाटत असे. क्राम्वेलची तारीफ करणार जे कित्येक ग्रंथकार अलीकडे झाले त्यांसही असेंच वाटलें होतें. प्रसिद्ध ग्रंथकार मेकाले असें ह्मणतात कीं, "स्वतःकरितां अगर स्वतःच्या कुटुंबाकरितां क्राम्वेल यास दुसरी कांहीं एक गोष्ट नको होती. फक्त सर्व युरोपभर एक जंगी धर्मयुद्ध त्याला पाहिजे होतें. दुर्दैवेंकरून आपला जबर पराक्रम गाजविण्यास त्यास एक संधी आली ती स्वजातीयांबरोबर लढण्यांत आली, दुसरीकडे आली नाहीं." क्राम्वेलच्या राज्याची लवकर समाप्ति झाल्यानें, जें मोठें संकट टळलें, त्याची कल्पना करणेंही कठिण आहे.

ही सार्वभौम राज्य स्थापण्याची पद्धत इंग्लंडचे बाहेर युरोपांत फारशी प्रसृत झाली नव्हती. तरीपण ती कालगतीनें दूर अमेरिकेकडे पसरत गेली व तेथें तिचे परिणाम जास्त कालपर्यंत टिकले. अमेरिकेच्या संबंधानें क्राम्वेलची पद्धत त्याच्या पूर्वीच्या लॉंग पार्लमेंटानें† घालून

---

* आलिव्हर क्रामवेल यानें ज्या शिपायांस बरोबर घेऊन राजपक्षीय लोकांचा पराभव केला, ते फार शूर असून त्यांस "आयर्न साइड्स्" ह्मणजे लोखंडी देहाचे असें नांव असे.

† टीप.—† पान १०१ पहा.

दिलेली असून दुसऱ्या चार्लसनें जशी पुढें चालू ठेविली, तशीच ती होती. ती केवळ जबरदस्तीची व थोडीशी धाडसाची होती. स्वतःच्याच इच्छेनें, लोकांची बिलकुल संमति न घेतां, व स्वतःचे मंत्री विरुद्ध असतां, त्यानें स्पेनबरोबर इंग्लंडचें युद्ध चालू केलें. हें युद्ध पूर्वीच्या एलिझाबेथ राणीच्या वेळच्या चांचे योध्यांनीं केलेल्या युद्धासारखें होतें. कारण, सुरुवातीच्यापूर्वीं कांहीं एक कलह नव्हता. उघडपणें लढाई चालू करण्याची समजही एकमेकांस एकमेकांकडून मिळाली नव्हती. सेंट डामिंगो* नांवाच्या वसाहतीवर एकदम हल्ला इंग्रजांनीं केला, हीच लढाईची सुरुवात होय. सर जे. स्टीफन ह्मणून एक गृहस्थ माझे मागें माझे जागीं काम पाहात होता. तो ह्या ठिकाणीं बोलत असतां असें ह्मणाला कीं, "आमचे श्रोत्यांपैकीं कोणा एखाद्याची इच्छा जर लोकांनीं पूज्य मानलेल्या मूर्ति फोडून त्यांचा विध्वंस करण्याची असेल, तर ती इच्छा त्यानें चांचे-पणाचा धंदा केलेला जो क्राम्वेल त्याच्या पुतळ्यावर चालवून तृप्त करून घ्यावी." इतका तो वक्ता क्राम्वेल यास दुष्ट समजत होता. ही टीका फार कडक आहे. कारण, क्राम्वेलच्या वेळीं समुद्रावरील युद्ध चाल-विण्यांत केवळ बेदाद होती. न्यायीपणा त्यांत मुळींच नव्हता. येथें इत-केंच लक्षांत ठेवावयाचें कीं, एलिझाबेथ राणीची जी पद्धत होती तीच पद्धत क्राम्वेलनें पुढें चालू ठेविली, तीच पद्धत पुढें अठराव्या शतकामध्येंही चालू राहिली, कारण स्पॅनिश लोकांनींच सर्व व्यापार बळकाविला होता, तो हिरावून घेण्याकरितां सन १७३९ या वर्षीं पुन्हां इंग्रज लोकांनीं स्पेनबरोबर युद्ध

* सेंट डामिंगो—ह्याची हेटी अथवा हिस्पानोला अशीं आणखी नांवें आहेत. हें वेस्ट इंडिज बेटांतलें एक मोठें बेट आहे. ह्याच्या उत्तरेस आट्लांटिक व दक्षिणेस आरिबियन समुद्र आहेत. हें बेट क्रिस्टोफर कोलंबस ह्यानें १४९२ त शोधून काढलें. येथें लोकसत्ताक राज्य आहे. हवापाणी युरोपियन लोकांना मानत नाहीं.

सुरू केलें. या सर्व हकीकतीवरून व्यापार आणि युद्ध यांजमध्यें पूर्वापार किती निकट संबंध होता, हें सहज समजणारें आहे. तथापि क्राम्वेलच्या वेळची, ह्मणजे बहुतेक सतराव्या शतकाच्या मध्यभागाची, विशेष गोष्ट ह्मटली तर स्पेनशीं युद्ध चालू होतें, ही नव्हे, तर तें हालंडबरोबर चालू होतें, ही होय. क्राम्वेल यानें जें स्पेन देशाशीं जोराचें युद्ध चालविलें, त्यावरून तें केवळ व्यापाराच्या सोयीकरितांच होतें, असें जरी अगदीं स्पष्टपणें दिसणारें आहे, तरी क्राम्वेलचा उद्देश निराळा होता, असें ह्मणण्यास जागा आहे. सर्व स्पेन देश कॅथोलिक धर्माचा होता, ह्मणून स्पेनबरोबरची लढाई होण्यास दुसरेंच कारण, ह्मणजे धर्मसुधारणा, हेंच असेल, असें कित्येक लोक ह्मणूं शकतील; परंतु हालंडबरोबरच जें युद्ध त्या वेळीं झालें त्याजविषयीं असें ह्मणतांच येणार नाहीं. जर धर्मसुधारणा हेंच सर्व घडामोडींचें मुख्य कारण, सतराव्या शतकामध्यें प्रबल असतें, तर हालंड देश प्राटेस्टंट धर्माचा असल्यामुळें हालंडचें व इंग्लंडचें नेहमीं सख्यच असलें पाहिजे होतें. पहिलें कारण, उत्तरोत्तर कमी कमी होत जाऊन, दुसरें ह्मणजे व्यापाराची चढाओढ हें कारण प्रबल होत चाललें, याचें हीच वरील गोष्ट उत्कृष्ट उदाहरण आहे. सर्व सतराव्या शतकभर इंग्लंडच्या व हालंडच्या मोठमोठ्या निकराच्या लढाया समुद्रावर होत होत्या, याचें कारण व्यापार होय. या सर्व लढायांचा विचार एकदम एका नजरेखालीं होत नाहीं. प्रत्येक लढाई निरनिराळी अशी पाहूं गेलें ह्मणजे तिचें कांहीं तरी अन्य कारण देतां येतें. परंतु अशीं कारणें केवळ गौण असून प्रधान कारण व्यापारच आहे. उदाहरणार्थ, दुसरा चार्लस व त्याचे केवळ नांवाचे मंत्री यांणीं केलेली इ. स. १६७२ या वर्षींची लढाई पहा. या वेळीं इंग्लंडनें फ्रान्सचा राजा १४ वा लुई याची मदत घेतली होती. हा राजा पक्का कॅथोलिक धर्माचा होता,

या दोघांनीं मिळून प्राटेस्टंट धर्मी हालंडबरोबर लढाई केली. या लढाई-विषयींही कित्येकांनीं निराळाच मजकूर लिहून ठेविला आहे. हालंडांत लुव्हेस्टिन नांवाचा बडे लोकांचा एक पक्ष होता. त्या पक्षाचा मोड करून दुसऱ्या चार्लस राजाचा भाचा प्रिन्स आफ् आरेंज (जो पुढें तिसरा वुइल्यम या नांवानें इंग्लंडचा राजा झाला) यास हालंडचा राजा करण्याकरितां ही लढाई चार्लस राजानें चालविली, असें कित्येकांनीं लिहिलें आहे. त्यांत क्याथोलिक धर्मी राजा फ्रान्सचा चौदावा लुई याची त्यानें मदत घेतली होती. या लढाईचें खरें बीज पूर्णपणें न समजल्यामुळें क्याथोलिक धर्मी राजाची मदत घेऊन इंग्लंडानें प्राटेस्टंट धर्मी राष्ट्रावर शस्त्र धरल्याबद्दल त्या वेळच्या राजनीतीस कित्येक ग्रंथकारांनीं अन्यायीपणाचा व निष्काळजीपणाचा मोठा दोष दिला आहे. भाचास गादीवर बसविण्याचा चार्लस राजाचा हा हेतु होता खरा; तरी आमच्या प्रस्तुतच्या विचारसरणीशीं वरील वृत्तांत जुळत नाहीं. या सर्व कृत्यांचा उलगडा सुरेख रीतीचा निराळे रीतीनें होतो. फ्रान्सबरोबर स्नेह असण्याचें कारण काय, व हालंडबरोबर लढाई होण्याचें कारण काय, याचें उत्तर निराळेंच आहे. क्राम्वेलच्या वेळीं हालंडबरोबर लढाई सुरू झाली होती व क्राम्वेलनें फ्रान्सबरोबर सख्य ठेविलें होतें; तेव्हां आपल्या पूर्वींची पद्धत एकदम न बदलतां तीच पुढें चालू ठेवणें चार्लस राजास बरें वाटलें. तसेंच क्राम्वेल यानें घालून दिलेली पद्धत ज्यांस संमत आहे असे कित्येक मुत्सद्दी त्या वेळीं हयात होते. त्यांनींही वरप्रमाणें करण्यास अनुमोदन दिलें. आंथनी आश्ले कूपर* म्हणून क्राम्वेलची व्यवस्था पसंत करणारा एक गृहस्थ होता, त्यानें चार्लस राजाच्या कृ-

* हा शाफ्टस्बरी या नांवानें प्रसिद्ध होता. याचा काल १६२१–१६८३. हा पार्लमेंटाचा सभासद असून मोठा मुत्सद्दी होता.

त्यांस पूर्ण संमति दिली. पूर्वींचेच शब्द त्यानें चार्लसच्या वेळींही ह्मणून दाखविले ते असेः—" महासागरावर तसेंच अमेरिकेमध्यें व्यापाराचे कामांत हालंडचें राष्ट्र आमचा शत्रू आहे. जरी ते प्राटेस्टंट धर्मी आहेत, तरी त्यांचा मोड आपण केला पाहिजे. क्याथोलिक राष्ट्राची ही मदत घेऊन हालंडचा पराभव करणें योग्य आहे." हे शब्द क्राम्वेल यास किंत्याप्रमाणें होते. कारण जरी त्या वेळचें राजकरण मंडळ प्रोटेस्टंट धर्माचें ह्मणजे प्यूरिटन शाखेचें होतें, व पोपचें व त्यांचें फारच वैमनस्य होतें, तरी त्यांस असें समजलें होतें कीं, धर्मसुधारणेचा प्रश्न दिवसेंदिवस मागें पडत चालला आहे. पश्चिमेकडील समुद्रकांठच्या राष्ट्रांची व्यापाराकरितां व नवीन राष्ट्रवृद्ध्यर्थ फारच चढाओढ चालली आहे, अशा प्रकारचे त्यांचे ग्रह होते.

याप्रमाणें विस्तृत ब्रिटिश राज्याच्या इतिहासांतली उणीव भरून काढावयाची आहे. एलिझाबेथ राणीच्या वेळीं आरंभीं चळवळ कशी सुरू झाली, हें आह्मीं वर सांगितलें आहे. व्हार्जिनीया, न्यू इंग्लंड, मेरीलंड वगैरे वसाहतींची स्थापना पहिल्या दोन स्टुअर्ट राजांच्या वेळीं होऊन एलिझाबेथचीच पद्धत पुढें चालू राहिली. नंतर १८ व्या शतकामध्यें ही व्यवस्था चांगली बळकट होऊन फ्रान्सच्या विस्तृत राष्ट्राबरोबर इंग्लंडची लढाई सुरू झाली. परंतु यांच्या दरम्यानची हकीगत बाहेर आलेली नाहीं. इंग्लंडच्या आरमाराची स्थायिकता व हालंडबरोबर लढाई हीच मधली हकीगत होय. ह्या गोष्टी सतराव्या शतकाच्या मधल्या भागांत घडल्या. याच लढाईमध्यें इंग्रजांनीं आरंभीं समुद्रांवर मारलेल्या लढायांचा समावेश होतो. तसेंच खालील ठिकाणेंही याच लढाईचे वेळीं इंग्रजांचे ताब्यांत आलीं. क्राम्वेलच्या वेळीं जमेका बेट स्पेनक

डून जिंकून घेण्यांत आलें. पोर्चुगल लोकांकडून मुंबई बेट दुसऱ्या चार्लस राजास मिळालें, व हालंडकडून न्यूयार्क* त्याच राजास प्राप्त झालें.

हालंडबरोबरची ही लढाई आटपल्यावर पुढें त्या देशाबरोबर इंग्लंडचें सख्य दृढ राहिलें. वुइल्यम् आफ् आरेंज ह्मणजे तिसऱ्या वुइल्यम राजाचे हकीगतीवरून हें व्यक्त होत आहे. आह्मांस असें वाटतें कीं, या वेळीं धर्मसंबंधीं प्रश्न पुन्हां थोडा वेळ पुढें आला. नांट्स्† येथें ठरलेला करारनामा मोडला गेल्यामुळें सर्व युरोपभर पुन्हां सोळाव्या शतका

---

* अमेरिकेमध्यें युनायटेड् स्टेट्सपैकीं एक संस्थान असून तें हल्लीं फार भरभराटीस आलेले आहे.

† नांट्स् येथील करारनामाः—सोळाव्या शतकांत युरोप खंडांत ख्रिस्ती धर्म सुधारणा होऊं लागली. प्रोटेस्टंट ह्मणून एक सुधारलेला पंथ क्याथोलिक धर्मापासून निराळा निघाला. नंतर युरोपांतील राष्ट्रांत पुष्कळ चळवळ होऊन कमीजास्त प्रमाणानें नवीन सुधारलेला पंथ कित्येक राष्ट्रें स्वीकारूं लागलीं. या प्रकरणांत लोकांचें धर्मतत्व पुष्कळ अंशीं त्यांच्या राजावर अवलंबून असे. फ्रान्स देशांत यासंबंधानें पुष्कळ दंगे चालू होते. फ्रान्सांतील प्राटेस्टंट धर्मी लोकांस ह्यूजेनॉट असें नांव आहे. फ्रान्सचा राजा चवथा हेन्री यानें प्राटेस्टंट धर्म स्वीकारला, व सर्व देशभर तो धर्मप्रसार करूं लागला. त्यावेळीं प्राटेस्टंट धर्मी लोकांचा फार छळ होत असे, ह्मणून या राजानें इ. स. १५९८ या सालीं ब्रिटनी प्रांतांतील नान्टस् नामक शहरीं प्राटेस्टंट धर्मी लोकांस एक ठराव करून दिला, त्यास 'एडिक्ट आफ् नांट्स्' असें नांव आहे. त्यांत असें ठरलें होतें कीं, कोणत्याही धर्मसंबंधीं मतांबद्दल लोकांचा छळ होऊं नये, कांहीं ठिकाणें खेरीज करून बाकीच्या पाहिजे त्या ठिकाणीं लोकांनीं आपआपल्या मतांप्रमाणें ईश्वराची प्रार्थना करावी, मुलकी व न्यायखात्यांत प्राटेस्टंट धर्मी लोकांस नोकरी मिळण्यास प्रत्यवाय असूं नये. तसेंच पार्लमेंट सभेंतही यांची एक शाखा असावी. परंतु याचे पुढचे सर्व राजे एकच मताचे नव्हते. चवदावा लुई हा कट्टा क्याथोलिक धर्माचा होता. ह्मणून तो प्राटेस्टंट लोकांचा छळ नेहमीं करीत असे. परंतु वरील ठराव त्यास पुष्कळ वेळां नडत असे. ह्मणून इ. स. १६८५ या वर्षीं त्यानें प्रसिद्धपणें दुसरा ठराव करून, पहिला ठराव रद्द केला व असें ठरविलें कीं, नवीन सर्व देवळें मोडून टाकावीं, धर्मसंबंधीं कोणीं सभा वगैरे भरविल्यास त्यास कैद करावें, व त्यांची जिनगी जप्त करावी. धर्मखात्यांत जे प्राटेस्टंट धर्म सोडून क्याथोलिक होणार नाहींत, त्यांस पंधरा दिवसांचे आंत राज्यांतून हाकून द्यावें, व

प्रमाणें धर्मयुद्धें चालू झालीं. अमेरिकेचें महत्व कांहीं वेळ कमी झाल्यासारखें होतें. धर्मसंबंधीं स्वतंत्रता आणि क्याथोलिक धर्म यांजविषयीं फिरून प्रश्न सुरू झाला. हा प्रश्न सुरू होतांच क्याथोलिक धर्मी फ्रान्सचे विरुद्ध, हालंड व इंग्लंड हीं प्राटेस्टंट धर्मी राष्ट्रें एक झालीं. या दोन्ही देशांवर एकच राजा वुइल्यम हा राज्य करीत होता. व्यापारसंबंधीचा प्रश्न थोडा वेळ मागें पडला.

जे आपला धर्म बदलतील त्यांस बक्षिसें वगैरे द्यावीं. अशा प्रकारें क्याथोलिक धर्माची पुनः प्रवृत्ति फ्रान्स देशांत जाहली व प्रोटेस्टंट धर्माचा त्राता कोणी नाहींसा झाला. अर्थात्‌च धर्मयुद्धें पुनः माजलीं व इंग्लंड आणि हालंड या दोन प्रोटेस्टंट धर्मी राष्ट्रांनीं एक होऊन फ्रान्सबरोबर लढाई चालविली.'

प्रकरण सातवें.

राष्ट्रविस्ताराचीं स्थित्यंतरें.

हें पुस्तक लिहिण्याचा आमचा हेतु काय आहे, हें पुस्तकारंभीं सांगण्यांत आलेंच आहे. इंग्लंडच्या इतिहासाचें महत्व उत्तरोत्तर कमी होत जातें, असा जो समज आहे, तो चुकीचा असून, तें महत्व शेवटपर्यंत सारखें वाढतच जावें, अशा प्रकारची माहिती सांगण्याचा आमचा इरादा आहे. हा हेतु कसा सिद्धीस नेतां येईल, हें इतक्या वेळच्या विवेचनावरून वाचकांस कळणारें आहे. कोणत्याही देशांत एखाद्या विषयाची पूर्णावस्था होत गेली नसेल, तर त्या देशाचा इतिहास फारसा महत्वाचा वाटणार नाहीं. राजकीय व्यवस्था कितीही चांगली भरभराटीची असली, तरी त्यांत दिवसेंदिवस कांहींतरी सुधारणा होत नसेल, तर त्या देशाच्या इतिहासांत महत्व असूं शकणार नाहीं. आह्मांस असें वाटतें कीं, इंग्लिश इतिहासकारांची चुकी केवळ अलीकडचा इतिहास लिहिण्यांत झाली आहे. एकच विषय घेऊन त्याची वृद्धि शेवटपर्यंत कशी होत गेली, हें त्यांनीं लिहिलें आहे. परंतु त्याच्यापुढें दुसऱ्याही एका विषयाची वृद्धि होत गेली, हें इतिहासकारांस न समजल्यामुळें त्यांस महत्वाचे असे कांहींच विषय लिहिण्यास सांपडत नाहींत. राजकीय कारभारांत प्रजाजनांस उत्तरोत्तर जास्त मुखत्यारी व स्वतंत्रता कशी मिळत गेली, हीच एक गोष्ट इतिहासकारांच्या मनापुढें नेहमीं असते. इ. स. १६८८ मध्यें जी राज्यक्रांति झाली तेथपर्यंत किंवा कदाचित् ब्रन्स्विक घराण्याकडे इंग्लंडचें राज्यपद गेलें तेथपर्यंत, ह्मणजे सुमारें इ. स. १७१४ पर्यंत, हें त्यांचें विवेचन बरोबर आहे, असें ह्मणतां येईल.

परंतु त्याच्यापुढें मात्र त्यांची चुकी झालेली आहे. इंग्लिश राज्यकार-स्थानांची सर्व प्रकारची वृद्धि तेथेंच खुंटली, असें नाहीं; किंवा या विषयाचें अध्ययन करणारास तिचें महत्वही कमी झालें, असें नाहीं. परंतु हें कारस्थान पुढें मंदगतिक होऊन शांतपणें चालूं लागलें. पूर्वी लोकांचीं मनें खवळून तटस्थ झालीं होतीं, तीं आतां जरा शांत होऊं लागलीं. यापुढें नाटकाचें स्थल बदलून गेलें, व मुख्य गोष्टी दुसरीकडेच घडूं लागल्या. इंग्लिश इतिहासकारांच्या लक्षांत ही गोष्ट फारशी राहत नाहीं. स्टुअर्ट वंशांतले राजे राजाचा हक्क ह्मणून अथवा लष्करी जुलमानें ज्या गोष्टी करीत असत, त्याच गोष्टी तिसरा जार्ज यानें आपल्या बादशाही अंमलानें लोकांस फसवून केल्या, ही गोष्ट खरी असेल; परंतु प्रिन* आणि मिल्टन,† पिम‡ आणि शाफ्ट्सबरी,§ ह्यानीं जशीं पूर्वी कृत्यें केलीं,

---

* प्रिन्–इंग्लंडच्या पहिल्या चार्लस राजाच्या विरुद्ध ज्या लोकांनीं बंड केलें त्यांपैकीं हा एक होता. तो वकिलीचा धंदा करीत असे. त्यानें एक पुस्तक प्रसिद्ध केलें, त्यांत त्यानें राणीची निर्भत्सना केली होती. याबद्दल त्यास शिक्षा झाली.

† जान मिल्टन नामक एक इंग्लंडमध्यें कवि होऊन गेला. त्याचा जन्म लंडनमध्यें १६०८ त झाला, व त्याचा मृत्यु १६७४ मध्यें झाला. त्याचें कवित्व सुप्रसिद्ध आहे. त्यानें पाराडाइज लास्ट व रीगेन्ड ह्या नांवाचीं उत्तम दोन काव्यें लिहिलीं आहेत. बारीक सारीक कवनें व गद्येंही त्यानें पुष्कळ लिहिलीं आहेत. तो प्रजासत्ताक राज्याचा भक्त असून एकराजसत्तेविरुद्ध पुष्कळ लेख त्यानें लिहिलेले आहेत. तो लेखनस्वातंत्र्याची फार कळकळ बाळगीत असे. पहिल्या चार्लस राजाला मारल्यावर जी " कॉमन्वेल्थ " ह्मणून सामान्यसत्ता क्राम्वेलनें स्थापिली, त्यामध्यें अमलबजावणीकरितां एक कौंसिल नेमण्यांत आलें होतें, त्याचा तो लाटिन सेक्रेटरी होता. दुसऱ्या चार्लसला परत आणून पुनः राज्यस्थापनेची वाटाघाट सुरू झाली, तेव्हां त्या विचाराला तो प्रतिकूल होता. ह्याचें प्रायश्चित्त त्यास दुसरा चार्लस गादीवर आल्यावर माफी मागण्याच्या रूपानें घ्यावें लागलें.

‡ पिम हाही पहिल्या चार्लस राजाच्या विरुद्ध उठलेल्या लोकांपैकीं एक असून, राजाचा मंत्री स्ट्राफर्ड याजवर खटला करण्यांत हा प्रमुख होता. इ. स. १६४२ या वर्षी पार्लमेंटाचे जे पांच सभासद पकडण्याविषयीं राजानें खटपट केली, त्यांपैकीं हा एक होता.

§ शाफ्ट्सबरी (आंथोनी आश्ले कूपर) (१६२१-१६८३) त्याचें सार्व-

तशींच कृत्यें पुढें विल्कस् आणि हार्नटुक, चाथाम आणि फॉक्स यांनीं केलीं, असें जेव्हां इतिहासकार लिहित जातात, तेव्हांच तो इतिहास कंटाळवाणा वाटूं लागतो; कारण, असा इतिहास वाचतांना सहज असें वाटूं लागतें कीं, अलीकडच्या काळाचा इतिहास ह्मणजे पूर्वी एकवार घडलेल्या गोष्टींची पुनरावृत्ति होय. पार्लमेंटांतील तंटे सतराव्या शतकांत फार प्रखर होते. परंतु तशाच प्रकारचे तंटे जेव्हां अठराव्या शतकांत झाले असल्याचें इतिहासकार लिहितात, तेव्हां या सर्व गोष्टी पूर्वकृतच ह्मणजे पूर्वी एकवार घडून आलेल्या आहेत असें वाटूं लागतें.

आमच्या मतें यांत चुकी इतकीच आहे कीं, रंगभूमीवर जे विषय दाखवावयाचे, त्यांची योजना इतिहासकार चतुराईनें करीत नाहींत. कांहींशा अप्रबुद्ध राजानें केलेल्या अतिक्रमांचा प्रतिकार करण्यांतच त्या राजाची (तिसरा जार्ज) सर्व कारकीर्द संपून गेली, असें त्या कारकीर्दीचें वर्णन करणें ह्मणजे निव्वळ खोटा मजकूर लिहिणें होय. या क्षुल्लक गोष्टीस आह्मी विनाकारण फाजील महत्व देतों. खरोखर पाहिलें तर या वेळचा इंग्लंडचा सर्व काळ दुसरीं मोठमोठीं जोखिमाचीं कृत्यें करण्यांत व्यापून गेला होता. ज्या गोष्टी पूर्वी वेळोवेळीं केल्या, त्याच पुनरपि करण्यांत सर्व वेळ गेला, असें ह्मणणें मिथ्या होय. मोठमोठ्या नवीनही गोष्टी पुष्कळ घडत होत्या, व याच अवाढव्य कृत्यांचे योगानें सर्व

जनिक चरित्र १६४० पासून सुरू झालें. तो १६४३ पर्यंत राजपक्षाकडे होता. पुढें तो क्रामवेलच्या पक्षाला मिळाला. क्रामवेलच्या नंतर तो आणि सेनापति मंक मिळून दुसऱ्या चार्लसला गादीवर आणण्याच्या कामांत होते. पुढें तो बऱ्याच पदवीस चढला. १६७३ मध्यें त्याला अधिकारावरून दूर केलें. टैटस ओट्स्च्या गुप्त बेताच्या धामधुमीचा प्रारंभ ह्यानेंच केला, असें कित्येक इतिहासकारांचें ह्मणणें आहे. दुसऱ्या जेम्सला गादीवर आणूं नये असा त्याचा अभिप्राय होता. त्याबद्दल त्यास प्रायश्चित्त भोगावें लागलें. दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दीत तो कांहीं दिवस पंतप्रधान होता.

जगाच्या राहटींत पुष्कळ फेरबदल झाले आहेत, व अजूनही होत आहेत. नवीन स्थळास सुरुवात करून निराळीं पात्रें रंगभूमीवर आणणें, हेंच इतिहासकारांचें काम आहे; तेंच तेंच पुनःपुनः दाखविण्यांत शहाणपण नाहीं.

इंग्रजी इतिहासांत कोणती गोष्ट परिपक्वतेस येत चालली होती, ती आम्हीं इतका वेळ चांगली व्यक्त केली. मागें असें सांगण्यांत आलें आहे कीं, सतराव्या शतकामध्यें इंग्लंड देशांत पुरातन ट्युटॉनिक लोकांच्या स्वातंत्र्याचा व आधुनिक राजकीय फेरफारांचा मिलाफ होत असतां व लोक लष्करी धंदा आनंदानें पतकरून विजातीय धर्मपंथांचा उद्भव व समावेश करीत असतां, त्याच वेळीं बाहेर दुसरीकडे इंग्लंडचे इतर व्यवसाय चालू होते. इंग्लंड व दुसरीं चार युरोपीय राष्ट्रें मिळून अमेरिकेमध्यें आपापले राष्ट्राचा विस्तार करीत होतीं. आणखी असेंही वर सांगण्यांत आलें आहे कीं, इतर चार राष्ट्रांपेक्षां इंग्लंडचें काम बरेंच मागाहून सुरू झालें असून, आरंभीं पुष्कळ वेळपर्यंत ह्मणण्यासारखी त्यांनीं त्या कामांत प्रवीणता प्रगट केली नाहीं. तरी सरते शेवटीं इतर सर्व राष्ट्रांस इंग्लंडनेंच मागें टाकिलें. आज रोजीं अमेरिकेंत अतिविस्तृत प्रबळ राज्य असें इंग्रजांचेंच आहे. अठराव्या शतकांत जेव्हां प्रजेच्या हक्कांचे सर्व तंटे मिटत आले, तेव्हांच अमेरिकेमध्यें इंग्लंडास पुढारीपणा प्राप्त झाला. आणि आज १९ व्या शतकांत आपल्या ताब्यांतल्या सर्व मुलुखांची कोणत्या प्रकारची व्यवस्था ठेवावी, अशा प्रकारचे विचार इंग्रज लोक करीत आहेत. यावरून उघड होतें कीं, जी गोष्ट इतर ग्रंथकारांचे लक्षांत न आल्यानें इंग्लंडच्या इतिहासास नीरसत्व प्राप्त झालें होतें, ती गोष्ट आह्मांस कळली आहे. राजकीय प्रकरणांतील स्वतंत्रता हा विषय पूर्णतेस येऊन संपून जातांच इतिहासकारांनीं या आह्मी ह्मणत

असलेल्या दुसऱ्या गोष्टींकडे आपलें सर्व लक्ष दिलें पाहिजे. कारण, सतराव्या शतकापासून या गोष्टीचें महत्व सारखें वाढत असून ती पूर्णावस्थेस येत चालली आहे. याच गोष्टीच्या योगानें गतकाल व भावि काल एकत्र बांधले जातात.

जसजसा इंग्लंडचा विस्तार हळू हळू वाढत जातो, तसतशी इंग्लंडच्या इतिहासांत नीरसता भासूं लागते, ही मोठी आश्चर्याची गोष्ट होय. जी गोष्ट इतिहासकारांनीं ध्यानांत घेतली नाहीं असें आह्मी ह्मणतों, ती ध्यानांत घेतली असतां या नीरसतेचें निरसन होईल. परंतु असें करितांना इतिहास लिहिण्याची पद्धत आह्मांस बरीच बदलावी लागेल, कारण निरनिराळ्या ऐतिहासिक गोष्टींचें महत्व ताडण्याचें प्रमाण आह्मांस निराळेंच योजावें लागून त्यांचें वर्गीकरणही निराळ्याच तत्वावर करावें लागेल. वसाहतींसंबंधीं हकीकती व हिंदुस्थानसंबंधीं हकीकती यांस इतिहासकारांनीं अगदीं कोपऱ्यांत झुगारून दिलें आहे. केवळ पुरवणी भागांत या हकीकतीस त्यांनीं जागा दिलेली आहे. ज्या गोष्टी इंग्लंडपासून दूर अंतरावर घडून आल्या, त्यांस इंग्लंडच्या इतिहासांत मुख्य स्थळ मिळावयाचें नाहीं, असें त्यांनीं गृहीत घेतलेलें दिसतें. जणूं काय ज्या इंग्लंड देशाचे इतिहास लिहिले गेले आहेत, तो इंग्लंड देश केवळ लहानसें बेट आहे व पुष्कळ प्रदेशांचा राजकारणांच्या योगानें समावेश झालेलें विस्तृत साम्राज्य नव्हे; व जणूं काय अर्धी पृथ्वी या इंग्लंड देशांत मोडेल इतका त्या देशाचा विस्तार होऊंच शकणार नाहीं. आमच्या मतें इंग्लंड या शब्दाचा अर्थ ज्या ज्या ठिकाणीं इंग्रज लोक रहात आहेत, तें तें ठिकाण, असा आहे. इंग्लिश लोकांस महत्वाच्या गोष्टी पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही घडल्या, तरी त्यांस इंग्लंडचे इतिहासांत जागा मिळणें अवश्य आहे.' राजकीय प्रकरणांत इंग्रज लोकांच्या हक्कांस

धक्का पोंचण्याचा पक्का संभव होता. त्या वेळचा इतिहास कळण्याकरितां ज्याप्रमाणें वेस्ट मिन्स्टर येथील पार्लमेंटांतील वादविवाद आपण पाहतों, त्याचप्रमाणें ह्या अलीकडच्या काळांत, विशेषतः इंग्लंड देशाचा हळू हळू विस्तार होऊन सार्वभौम राज्य स्थापन होत होतें ह्मणून, ज्या ज्या ठिकाणीं हा विस्तार होत होता, त्या त्या ठिकाणीं आह्मीं या काळाचा इतिहास शोधीत गेलें पाहिजे; मग तें ठिकाण अमेरिकेंतील कानडा अगर एशियांतील हिंदुस्थान वगैरे कितीही दूर असलें तरी चिंता नाहीं. असें केलें असतां अलीकडचा इंग्लंडचा इतिहास जो चुकीनें पार्लमेंटाच्या इतिहासाशीं गुंतून गेला आहे, तो दुरुस्त होईल. ही व्यवस्था इतिहासांत करण्याकरितां जे फेरफार आह्मांस करावे लागतील ते विशेषेंकरून अठराव्या व एकोणिसाव्या शतकाच्या इतिहासांत करावे लागतील, व सतराव्या शतकांतसुद्धां ऐतिहासिक विषयांची ह्मणजे स्टुअर्ट घराण्यांतील राजांबरोबर लोकांची स्वतंत्रतेकरितां झालेलीं भांडणें वगैरेंची व्यवस्था बदलण्याचें आह्मांस जरी प्रयोजन नाहीं, तरी त्या वेळीं दुसरीही एक व्यवस्था आह्मीं ध्यानांत ठेविली पाहिजे, ह्मणजे इंग्रज लोकांचें पाऊल राज्यवृद्धीकडे उत्तरोत्तर जास्त पडत चाललें होतें, हें तत्व आपण विसरतां नये.

हल्लीं सर्वत्र संमत असणारी इतिहासाची व्यवस्था अशी आहे कीं, प्रथम प्रत्येक कारकीर्द व घराणीं निरनिराळीं ध्यावयाचीं व त्या कारकीर्दींत पार्लमेंट आणि राजा यांजमध्यें जे तंटे झाले असतील तेच मुख्य समजून त्यांचा इतिहास लिहावयाचा. या व्यवस्थेप्रमाणें अलीकडच्या इतिहासांत मर्यादभूत मुख्य टप्पा ह्मटला ह्मणजे ब्रन्स्वीक घराण्यांतील पुरुषांकडे राज्यपद जाणें, व त्याच्या पूर्वीचा मुख्य टप्पा ह्मणजे स्टुअर्ट घराण्याकडे राज्यपद जाणें हा होय. या दोन मुख्य गोष्टींच्या दरम्यान

दुसऱ्या दोन गोष्टी बऱ्याच महत्वाच्या समजल्या जातात. एक, कांहीं दिवसपर्यंत चाललेलें प्रजासत्तात्मक राज्य जें एकसत्ताधीश राजाच्या ताब्यांत नव्हतें; दुसरी, १६८८ या वर्षाची राज्यक्रान्ति. या चार मुख्य गोष्टींपासून इतर महत्वाच्या गोष्टींस अडथळा येत नसूनही इतिहासकार त्याच मुख्य धरून चालतात. पहिला जार्ज व ॲन राणी; दुसरा चार्लस आणि तिसरा विल्यम्; क्राम्वेलच्या वेळचें प्रजासत्ताक राज्य व राजाची पुनःस्थापना;* पहिला जेम्स आणि एलिझाबेथ; या द्वयांपैकीं प्रत्येकाच्या कालांत, वास्तविक आहे त्यापेक्षां जास्त भेद इतिहासकार मानतात. राज्यक्रान्तीच्या योगानें लोक समजतात इतकें राज्यक्रमण झालेलें नाहीं, किंवा दुसऱ्या चार्लस राजाला गादीवर आणल्यापासून इंग्लंडची राज्यपद्धति लोकांस वाटते इतकी मूळ पदावर आलेली नाहीं. परंतु इंग्लंड ह्मणजे जिवंत शरीर असून, तें एलिझाबेथच्या वेळेपासून अव्याहत वृद्धि पावत सार्वभौम इंग्लिश राज्य बनत आहे, असें एकदां आपण स्पष्ट समजलों, ह्मणजे वरील जे विभाग इतिहासकारांनीं केले आहेत, ते आमच्या मुळींच उपयोगास येणारे नाहींत व ह्या विस्ताराचीं वेळोवेळचीं स्थित्यंतरें नीट ध्यानांत येण्याकरितां आह्मांस दुसरेच भाग पाडण्याची जरूर लागेल.

यांपैकीं मुख्य मुख्य विभाग आह्मीं पूर्वी दाखविलेच आहेत. तरी आह्मी ह्मणतों या रीतीस अनुसरून इंग्लंडचा अलीकडचा इतिहास जास्त सुसंबद्ध करून दिल्यास बरें होईल, असें आह्मांस वाटतें.

---

* ह्यास ' रेस्टोरेशन ' असें नांव आहे. इ. स. १६६० या वर्षी क्राम्वेलनें घालून दिलेल्या राजपद्धतीचा लय होऊन लोकांनीं पहिल्या चार्लस राजाचा मुलगा दुसरा चार्लस यास बाहेरून बोलावून आणिलें व त्यास इंग्लंडचे राज्यपद दिलें.

कोलम्बस* आणि वास्कोडिगामा† यांणीं सातव्या हेन्री राजाच्या कारकीर्दींत ज्या दोन मोठ्या सतत ध्यानांत ठेवण्याजोग्या अशा महासागरांतून सफरी केल्या, त्यांजपासूनच इंग्लंडच्या विस्ताराच्या इतिहासास सुरुवात झाली. त्या वेळेपासून इतर देशांशीं होणाऱ्या इंग्लंडच्या व्यवहारांत फेर पडूं लागला. हा फेरफार स्पष्टपणें दिसूं लागण्यास सुमारें एक शतकाचा काल गेला. आमच्या व्यवस्थेप्रमाणें हें एक शतक ह्मणजे, पहिला एक भाग झाला. या काळांत इंग्लंडचें विशिष्ट स्वरूप असें होतें कीं, समुद्रावर इंग्लंडचा व्यवहार हळू हळू सुरू झाला. अनेकविषयसंकुल अशा या शंभर वर्षांत इंग्लंडांत ज्या राजकीय, धर्मसंबंधीं आणि सामाजिक घडामोडी झाल्या, त्या आतां आह्मी तशाच राहूं देतों. धर्मसुधारणा आणि तिचे परिणाम इकडे आतां आह्मी लक्ष देत नाहीं. अमेरिकेचा शोध लागल्यापासून त्या ठिकाणीं स्पॅनिश आणि पोर्चुगीज लोकांच्या ज्या वसाहती होत होत्या, त्यांत आपणांसही वांटा असावा असा हक्क सांगावयास इंग्रज लोक हळू हळू कंबर बाधूं लागले. न्यू फाउंडलंड‡ आणि लाब्रडोर§ वगैरे ठिकाणीं कित्येक सफरी इंग्रज लोकांनीं केल्यानंतर धिटाईनें कांहीं जोखमी कृत्यांसही त्यांनीं हात घातला. परंतु ही गोष्ट त्यांनीं नीट विचारपूर्वक केली नसल्यानें त्यांस यश आलें नाहीं. दुर्दैवेंकरून इंग्रज लोक थेट ध्रुवांच्या बाजूस नवीन प्रदेश शोधण्याचा प्रयत्न करूं लागले व त्याच वेळीं त्यांचे प्रतिपक्षी भूमध्यवृत्ताच्या समोर एकामागून दुसरें बेट असे वरचेवर शोध लावून यश मिळवीत चालले

* टीप.—† पान ९६ पहा.

† टीप.—* पान ९६ पहा.

‡ हें उत्तर अमेरिकेच्या किनाऱ्यावर एक मोठें बेट आहे.

§ उत्तरअमेरिकेंतील कानडा प्रांताचे पूर्वेस एक द्वीपकल्प आहे.

होते. त्यानंतर इंग्रजांनीं यांचे लोकांप्रमाणें स्पॅनिश लोकांच्या वसाहतींवर थोडेबहुत हल्ले केले; व यांत दुसरा जरी कांहीं विशेष फायदा त्यांस झाला नाहीं, तरी त्यायोगानें ते धीट आणि दर्यावर्दी असे तरी निदान प्रसिद्धीस आले यांत संशय नाहीं.

सन १५८८ या वर्षी स्पेनच्या मोठ्या आरमाराचा ज्या वेळेस इंग्लंडावर हल्ला झाला,* त्या वेळीं हा इंग्रजांचा उमेदवारीचा काल समाप्त झाला. इंग्लिश राष्ट्रामध्यें होत असलेले अंतस्थ फेरफार बहुतेक संपत आले. यापुढें इंग्लंडची दृष्टि युरोपाकडे फारशी नसून ती अमेरिकेकडे व महासागराकडे वळली. इंग्रज लोक ह्या वेळेपासून दर्यावर्दी व उद्योगी झाले.

इतिहास लिहिण्याची जी इतिहासकारांची चालू पद्धत आह्मीं वर सांगितली, त्या पद्धतीप्रमाणें स्ट्युअर्ट घराण्याकडे राज्यपद जातांच† त्या देशास उतरती कळा लागली असें इतिहासकार ह्मणतात. ट्यूडर घराण्यांतील राजे निश्चयी असून दूर दृष्टीनें राज्य करीत असल्यानें लोकांस प्रिय होते. परंतु स्टुअर्ट राजे धर्मसंबंधांत हट्टी व अप्रबुद्ध असून आपल्यास राज्यपद ईश्वरीसूत्रानेंच मिळालें आहे, असें ह्मणत असत. आमच्या मतें स्टुअर्ट घराण्याकडे अंमल गेल्यापासून देशास उतरती कळा न लागतां उलट सर्व व्यवहारांत अव्याहत वृद्धिच चालू होती. मग जेम्स आणि चार्लस हे जात्या एलिझाबेथ राणीपेक्षां कितीही भिन्न असले, तरी त्यांत फारसा अर्थ नाहीं. विस्तृत ब्रिटिश राज्याचा पाया ह्याच वेळीं घातला गेला. जॉन स्मिथ,‡ पिल्ग्रिम फादर्स‡ आणि काल्व्हर्ट‡ यांनीं

---

* टीप.—† पान १५४ पहा.

† इ. स. १६०३.

‡ पिल्ग्रिम फादर्स—प्यूरिटन पंथी कडक व धर्मवेडे लोक होते. त्यांचा छळ

व्हर्जीनिया, न्यू इंग्लंड, मेरिलँड, ह्या वसाहती स्थापन केल्या.* ह्यांपैकीं

इंग्लंडांत फार झाला. तेव्हां ते देश सोडून गेले. इंग्लंडमधील स्थापित धर्माला जो विरुद्ध जाईल त्यास हद्दपार करण्यांत येईल, असा जेम्स राजानें ठराव केला होता, व तो छळही फार करी. तेव्हां त्यांना असें वाटूं लागलें होतें कीं, आपला धर्म पाळ-ण्याची कधींही सबड सांपडावयाची नाहीं. नॉटिंगहॅम शायरमधून एक लहानशी टोळी प्रथम हालंडांत गेली. आणि कांहीं वर्षें तेथें राहून ते १६२० त अमेरिकेंत गेले. ह्या लोकांना "पिल्पिमस् फादर्स्" हें नांव देण्यांत आलें. त्यांनीं मेरिलंड प्रांताची स्थापना केली.

जार्ज कलव्हर्ट हा अमेरिकेंतील मेरिलंड वसाहत स्थापणारांपैकीं एक होता.

जॉन स्मिथ (१५७९–१६३१) एक खलाशी होता. अमेरिकेंतील व्हर्जी-निया प्रांताला त्यानें तीन सफरी केल्या, व जेम्स टाऊन स्थापण्यांत मदत केली. ह्यानें दोन पुस्तकें लिहिलीं आहेत, एक "न्यू इंग्लंडचें वर्णन" दुसरें "क्याप्टन जान स्मिथचें अवलोकन व शोध."

* अमेरिकेंतील वसाहतींची उत्पत्तिः—ह्या तेरा वसाहतींचें मूळ, व कायदे व-गैरे अगदीं निरनिराळे होते. प्रथम, न्यू इंग्लंड प्रांत ह्मणून एक समूह आहे, ह्यांत कानेक्टिकट्, मासाच्यूसेट्स्, न्यूहाम्शायर व व्होड बेट ह्यांचा समावेश होतो. ह्याची मूळ स्थापना यात्रेकरू जे जुइट उपाध्याय त्यांनीं केली. त्या वसाहतींतील लोकांमध्यें मूळ संस्थापकांचें धर्मवेड राहिलें नव्हतें; पण स्वभावाची उग्रता कायम होती. त्यांची राजधानी बोस्टन बंदर होय. हें बंदर फार महत्वाचें व श्रीमंत होतें. त्या वसाहतीं-ची पूर्वेकडील हद्द हडसन नदी होती. त्यांच्या दक्षिणेस जो वसाहतींचा समूह होता तो प्रथम डच लोकांचा होता, व त्यास न्यू नेदर्लंड असें नांव होतें. इंग्लं-डचा राजा दुसरा चार्लस ह्याच्या कारकीर्दींत इंग्लंड व फ्रान्स ह्यांच्यामध्यें जेव्हां युद्ध सुरू झालें, तेव्हां ती वसाहत इंग्लंडच्या ताब्यांत आली, व चार्लसनें ती आ-पला भाऊ, जेम्स डयूक आफ् यार्क, ह्याजला दिली. त्या वसाहतींत न्यू आम्स्टेर्डॅम हे नांव ज्यास होतें त्यास न्यू यार्क नांव पडलें, व उत्तरेस फोर्ट ऑरेंजला आल्बनी नांव देण्यांत आलें. ह्या वसाहतीच्या बरोबरच हडसन व डेलेवेर ह्या नद्यांच्या दर-म्यानचा न्यू जर्सी प्रांत जेम्सला दिला होता. जेम्सनें तो लार्ड बर्कूले व सर जार्ज कार्टरेट ह्यांजला विकला. पुढें त्याच्या पश्चिमेचा भाग बर्कूलेनें क्वेकर नांवाच्या धर्म पंथी लोकांना दिला. सगळा प्रांत ॲन राणीच्या कारकीर्दींत राजाकडे गेला, तेव्हां त्यास जर्सी ह्याच नांवानें हाका मारीत, व त्यांत बहुतेक क्वेकर, प्रेस्बिटेरियन, आना-बाप्टिस्ट ह्या पंथांचे लोक राहत. क्वेकर लोक न्यू जर्सीच्या बाहेर पसरत गेले, ते आपला पुढारी वुइल्यम पेन ह्याच्या साह्यानें एका प्रांतांत स्थायिक झाले. त्याला पेनसिल्व्हे-

मेरिलँड हें नांव हेन्रिटा मराया* राणीच्या नांवावरून पडलेलें आहे; ह्मणून ही वसाहत कोणच्या वेळीं स्थापन झाली, हें नांवावरूनच उघड होतें.

नियां नांव देऊन त्यांतील राजधानीचें शहर पश्चिमेस असणारें फिलाडेल्फिया नामक झालें. ह्या समूहांतच मेरिलंड नामक दुसऱ्या एका प्रांताचा समावेश होत असे. त्याची गणना पेनसिल्व्हेनियांतच केली जात असे. ह्या दोन समुहांच्या दक्षिणेस तीन मोठ्या वसाहती होत्या. त्यांच्या स्थापनेसंबंधीं नक्की माहिती कांहीं लागत नाहीं. पोटोमॅकच्या दक्षिणेस व्हर्जीनिया नामक वसाहतीची स्थापना राले यानें प्रथम केली होती. ती वसाहत पहिल्या जेम्स राजानें कांहीं व्यापाऱ्यांना देऊन टाकली. त्या व्यापाऱ्यांनीं वाईट वर्तन केलें, व ते वसाहतींच्या लोकांशीं तंटेबखेडे करूं लागले, ह्मणून त्यांचे हक्क हिसकून घेतले, आणि १६२४ त ती वसाहत राजाच्या ताब्यांत गेली. ह्यांत मूळ इंग्लिश चर्चचे लोक व इंग्लिश कामांसाचे लोक राहूं लागले. ती वसाहत फार जुनी होती, ह्मणून तींत लोकसंख्या पुष्कळ होती, व तेथील मालकांचें कुल व शील हीं इंग्रज जमीनदार गृहस्थांच्या सारखींच होतीं; तेव्हां त्या लोकांना एकंदर वसाहतींतील लोकांस बडे लोक असें समजत असत. कारोलिनाच्या दोन वसाहती दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दींत बऱ्याच मालकांना मिळवून देण्यांत आल्या होत्या. पण इतर ठिकाणांप्रमाणें ह्याही ठिकाणीं मूळ मालकांचें लोकांशीं भांडण झालें, व त्यांनीं आपले हक्क सरकारास विकून टाकले. ह्या कारोलिनाच्या दक्षिणेस जार्जिया ह्मणून एक वसाहत होती. ती प्रथम जनरल ओगार्थोप ह्यानें, दिवाळें काढलेल्या, कर्जबाजारी लोकांना, व छळ झालेल्या जर्मन लोकांना रहाण्यास जागा असावी ह्मणून स्थापिली. ह्या गृहस्थाचें नांव प्रसिद्ध झालें, तें १७२८ त इंग्लिश तुरुंगांच्या स्थितीची प्रथम चौकशी केली ह्मणून झालें. उत्तर अमेरिकेमध्यें आतां इंग्लिश नाहींत अशा वसाहती फक्त स्पेनच्या होत्या. स्पेनच्या ताब्यांत प्रथम फ्लारिडा प्रांत होता, पण पुढें त्यांनीं तो फ्रान्सला देऊन फ्रान्सपासून लोसिनियाचा कांहीं भाग घेतला. ही फ्लारिडा वसाहत फ्रेंचांना पुढें इंग्लिशांस द्यावी लागली. १७६३ च्या पारिसच्या तहानंतर फ्रेंचांचें उत्तर अमेरिकेंतील वर्चस्व अगदीं नाहींसें झालें होतें.

ह्या निरनिराळ्या वसाहतींमध्यें धर्मपंथ फार होते. तसेच कायदे, राजनीति ह्याही निरनिराळ्या असत. तथापि इंग्लिश राज्यव्यवस्था इंग्लिश पद्धतीवर स्थापिलेली असे. पार्लमेंटसारखी एकादी सभा, त्यांतही वरिष्ठ कनिष्ठ सभा असा भेद, सभासद सरकारानें नेमणें, किंवा प्रतिनिधि तत्वानें निवडले जाणें, अशीही व्यवस्था असे. सरकारी वसाहतींचा एक गव्हर्नर असे, व तो राजानें व वसाहतींच्या मालकांनीं मिळून नेमला जात असे. सर्व मिळून लोकसंख्या सुमारें २५ लाख होती.

* ही इंग्लंडचा राजा पहिला चार्लस याची राणी होती (१६०९–१६६९).

ह्या वेळेपासून इंग्लंडचें राज्य विस्तृत होऊं लागलें. कारण, अटलांटिक महासागराच्या दोन्ही बाजूंस इंग्लिश लोकांची वस्ती आढळूं लागली. त्या वेळच्या स्थित्यनुरूप एक विशिष्टावस्था ह्या राज्यास प्राप्त झाली. स्पेन देशाच्या ज्या वसाहती होत्या, त्यांची रचना कृत्रिम होती. स्पेनच्या सरकारानें ह्या रचनेवर फार विचारानें पुष्कळ कसब खर्च केलें होतें. धर्मसंबंधीं व राजकीय प्रकरणसंबंधीं अंमल स्पेन देशांतल्यापेक्षां त्यांच्या वसाहतींत जास्त कडक होता. कारण, वसाहतींपासून एकसारखा वसूल स्पेन देशास येत असल्यामुळें त्यांची त्यांस फार जरूर होती. परंतु इंग्लंडच्या वसाहतींची अशी स्थिति नव्हती. इंग्रज लोक वसाहतींची फारशी पर्वा करीत नसत. या वेळीं इंग्लंडांत तंटे सुरू असल्यामुळें इंग्लिश वसाहतींची ही वरील स्थिति एक प्रकारानें विशेष महत्वाची होती. वसाहतींपासून पैसाच जरी उलट न मिळाला, तरी मूळ देशांत बहिष्कृत झालेल्या लोकांस वसाहतींत जाऊन राहण्यास विपुल जागा होती. सुमारें पन्नास वर्षांपूर्वी मेफ़ावर कॉलिग्नी* यानें वसाहतींचा हा उपयोग उघडकीस आणिला. धर्माच्या बाबतींत एकमेकांचे विरुद्ध असे जे पंथ असत, त्या सर्वांस निरनिराळ्या ठिकाणीं एकमेकांस उपद्रव दिल्याशिवाय पृथक्पणें राहण्यास वसाहतींत पाहिजे तितकी जागा आहे, ही कल्पना प्रथम कॉलिग्नी ह्यास सुचली, व याच कल्पनेस अनुसरून फ्रान्समध्यें 'एडिक्ट आफ् नांट्स्'†, ह्या नांवाचा हुकुम काढण्यांत आला. जर अमेरिकेमध्यें ह्युजेनाट् नांवाचे फ्रेंच धर्मसुधारक जाऊन राहते, तर जगाची स्थिति आज आहे ह्याहून किती बरें भिन्न असती! कॉलिग्नी याची कल्पना इंग्रज लोकांनीं उचलून अंमलांत आणिली.‡ धर्मसंबंधीं

* याचा काल (१५१७–१५७२).

† टीप.—† पान २२२ पहा.

‡ इ. स. १६६३ या वर्षी न्होड नांवाच्या बेटाची सनद झाली, तींत हा मज-

आणीबाणीचे तंटे इंग्लंडमध्यें सुरू असतांनाच इंग्लंडच्या वसाहती स्थापन झाल्या असल्यामुळें इंग्लंड सोडून जाऊन नवीन ठिकाणीं वसाहती करण्यास लोकांस एक प्रकारचें नवीन उत्तेजन मिळालें. वरील तंटे सुरू नसते, तर हें उत्तेजन मिळालें नसतें. पण ह्या कारणामुळें त्याच वेळीं अमेरिका आणि युरोप ह्यांच्यामध्यें एक सुक्ष्म रीतीचें वैमनस्य पडून गेलें. जे लोक स्वदेश सोडून युरोपांतून अमेरिकेंत गेले, त्यांच्या मनांत कांहीं एक गुप्त विचार होता. इंग्लंडांत पूर्वापार चालत आलेल्या परिपाठास निवळ फांटा देऊन अमेरिकेंत इंग्लंडच्यापेक्षां भिन्न अशी कांहींतरी तऱ्हा अमलांत आणावी, हा त्यांचा निश्चय जरी आरंभीं गुप्त होता, तरी तोच पुढें फळास आला.

इ. स. १६४८ या वर्षी इंग्लंडच्या लष्करांत जी दुफळी झाली तिचे योगानें विस्तृत ब्रिटिश राज्यास दुसरें स्थित्यंतर प्राप्त झालें. आलिव्हर क्राम्वेल यानें इंग्लंडांत प्रजासत्ताक राज्याचा पाया मजबूद केल्यावर लोकांच्या तर्फे व राजपक्षाच्या विरुद्ध इंग्लंडचे सैन्यास समुद्रावर दुसरें युद्ध सुरू करणें भाग पडलें. आमच्या मतानें हें युद्ध पहिल्यापेक्षां जास्त महत्वाचें आहे. कारण, क्राम्वेल यानें जें सैन्य जमा केलें होतें, तें लवकरच मोडून जाणारें होतें. परंतु जें आरमार व्हेन* यानें तयार केलें व ज्याचें आधिपत्य ब्लेक§ यास मिळालें, तेंच हें इंग्लंडचें आरमार

कुर खुलासेवार लिहिलेला आहे. " धर्मसंबंधीं स्वतंत्रता सर्वांस सारखी देण्यांत येत आहे. कारण, हीं ठिकाणें एकमेकांपासून फार दूर असल्यामुळें आह्मांस अशी आशा आहे कीं, ह्या राष्ट्रांत जी ऐक्यता व समरूपता स्थापन झाली आहे, त्यांस ह्या स्वतंत्रतेच्या योगानें कोणताही धक्का पोंचणार नाहीं. " धर्मसंबंधीं सर्व व्यवहारांत दुसऱ्या चार्लस राजानें आपल्या मामे-आजाची (फ्रान्सचा चवथा हेन्री) पद्धत नेहमीं लक्षांत ठेविली होती. मं. क.

* टीप.—* पान २१४ पहा.

§ टीप.—§ पान १६१ पहा.

आजपर्यंत सर्व जगभर गाजत आहे. समुद्रावर इंग्लंडचा पगडा याच वेळेपासून बसत चालला. प्रसिद्ध इतिहासकार रॅंके आपल्या इतिहासांत असें ह्मणतो कीं, "भूगोलावर जें अत्युत्तम ठिकाण इंग्लंडास प्राप्त झालें आहे, त्याचा आपल्यास फायदा करून घेतां येईल, व दर्यावर्दीपणा हेंच आपलें स्वभावसिद्ध नेमलेलें काम आहे, असें या वेळेपासून इंग्रज लोकांस पूर्वीपेक्षां जास्त स्पष्टपणें कळूं लागलें." इंग्लंडचा बाणा लष्करी असतांच वरील तत्व इंग्रजांस या वेळीं कळूं लागलें. याचें उदाहरण, क्राम्वेल यानें स्पेनच्या वसाहतींवर हल्ला करून जमेका बेट घेतलें, हें होय. इंग्लंडच्या अर्वाचीन इतिहासांत जुलमानें दुसऱ्या राष्ट्राचे प्रांत हिसकावून घेतल्याचें हेंच एक उदाहरण आहे.

विस्तृत ब्रिटिश राज्याचें याच्यापुढचें स्थित्यंतर ह्मणजे हालंडबरोबरचें युद्ध होय. हें युद्ध दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दीच्या प्रथमार्धात झालें व तें इतिहासरूपी रंगभूमीवर या वेळचें मुख्य पात्र होतें. खरोखर पाहतां या युद्धाचा आरंभ १६२३ त आंबोयना येथील कत्तलीच्या* वेळीं झाला. क्राम्वेलच्या वेळीं वगैरे ह्या युद्धाला थोडें पुष्टीकरण येत होतें. ह्याचा शेवट इ. स. १६७४ या वर्षी झाला, कारण फ्रान्सच्या चवदाव्या लुईबरोबर दुसऱ्या चार्लस राजानें हालंडवर हल्ला केला होता, तो आतां त्यानें तहकूब केला. सुदैवानें या वेळीं हालंड देशास एक त्राता मिळाला. ज्याप्रमाणें पूर्वी स्पेनबरोबरच्या लढाईत वुइल्यम् धि सायलेंट् नांवाच्या सुभ्यानें हालंडची बाजू संभाळिली, त्याचप्रमाणें या वेळीं एक वुइल्यम् नांवाचा सुभा पुढें आला व फ्रेंचांपासून त्यानें स्वदेशाचें

---

* आंबोयना येथील कत्तलः—हें बेट डच लोकांकडे होतें. इ. स. १६१५ चे सुमारास इंग्रज लोकांनीं त्यांत आपलें ठाणें बसविलें. पुढें १६२३ या वर्षी डच लोकांनीं इंग्रजांची फार क्रूरपणानें कत्तल केली.

संरक्षण केलें. हाच पुढें इंग्लंडचा राजा तिसरा वुइल्यम् या नांवानें झाला. तरी हालंड देशास उतरती कळा एक वेळ लागली ती मागें हटली नाहीं. कारण, या दुसऱ्या युद्धांत कितीही जरी पूर्वीचें शौर्य हालंडर्स् लोकांनीं दाखविलें असतें, तरी पूर्वीचें त्यांचें सुदैव या वेळीं त्यांस अनुकूल नव्हतें. ज्याप्रमाणें लढाईच्याच योगानें एकवार त्यांस उन्नतावस्था प्राप्त झाली होती, त्याप्रमाणें पुनः लढाई करून त्यांस ती पुनः प्राप्त झाली नसती. पूर्वी हालंडची लढाई स्पेनबरोबर चालू होती. स्पेनच्या वसाहती विपुल असून त्या त्यांस पाहिजे तेव्हां लुटण्यास सांपडत. परंतु आतां तर त्यांची लढाई फ्रान्सबरोबर होती. पूर्वी हालंडच्या आरमारास स्पेनकडून बिलकुल प्रतिबंध होत नसल्यामुळें सर्व समुद्रांत पाहिजे तिकडे भटकत फिरण्यास त्यांस मोकळीक असे. आतां तर इंग्लंडच्या प्रबल आरमाराशीं त्यांस सामना करावयाचा होता. शिवाय, हालंडचा द्रव्य मिळविण्याचा मुख्य मार्ग समुद्रावरील व्यापार, तोही इंग्लंडांतील नौकानयनाच्या कायद्यानें बंद झाला. ह्मणून, जरी या वेळीं हालंडस् लोकांनीं आपला बचाव केला आणि पुढेंही कांहीं वेळपर्यंत त्यांनीं बरेच पराक्रम गाजविले, तरी त्यांचा ऱ्हास होण्यास एकवार सुरुवात झाली ती झाली. त्यांचा मोठा साह्यकर्ता सुभा इंग्लंडचा तिसरा वुइल्यम मरण पावतांच हालंडची दुर्गति सर्वांस व्यक्त झाली. इंग्रज लोक मूळचेच सधन असल्यामुळें व त्यांजला परकीयांशीं लढून आपलें अवसान खर्चण्याचा प्रसंग न आल्यामुळें ते हळू हळू पुढें सरसावत चालले व हालंडचें वैभव लयास गेलें.

दुसऱ्या चार्लस राजाची कारकीर्द विस्तृत इंग्लिश राष्ट्राच्या इतिहासांत विलक्षण महत्वाची आहे. कारण, या कारकीर्दींत इंग्रज

लोक फारच पुढें सरसावले.* अटलांटिक महासागराच्या बाजूनें अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर उत्तरेकडून दक्षिणेकडे एकसारख्या, मध्यें तुटल्याशिवाय, ज्या इंग्रज लोकांच्या वसाहती पुढील शतकांत सर्व लोकांच्या नजरेसमोर ढळढळीतपणें दिसूं लागल्या, त्यांस प्रथम असें स्वरूप याच वेळीं ह्मणजे दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दींत प्राप्त झालें. इंग्रज लोकांनीं न्यू यार्क आणि डिलावेअर यांतून डच लोकांस हुसकावून दिले व कारोलिना† आणि पेनसिल्व्हेनिया† या वसाहती त्याच वेळीं नवीन वसविल्या. या अमेरिकेंतील वसाहती सर्व एक ठिकाणीं घेतल्या ह्मणजे तत्कालीन स्थित्यनुरूप त्या फारच अवाढव्य होत्या, असें ह्मणावें लागतें. त्यांत विशेष हा होता कीं, त्यांतील लोकसंख्या फार मोठी असून एकजात युरोपिअन लोकांची होती. स्पॅनिश लोकांच्या वसाहती झाल्या तेव्हां जे थोडे युरोपिअन लोक तिकडे राहण्यास गेले होते, ते तेथलि असंख्यात मूळच्या इंडियन लोकांमध्यें मिसळून जाऊन नाहींसे झाले. तसेंच डच लोकांची युरोपांतच लोकसंख्या थोडी असल्यामुळें त्यांच्या वसाहतींतही डच लोक फार नव्हते; ह्मणून डच लोकांच्या वसाहती ह्मणजे लहान लहान व्यापाराचीं ठिकाणें होतीं. फ्रेंच लोकांच्या वसाहतीसुद्धां याच वेळीं लोकांच्या नजरेस येऊं लागल्या. तरी डच लोकांच्याप्रमाणें फ्रेंचांचेही दोष होते. फ्रेंच लोकांच्या वसाहती जेव्हां प्रथमतः होऊं लागल्या, तेव्हां एका गोष्टीची त्यांस फार उणीव होती. वसाहत करून त्यांत जाऊन राहण्याचा त्यांचा

---

* सेन्सबरी असें लिहितो कीं, धाडसानें कोणतीही गोष्ट करण्याची शक्ति आणि वसाहती वाढविण्याची इच्छा हीं या वेळीं एलिझाबेथ अगर जेम्स यांच्या कारकीर्दीप्रमाणेंच इंग्रज लोकांमध्यें दृढ होतीं. 　　　　मं. क.

† टीप.—* पान २३३ पहा.

स्वभावतःच कल नव्हता. फ्रेंच लोकांची लोकसंख्याही त्या वेळेपासून उत्तरोत्तर कमीच होत आली आहे. अटलांटिक महासागराचे किनाऱ्या-वर एकसारखी वसाहतींची रांग असणें, ही हल्लींच्या काळांत जरी विशेष गोष्ट मानिली जाणार नाहीं, तरी त्या वेळीं हें कोणत्याही युरोपिअन राष्ट्रास मोठें अभिमान बाळगण्याजोगें भूषण असून, वसाहतींच्या कामांत नांवा-जण्यासारखें व पराक्रमाचें कृत्य होतें. दुसऱ्या चार्लस राजाच्या कार-कीर्दीच्या शेवटीं इंग्लंडची सर्व लोकसंख्या दोन लक्ष होती. तरी ही लोकसंख्या दर पंचवीस वर्षांनीं दुप्पट होणारी होती.

ब्रिटिश राष्ट्रविस्ताराचें यापुढचें स्थित्यंतर कोणतें आहे बरें? कोलबर्ट* यानें फ्रान्स देशाचा जो विस्तार करविला होता, तो मोडून काढण्याविषयीं इंग्लंड आणि हालंड हे दोनही देश एकत्र मिळून प्रयत्न करूं लागले. कोलबर्टविषयीं आह्मांस असें वाटतें कीं, त्यानें समजून उमजून अमेरिकेबद्दल पाश्चिमात्य राष्ट्रांच्या चालू असलेल्या तंट्यांत फ्रान्स देशा-ला लोटलें. पूर्वी अमेरिकेचा शोध लावण्यांत फ्रेंच लोक इंग्रजांच्या फारसे मागें नव्हते. इंग्लिश दर्यावर्दी फ्राबिशर† आणि ड्रेक‡ यांच्यापूर्वीच जाके कॉर्टिए§ यानें समुद्रांतरीं आपलें नांव पुष्कळ गाजविलें होतें. इंग्लिश मुत्सद्दी राले¶ याच्यापूर्वीच कॉलिग्नी यानें वसाहतींची व्यवस्था कशी करावी

* टीप.—* पान २०३ पहा.

† टीप.—† पान १६४ पहा.

‡ टीप.—‡ पान २०५ पहा.

§ जाके कॉर्टिए (१४९४–१५५५) हा एक फ्रेंच खलाशी होता. ह्यानें १५३४ त कानडा प्रांताचा शोध लाविला फ्रेंच सरकारानें ह्याला सनदा दिल्या होत्या.

¶ टीप.—† पान २०६ पहा.

याजबद्दल बेत चालविले होते. मेफ़्लावर यानें सफर केली त्या वेळच्या सुमारास साम्युएल चाम्लन याच्या देखरेखीखालीं अकेडी, कानडा या मुलुखांत वसाहत होऊन कित्येक शहर स्थापन झालें होतें. इतकें झालें तरी युरोपांतील इतर राष्ट्रांशीं भानगडीचे व्यवहार करण्यांत फ्रेंच लोक गुंतल्यामुळें अमेरिकेंत त्यांची गति खुंटली. तीस वर्षांचें युद्ध* ह्मणून जें मोठें युद्ध झालें, त्याचे योगानें युरोपांतील राष्ट्रांमध्यें फ्रान्स देशास पुढारी-पणा प्राप्त होण्याचा योग आला. त्या शतकाच्या मध्यभागांत फ्रेंच लोक युरोपीय राष्ट्रांशीं सतत लढाई करण्यांत गुंतले होते. स्पेन देशाचें दिवाळें निघून त्याच्या वसाहती अगदीं उघड्या पडल्या होत्या, व हॉलंड आणि इंग्लंड हे देश त्या आपआपसांत विभागून घेत असतां, फ्रान्सानें तिकडे लक्ष न देतां युरोपाकडेसच सर्व नजर पुरविली. बर्गंडीनजीकच्या सरहद्दीवरील प्रदेश आपल्या ताब्यांत घेण्याच्या उद्योगास ते लागले यावरून हें व्यक्त होत आहे. ह्मणून वसाहतींच्या कामांत कामवेळच्या वेळीं फ्रेंच लोक मागें पडले. त्या काळची जगस्थिति माहाब्धिक असून राष्ट्रविस्तार करण्याकडे सर्वत्रांची खटपट चालू होती. याजबद्दलची दाद फ्रेंच मुत्सद्दी माझेरीन† यास नव्हती, असें दिसतें. परंतु माझेरीन कामा-वरून जातांच व लढाई संपून जिकडे तिकडे शांतता होतांच कोल्बर्ट‡

* " तीस वर्षांचें युद्ध (थर्टि यिअर्स वॉर)" हें इ. स. १६१८–१६४८ मध्यें चालू होतें. अलीकडच्या धर्मसुधारणेच्या योगानें जीं कित्येक अघोर युद्धें झालीं त्यां-पैकीं हें मुख्य होय. यांत जर्मनी, आस्ट्रिया, स्वीडन, डेन्मार्क, फ्रान्स, स्पेन, इंग्लंड वगैरे आणखीही युरोपीय राष्ट्रांचें अंग होतें. इ. स. १६४८ या वर्षीं वेस्टफालिया येथें तह होऊन या युद्धाची समाप्ति झाली.

† माझेरीन (१६०२–१६६१) हा प्रसिद्ध फ्रेंच मुत्सद्दी होता. याच्या वेळीं फ्रान्स देश भरभराटींत असून त्या देशाचा बलाढ्य राजा चौदावा लुई यानें राज्य-व्यवस्था आपली माझेरीनच्या पद्धतीवरून उतरून घेतली होती.

‡ टीप—* पान २०३ पहा.

याचें लक्ष या गोष्टीकडे गेलें. डच लोकांनीं व विशेषेंकरून सनद मिळालेल्या कंपनीनें ज्या कांहीं मोठमोठ्या व्यापाराच्या युक्त्या काढल्या होत्या, त्याच कोल्बर्ट यानें उचलल्या. फ्रान्स हा देश पूर्वापार मोकासपणाच्या* पद्धतीनें भरलेला असून त्यांत कलहप्रिय मोठमोठे बडे लोक राहत होते. तर अशा देशास अमेरिकेच्या आकर्षणानें इतर दर्यावर्दी राष्ट्रांस येत असलेलें आधुनिक औद्योगिक स्वरूप आणण्याविषयीं कोल्बर्ट यानें खटपट केली व त्यास कांहीं वेळ यशही आलें. त्या वेळची व्यापाराची पद्धत घालून देण्यांत पुढारीपणा कोल्बर्ट याचा होता, असें आडाम स्मिथ यानेंही आपल्या प्रसिद्ध अर्थशास्त्रांत लिहिलें आहे. कोल्बर्ट हा चौदाव्या लुईचा प्रधान होता. त्या वेळीं युरोपीय राष्ट्रांत पूर्ण भरलेलें असें जें विपरीत व्यापारोत्तेजक स्वरूप तें तो लढाईंत घुसडून देत होता यांत संशय नाहीं.

आडाम स्मिथही यासंबंधीं असें लिहितो कीं, व्यापार जसा व्यक्तिमात्राचे ऐक्यास व सख्यत्वास कारण आहे, तसाच तो राष्ट्रांच्याही ऐक्यास व सख्यत्वास कारण आहे. असें असतांही त्या वेळीं सर्व यूरोपांत अतोनात वैमनस्य आणि तंटे उपस्थित करण्यास हा व्यापारच कारण झाला.

आह्मीं वर असें सांगितलेंच आहे कीं, सतराव्या शतकांत युरोपांतील सर्व खटपटींचीं दोन मुख्य कारणें होतीं. एक धर्मसुधारणा आणि दुसरें अमेरिकेचें आकर्षण. यांपैकीं पहिल्या कारणाचा जोर उत्तरोत्तर कमी होत जाऊन दुसऱ्याचा जोर उत्तरोत्तर वाढत चालला होता. ह्मणून इतिहासाचें अध्ययन करणारानें या दोन कारणांचे परिणाम पृथक ठेविले पाहिजेत. ह्मणजे यांपैकीं एका कारणाचे परिणाम दुसऱ्याचे आहेत अशी

* टीप.—पान १७३ पहा.